
HANSA MEHTA LIBRARY
The Maharaja Sayajirao University
of Baroda
Call No. 7BF
1651
J9-1
M-2131

GIFT FROM SHRI DAJI NAGESH APTE
GIFT
Date 21-5-58
Initial
M. 2131.
7BF
1651
J9-1

# ज्योतिर्माला.

ग्रहा राज्यं प्रयच्छंति ग्रहा राज्यं हरंति च ।
ग्रहैर्व्याप्तं सर्वमिदं त्रैलोक्यं सचराचरम् ॥

"The wise man rules his stars;
The fool obeys them."



पुस्तक १ लें.] मे, १८९५. [अंक १ ला.

विषय. पृष्ठें.

श्री शिवछत्रपतीजन्मवर्णन.... .... .... १-१२

मुंबई:-"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापविलें.

सन १८९५.

[ All Rights Reserved by the Publishers.]

किंमत एक आणा.

जोतिर्माला मासिक पुस्तकाची वर्गणी एक महिन्याचे आंत पाठविणारांस, टपाल हांशीलासह, वर्षाचे फक्त **बारा आणे** पडतील. आगाऊ वर्गणी आल्याखेरीज अंक रवाना होणार नाहीं. सर्व प्रकारचा पत्रव्यवहार पोष्टपेड असून उत्तरास अर्धा आण्याचें तिकीट असावें. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर असावा.

ज्योतिर्मालाकर्ते, फणसवाडी, जगन्नाथाची चाळ,
मार्केट पोष्ट,—मुंबई.

# ज्योतिर्माला.

ह्या मालेचा उद्देश विद्यार्थ्यांस क्रमानें शिक्षण देण्याचा आहे. प्रत्येक व्यक्ती आपले भवितव्यतेची कर्त्री आहे. फलज्योतिषाचे ज्ञानानें संकटें टाळतां येतात, आणि फायदाही करून घेतां येतो. ह्या पुस्तकाचे साह्यानें विद्यार्थ्यांस थोडे काळांत मुख्य तत्त्वांची माहिती होईल. प्रथम अंकांत श्री **शिवछत्रपतीचें** चरित्र दिलें आहे. हें सामान्य लोकांत जिज्ञासा उत्पन्न व्हावी ह्मणूनच दिलें आहे. पुढील अंकांत विद्यार्थ्यांस माहिती येईल.

ह्या मासिक पुस्तकांत थोर पुरुषांची लघु चरित्रें व उपयुक्त माहिती प्रथम विभागांत येईल. दुसरे विभागांत






**गुरुशुक्रशुभाधीशाः केंद्रकोणायगा यदि ।
अनेकयानसंपन्नो मंडलाधिपतिर्भवेत् ॥**

हीं कुंडली मराठी राज्याचे संस्थापक, श्री शिवछत्रपतींची आहे. कुंडली हा आकाशांतील ग्रहांचा नकाशा आहे. ह्या कुंडलींत ग्रह सायनमानाचे आहेत. सायनमानाचा आरंभ मेषसंपातापासून आहे. क्रांतिवृत्त आणि विषुववृत्त ह्यांचे छेदनबिंदूंस संपातबिंदू ह्मणतात. एकाचें नांव उत्तरसंपात अथवा वसंतसंपात आहे. व दुसऱ्याचें नांव दक्षिणसंपात अथवा शारदसंपात असें आहे. संपात चल आहे. संपाताचे गतीस अयनगति ह्मणतात. पृथ्वीचे मध्यभागावर सूर्य आणि चंद्र ह्यांचें आकर्षण होतें त्यामुळें पृथ्वीचा उत्तरध्रुव प्रतिवर्षी थोडा थोडा मागें कलतो. शालिवाहन शके ४४४ चे सुमारास हें आरंभस्थान मेषसंपातांत होतें आणि मेषसंपात रेवतीचे योगताऱ्यांत होता. सूर्य सिद्धांतांत फलादेशाकरितां ग्रह रेवतीचे योगताऱ्यापासून धरावेत असें लिहिलें आहे तें संपातानुरोधें होय. सूर्यसिद्धांतांत वर्षाचें मान, संपातिक वर्षापेक्षां, एक घटकेनें जास्त आहे ह्यामूळें आरंभस्थान प्रतिवर्षी एक कला पुढें जात जात तें हल्लीं एका मताप्रमाणें १९ अंशाजवळ व एका मतानें २३ अंशा जवळ जवळ पुढें गेलें आहे; ह्मणजे मेषसंपातापासून २३ अंशानें पुढें आहे. रेवतीचे योगताऱ्याशीं मेषसंपात शके ४४४ चे सुमारास जो यूती करीत होता तो मेषसंपात हल्लीं उत्तराभाद्रपदावर आहे. सूर्य मेषसंपातीं ह्मणजे विषुवावर आला ह्मणजे



दिनमान व रात्रिमान ३० घटकेचें होतें. ता० २२ मार्चचे सुमारास सर्व पंचांगांत हें मान दिलें जातें. ह्याच मेषसंक्रमणाचा काळ खरा असून चालू पंचांगांत मेषसंक्रमण ता० १२ एप्रिलचे सुमारास देतात. हें निरयण मेषसंक्रमण होय. पत्रिकेचें गणित सायन गणनेचें असून, पंचांगें निरयण गणनेचीं आहेत, त्यामुळें मूळ पायाच चुकला आहे. पत्रिका सायन गणनेवरून केल्यास अनुभव जास्त येईल. ह्या मालेचा उद्देश फलज्योतिषाचा शास्त्रीय रीतीनें ऊहापोह करून सत्यता दाखविण्याचा आहे, ह्मणून ह्यांत सायन गणनेचा स्वीकार केला आहे. व त्यास उपयोगीं पडणारें सायन पंचांग हेंच गणितास आधार घेतलें आहे.

महाराष्ट्र देशावर धनुराशीचा अम्मल आहे. धनुराशीची आकृति घोडेस्वाराप्रमाणें असून त्याचे हातांत तीरकमठ आहे. महाराष्ट्रांतील लोक तिरंदाज व घोड्यावर बसण्यांत कुशल आहेत. गंगा आणि भीमा ह्यांचे कांठीं घोडे बळकट आणि चपल उपजतात. धनुराशीचा अधिपति गुरु आहे. ह्या ग्रहाचे विषुवावर दोन पट्टे आहेत. महाराष्ट्राचे विषुवावर गोदा आणि कृष्णा ह्या नद्या पट्याप्रमाणें वाहत जातात. श्रीराम पत्नीचे विहारस्थानांपैकीं पंचवटी, जनस्थान ( नाशिक ), त्रिंबक, हीं गोदेचे तीरावरील शहरें, सिंहस्थांत, आणि धोममहाबळेश्वर, वाई, माहुली हीं कृष्णेवरील शहरें, कन्यागत पर्वणींत सुर-

मैत्रीची साक्षच देतात. प्रतिवर्षी लाखों लोक आळंदी, देहू येथून ज्ञानदेव-तुकाराम यांचे समाधीचें दर्शन घेऊन आषाढ-कार्तिकांत पुंडलिकाचे दर्शनार्थ पंढरपुरास जातात. महाराष्ट्रीयांचा स्वभाव गुरूचे स्वभावाप्रमाणें शांत व ममताळु असून सहिष्णु आहे. राजकीय विचारांत त्यांचे विचार प्रौढ व प्रगल्भ आहेत. रामदास, वामन, श्रीधर, मोरोपंत, तुकाराम, ज्ञानदेव आणि कबीरादि संतांचे प्रेमरसानें भरलेले ग्रंथ, वेदासही मान डोलवावयास लावीत आहेत. उत्तरेस गोदावरी नदी आणि दक्षिणेस तुंगभद्रा नदी ह्या प्रदेशावर धनुलग्नाचा व गुरूचा अगदीं निकट संबंध आहे. श्री० शिवछत्रपतींचे जन्मकाळीं गुरु धनेंत होता. महाराष्ट्रांत धर्मसंस्थापना करण्यास गुरूनें शिवाजी महाराजांस जन्मास आणिलें, इतकेंच नाहीं तर त्यांची बुद्धि धर्मसंस्थेकडे वळावी ह्मणून सुरगुरूनें पंचमस्थानांत वासही केला आहे. शिवाजी महाराजानें धर्मसंस्थापन करून महाराष्ट्रीयांचें नांव अमर केलें ह्मणून त्यांचे आभार ऐतिहासिक दृष्टीनें मानले पाहिजेत; परंतु अनंतगोलचालकानें देवगुरूचे शांत-सुखद किरणांकडून आह्मावर केलेला उपकार न विसरणें हें एक मानवी कर्तव्य आहे.

श्री० शिवछत्रपतींची कुंडली जी प्रचारांत दिसत आहे ती खोटी आहे. इ० स० १६२७ मध्यें गुरु कर्क राशींत नसून त्या कुंडलींत तो कर्केचा दिला



आहे. ह्या मालेंतील कुंडलींचे ग्रह, ग्रहसाधन पुस्तकावरून केलेले आहेत. हे ग्रह एक दोन अंशांचे अंतरानें, वेधतुल्य ग्रहांशीं मिळतील. गुरु वृश्चिक राशींत २९ अंश, ९६ कला ग्र० सा० पुस्तकावरून येतो. ग्र० सा० पुस्तकांतील ग्रह सुमारें दोन अंशपर्यंत चुकीचे येतात ह्मणून गुरु धनराशींत धरला आहे. शिवाजी महाराजांचा जन्म कर्कलग्नाचे ६ वे अंशांत आहे. दशमभावारंभ मीनेंत २८ अंशांत आहे. हा दशमभाव जेथें चालू कुंडल्यांत जन्मलग्न लिहितात तेथें दर्शित केला आहे. त्याचप्रमाणें जन्मलग्न जेथें चतुर्थभाव मांडतात तेथें दिला आहे. सूर्योदयाचे वेळेस पृथ्वीचे पूर्वक्षितिजावर सूर्य दिसतो. दुपारीं पृथ्वी उदयापासून ९० अंश खालीं जाते ह्मणून रवि आपले डोक्यावर दिसतो. अस्तकालीं पृथ्वी उदयापासून १८० अंश खालीं जाते ह्मणून जन्मलग्न आणि पूर्व-केंद्र आणि अस्तकेंद्र हीं केंद्रें भासमान स्थितीप्रमाणें मांडलीं आहेत. ही पद्धत जास्त शास्त्रोक्त आहे ह्मणून मालेंत कुंडल्या ह्या पद्धतीस अनुसरून येतील.

श्री० शिवछत्रपतींचा जन्म कर्क लग्नावर झाला आहे. ह्याचा अधिपति चंद्र, आपले उच्च राशींत, ह्मणजे वृषभ राशींत आहे. त्यावर गुरूची दृष्टि आहे. त्याचा परिणाम शिवाजीचें शरीर चांगलें ठेवणें हा आहे. सर्वार्थचिंतामणींत असा आधार आहे. 'लग्नेशो स्वोच्चमित्रांशे

स्वनवांशगतेपि वा । शुभग्रहयुते दृष्टे देहसौख्यं विनिर्दिशेत् ॥' धन भावारंभाचा अधिपति चंद्र उच्च आहे ह्मणून शिवाजी महाराजांनीं पुष्कळ लोकांचें संरक्षण केलें. 'स्वोच्चस्थिते शोभनखेचरेंद्रे कुटुंब राशौ शुभ वीक्षिते वा ॥ अनेकसंरक्षणजातपुण्यो लग्नेश्वरे वीर्ययुते स्वतुंगे ॥' धनस्थानांत सिंहराशी आहे तिचा अधिपति सूर्य, उच्च ह्मणजे मेषराशीचा असून दशमांत बलिष्ठ आहे, त्यामुळें शिवाजी महाराजांस सिंहासन प्राप्त झालें. 'स्वोच्चस्थिते वित्तपतौ च केंद्रे सिंहासनप्राप्तिमुदाहरंति' ॥ तृतीय स्थानांत सिंहराशी आहे तिचा अधिपति सूर्य सिंहासनांशांत आहे त्यामुळें छत्रपतीस युद्ध करण्याची हौस होती. 'सिंहासनांशे यदि विक्रमेशे पारावते गोपुरभागयुक्ते ॥ मृद्वंशके वा शुभदृष्टियोगे मनोत्सवो युद्धविशारदः स्यात्' ॥ तृतीय स्थानांत शनि आहे आणि त्यावर मंगलाची दृष्टि आहे, त्याचा परिणाम परस्पर शत्रूंत कलह लावून आपला फायदा करून घेणें हा आहे. तृतीय स्थानांत शनि असतांना मनुष्य शत्रुनाश करून पुष्कळ द्रव्यानें मनुष्यांचें पालन करून निर्भय व नीरोगी असतो. 'श्रेष्ठोदृष्टः स्वसुतगृहभाक् सारभास्वांश्च राजानंदैरिष्टं भजति सशुभं क्रूरदृष्ट्यारिनाशं ॥ भूमीपालो बहुलवसुभिः पालयेद्भूरि लोकान्नीरोगः स्याज्जननसमये यस्य सौरिस्तृतीयः ॥' अफझुलखानास शिवाजीनें कपटानें मारलें हा आरोप इंग्रज इतिहासकारानें केलेला खोटा आहे. अफझुलखानाचे मृत्यूचें वर्णन चिटणिसांचे बखरींत आहे. मि० करकरिया ह्या पारशी गृहस्थानें छत्रपतीवरील आरोप दूर केला आहे.



चतुर्थ स्थानावर ह्याचा विचार होतो. चतुर्थ स्थानाचा अधिपति बुध शुभग्रह आहे. तूळ राशीचा अधिपति शुक्र उच्च आहे. त्याचा परिणाम शिवाजी महाराजांचें अंतःकरण निष्कपटी असणें हा आहे. 'विशुद्धहृदयः शांतो हृदयेशे बलान्विते ॥ गोपुराद्यंशके वापि मृद्वंशादियुते तथा' ॥ चतुर्थ स्थानावर आईचा विचार करतात. चतुर्थ स्थानचा अधिपति बुध, आणि लग्नाधिपति चंद्र, हे वृषभ राशींत आहेत. चंद्र हा बुधाचा मित्र आहे, ह्मणून राजमाता जिजाबाई आणि छत्रपति ह्यांत प्रेम फार होतें. 'यदालग्नसुखेशौ वा मित्रभूतौ परस्परम् ॥ शुभेक्षितौ शुभैर्युक्तौ मातृस्नेहं विनिर्दिशेत् ॥' पंचम स्थानावर संततीचा विचार करतात. पंचम स्थानचा अधिपति मंगळ अष्टम भावाचे शेवटीं आहे आणि त्यावर राहूची दृष्टि आहे त्यामुळें शिवाजी महाराजांचे शुभ्र कीर्तीवर संभाजीचें दुराचरण हा काळिमा होता. 'पुत्रस्थानेश्वरे दुःस्थे लग्नेशेनापि वीक्षते ॥ संदृष्टे कुजराहुभ्यां नित्यं पितृविदूषकः ॥'

पंचम भावाचा अधिपति नवम भावारंभीं घेतला तर मंगळ, शुक्र एकाच भावीं आहेत आणि त्यांवर गुरूची पंचम दृष्टि आहे त्यामुळें छत्रपतीकडून अन्नदान होत होतें. 'अन्नदानकरो नित्यं पंचमेशे शुभंगते ॥ शुभग्रहैः समा-

युक्ते युक्तीशे शुभसंयुते ॥' पंचम स्थानावर बुद्धीचा विचार होतो. गुरु पंचमांत असल्यामुळें शिवाजी महाराजांची बुद्धि चांगली होती; स्मरणशक्ति चांगली होती. राजगुरु दादोजी कोंडदेव आणि धर्मगुरु श्रीसमर्थ रामदास, हे अनुक्रमें पंचम व दशम स्थानसूचक होते. दोन्ही स्थानांचा अधिपति गुरु असल्यामुळें दादोजी कोंडदेवाचे उपदेशावर, रामदास स्वामींचा जास्त ठसा उमटला. त्यांतून राजमाता जिजाबाईचा प्रदर्शक जो शुक्र ग्रह, ( चतुर्थ स्थानचा अधिपति ), तो नवम स्थानांत ह्मणजे धर्मस्थानांत उच्च आहे. ह्यामुळें धर्मरक्षणार्थ जिजाबाईचा उपदेश, अर्थात् ही शुक्राची कृपा आणि गुरूची कृपा ह्या दोन्ही कृपेचे मेळनानें छत्रपतीनें अतुल पराक्रम करून महाराष्ट्र देशास संकटांतून सोडविलें. पंचम आणि नवम ह्या स्थानांस त्रिकोण स्थानें ह्मणतात. तेथें गुरुस्वग्रहींचा आणि शुक्र उच्च आहे, ह्मणून छत्रपतीनीं जी देशसेवा केली ती परमेश्वरास आवडली असें दिसतें. विजापुरचे सरदाराचा मुलगा शिवाजी ह्यास सरदार ह्मणविण्यांत हीनपणा येईल असें परमेश्वरास वाटून त्यास 'छत्रपति' हें पद देवविलें आहे. 'गुरुशुक्रशुभाधीशाः केंद्रकोणायगा यदि ॥ अनेकयानसंपन्नो मंडलाधिपतिर्भवेत् ॥'

षष्ठस्थानावर शत्रूचा आणि नौकरांचा विचार होतो. शिवाजी महाराजांचे शत्रु दिल्लीचे पातशाहा आणि विजापुरकर हे होत. षष्ठस्थानचा अधिपति गुरु पंचम



स्थानांत आहे. शिवाजी महाराजानें एक वेळ विजापुरकराबरोबर सख्य, आणि एक वेळ दिल्लीचे बादशाहाबरोबर सख्य करून अखेरीस दोघांसही जेरीस आणिलें. लग्नाधिपति चंद्र बलिष्ठ असून त्याची दृष्टि गुरूवर आहे. गुरु स्वग्रहींचा आहे त्यामुळें शत्रु ते मित्र होत होते 'लग्नेशाद्बलहीने तु शत्रुस्थानाधिपे यदा ॥ शुभान्विते शुभैर्दृष्टे शत्रूणां मैत्रमादिशेत् ॥' औरंगझेबासारखे शत्रूकडून शिवाजीची तारीफ झालेली आहे. शिवाजी महाराजांचे नोकर सर्व जातीचे लोक होते. वेदोक्त कर्मे करण्याचा ज्यांस अधिकार आहे असे ब्राह्मण–कायस्थ–शेणवी हे छत्रपतीस अनेक प्रसंगीं उपयोगीं पडले आहेत. महाराष्ट्र देशाचें तनुस्थान धन लग्न आहे. महाराष्ट्राचा उदय करण्यास परमेश्वरानें शिवाजीस जन्मास आणलें. नेपोलियनला उदयास आणण्यास फ्रेंच रेव्होल्युशन ( राज्यक्रांति ) करविली, ड्यूक ऑफ वेलिंगटन ह्यास उदयास आणण्यास नेपोलियनचा पराभव वाटरलु येथें करविला, त्याप्रमाणें महाराष्ट्रीयांचें वैभव चिरायु राहवें ह्मणून श्री० शिवाजीकडून अष्टप्रधानादिक राजमंडळ अथवा हिंदुपार्लमेंट बनविलें. इंग्लंदासारखे देशांत पार्लमेंट स्थापन होण्यास बरेच राजांस लोकांकडून शह सोसावे लागले. परंतु अक्षरशून्य, बारगिरानें राजतृष्णेस न जुमानतां हिंदुपार्लमेंट केलें, हा सर्व उपकार सुरगुरूचा होय.

महाराष्ट्रांत प्रतिनिधि सचिवादिक अष्टप्रधानांच्या जहागिरी, दक्षिण महाराष्ट्रांत छत्रपतीची गादी, आणि पटवर्धनांच्या जहागिरी ह्या धन आणि मीन राशींची सम्यक्स्थितिदर्शक होत. महाराष्ट्र देशाचे दशमांत कन्या आहे हें पुणें शहरचे तनुस्थान होय. पेशवाईत महाराष्ट्र देशाचें वैभव जास्त चमकलें. पुण्याचे दशमांत मिथुन आहे. मिथुन हें लंदन शहरचे व विक्टोरिया राणीचें तनुस्थान होय. पेशवाईची अखेरी सन १८१८ चे नवंबर महिन्यांत झाली, आणि विक्टोरिया राणीचा जन्म सन १८१९ मध्यें मे महिन्यांत झाला. अर्थात् महाराष्ट्राचें वैभव परमेश्वरकृपेनें विक्टोरिया राणीस गर्भांतच मिळालें आणि श्रीमंत ब्रह्मावर्तास गेले ! ! महाराष्ट्राचे राजकीय इतिहासांचे अवलोकन करतां महाराष्ट्रास स्वतंत्रा मिळण्याची तजवीज छत्रपतीचे जन्मकाळींच झालेली दिसत आहे आणि तिचा भंग जगांतील सर्व राष्ट्रें एकत्र झालीं असतांनाही होणारा नाहीं. षष्ठ स्थानचा अधिपति गुरु हा शिवाजी महाराजांचा शत्रु होय. पिंगळे प्रधान ह्यांचें ग्रामण्य, पेशव्यांचे उद्दाम वर्तन, करवीरावर पटवर्धनांचा हल्ला, सन १८४४।४५ सालीं बाळाजीपंत नातूनें दाखविलेली कर्तबगारी ही गुरूची कृति छत्रपतीचे गादीस असमाधानाची होती.

सप्तम स्थानचा अधिपति शनि मंगळाकडून विलोकित आहे, त्यामुळें शिवाजी महाराजांस दोन बायका होत्या. अन्य मताप्रमाणें सप्तम स्थानावर शत्रूचा विचार होतो. सप्तम स्थानांत मकरराश आहे. मकर हें उत्तर हिंदुस्थानचें तनुस्थान होय. शिवाजीस उत्तर हिंदुस्थानांत ह्मणजे दिल्ली शहरांत कैदेंत वास करावा लागला आहे. अष्टम स्थानावर मृत्यूचा विचार होतो. मकर राशीचें स्वामित्व गुढघ्यावर आहे. शिवाजी महाराजास मृत्युकाळीं गुडघी रोग झाला होता. नवम स्थानावर दान–धर्म ह्याचा विचार करतात. नवम स्थानाचा अधिपति गुरु पंचम भावांत आहे हा स्वग्रहींचा आहे. नवम भावांत शुक्र मीनेचा उच्च आहे. शुक्र हा शुभ ग्रह आहे. ह्या ग्रहस्थितीच्या परिणामानें शिवाजी महाराज दान कृत्यांत नेहमीं अनंद मानीत असत. श्रीरामदास स्वामींस त्यांनीं राज्य अर्पण केलें होतें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. ‘दानस्थानाधिपे स्वोच्चे शुभग्रहनिरीक्षिते ॥ तत्स्थाने शुभसंयुक्ते दानकृत्स नरो भवेत् ॥’

दशम स्थानावर राजकीय प्रकरणाचा विचार होतो. दशम भावारंभाचा अधिपति गुरु स्वग्रहींचा पंचम स्थानांत आहे. दशम स्थानाचा अधिपति मंगळ नवम भावारंभीं आहे त्यावर गुरूची शुभदृष्टि आहे. दशम भावाचा अधिपति गुरु स्वग्रहींचा असल्यामुळें शिवाजी महाराज हातांत घेतलेली गोष्ट शेवटास नेल्याशिवाय ठेवीत नव्हते. ‘शुभग्रहाणां संबंधमाने तन्नायकेपि वा ॥ स्वोच्चे वा स्वगृहे वापि जातो मानी दृढव्रतः’ एकादश

स्थानचा अधिपति मंगळ आणि शुक्र, हे नवम स्थानांत, ह्मणजे त्रिकोणांत आहेत. शुक्र उच्च आहे त्यामुळें शिवाजी महाराजानें, मित्रांचे साह्यानें, आणि लढाऊ मित्रांचे साह्यानें, अनेक प्रकारचे लाभ संपादन करून पुष्कळ द्रव्य मिळविलें. मित्रभावारंभाचा अधिपति मंगळ हा लढाऊ ग्रह आहे. 'लाभेश्वरे केंद्रगते त्रिकोणे वा समन्विते ॥ लाभे वा पापसंयुक्ते धनलाभमुदीरयेत् ॥'

श्रीशिवाजी महाराजांचे कुंडलींत पूर्वकेंद्रारंभापासून तो पश्चिम केंद्रारंभापर्यंत ६ ग्रह आहेत. ह्या सहांपैकीं केतु खेरीज करून शेष पांचग्रहांत, रवि, शुक्र आणि चंद्र हे तीन ग्रह उच्च आहेत. दशम स्थानांत रवि उच्च आहे. चंद्रावर कांहीं ग्रंथकारांचें मताप्रमाणें सामान्य जनांचा विचार होता. सामान्य मनुष्यास श्री शिवाजी आवडणें हा एक गुण सर्वांत मोठा आहे. लग्नापासून सप्तम स्थानापर्यंत ग्रहांत तीन ग्रह उच्च असल्यामुळें श्री शिवाजीस राजपद मिळालें. 'ग्रहा बलाढ्या यदि पूर्वषट्के स्वोच्चस्थिताः पूर्वदले नृपः स्यात् ॥.

सायनगणिताचे आधारें, श्री शिवछत्रपतीचें जन्मकाळींचें ग्रहांचे संस्कार, जे शिवाजीवर, लोकसमाजावर, देशावर, आणि त्यांचे मरणानंतर, त्यांचे स्थापन केलेले गादीवर जे जे झाले ते ते सर्व ग्रंथांचे आधारें आणि फलज्योतिष्याचे नियमास अनुसरूनच दिले आहेत.

---



विद्यार्थ्यांकरितां क्रमानें माहिती येत जाईल. तिसरे विभागांत सर्वार्थचिंतामणीचें मराठींत भाषांतर येईल. चवथे विभागांत इंग्रजी फलज्योतिषाची माहिती क्रमानें येईल. हाच क्रम पुढील अंकांत ठेवण्यांत येईल.

---

## आगत्याची सूचना.

ज्योतिर्मालेचा हा प्रथम अंक आश्रय मिळण्याकरितां विद्वान् लोकांकडे पाठविण्यांत येत आहे. ज्यांस आश्रय देणें योग्य वाटत नसेल, त्यांनीं लेखी कळविल्यास पुढील अंक पाठविण्यांत येणार नाहीं. जे सद्गृहस्थ लेखी कळविणार नाहींत, ते वर्गणीदार आहेत असें समजून त्यांचेकडे पुढील अंक रवाना होतील. चवथ्या अंकापासून पुढील अंकांच्या प्रति वर्गणीदारांचे संख्येइतक्याच काढावयाच्या आहेत, तेव्हां वर्गणीदारांनीं आणि आश्रयदात्यांनीं ह्या वरील सूचनेचा अव्हेर करूं नये.

ज्योतिर्मालाप्रकाशक.

---

## खालील पत्त्यावर वर्गणी भरल्यास पुस्तकें मिळतील.

पुणें.—बुधवारपेठ—माणकेश्वराचा वाडा—रा० रा० आनंदराव कृष्ण हेबळेकर यांचे घरीं.

इंदूर.—इंग्लिश स्कूल—रा० रा० बापू नरसिंह भावे.

## अगत्याची सूचना.

ज्योतिर्मालेच्या ज्या वर्गणीदारांनीं मालेचे सात अंक घेऊन देखील अद्याप वर्गणी पाठविली नाहीं त्यांनीं ती पाठविण्याची मेहेरबानी करावी. येत्या डिसेंबर अखेर जे गृहस्थ वर्गणी पाठविणार नाहींत त्यांना पुढील अंक रवाना होणार नाहींत.

ज्या वर्गणीदारांस सायन स्पष्ट ग्रहांच्या द्वादशभावात्मक व संक्षिप्त वर्णनासह आपल्या जन्मकाळच्या **कुंडल्या** पाहिजेत त्यांनीं आपल्या वर्गणी सोबत आणखी १ रु० १ आ० पाठवावा. इतरांस २ रु० १ आ० पडेल. सूक्ष्म वर्णन पाहिजे असल्यास पत्रद्वारें विशेष ठराव केले जातील.

हल्लीं उपलब्ध असलेल्या निरयण, केरोपंती, व सायन पंचांगांतून दर पंधरवड्याचे ग्रह येत असल्यामुळें कोणत्याही कालचे स्पष्ट ग्रह काढणें झाल्यास त्या ग्रहांच्या पंधरा दिवसांच्या साधारण गतीवरून ते काढावे लागतात. तेणेंकरून वेळ कितीही सूक्ष्म घेतला तरी ग्रह यावे तसे सूक्ष्म रीतीनें स्पष्ट का[illegible]ां येत नाहींत. ही अडचण दूर व्हावी म्हणून व अगदीं नूतन वि[illegible]र्थ्यास देखील स्वल्प गणितानें व श्रमानें अल्प काळांत पाहिजे त्या वेळची द्वादशभावात्मक अंश कलापर्यंत सर्व ग्रहांची कुंडली काढितां यावी म्हणून आम्ही येत्या इ० स० १८९६ सालाचे मुंबईच्या रेखांशावरून काढिलेले **दैनिक ( रोजचे ) मध्याह्न काळचे सायन स्पष्टग्रह व द्वादशभाव साधन कोष्टक** हीं ता० १५ डिसेंबरच्या सु[illegible]मारास पुस्तक रूपानें छापून प्रसिद्ध करणार आहों. चंद्र हा अति ज[illegible] चालणारा असल्यामुळें तो ह्यांत रोज दुपारचे व रात्रीचे १२ वाजतांचा म्ह० दोन वेळचा व रवि रोजचा मध्याह्नीचा एक वेळेचा विकलापर्यंत सूक्ष्म दिला जाईल. दर प्रतीस आगाऊ किंमत ४ आणे. सदरील मुदतींत ज्योतिर्मालेच्या वर्गणीसोबत जे आणखी ४ आणे पाठवितील त्यांस व त्याच मुदतींत ४ आणे पाठविणाऱ्या इतर ग्राहकांस ह्या पुस्तकाचे आगाऊ वर्गणीदार समजलें जाईल. ग्राहकांच्या संख्येच्या मानानें पुस्तकें काढावयाचीं आहेत म्हणून प्रती उरल्यास, मागाहून किंमत जास्त पडेल.



[illegible]क्षिक दिसतें ह्मणून षोडशांशक्रमकोष्टक पराशराचे मतास अनुसरून देणार आहोंत.

### पारिजातादि योगफलांविषयीं विचार.

( श्लोक २८।२९।३०।३१ ) ऐरावतांशीं जन्म झाला असतां तो मनुष्य सार्वभौम राज्य करणारा व सर्वैश्वर्यवान् होईल; देवलोकांशीं जन्म असेल तर महादान देणारा व [illegible] असा राजा होईल; पारावतांशीं जन्म असेल तर [illegible]क राजा व सर्व शास्त्र जाणणारा होईल; सिंहासनांशीं जन्म असेल तर सर्व लोकांत मान्य व सामान्य भूमिपति होईल; गोपुरांशीं जन्म असेल तर सर्व शास्त्रांत निपुण व नित्य धनवान् होईल; उत्तमांशीं जन्म असेल तर सर्व संपत्तिमान् होईल; पारिजातांशीं जन्म असेल तर धनाढ्य होईल; आणि सर्व ग्रह आणि लग्न स्वनवमांशांत असतील तर मोठा यशस्वी, बुद्धिवान् व सर्व सौख्यांनीं युक्त होईल. हीं वैशेषिकांशांचीं फलें होत.

### क्षणिक ग्रहांविषयीं विचार.

( श्लोक १।२।३।४ ) सूर्योदयापासून २ घटी ३० पलेंपर्यंत मेष लग्न समजावें. पुढें २½ घटीपर्यंत वृषभ लग्न समजावें. ह्याक्रमानें मीनेपर्यंत लग्नें मोजल्यावर पुनः मेषेपासून आरंभ करावा. ह्याप्रमाणें दर एक दिवशीं ( ६० घटकांत ) बारा राशींच्या दोन आवृत्त्या होतात. ( ह्या लग्नांस अधिष्ठित लग्नें असें ह्मणतात. )

उदाहरण कोणत्याही दिवशीं सूर्योदयानंतर ९ घटी ५० पलांनीं अधिष्ठित लग्न कर्क येईल.

प्राणपद—सूर्य ज्या संक्रांतींत असेल ह्मणजे पंचांगावरून तो ज्या राशींत असेल त्या राशीपासून कोणं त ह्मणजे प्रथम, पंचम, किंवा नवम स्थानांत जी चरराशी असेल त्या राशींत सूर्योदयापासून प्राणपदाचा आरंभ होतो. हें प्राणपद दर एक राशीवर १५ पलें असतें असें ज्योतिषशास्त्रज्ञांचें मत आहे. प्राणपद १ घटींत ४ राशी भोगतें आणि १ अंश भोगण्यास त्यास ३० विपलें लागतात. (प्राणपद हा शरीराचा प्राणच समजावयाचा. प्राणपद अशुभ ग्रहयुक्त अथवा अशुभ ग्रहांनीं विलोकित असेल तर तो मनुष्य पापी व दुःखी असतो. शुभग्रहयुक्त किंवा विलोकित असेल तर मनुष्य पुण्यशील व सौख्यवान् असतो.) उदाहरण सूर्य तूळ संक्रांतींत आहे, तर सूर्योदयानंतर ९ घटी ५० पलांनीं प्राणपद मकर राशींत येईल. कारण सूर्य, तूळ ह्या चरराशींत असल्यामुळें प्राणपद मोजण्याला आरंभ तूळ राशीपासून केला, तेव्हां दरएक राशीला १५ पळें ह्या नियमानें तूळ राशीच्या ३ आवृत्त्या होऊन पुढें प्राणपद मकर राशींत आलें.

सूर्यादिग्रहांचा क्षणिक राशि भोगकाल—कोणत्याही दिवशीं सूर्योदयापासून २ घटी ३० पलेंपर्यंत रवि धन राशीवर असतो, पुढें २½ घटीपर्यंत वृश्चिक



राशीवर असतो, ह्या उलट क्रमानें रवि १२ राशी भोगितो. चंद्र २ घटी ३० पलेंपर्यंत प्रत्येक राशीस असतो. सूर्योदयापासून चंद्र धन, मकर, कुंभ आणि मीन ह्या क्रमानें राशि भोगतो. सूर्य आणि चंद्र हे ग्रह ६० घटींत बारा राशि दोन वेळां भोगितात. मंगळ सूर्योदयापासून १ घटीपर्यंत वृषभ राशीवर, पुढें १ घटीपर्यंत मेषावर अशा विपरीत क्रमानें द्वादश राशि ५ वेळां ६० घटकेंत भोगितो. बुध धन राशीपासून विपरीत क्रमानें प्रत्येक राशि एक एक घटिका भोगितो; म्हणजे ६० घटकेंत त्याच्या ५ आवृत्त्या बारा राशींत पूर्ण होऊन जातात. गुरु मीन राशीपासून उलट क्रमानें प्रत्येक राशि ५ घटीपर्यंत भोगितो. हा क्रम सूर्योदयापासून समजावा. ६० घटींत गुरु फक्त १२ राशि एक वेळ भोगितो. शुक्र मिथुन राशीपासून अनुक्रमानें प्रत्येक राशि १ घटीपर्यंत भोगतो. ह्याप्रमाणें ६० घटकेंत १२ राशींत या त्याच्या ५ आवृत्त्या होतात. शनि मेष राशीपासून विपरीत क्रमानें प्रत्येक राशि १ घटीपर्यंत भोगितो. ह्याप्रमाणें शिनीच्या प्रत्येक दिवशीं ५ आवृत्त्या एका भगणांत ह्मणजे १२ राशींत होतात. राहु मीन राशीपासून विपरीत क्रमानें प्रत्येक राशि २ घटी ३० पलेंपर्यंत भोगितो, म्हणजे ६० घटकेंत त्याच्या दोन आवृत्त्या १२ राशींत होतात. केतु कन्या राशीपासून विपरीत क्रमानें प्रत्येक राशि २ घटी ३० पलें-

पर्यंत भोगतो. केतूच्या ६० घटकेंत २ आवृत्त्या भगणांत होतात. उदाहरण—वरील नियमास अनुसरून कोणत्याही दिवशीं सूर्योदयानंतर ९ घ० ५० पलांनीं क्षणिक ग्रह खालीं लिहिल्याप्रमाणें येतील. सूर्य कन्येंत, चंद्र मीनेंत, मंगळ सिंहेंत, बुध मीनेंत, गुरु कुंभेंत, शुक्र मीनेंत, शनि कर्कैंत, राहु धनेंत, आणि केतु मिथुनेंत येतील. गोचरीच्या ह्मणजे पंचांगांतील रवीचा उपयोग क्षणिक ग्रहांत फक्त प्राणपद काढण्यासच लागतो.

एखाद्यानें आपणास एकाएकीं प्रश्न विचारला असतां आपणास जर नऊ ग्रहांपैकीं सूर्य खेरीज करून अन्य ग्रह माहीत नाहींत तर, अथवा पंचांगही जवळ नसेल तर तत्क्षणीं वर सांगितल्याप्रमाणें क्षणिक ग्रहांची कुंडली मांडून त्यावरून फलें सांगावीत असें म्हणतात.

ग्रहांच्या अवस्था—१ बाल, २ कुमार, ३ युवा (तरुण), ४ वृद्ध आणि ५ मृत ह्या पांच अवस्था ग्रहांच्या आहेत. हा अवस्थाक्रम विषम राशींतील ह्मणजे मेष, मिथुन, सिंहादि राशींतील ग्रहांचा सदरील क्रमानें जाणावा. समराशींतील ग्रहांचा क्रम ह्मणजे वृषभ, कर्क, आणि कन्यादि राशींतील ग्रहांचा अवस्थाक्रम विपरीत ह्मणजे उलट घ्यावयाचा. समराशींतील अवस्थाक्रम मृत, वृद्ध, युवा, कुमार आणि बाल ह्या क्रमानें येतो. प्रत्येक अवस्था ६ अंश असते. उ० एक ग्रह जर वृश्चिक राशीच्या १४ अंशावर असला



तर तो युवावस्थेंत आहे असें जाणावें. दशाप्रवेशकालीं सूर्यादिक ग्रह बालादिक ज्या अवस्थेमध्यें असतील त्या अवस्थेप्रमाणें फलें देतात.

(श्लोक ५–८) द्वादशराशि संज्ञा,—(१) मेष, अज, बस्त, प्रथम, क्रिय, ह्या संज्ञा प्रथम राशीच्या होत. (२) वृष, उक्ष (बैल), गौ, तावुरी, शुक्रभ (शुक्राचें स्थान), ह्या संज्ञा द्वितीय राशीच्या होत. (३) बौध (बुधाचें स्थान) नृयुग्म (मनुष्याचें जोडपें) जितुम ह्या संज्ञा तृतीय राशीच्या होत. (४) चांद्र (चंद्राचें स्थान), कुलीर, चतुर्थ राशि, हीं नांवें चतुर्थ राशि दर्शक होत. (५) कंठीरव (सिंह) लेय, ह्या संज्ञा पंचम राशीच्या होत. (६) पार्थोन, षष्ठी, अबला, तन्वी, (स्त्री) ह्या संज्ञा सहावी राशिदर्शक जाणाव्या. (७) जूक, वाणिक, सप्तम, तौली (तागडी धरणारा) हीं नांवें सप्तम राशीदर्शक होत. (८) कौर्प्य, अष्टम, कौज (मंगळाचें स्थान) आणि अलि हीं नांवें अष्टम राशीचीं जाणावीं. (९) जैव (गुरूचें स्थान), धनु, तौक्षिक, चाप, हीं नांवें नवम राशीचीं होत. (१०) आकोकरो, दशम, चक्र, हीं नांवें दशम राशीचीं होत. (११) हृद्रोग, कुंभ, घट, हीं अकरावे राशीचीं होत. (१२) मीन, झष, अंतिम, रिःफ हीं नांवें बारावे राशीचीं दर्शक होत.

द्वादश राशींच्या नांवांत, कांहीं नांवें ग्रीक भाषेंतून

संस्कृत भाषेंत अपभ्रंशानें आलीं आहेत, त्यांचीं नांवें व मूळचे ग्रीक धात्वर्थ येणेंप्रमाणें आहेत :—

| राशी. | संस्कृत शब्द. | ग्रीक धात्वर्थ. |
|---|---|---|
| मेष | क्रिय | Krios |
| वृषभ | तावुरी | Tauros |
| मिथुन | जितुमु | Didumos |
| कर्क | कुलीर | Karkinos |
| सिंह | लेय | Leon |
| कन्या | पार्थोन | Parthenos |
| तूळ | जूक | Zugon |
| वृश्चिक | कौर्प्य | Skorpios |
| धन | तौक्षिक | Toxikos |
| मकर | आकोकरो | Aggokeros |
| कुंभ | हृद्रोग | Uldrochois |
| मीन | इत्थ | Ichthus |

होरा, द्रेष्काण ह्या शब्दांखेरीज केंद्र, हेलि, आर, जामित्र हे शब्द ग्रीक भाषेंतून संस्कृत भाषेंत आले आहेत. केंद्र हा शब्द ग्रीक धातु जो केन्ट्रन (Kentron) ह्यापासून निघाला आहे आणि त्याचा अर्थ वर्तुलमध्य असा आहे. हेलि हा शब्द हीलिआस (Helios) ह्या धातूपासून निघाला आहे आणि त्याचा अर्थ सूर्य असा आहे. आर (Aar) ह्या शब्दाचा अर्थ मंगळ असा आहे. जामित्र ह्या शब्दाचा अर्थ पृथ्वीचे मध्य-रेषेचे दुसरे टोंकाजवळील जागा असा आहे. प्रथम टोंक हें तनुस्थान होय, दुसरें टोंक सप्तमस्थान होय.

(श्लोक ८–१४) द्वादश स्थानांचीं नांवें—( १ ) होरा, तनु, मूर्ति, उदय, शिर, हीं प्रथम स्थानाचीं नांवें होत. (२) वाक्, वित्त, कुटुंब, अक्षि (डोळे), हीं द्वितीय स्थानाचीं नांवें होत. (३) सहोत्थ, दुश्चिक्य, गल, तृतीय, शौर्य, कर्ण, हीं तृतीय स्थानाचीं नांवें होत. ( ४ ) सुख,



अंबु, बंधु, रसातल, हिबुक, वेश्म ( घर ), पाताल, हृदय, वाहन, मातृ ह्या संज्ञा चतुर्थ स्थान दर्शक आहेत. ( ५ ) बुद्धिप्रभाव, आत्मज ( संतति ), मंत्री, विवेक-शक्ति, उदरप्रवेश हीं नांवें पंचम स्थान दर्शक आहेत. ( ६ ) रोग, क्षत, अरि, व्यसन, चोरस्थान, विघ्न हीं नांवें षष्ठ स्थान दर्शक आहेत. (७) चित्तोत्थकाम (मनोविकार), मदन, भर्तृ, कलत्र, दधि, सूप, क्षीर, गुड, मूत्रकृच्छ्र ( लघवीरोग ), गुह्य, हीं नांवें सप्तम स्थान दर्शक होत. ( ८ ) रंध्र, मरण, अंतक, आयुः हीं नांवें अष्टम स्थान दर्शक होत. ( ९ ) धर्म, उदय, पैत्रिक ( बापाचें द्रव्य ), भाग्य, गुरु, तप, लाभ शुभा-र्जित, हीं नांवें नवम स्थान दर्शक होत. ( १० ) आज्ञा, मान, दशम, कर्म, आस्पद, ख, हीं नांवें दशम स्थान दर्शक आहेत. ( ११ ) धनलाभ, आय, हीं नांवें एकादश स्थान दर्शक आहेत. ( १२ ) व्यय, अंत्य, रिःफ, विनाश, लग्नांत्यखंड, हीं नांवें द्वादश स्थान दर्शक आहेत. षष्ठ, अष्टम, आणि द्वादश स्थानीं गेलेले ग्रह नाशकारक होतात.

मेष, वृषभ, कर्क, धन आणि मकर ह्या राशि पृष्ठोदय आहेत ह्मणजे आकाशांत उगवतांना त्या आपल्या मागल्या भागाकडून उगवतात. मिथुन व वरील राशि रात्रीं बलिष्ठ असतात. मिथुन, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, आणि कुंभ, ह्या राशि शीर्षोदय आहेत ह्मणजे मस्तका-

कडून उदय पावतात. मिथुन राशि खेरीज करून बाकीच्या शीर्षोदय राशि दिवसा बलिष्ठ असतात. मीन ही राशि उभयोदय आहे ह्मणजे तिचा उदय पाठीकडून व डोक्याकडून असून ती दिवसा व रात्रीं बलिष्ठ आहे.

## अप्रकाश ग्रह. ( श्लोक १९. )

आकाशांत पुष्कळ ग्रह व तारा आहेत. त्यांपैकीं आर्य लोकांनीं नव ग्रह आणि नक्षत्रांचे ताऱ्यांचा विचार फलज्योतिषांत केला आहे. कांहीं ग्रंथांत अप्रकाश ग्रहांचा उपयोग केला आहे. ह्या ग्रहांस धूमादिक ग्रह अशी संज्ञा आहे. हे ग्रह कुंडलींत मांडण्याचा सामान्य प्रचार नाहीं व त्यांची उपपत्ति कळत नाहीं.

जन्मकाळचा स्पष्ट सूर्य अंश, कला, विकलात्मक काढावा. जन्मलग्न कसें काढावें आणि ग्रह स्पष्ट कसे काढावेत ह्याची माहिती लवकरच येईल. तेव्हां हा भाग पहावा. अप्रकाश ग्रहांचे क्षेपक येणेंप्रमाणें आहेत.

| धूम. | व्यतिपात. | परिवेष. | इंद्रधनु. | ध्वज. |
|---|---|---|---|---|
| रा. ४ | १२ | ६ | १२ | ३ |
| अं. १३ | ० | ० | ० | १७ |
| क. ० | ० | ० | ० | ० |
| वि. ० | ० | ० | ० | ० |

नियम—स्पष्ट रवींत धूमक्षेपक मिळविला असतां धूम उत्पन्न होतो. धूमाचे राशि, अंश, कला आणि विकला १२ राशींतून उण्या कराव्यात ह्मणजे व्यतिपात उत्पन्न होतो. व्यतिपातांत ६ राशि मिळविल्या ह्मणजे परिवेष उत्पन्न होतो. परिवेष १२ राशींत उणा केला



ह्मणजे इंद्रचाप उत्पन्न होतो. इंद्रचापांत १०७ अंश मिळविले ह्मणजे ध्वज उत्पन्न होतो. उदाहरण स्पष्ट सूर्य २ रा० ४ अं० २८ क० आणि १ विकला आहे तर धूमादिक ग्रह कसे येतील?

| स्प० रवी | + | धु० क्षे० | = | धूम. | राशि. | धूम | = | व्यतिपात. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा. २ | + | ४ | = | ६ | १२– | ६ | = | ५ |
| अ. ४ | + | १३ | = | १७ | ०– | १७ | = | १२ |
| क. २८ | + | ० | = | २८ | ०– | २८ | = | ३१ |
| वि. १ | + | ० | = | १ | ०– | १ | = | ५९ |

| व्यतिपात | + ६ राशि | = | परिवेष. | राशि. | परिवेष | = | इंद्रचाप. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | + ६ | = | ११ | १२– | ११ | = | ० |
| १२ | + ० | | १२ | ०– | १२ | = | १७ |
| ३१ | + ० | | ३१ | ०– | ३१ | = | २८ |
| ५९ | + ० | | ५९ | ०– | ५९ | = | १ |

| इंद्रचाप | + | ध्व० क्षेपक | = | ध्वज. |
|---|---|---|---|---|
| ० | + | ३ | = | ४ |
| १७ | + | १७ | = | ४ |
| २८ | + | ० | = | २८ |
| १ | + | ० | = | १ |

पराशराचे मताप्रमाणें धूमक्षेपक वरील क्षेपकापेक्षां २० कला जास्त आहे. त्याचप्रमाणें ध्वजक्षेपक ० रा० १६ अं० ४० कला आहे.

ह्या धूमादि ग्रहांचीं फळें जन्मकाळीं व प्रश्नकाळीं पाहतात. धूमादि ग्रहांचा फलविचार पराशराचे ग्रंथांतून घेतला आहे. कारण, सर्वार्थचिंतामणींत ह्यांचा फलविचार दिला नाहीं.

( १ ) तनु स्थानांत धूम असल्यास मनुष्य शूर, स्वच्छ नेत्राचा, स्तब्ध, निर्दय, दुष्ट, क्रोधी, रोगी, धनी,

हीनांग व राज्य हरण करण्याची इच्छा करणारा असतो. ( २ ) द्वितीय भावांत धूम असल्यास, मूढ, नपुंसक, मतिमान्, रणशूर, गोडबोल्या, असतो. ( ३ ) सहज भावांत धूम असल्यास धनवान्, बायकोनें सोडलेला व दुःखी असतो. (४) चतुर्थ स्थानांत धूम असल्यास सर्व शास्त्रांचा विचार करणारा असतो. ( ५ ) धूम पंचम स्थानांत असल्यास अल्पसंतति, निर्धन, श्रेष्ठ, सर्वभक्षक, मित्र-हीन असा असतो. ( ६ ) धूम षष्ठ स्थानांत असल्यास मनुष्य बलवान्, शत्रुवध करणारा, तेजस्वी, प्रख्यात व निरोगी असतो. ( ७ ) धूम सप्तम स्थानांत असल्यास निर्धन, कामी, परदारलंपट आणि निस्तेज असतो. ( ८ ) अष्टम स्थानांत धूम असल्यास पराक्रम करण्याविषयीं उत्साही, लढाई जिंकणारा, अप्रिय, निष्ठूर व अस्वामी असा असतो. ( ९ ) नवम स्थानीं धूम असल्यास सौभाग्यसंपन्न, धनी, मानी व दयाळू असतो. ( १० ) दशम स्थानांत धूम असल्यास संततियुक्त, संतोषी, मतिमान्, सुखी आणि सत्यनिष्ठ असतो. ( ११ ) एकादश स्थानीं धूम असल्यास मनुष्य धनधान्य संपत्तिमान्, रूपवान्, कलाशास्त्र जाणणारा व गायनशास्त्रज्ञ असतो. ( १२ ) धूम व्यय स्थानांत असल्यास पतित, पापकर्मे करणारा, व्यभिचारी, व्यसनी, व्रणरहित आणि शंढ असतो.

---

टीप:—हीं फलें जेव्हां धूम शुभग्रहांनीं युक्त किंवा विलोकित नसेल तेव्हांच अनुभवास येतील.



## वर्गणीची पोंच.

रा. रा. दामोदर गणेश हर्जीरनीस—मुंबई.
„ बाळाजी कान्होबा विजयकर „
„ केशवराव व्यंकटेश कामथ „
„ महादेव बाळकृष्ण केळकर „
„ रामचंद्र आबाजी खोपकर—उमेळा.
„ गंगाराम आत्माराम सबनीस—मरतिझापूर.
श्री० माधवराव विनायक किबे—आलाहाबाद.
रा. सा. कृष्णाजी सदाशिव रिसवडकर B.A., L.L.B. स. ज. पारनेर.
रा. रा. भिकाजी महादेव पेणसे—पेण.
„ सदाशिव वामन काणे L.M. & S. मुंबई.
श्री. रामप्रसाद बाळमुकुंद जहागिरदार—वासीम.
रा. रा. महादेव गोपाळ बोरगांवकर—इंदूर.
„ डाक्तर गोपाळ परशराम दुबे „
„ केशव चिमणाजी सराफ „
„ दत्तात्रय गोविंद आपटे „
„ आत्माराम गोपाळ जोशी—सैलाना.
„ सेक्रेटरी ने० ज० लायब्ररी—इंदूर.
प्रो. रामकृष्ण सखाराम आठवले M. A.
रा. रा. चिंतामण शिवराम—इंदूर.
„ रामचंद्र केशव „
„ नरहर गणेश „
„ सदाशिव बल्लाळ „
„ विनायक हरी „
„ केशव नारायण खारकर—उरण.
„ बाळकृष्ण दादाजी पाठारे—ठाणें.

( पुढें चालू. )

## ज्योतिर्मालेवर आलेले अभिप्राय.

'ज्योतिर्माला'—ह्या लहानशा मासिक पुस्तकांत फलज्योतिषाची सत्यता दाखविण्याचा व आकाशांतील ताऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध कसा असतो तो दाखविण्याचा विचार आहे. विवेचन पद्धति चांगली पद्धतशीर असते. प्रथमतः थोर पुरुषांची लग्नकुंडली देऊन त्यावरून त्याचे गुणावगुण शास्त्रपद्धतीनें सांगितले असतात. प्रथमांकांत **श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराजांची** तसबीर व कुंडली देऊन तिचें विवेचन केलें आहे. प्रस्तुत पुस्तकावरून एका वादाच्या विषयाचें खरें स्वरूप जगांत प्रगट होऊन तथ्यातथ्य बाहेर पडण्याचा चांगला मार्ग झाला. **केरळ कोकिळ. पु. ९ अं. ९.**

**ज्योतिर्माला**—मासिकपुस्तक, **अंक दुसरा** ह्यांत ज्योतिषाविषयीं माहिती फार चांगली आणि सोप्या भाषेनें लिहिलेली आहे. अंक वाचण्याजोगा आहे. **अंक ४** ह्यांत आपल्या आणि परकीय ज्योतिषाची माहिती सोप्या भाषेनें आणि थोडक्यांत फार चांगली दिलेली आहे. ह्या चौथ्या अंकांत युरोपीय फलज्योतिषाविषयीं फार चांगली माहिती दिली आहे. अवश्य वाचावी. **बालबोध पु. १५ अंक ५।६.**

**ज्योतिर्माला**—हें मासिक पुस्तक नुकतेंच निघूं लागलें आहे. आजपर्यंत त्याचे सहा अंक निघाले. ह्यांत भारत व आंग्लज्योतिषाविषयीं शास्त्रीय माहिती सरळ रीतीनें देण्याचा चालकाचा विचार दिसतो. प्रयत्न नवीन दिशेचा व अत्यंत आवश्यक आहे. यास लोकांनीं अवश्य हातभार लावावा. **विद्यार्थिमित्र. पु. १ लें अं. १२.**

**ज्योतिर्माला**—हें मासिक पुस्तक अर्धकच्च्या खेड्यापाड्यांतल्या जोशांना तर फारच उपयुक्त आहे. एवढेंच नाहीं तर नूतनाभ्यासी विद्यार्थ्यांनींही लक्ष्यपूर्वक याचें अध्ययन केल्यानें बराच लाभ होईल. प्रसंगविशेषीं यांत बरेच कठिण वादग्रस्त



...च्या पलीकडे लोभाच्या पाशांत पडावयाचें नाहीं. ...नंतर त्यांस एक दोन ठिकाणीं शिंदेसरकारच्या ...जणी खात्यांत थोड्याशा अधिक पगाराच्या जागा ...ळाल्या. ह्यावेळीं ह्मणजे इ० स० १८८० चे सुमा... त्यांची बायकी आणि प्रथम पुत्र थोडे काळांत ...एकीं वारले. शिंदेसरकारच्या हुजूरदरबारांत ...जमाखर्चाकडे हे नौकर मृत्युकालापर्यंत होते. ह्यांचें ...र अत्यंत सुबक असून ते छापील अक्षरासारखें ...त असे. ह्यांचे हांतून आपले कामांत एकही चूक ...ी नाहीं. ह्यांची वृत्ति गंभीर असून, मनानें ...र मोकळे असत. प्रत्येक व्यक्तीचे स्पष्ट दोष ...विण्यांत हे गृहस्थ आळस करीत नसत. त्यामुळें ...र्व लोकांस अप्रिय दिसत. परंतु त्यांचा स्पष्टवक्ते... हा ज्यास एक वेळ कळला तो ह्यांचा मित्र झालाच ...ही होत असे. ह्यांचा बांधा उंच असून फारसा ... नव्हता. शरीरानें हे गृहस्थ अशक्त होते. ह्यांस ...याची व थंडीची व्यथा वारंवार होत असे.

...ह्या गृहस्थास लहानपणापासून गणिताचा नाद असल्यामुळें, पुढें सुमारें ३९ वे वर्षी ज्योतिषाचा नाद लागला. कै० वा० बापूदेवशास्त्री ह्या जगमान्य ज्योतिर्विदानें एक ज्योतिष्यावर लिहिलेलें पुस्तक ह्या गृहस्थाचे वाचण्यांत आलें. त्यावरून चालू निरयण पंचांगें किती चुकीची व धर्मशास्त्रास सोडून आहेत हें ...स कळलें. सायनमताचें बिजारोपण प्रसिद्ध कै० वे० शां० सं० बापूदेवशास्त्री ह्यांनींच केलें परंतु स्फुटवक्ता अभियोगी ह्यानें अमरणपर्यंत सायन वृक्षास वेळोवेळीं

सिंचन करून कै० छत्रे, प्रो० टिळक, रा० भागवत इत्यादि ९
मंडळीचें वेळोवेळीं त्यांनीं खंडनही केलें आहे. प्रो वे
किलहार्न ह्यांनीं सायन पंचांग हेंच फक्त आर्य पंचांग अ त्र
असें आपलें मत प्रसिद्ध केलें आहे. सायन पंचांग प्रचा ते.
आणण्याविषयीं स्फुटवक्ता अभियोगी ह्यानें इंदुप्रका हा-
विविधज्ञानविस्तार, आणि ज्ञानप्रकाश ह्यांच्या द्वारें पुष्व नीं
लेख प्रसिद्ध केले परंतु त्यांत त्यांस, चांगलें यश आलें न ळी
तेव्हां त्यांनीं त्याविषयीं एक चमत्कारिक नवें पद्य र शीं
छापून प्रसिद्ध केलें. ते बालबोधांत प्रसिद्ध झालेलें अ त्रे-
ह्या गृहस्थाचा मृत्यु ता. ८ नव्हेंबर सन १८९५ रें च्या
दुपारीं १ वाजतां ग्वालेर येथें झाला. मरणका ाच
थोडा वेळ पूर्वीं हे गृहस्थ आपले चिरंजीवाकडून प तः
महामहोपाध्यायास उत्तर लिहवीत होते त्या पत्रा स,
शेवट होत असतांना देह विसर्जन झाला. का
येथपावेतों कै० वि० र० लेले ह्यांचें त्रोट ंना
चरित्र दिलें. आतां फलज्योतिषाचे बाजूनें विचार कर वस
मकरलग्न उदित असून शास्त्रीय राशि जी कुंभ ती त न
भावांत लुप्त झाली आहे. मकरेंत हर्शल अथवा प्रजाप
हा ग्रह आहे. ह्या ग्रहाविषयीं निश्चयात्मक कां
लिहितां येत नाहीं, तथापि हर्शल हा ग्रह शास्त्रीयवि
याचा दर्शक आहे. पंचमस्थानांत मिथुन ही शास्त्री
राशि आहे. ह्यामुळें जन्मणारा मनुष्य शास्त्रीय वि
यांचा व्यासंगी असला पाहिजे. तनुभावाचा स्वामि
हा षष्ठस्थानांत आहे ह्मणून शरिरास सुख लागणा
नाहीं, ह्मणजे शरीर कृश पाहिजे. (देहाधिपः पापयु
तोष्टमस्थो व्ययारिगो वांगसुखं निहन्ति). लग्नाधिपति



ह्या स्थानांत आहे ह्मणून रा० लेले हे पराक्रमी
ह्यानी आणि मतिमान् (बुद्धिमान्) होते. (लग्नेशे
मो जे षष्ठे सिंहतुल्यपराक्रमी सर्व संपद्युतो मानी
मिळायों मतिमान्सुखी). रा. लेले यांचें बाळपण
रास द्रांत गेलें आहे परंतु पुढें शिंदे यांचे आश्रयाखालीं
एकाची नौकरी मरणकालपर्यंत झाली आहे. हा योग
माल मचा आहे. धनभावाचा अधिपति गुरु नवमस्था-
अक्ष आहे ह्मणून ही स्थिति रा० लेले ह्यांस प्राप्त झाली.
दिसानिशे नवमे लाभे धनवानुद्यमी पटुः बाल्ये रोगी
झाली पश्चाद्यावदायुः समाप्यते). रा० लेले यांचे
हे जे श्रीमान् गृहस्थ असून त्यांचे वडील गरीब होते
दार स्थिति खालील श्लोकांत दिसते. चतुर्थस्थानाचा
हे अधिपति शुक्र सप्तमस्थानांत आहे त्यामुळें रा० लेले
पणांनीं बहु विद्या संपादन केल्या होत्या. राजदरबारांत
असेचें वजन होतें तरी ह्यांचे हातून सभेंत पांडित्य झालें
उम्हीं. (सुखेशे सप्तमे लग्ने बहुविद्यासमन्वितः
दमत्रार्जितधनत्यागी सभायां मूकवद्भवेत्). पंचम-
थानाचा अधिपति बुध सप्तमस्थानांत आहे. ह्मणून
अर्मसंबंधाचा विचार करतां रा० लेले सर्वधर्मसमान
नातनणारे असावेत. त्याचप्रमाणें ह्यांचें शरीर उंच असून
ज्येष्ठमिभक्ति करण्यांत ते प्रवीण होते. (सुतेशे
गृहा गे मानी सर्वधर्मसमन्वितः तुंगयष्टिस्तनुस्वामी-
पभक्तियुक्तैकतेजसा). पंचमभावाचा अधिपति बुध
त क्रयुक्त असून, पंचम भावीं चंद्र हा गुरूचे नवम दृष्टींत
आहे ह्मणून रा० रा० लेले बुद्धिमान् व धारणादिपटु
होते. (सुतर्क्षे शुभे शुभदृष्टयुते बुद्धिमान्॥ गुरौ केन्द्र-


कोणे बुद्धिमान् ॥ पुत्रेशे केन्द्रे शुभान्विते धारणा-दिपटुः ॥ ज्ञे सुते वा सुतेशे बलिनि केन्द्रे वा बुद्धिमान् ॥ ). धनभावाचा अधिपति गुरु नवमस्थानांत आहे ह्मणून रा० लेले हे अभिप्राय देण्यांत प्रवीण असावेत असें दिसतें. केन्द्रे कोणे सौम्यवागीशयुक्ते वीर्योपेते बुद्धिमानिङ्गितज्ञः.

षष्ठस्थानाचा अधिपति चंद्र मिथुन राशींत २७ अंशावर असून दीप्तांश विचार करतां तो षष्ठस्थानांत आहे ह्मणून रा० लेले ह्यांस शत्रु त्यांचे ज्ञातींतलेच असावेत. सायन मताचें मंडण करतांना रा० लेले ह्यांस कै० छत्रे, प्रो० टिळक, रा० भागवत इत्यादिक मंडळींकडून बराच त्रास सोसावा लागला आहे, परंतु सायन पंचांगास मान्यता जर्मन पंडितांनीं दिली आहे. ( षष्ठेशे रिपुभावस्थे स्वज्ञातिः शत्रुवद् भवेत् परजातिर्भवेन्मित्र भूमौ न चलति ध्रुवम् ). परंतु अंतःकाळचे समयासही सायनमताचे मंडणार्थ लेख लिहिण्या इतके स्वकार्यचतुर हे रा० लेले होते. ( षष्ठेशे पंचमे यस्य चलमित्र धनादिकम् दयायुक्तः सुखी सौम्यः स्वकार्ये चतुरो महान् ). रा० लेले ह्यांस दम्याचा व वाताचा विकार होता ह्याचें कारण सप्तमस्थानाचा अधिपति रवि हा अष्टमाधिपति बुधावरोबर आहे. ( सप्तमेशे तनौ चास्ते........ दुष्टो विचक्षणो धीरो वातरुक् स्थीयतेहृदि ). रा० लेले ह्यांचें मत कांहीं अंशीं नास्तिकासारखें असावें आणि त्यांस व्रणरोग असावा. कारण अष्टमाधिपति बुध सप्तमस्थानीं आहे. ( अष्टमेशे तनौ कामे भार्याद्वयं समा-



दिशेत् विष्णुद्रोहरतो नित्यं व्रणरोगी प्रजायते ). रा० लेले ह्यांचे पत्रिकेंत केंद्रांत मंगळ आणि बुध एकत्र आहेत ह्मणून हे गणिती होते. ( केन्द्रे बुधे वा कुजे गणितज्ञः ). रा० लेले ह्यांनीं सायन मताचे प्रसारार्थ अनेक खटपटी केल्या परंतु त्यांत यश मिळालें नाहीं ह्याचें कारण भाग्यभुवनाचा अधिपति शुक्र सप्तमस्थानांत आहे. भाग्येशेच मदे कल्पे गुणवान्कीर्तिमान् भवेत् कदाचिन्न भवे त्सिद्धं यत्कार्यं कर्तु मिच्छति. स्थलसंकोचास्तव हें चरित्र येथेंच पुरें केलें आहे.

## राष्ट्रीयसभा.




राष्ट्रीयसभेची प्रथम बैठक ता० २८ डिसेंबर सन १८८५ रोजीं दुपारीं मुंबई वेळ १२ वाजतां शेठ गो०


तेजपाल यांचे संस्कृतपाठशाळेंत भरली होती. त्या वेळीं मि० बानर्जी ह्यांनीं अध्यक्ष ह्या नात्यानें राष्ट्रीयसभेची स्थापना झाली असें विदित केलें. हा इष्टकाळ राष्ट्रीयसभेच्या जन्माचा मानिला पाहिजे. ह्या वेळीं मेष ह्या चर राशीचें लग्न नववे अंशांत उदित असून मुंबईशहरचें तनुस्थान जें तूळ तें अस्तास जात होतें. लग्नाधिपति अथवा राष्ट्रीयसभेचा प्राण जो मंगळ तो षष्ठ स्थानांत ह्मणजे पुणें शहरचें तनुस्थान जें कन्या त्यांत असून तनुस्थानावर अष्टम दृष्टीनें पाहत आहे. दक्षिण केंद्रांत उत्तर हिंदुस्थान, अलहाबाद ह्यांचें मकरलग्न आकाशांत मध्यवर्ती उदित असून तेथेंच सूर्यमालेचा चालक रवि जलतत्त्वांत बसला आहे. उत्तर केंद्रांत कलकत्त्याचें तनुस्थान जें कर्क तें उदित असून तेथेंच उत्तर हिंदुस्थानचा अधिपति जो शनि हा जलतत्त्वांत बसला आहे. अस्तकेंद्रीं ह्मणजे मुंबईशहराचे तनुस्थानांत अथवा तूळ लग्नांत हर्शल (प्रजापति) गुरु, आणि लोकसमुदाय दर्शक जो चंद्र हे ग्रह असून ते राष्ट्रीयसभेच्या तनुस्थानावर पहात आहेत. पृथ्वीचे ऊर्ध्वभागीं केतु, शुक्र, रवि, बुध, हर्शल (प्रजापति) गुरु आणि चंद्र हे ग्रह उदित होते, त्याचप्रमाणें पृथ्वीचे अधोभागीं मंगळ, राहु, शनि, आणि नेपच्यून (वरुण) हे ग्रह उदित होते.

राष्ट्रीयसभेच्या तनूचा मालक तनूस अष्टम दृष्टीनें पाहत असून त्यावर चंद्र आणि गुरु ह्यांची सप्तम दृष्टि आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचें आयुष्य अल्प काळाचें नाहीं. लग्नाधिपति मंगळ, कन्या ह्या द्विस्वभाव राशींत आहे ह्मणून राष्ट्रीय सभेच्या मूळ उद्देशांत आणि तिचे धुरीणत्वांत पुष्कळ घडामोडी द्विस्वभाव राशीचे स्वभावानुरूप होणार आहेत. धनभावांत नेपच्यून अथवा वरुण हा पापग्रह असून धनभावाधिपति शुक्र अधिकारयुक्त नाहीं ह्मणून राष्ट्रीयसभेचा फंड अथवा सांपत्तिक स्थिति कांहीं अंशीं समाधानकारक असणार नाहीं. तृतीय स्थानचा अधिपति बुध हा विद्वान् लोकांचा कारक ह्मणजे दर्शक असून तो नवम स्थानांत आहे ह्मणजे स्वसन्मुख राशींत आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचे चिटणीस काम करण्यास दुर्बल दिसत आहेत; परंतु नवम भावाचा अधिपति गुरु केंद्रीं आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचे चिटणीसांचें दौर्बल्य प्रसिद्धीस येणार नाहीं. चतुर्थ स्थानचा अधिपति चंद्र लोकमताचा व स्थावर मालमिळकतीचा दर्शक सप्तम स्थानांत गुरुबरोबर आहे ह्मणून जमिनीवरील सारे, मीठ इत्यादिकांविषयीं लोकांची कुरकूर नाहींशी होणार आहे. आणि राजकीय भुवनाचा ह्मणजे दशम स्थानचा कारक शनि चंद्रक्षेत्रीं आहे. शनि हा कृषीकर्माचा कारक आहे. चंद्र लोकमताचा व राष्ट्रीयसंपत्तीचा ह्मणजे स्थावराचा कारक शुक्राचें स्वगृह जें तूळ तेथें आहे. आणि शुक्र शनीचे घरीं आहे. ह्मणून लोकमत, सामान्य लोक आणि कृषीकर्मावर अवलंबून राहणारे मध्यम प्रतीचे लोक ह्यांमध्यें स्नेहभाव शुक्र, शनि आणि चंद्र ह्या ग्रहांचें क्षेत्रान्वयें वृद्धिंगत होईल. केंद्रांत चर राशि असून त्यांत पांच ग्रह आहेत ह्मणून राष्ट्रीयसभेचें स्थलांतर केंद्रान्वयें झालें आहे. राष्ट्रीयसभेची प्रथम बैठक मुंबई शहरचे तनु स्थानांत, दुसरी बैठक कलकत्याचे तनुस्थानांत (कर्क लग्नांत), तिसरी बैठक मद्रास

शहरचे तनुस्थानांत ( मेषेंत ), चवथी बैठक अलहाबादचे तनुस्थानांत ( मकरेंत ), आणि पांचवी बैठक पुन्हा मुंबईचे तनुस्थानांत ( तूळेंत ) झाली. पांच बैठकांनीं केंद्रक्रम सोडला नाहीं. त्याचप्रमाणें केंद्रांतही पांच ग्रह आहेत. सहावी बैठक कलकत्त्याचे तनुस्थानांत झाल्यावर सातवे बैठकीस केंद्रक्रम बदलून ती बैठक नागपुरचें तनुस्थान जें कन्या त्यांत झाली. पुणें शहरचें तनुस्थान कन्यालग्न आहे. पेशवाईचा व भोंसलेशाईचा उत्कर्ष व अंत सारखाच झाला आहे. श्री० बाजीराव कोरेगांवीं, आणि आप्पा साहेब भोंसले सितावर्डीस एकाच काळीं पराभूत झाले आहेत आणि राजसुखास मुकले आहेत. दोन्ही शहरांचें साम्य पुष्कळ प्रमाणांनीं मिळतें ह्मणून नागपूरचें लग्न कन्या असावें असें खात्रीपूर्वक वाटतें. कलकत्याचे तनुस्थानापासून तृतीय स्थानांत राष्ट्रीय सभेची सातवी बैठक झाल्यावर आठवी बैठक पुन्हा दशमांत ह्मणजे अलहाबादचे तनुस्थानांत झाली. दशमस्थानापासून तृतीय स्थानीं ह्मणजे मीनलग्नांत नववी बैठक झाली. ही बैठक पंजाबचे राजधानींत ह्मणजे लाहोरांत झाली. मीन ही जलराशि आहे. पंजाब हा शब्द पांच नद्यांचा दर्शक आहे. १० वी राष्ट्रीय सभा केंद्रक्रमान्वयें मेष राशींत ह्मणजे मद्रासचे तनुस्थानांत झाल्यावर, अकरावी राष्ट्रीय सभा त्रिकोणांत आली. महाराष्ट्राचें तनुस्थानांत धन लग्न आहे. हे नवम स्थानांत आहे आणि पुणें शहरचे तनुस्थान पंचम भावाचे अंतीं आहे. पुणें शहराचें तनुस्थान किती अंशांत आहे हें नक्की ठरविण्याचीं अन्य साधनें

## स्फुटवक्ता अभियोगी.






देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हीच क्रिया धरावी ॥

'स्फुटवक्ता अभियोगी' ह्यांचें खरें नांव रा. रा. विसाजी

रघुनाथ लेले असें आहे. ह्यांचें जन्म शके १७४
ह्मणजे इ० स० १८२७ सालीं आगष्ट महिन्याचे १५
तारखेस शुक्रवारीं ४ वाजून ३९ मिनिटांनीं मुक्काम क्षे
नाशिक येथें झाला. ह्यांचे आजे चांगले श्रीमंत हो
परंतु, वडिलांस गरिबी प्राप्त झाली होती. तरी, ल
नपणीं ह्मणजे अकरा बारा वर्षांचे वयापर्यंत ह
शाळेंत पूर्णांक, अपूर्णांक शिकून, मातुलगृहीं रूपाव
आणि अमरकोश ह्यांचा अभ्यास करून, वडिलांपा
पांच उपनिषदें ह्मटलीं. पुढें त्यांचीं आईबापें य
करितां बाहेर पडलीं, आणि ह्या मुलास त्यांनीं त्या
मावशीच्या येथें नाशकासच ठेविलें. तेथें त्यांचा ब
अभ्यास झाल्यावर हे गृहस्थ निर्वाहाकरितां, प्रथ
एका रोटीवाल्याच्या कारखान्यांत, जमाखर्च मांडण्
क रुपया दरमहावर राहिले. आणि मग पुढें
रोपियन व्यापाऱ्याकडे तीन रुपयांवर राहिले. नंतर त्य
काटात लहानशी जागा मिळाली. तेथें बरेंच दि
काम केलें. इतक्यांत चीं मातापितरें महायात्रा कर
ग्वालेरीस येऊन राहि
राहिले. ग्वालेरच्या दरबारांत मोठ्या प्रयत्नानें त्या
चाकरी मिळविली होती, आणि ती चांगली लाभदा
होईल अशी आशा त्यांस उत्पन्न झाली होती.
दरबारांतल्या लहान मोठ्या लोकांच्या नानाप्रकारच्
कपटांनीं आणि भानगडींनीं त्यांचा सगळा हेतु फसल
आणि तेव्हां त्यांस एक प्रकारचें वैराग्य उत्पन्न होऊ
त्यांनीं असा निश्चय केला कीं, कोणीकडून तरी, सरासरी
निर्वाहास मिळेल, एवढा मात्र उद्योग करावयाच



विषयही येण्याचा पूर्ण संभव असल्यानें मोठ्या लोकांनींही हें अवश्य संग्रहीं ठेवावें. **चंद्रकांत.** २६ जुलई १८९५.

ज्योतिर्माला—नांवाचें लहानसें मासिक पुस्तक मुंबईत निघूं लागलें आहे. आज आमच्या पुढें ५ अंक आहेत त्यावरून ज्योतिषाच्या विषयीं यांत थोडक्या किमतींत पुष्कळ चांगली माहिती वाचकांस मिळेल असें आह्मांस वाटतें. इंग्रजी फलज्योतिष व देशी फलज्योतिष यांचा यांत संग्रह असून उदाहरणासाठीं थोर माणसांच्या चरित्रांचा त्यांच्या पत्रिकेशीं कसा संबंध आहे हेंही यांत देण्यांत येतें. एकंदरींत किंमतीच्या मानानें पुस्तक संग्रहास व आदरास पात्र आहे. **ज० हितेच्छु.**

ज्योतिर्माला—ह्या मासिक पुस्तकाचे आजवर सहा अंक निघाले आहेत. फलज्योतिशाचा भाग जितका आला आहे, तो त्या शास्त्रास सर्वथा धरून आहे, असें आम्ही तज्ज्ञांच्या अभिप्रायावरून म्हणूं शकतों. **ग्रंथमाला.**

## सुप्रसिद्ध ज्योतिषांचे अभिप्राय.

वे० शा० सं० रा० रा० अमृतराव महादेव वाघोलीकर, कोल्हापूर येथील प्रसिद्ध ज्योतिषी, हे कळवितात कीं ज्योतिर्माला हें पुस्तक सप्रमाण रीतीनें ज्योतिषाची माहिती चांगली देत आहे. हें पाहून मजला आनंद वाटत आहे. लोकाश्रयास पुस्तक पात्र आहे.

वे० शा० सं० रा० रा० आत्माराम गोविंद जोशी वाघबेकर, राहणार कर्जत, जि० कुलाबा, कळवितात कीं ज्योतिर्मालेचे पहिले पांच अंक पाहण्यांत आले. कर्त्याचा उद्योग स्तुत्य आहे. विषयाचें प्रतिपादन सप्रमाण झाल्यास याहूनही बहार होईल. हें मासिक पुस्तक संग्राह्य आहे असा आमचा अभिप्राय आहे.

# MODERN ASTROLOGY.

Annual Subscription 6 s. 6 d. (Rs. 6) Post free.

Annual subscribers, who remit 6/6 to the Proprietors of the *Modern Astrology* 1 & 2 Bouverie St., Fleet St., London, E. C. or the Proprietors of the Jotirmálá, are entitled to the following privilege, *free of charge*, if they send with their subscription exact time (state if before or after Mid-day,) date and place of birth.

1.—Their horoscope cast and brief delination given free of charge.

2.—Their directions calculated for the current year, shewing fortunate or unfortunate periods, as the case may be, with useful advice thereon.


## एजंटांचीं नांवें.

कोल्हापूर.—वे. शा. सं. रा. रा. आमृतराव महादेव वाघोलीकर—गंगावेशींत दांडेकराचा वाडा.

पुणें.—बुधवारपेठ—माणकेश्वराचा वाडा—रा० रा० आनंदराव कृष्ण हेबळेकर यांचे घरीं.

इंदूर.—इंग्लिश स्कूल—रा० रा० बापू नरसिंह भावे, असिष्टंट-मास्तर.

नाशिक.—वे. शा. सं. रा. रा. विष्णु रावजी राहळकर, ज्योतिषी.


सन १८९६ सालचें रोजचें स्पष्ट ग्रहांचें पुस्तक जानेवारी अखेर साडेचार आणे पाठविणारांस मिळेल. सायन द्वादशभावात्मक पत्रिकेचें स्थूल वर्णन १ रु० १ आण्यास मिळेल.



पत्ता :—फणसवाडी, जगन्नाथाची चाळ—मार्केट पोष्ट, मुंबई.

मुंबई :—"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापविलें.


# ज्योतिर्माला.

THE JOTIRMALA OR THE GARLAND OF ASTROLOGY.

ग्रहा राज्यं प्रयच्छंति ग्रहा राज्यं हरंति च ।
ग्रहैर्व्याप्तं सर्वमिदं त्रैलोक्यं सचराचरम् ॥

"The wise man rules his stars;
The fool obeys them."




पुस्तक १ लें.] फेब्रुआरी, १८९६. [अंक १० वा.



| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| विद्यार्थ्यांकरितां सुलभ माहिती.... .... | २१–२६ |



विषयक्रमः—थोर पुरुषांच्या व संस्थेच्या कुंडल्या अंक १,५ आणि ९.

" आर्यफलज्योतिषाची सुलभ माहिती " २।६।१०.

" सर्वार्थचिंतामणीचें भाषांतर " ३।७.

" युरोपिय फलज्योतिषाची माहिती " ४।८.



[ All Rights Reserved by the Publishers.]


वर्षाची किंमत १२ आणे.

# पत्रिका.

आमचेकडे पत्रिका करण्याबद्दल सूचना बऱ्याच वर्गणीदारां-कडून आल्या आहेत. परंतु वेळ आम्हांस [illegible] त्रिका करण्यास विलंब बराच लागला आहे [illegible] च वेळेस देणें अशक्य आहे. सवडीप्रमाणें [illegible] विण्यांत येईल. पत्रिकेंतील वर्णन [illegible] तें कोणत्याही कारणानें जमत नसेल तर दुरुस्त [illegible]

---

## फक्त वर्गणीदारांस सूचना.

सन १८९६ चे स्पष्टग्रहांचें पुस्तक छापण्यास विलंब लागल्या-मुळें फेब्रुआरीचा अंक उशीरानें निघाला आहे. ज्योतिर्मालेची वर्गणी वर्गणीदारांनीं कृपा करून ह्या महिन्याचे अंत पाठवावी. अंकांतून पुष्कळ सूचना देऊन व पत्रेंही पाठवून वर्गणी पाठविण्या-बद्दल सूचना केल्या, परंतु तिकडे कांहीं दक्षिणेंतील सरदार, युनिव्हर-सिटीचे पदवीधारक, सरकारी अधिकारावर असलेले रावसाहेब व रावबहादूर ह्यांनीं फारच दुर्लक्ष केलें आहे. ज्योतिर्मालेची वर्गणी बुडवण्याची ज्यांची इच्छा आहे त्यांनीं कृपा करून एका कार्डावर आम्हांस पुस्तकाची जरूरी नाहीं इतकें तरी कळवावें म्हणजे अंक त्यांकडे पुढें येणार नाहीं. ज्यांचेकडून वर्गणी येणार नाहीं व अंक बंद करण्याबद्दलही कळविलें जाणार नाहीं त्यांचीं नांवें ११ आणि १२ अंकांत प्रसिद्ध होतील आणि त्यांचे परिणामाबद्दल आम्हांवर कांहींच जबाबदारी राहणार नाहीं.

ज्योतिर्माला प्रकाशक.

---



असेल तर दोन प्रहरपासून जन्मकाळापर्यंत गेलेले तास, मिनिटें व दर तासास १० सेकंद याप्रमाणें त्या दिव-साच्या नाक्षत्रकाळांत मिळवावे. येईल तो जन्मकाळचा नाक्षत्रकाळ जाणावा. नाक्षत्रकाळ कमी असल्यास वजा-बाकी करतांना कधीं अडचण पडली तर त्या नाक्षत्रकाळांत २४ तास मिळवावे व मग वजाबाकी करावी; त्याचप्रमाणें मध्यान्हकाळापासून जन्मकाळापर्यंत गेलेले तास मिळ-विल्यावर नाक्षत्रकाळाची बेरीज जर २४ तासांहून जास्त असली तर त्या बेरजेंतून २४ तास वजा करावे. कारण, नाक्षत्रकाळ २४ तासांहून कधींही ज्यास्त नसतो. [illegible] काळाची रोजची गति सुमारें ४ मिनिटें ह्म० दर [illegible] १० [illegible] आहे. म्हणूनच वर दर तासास १० [illegible] माणें [illegible] लें आहे. आतां ता. ९ [illegible] रीचा [illegible] च्या पुस्तकांत पृष्ठ २ वर १८ तास [illegible] सेकंदें आहे. त्यांत दोन प्रहरांनंतर [illegible] २ मिनिटें व (दर




तासास १० सेकंदप्रमाणें) ४९ सेकंद मिळवा. ह्याची बेरीज २३ तास ५० मिनिटें व २२ सेकंदें झाली. हा वरील उदाहरणांतील जन्मकाळचा नाक्षत्रकाळ झाला. आतां जर जन्मकाळ त्या दिवशीं सकाळचे ४ वाजून ५२ मिनिटांचा असता तर त्या दिवसाच्या नाक्षत्रका-ळांतून ७ ता. ८ मि. व (तासास १० सेकंदप्रमाणें) ७१ सेकंद वजा करावे लागले असते. कारण, दोन प्रहर ह्म० १२ तास, त्यांतून ४ ता. ५२ मिं. वजा दिलीं ह्मणजे ७ ता. ८ मि. राहतात, ह्मणून त्या दिवसाचा नाक्षत्रकाळ १८ ता. ५७ मि. २२ से. ह्यांतून ७ तास ९ मि. ११

से. वजा जातां बाकी ११ तास ४८ मि. २२ से. हा इष्ट नाक्षत्रकाळ झाला असता. वरील जन्मकाळ रात्रीचे १० वाजतांचा असता तर १८ तास ५७ मि. ३३ से.+१० तास व (१०से. प्रमाणें) १०० से.=२८ तास ५९ मि. १३ से. हा इष्ट नाक्षत्रकाळ झाला असता. हा २४ तासांहून जास्त आहे, ह्मणून २४ तास वजा करून बाकी ४ तास ५९ मि. १३ से. खरा नाक्षत्रकाळ उरला असता. हाच जन्म, तारिख ८ एप्रिल सकाळीं ७ वाजतां झाला असता तर त्या दिवसाच्या नाक्षत्रकाळांतून ५ तास (१० से. प्रमाणें) ५० से. वजा करावे लागले असते. कारण दुपारचे १२ तासांतून सकाळचे ७ ता. ८ एप्रिलचा नाक्षत्रकाळ १ ता ह्मणजे बाकी ५ तास उरतात. ज्योतिर्मालेआहे. त्यांतून ५ तास ० मि. ५० वाचे आंत पाठवाते बाकी २० पाठवून वर्गणी पाठविझाला असता. क्षिणेंतील सरदार, युगून १ त २४ तास ७ मि. १की केली. याप्रमाण पाहिजे त्या नाक्षत्रकाळ काढल्यावर बारा भाव काढावे.

**द्वादशभाव काढण्याची रीतिः**—स्पष्ट ग्रहांच्या पुस्तकांत पृष्ठ २६ पासून भावसाधन कोष्टक दिलें आहे. त्यांत दर पानावर प्रथमनाक्षत्र काळाचे तास, मिनिटें व सेकंद आहेत. पुढें प्रत्येक सदराच्या मथाळ्यावर १०, ११, १२, लग्न, २, ३ असे अंक आहेत. हे क्रमानें दशम, एकादश, द्वादश, लग्न (प्रथम), द्वितीय व तृतीय भाव दर्शवितात. भावदर्शक आंकड्यांखालीं संक्षेपानें राशींचीं नांवें दिलीं आहेत. राशींच्या खालीं पुन्हा अंक दिले आहेत, ते त्या



त्या राशींचे अंश दाखवितात व लग्नाखालील राशींचे अंश व कला दाखवितात. पृष्ठ २६ वरील १ ल्या ओळीचा अर्थ असा आहे कीं, जन्मकाळचा नाक्षत्रकाळ जर ३ मिनिटें ४० सेकंद असला तर दशम स्थानांत मेषराशीचा १ अंश, एकादशांत वृषभेचे ४ अंश, द्वादशांत मिथुनेचे ८ अंश, लग्नांत कर्केचे ८ अंश ३६ कला, द्वितीयांत सिंहेचे २ अंश व तृतीयस्थानांत कन्येचे ० अंश उदित असतील. याप्रमाणें २४ तासांपर्यंत कोणताही नाक्षत्रकाळ इष्टकाळीं आला असतां या कोष्टकावरून वरील ६ भावांत कोणत्या राशि व त्या राशींचे किती अंश उदय पावतात हें काढावें. आकृति १ पहा. आतां आपल्या




आकृति १.
रविवार ता. ५ ज्यानेवारी सन १८९६ रोजीं संध्याकाळीं ४ वाजून ५२ मिनिटांनीं प्रत्येक भावांत कोणत्या राशि व त्या राशीचे किती अंश उदय पावले होते ते दाखविते.

उदाहरणांत जन्मकाळाचा नाक्षत्रकाळ २३ तास ५० मि. २२ से. काढिला होता. हा काळ किंवा हा न मिळा-

त्यास जवळ जवळ इतकाच नाक्षत्रकाळ भावसाधनकोष्टकांत पाहून काढावा. या कोष्टकाच्या ३२ व्या पृष्ठावर २३ तास ४९ मि. ० से. इतका नाक्षत्रकाळ सांपडतो. तो आपल्या इष्ट नाक्षत्रकाळाच्या अगदीं जवळ जवळ आहे ह्मणून तोच घेऊन त्यावरून भाव काढावे. या नाक्षत्रकाळाच्यापुढें उजव्या बाजूच्या दुसऱ्या सदरांत २७ अंश आहेत, २७ च्या वर एकसारखें पाहत गेलें तर मीन राशि व तिच्या माथ्यावर १० आहेत, १० म्ह० दशमभाव; याचा अर्थ दशमभावाचा आरंभ मीन राशीचे २७ अंशावर झाला असा आहे. ह्मणून दशमभावारंभीं मीनेचे २७ अंश मांडावे. वरील २७ अंशांपुढें कोष्टकांतील तिसऱ्या सदरांत वृषभ राशि. वृषभेच्या अगदीं माथ्यावर मेष, ११ (एकादशभाव) स्थानारंभीं वृषभ राशि किंवा ... एकावे; येथें जरी माथ्यावर मेष आहे तरी मेषराशीशीं आपणास कांहीं एक कर्तव्य नाहीं, कारण कीं, त्या राशीचे सर्व अंश आधींच संपून गेले व आपण काढलेल्या नाक्षत्रकाळीं वृषभेस आरंभ झाला. वृषभेपुढें चौथ्या सदरांत ४ अंश आहेत, वर पाहिलें तर मिथुन, तिच्या अगदीं माथ्यावर वृषभ व तिच्यावर १२ (द्वादशभाव) आहे; ह्मणून द्वादशस्थानारंभीं मिथुनेचे ४ अंश मांडावे, कारण वृषभेचे सर्व अंश आधींच संपून गेले. पांचव्या सदरांत ९ अंश १७ कला आहेत, वर पहात गेलें तर कर्क आहे, कर्केच्या अगदीं माथ्यावर मिथुन व वर लग्न आहे; ह्मणून लग्नांत कर्केचे ९ अंश १७ कला मांडाव्या, कारण मिथुनेचे सर्व अंश आधींच सरले.



सहाव्या सदरांत २८ अंश, अगदीं वर पाहिलें तर कर्क व कर्केवर २ ह्मणजे द्वितीयभाव; म्हणून द्वितीयभावारंभीं कर्केचे २८ अंश मांडावे. सातव्या सदरांत २६ अंश, माथ्यावर सिंह व सिंहेवर ३ ह्म० तृतीयभाव आहे. ह्मणून तृतीयस्थानारंभीं सिंहेचे २६ अंश मांडावे. याप्रमाणें सहा भावांच्या राशि व अंश काढले. आतां नाक्षत्रकाळाची किंवा भावसाधन कोष्टकाची जरूर नाहीं. पुढें चतुर्थभावापासून नवमभावापर्यंत ६ भाव काढावयाचे. त्यांवर अंश तर क्रमानें हेच मांडावे, राशि मात्र सन्मुख ...ठव्या, ह्म० प्रत्येक राशीपासून सातवी राशि अनुक्रमें मा...त जावी. यात दशमस्थानासमोर चतुर्थस्थान, एकादशासमोर पंचम, द्वादशासमोर षष्ठ, लग्नासमोर सप्तम, द्वितीयासमोर अष्टम आणि तृतीयासमोर नवमस्थान यावयाचें. तसेंच मेषसमोरील किंवा मेषेपासून सातवी राशि तूळ व तूळेपासून सातवी राशि मेष आहे. राशि परस्परांसन्मुख कशा येतात तें खालील तक्त्यांत ... दाखविलें आहे.

१ मेष, २ वृषभ, ३ मिथुन, ४ कर्क, ५ सिंह, ६ कन्या उत्तरराशि.
७ तूळ, ८ वृश्चिक, ९ धन, १० मकर, ११ कुंभ, १२ मीन दक्षिणराशि.

यांत उत्तरराशि दक्षिणराशि समोर व दक्षिणराशि उत्तरराशि समोर येतात. आतां दशमांत मीन राशि आहे आणि दशमासमोर चतुर्थस्थान व मीनेसमोर कन्याराशि येते, ह्मणून चतुर्थांत कन्या मांडावी; दशमांत २७ अंश आहेत ह्मणून चतुर्थांतही तितकेच अंश मांडावे. एकादशांत वृषभ ० अंश आहे, आणि एकादशासमोर पंचम व वृषभेसमोर वृश्चिक येते, ह्मणून पंच-

मांत वृश्चिक ० अंश मांडावे. पुढें द्वादशांत मिथुनेचे ४ अंश आहेत, आणि द्वादशासमोर षष्ठस्थान, मिथुनेसमोर धन येते व द्वादशांत ४ अंश आहेत ह्मणून धनेचे ४ अंश षष्ठांत मांडावे. याप्रमाणें सप्तमांत मकरेचे ९ अंश १७ कला, अष्टमांत मकरेचे २८ अंश व नवमस्थानांत कुंभेचे २६ अंश येतात. आतां द्वादशभाव तर काढले, परंतु यांत कांहीं राशि गाळल्या किंवा काय त्या मेष-पासून मीनेपर्यंत क्रमानें मोजून पाहतां मेष व तिच्या समो-रची तूळ ह्या दोन राशि दिसत नाहींत. ज्याअर्थीं मेष राशि मीन आणि वृषभेच्या मध्यें येते व तूळ राशि कन्या व वृश्चिकेच्या मध्यें येते, त्या[illegible]थीं मेष दशमांत व तूळ तिच्यासमोर चतुर्थांत मां[illegible]ात. अशा राशींना लुप्त किंवा गलित राशि असें ह्मण[illegible]. यांच्या उलट कर्क, लग्नांत व द्वितीयांत आहे आ[illegible]णे मकर, सप्तमांत व अष्टमांत आहे ह्मणून त्या वृद्धि पाव[illegible]आहेत असें ह्मणतात. कधीं [illegible]राशि लुप्त होण्याचा [illegible] एकच संभव असतो, [illegible]गून त्या मोजून १२ राशि होण्यास जितक्या [illegible] असतील तितक्या भरून काढण्यास विसरूं नये.

**स्पष्ट ग्रह करण्याची रीतिः**—ग्रह कोणत्या राशींत आहेत इतकेंच नाहीं, परंतु ते त्या राशीच्या कोणत्या अंशकलांत वगैरे आहेत हें काढणें त्यास ग्रह स्पष्ट करणें असें ह्मणतात. स्पष्ट ग्रह करण्यापूर्वी प्रत्येक ग्रहाची रोजची गति काढली पाहिजे. स्पष्ट ग्रहाच्या पुस्तकांत रोजचे मध्यान्हीचे स्पष्ट ग्रह दिले आहेत ह्मणून ज्या दिवशीं जन्म झाला असेल त्या दिवसाचे स्पष्ट ग्रह आणि त्याच्या पूर्वीच्या दिवसाचे किंवा दुसऱ्या



दिवसाचे स्पष्ट ग्रह ह्यांची वजाबाकी करावी म्हणजे रोजची किंवा २४ तासांची गति निघेल. उदाहरण—जन्म दोन प्रहरांपूर्वी झाला असेल तर त्या दिवसाचे व त्याच्या आदल्या दिवसाचे ग्रहांची वजाबाकी करावी; परंतु जन्म दोन प्रहरांनंतर झाला असेल तर त्या दिवसाचे व दुसऱ्या दिवसाचे ग्रहांची वजाबाकी करावी म्हणजे गति बरोबर निघेल. आपल्या उदाहरणांतील जन्म ता. ५ ज्यानेवारी १८९६ दोन प्रहरांनंतर ४ वाजून ५२ मिनि-टांनीं झाला आहे. स्पष्ट ग्रहाच्या पुस्तकांत पृष्ठ २ वर ५ व्या ज्यानेवारीस दोन प्रहरीं रवि मकरेचा १४ अंश, २९ कला, ५७ विकला आहे आणि दुसऱ्या दिवशीं म्हणजे ६ व्या तारखेस तो त्याच राशीचा १५ अंश, ३१ कला, ६ विकला आहे. दोहोंची वजाबाकी केली तर १ अंश, १ कला, ९ विकला येते, ही रवीची २४ तासांची गति झाली. आतां हें प्रमाण घेऊन रवि ४ तास ५२ मिनि-टांत किती जाईल तें काढून ५ व्या तारखेच्या रवींत मिळविला म्हणजे इष्टकाळचा स्पष्ट रवि निघेल. ६० विकला = १ कला. ६० कला = १ अंश. ३० अंश = १ राशि. २४ तास : ४ ता. ५२ मि. :: १ अं. १ क. ९ वि. = २४ : $४\frac{१३}{१५}$ :: ३६६९ विकला = $\frac{१}{२४} \times \frac{७३}{१५} \times \frac{३६६९}{१} = \frac{२६७८३७}{३६०}$ = ७४३ वि. = १२ कला २४ विकला रवि ४ तास ५२ मिनिटांत जातो. म्हणून ता. ५ चा रवि मकर १४ अंश, २९ कला ५७ विकला + १२ कला २४ विकला = मकरेंत १४ अंश ४२ क. २१ वि. इष्टकाळचा स्पष्ट रवि आहे. आपल्या कुंडलींत मकरेचे ९ अंश सप्तमांत आहेत

मांत वृश्चिक ० अंश मांडावे. पुढें द्वादशांत मिथुनेचे ४
अंश आहेत, आणि द्वादशासमोर षष्ठस्थान, मिथुनेसमोर
धन येते व द्वादशांत ४ अंश आहेत ह्मणून धनेचे ४
अंश षष्ठांत मांडावे. याप्रमाणें सप्तमांत मकरेचे ९ अंश
१७ कला, अष्टमांत मकरेचे २८ अंश व नवमस्थानांत
कुंभेचे २६ अंश येतात. आतां द्वादशभाव तर काढले,
परंतु यांत कांहीं राशि गाळल्या किंवा काय त्या मेष-
पासून मीनेपर्यंत क्रमानें मोजून पाहतां मेष व तिच्या समो-
रची तूळ ह्या दोन राशि दिसत नाहींत. ज्याअर्थी मेष
राशि मीन आणि वृषभेच्या मध्यें मे[illegible] $\frac{१२}{} \times \frac{}{१५} \times \frac{२५७४३}{१} =$ ७४ क. = २ अं. ५४ क.
व वृश्चिकेच्या मध्यें येते, त्या[illegible] जातो. तारिख ९ चा मध्या-
तिच्यासमोर चतुर्थांत मांड[illegible]शि १३-३७-३४ आहे त्यांत
गलित राशि असें ह्मणत[illegible]ले म्हणजे कन्येचा अं. १६-३१-
व द्वितीयांत आहे आ[illegible]ही चंद्र होतो. आपल्या कुंडलींत
ह्मणून त्या वृद्धि पावल[illegible]. कन्ये[illegible] ० अंशांत झाला आहे,
[illegible]तुर्थस्थानाचा [illegible]रंभ [illegible] अर्थी २७ [illegible] मांडून
म्हणून कन्येच्या २७ अंशाच्या अलीकडे चंद्र [illegible]मांडून
पुढें अंश १६-३१-३४ लिहावे. ९ व्या तार[illegible]स
मंगळ धनेंत १७ अं. ९ कला आहे व ६ व्या तार[illegible]खेस
तो १७ अंश ५२ कला आहे. दोहोंची वजाबा[illegible]की
केली ह्मणजे ४३ कला उरतात. ही मंगळाची २४
तासांची गति झाली. म्हणून २४ तास : ४ ता. ५२
मि :: ४३ क. = $\frac{१}{२४} \times \frac{७३}{१५} \times \frac{४३}{१} = \frac{३०७९}{३६०}$ = ९ कला.
ह्या ९ व्या तारखेच्या मंगळांत म्हणजे धनेच्या १७ अंश
९ कलांत मिळविल्या असतां १७ अंश १८ कला येतात.
म्हणून मंगळ षष्ठस्थानांत लिहून पुढें १७ अंश, १८ कला




दिवसाचे स्पष्ट ग्रह ह्यां[illegible]ी वजाबाकी करावी म्हणजे
रोजची किंवा २४ तासांची गति निघेल. उदाहरण—जन्म
दोन प्रहरांपूर्वी झाला असेल तर त्या दिवसाचे व त्याच्या
आदल्या दिवसाचे ग्रहांची वजाबाकी करावी; परंतु
जन्म दोन प्रहरांनंतर झाला असेल तर त्या दिवसाचे व
दुसऱ्या दिवसाचे ग्रहांची वजाबाकी करावी म्हणजे गति
बरोबर निघेल. आपल्या उदाहरणांतील जन्म ता. ९
ज्यानेवारी १८९६ दोन प्रहरांनंतर ४ वाजून ५२ मिनि-
टांनीं झाला आहे. स्पष्ट ग्रहाच्या पुस्तकांत पृष्ठ २ वर
मांडावा. [illegible] दोन प्रहरीं रवि मकरेचा १४ अंश,
अंशावर होतो. वर सा[illegible]आहे आणि दुसऱ्या दिवशीं
गुरूची वजाबाकी करतां तो [illegible]च राशीचा १९ अंश, ३१
दिसून येईल. यामानानें ४ ता.[illegible] वजाबाकी केली तर १
१ कला चालेल. येथें गुरु वक्रगति[illegible]ीची २४ तासांची गति
१ कला ९ व्या तारखेच्या गुरूंत [illegible]वि ४ तास ५२ मिनि-
केली पाहिजे. त्यावरून गुरु सिं[illegible] ६ अ. २६ [illegible]
येतो, तो सिंहेच्या २६ अंशापूर्वी द्वि[illegible] स्थानांत मांडावा.
आर्यज्योतिषी प्रत्येक भावाचे सारखे दोन भाग करू[illegible]
त्यांतल्या पूर्वार्धांत ज्या ग्रहांचा समावेश होईल ते त्या
भावांत आहेत व उत्तरार्धांतील ग्रह त्या भावाच्या
पुढल्या भावांत आहेत असें मानितात. द्वितीयभाव
कर्केच्या २८ अंशांपासून सिंहेच्या २६ अंशांपर्यंत
आहे म्हणजे त्यांत सर्व २८ अंश येतात. ह्याचे दोन
भाग केले म्हणजे पहिला भाग सिंहेच्या १२ अंशांपर्यंत
येतो व दुसरा भाग सिंहेच्या २६ अंशांपर्यंत येतो.
गुरु पहिल्या भागांत येतो म्हणून तो द्वितीय भावांत

व २८ अंश अष्टमांत आहेत म्हणून रवि सप्तमभावांत मांडून मकरेचे १४ अंश ४२ क. २१ वि. त्याच्या जवळ लिहावे. चंद्राची गति काढतांना तो दुसऱ्या दिवसाचा न घेतां मध्यरात्रीचा घ्यावा. मध्यान्ह व मध्यरात्र ह्यांत १२ तासांचें अंतर आहे हें लक्षांत ठेवावें. मध्यरात्रीचा चंद्र कन्येचा २० अंश ४६ कला ३७ विकला उणें मध्यान्हीचा चंद्र कन्येचा १३ अं. ३७ क. ३४ वि. = ७ अंश ९ कला ३ वि. इतकी चंद्राची १२ तासांची गति. १२ ता : ४ ता. ५२ मि. : : ७ अं. ९ क. ३ वि. = १२ : ४ $\frac{१३}{१५}$ : : २५७४३ विकला = ... = २ अं. ५४ क. $\frac{१८७५२३९}{१८०}$ = १०४४० वि. = ... तारिख ५ चा मध्या- ... चंद्र ४ ता. ५२ मिनिटांत ३–३७–३४ आहे त्यांत ...न्हीचा चंद्र कन्येचा अं... म्हणजे कन्येचा अं. १६–३१–... अंश २–५४–० मिळवि... होतो. आपल्या कुंडलींत ३४ इष्टकाळचा स्पष्ट ... अंशांत झाला आहे, ...चतुर्थस्थानाचा आरंभ ... एक कर्तव्य ... मांडून म्हणून कन्येच्या २७ अंशाच्या अलीकडे चंद्र ... पुढें अंश १६–३१–३४ लिहावे. ५ व्या तारखेस मंगळ धनेंत १७ अं. ९ कला आहे व ६ व्या तारखेस तो १७ अंश ५२ कला आहे. दोहोंची वजाबाकी केली म्हणजे ४३ कला उरतात. ही मंगळाची २४ तासांची गति झाली. म्हणून २४ तास : ४ ता. ५२ मि : : ४३ क. = $\frac{१}{२४} \times \frac{७३}{१५} \times \frac{४३}{१} = \frac{३०४९}{३६०}$ = ९ कला. ह्या ५ व्या तारखेच्या मंगळांत म्हणजे धनेच्या १७ अंश ९ कलांत मिळविल्या असतां १७ अंश १८ कला येतात. म्हणून मंगळ षष्ठस्थानांत लिहून पुढें १७ अंश, १८ कला



लिहाव्या. कारण षष्ठस्थानारंभ धनेच्या ४ अंशांवर होतो. ५ व्या तारखेस बुध मकरेचा, २३ अंश, ४७ कला आहे व ६ व्या तारखेस २५ अं. २६ क. आहे. दोहोंची वजाबाकी केली तर १ अं. ३९ क. म्हणजे ९९ कला उरतात, ही बुधाची २४ तासांची गति झाली. म्हणून २४ तास: ४ ता. ५२ मि. : : ९९ क. = $\frac{१}{२४} \times \frac{७३}{१५} \times \frac{९९}{१} = \frac{१}{८} \times \frac{७३}{५} \times \frac{११}{१} = \frac{८०३}{४०}$ = २० कला. ह्या ५ व्या तारखेच्या बुधांत मिळविल्या म्हणजे बुध मकरेचा २४ अं. ७ क. होतो. तो अष्टमस्थानाच्या अलीकडे मांडावा. कारण, त्या स्थानाचा आरंभ मकरेच्या २८ अंशावर होतो. वर सांगितल्याप्रमाणें दोन दिवसांच्या गुरूची वजाबाकी करतां तो रोज ७ कला चालतो, ... दिसून येईल. यामानानें ४ ता. ५२ मिनिटांत तो ... १ कला चालेल. येथें गुरु वक्रगति आहे, म्हणून आ... १ कला ५ व्या तारखेच्या गुरूंत मिळविण्याऐवजीं व... केली पाहिजे. त्यावरून गुरु सिं... ६ अं. ३६ कला येतो, तो सिंहेच्या ... १६ अंशापूर्वी द्वि... स्थानांत मांडावा. अ...ज्योतिषी प्रत्येक भावाचे सारखे दोन ... भाग क... सांगितल्या पूर्वार्धांत ज्या ग्रहांचा समावेश होईल ते त्या भा...वांत आहेत व उत्तरार्धांतील ग्रह त्या भावा... पु...ल्या भावांत आहेत असें मानितात. द्विती... क...र्केच्या २८ अंशांपासून सिंहेच्या २१ अंशा... आहे म्हणजे त्यांत सर्व २८ अंश येतात. ह्याचे दोन भाग केले म्हणजे पहिला भाग सिंहेच्या १२ अंशांपर्यंत येतो व दुसरा भाग सिंहेच्या २६ अंशांपर्यंत येतो. गुरु पहिल्या भागांत येतो म्हणून तो द्वितीय भावांत

आहे, परंतु तोच दुसऱ्या भागांत असता तर तो तृतीय भावांत आहे असें मानावें लागलें असतें. ह्याला चलित करणें असें ह्मणतात. शुक्राची २४ तासांची गति १ अं. १० क. आहे, त्यामानानें तो ४ तास ५२ मिनिटांत १४ कला जातो. ५ व्या तारखेच्या शुक्रांत १४ कला मिळविल्या तर धनेचे १ अं. १० क. होतात. म्हणून शुक्र षष्ठस्थानाच्या अलीकडे मांडावा. ह्याप्रमाणें इतर ग्रह काढले तर शनि वृश्चिकेचा १६ अं. ५२ क. पंचमांत येईल, राहु नवमांत मीनेचा ६ अं. १७ क. येईल, राहूच्या समोर नेहमीं केतु असतो म्हणून तो तृतीयांत कन्येचा ६ अं. १७ क. येईल, हर्शल षष्ठांत [illegible]केचा ९२ अं. १६ क. व नेपच्यून द्वादशांत मिथुनेचा [illegible] अं. ५५ क. वक्री येईल. द्वादशभावसाधन स्पष्ट-[illegible]ची कुंडली तयार झाली.




आकृति २.
द्वादशभावसाधन स्पष्ट ग्रहांची कुंडली.
जन्म रविवार ता. ५ ज्यानेवारी सन १८९५ संध्याकाळीं ४ वाजून ५२ मिनीटांनी मुंबई वेळ.




## सर्वांत जुनें इंग्रजी–मराठी साप्ताहिक पत्र

# प्रभाकर.

वर्षाची वर्गणी ४ रुपये ८ आणे, ट. ह. ५ रुपये.

ट्रामवे टर्मिनस जवळ, गिरगांव–मुंबई.

नवीन व्यवस्थेसंबंधानें विद्वानांचे उत्तम अभिप्राय आले आहेत.


## वर्गणीची पोंच.

रा. रा. बी० व्ही० ताह्मणे.
" " ता० ल० देशपांडे.
रा० सा० ब० रा० सहस्रबुद्धे.
रा.रा.बा०का०पाटील कुळकर्णी.
रा. रा. नागेश्वर जोशी पुरोहित.
" " बा० नि० नाडकर.
" " मा० दा० हातोडे.
" " गो० ज० अठवले.
" " गो० मं० खडे.
" " ना० ग० कानविंदे.
" " शं० भ० दीघे.
रा० सा० का० बा० प्रधान.
" " गो० वि० ठोकेकर.
मि० हि० दि० इन्जनियर.
रा. रा. द० मो० समर्थ.
" " पां० बा० राजिंदेकर.
" " गो० मा० मायाळ.
" " म० वा० मोहरीर.
" " दा० गोविंद.
" " शं० सि० गुप्ते.
रा. रा. शं० के० डांगे.
" " कृ० सि० लेले.
" " गो० म० शिंदे.
रा० सा० ल० कृ० नुलकर.
रा. रा. त्रिं० त्रि० ठोकेकर.
" " वा० ता० घुगरी.
रा० सा० कृ० बा० फडके.
रा. रा. स० ना० राणे.
" " ह० पां० दोंदे.
" " ग० रं० पेंढारकर.
रा० सा० ग० दा० देशमुख.
रा. रा. ह० गो० वैद्य.
" " मो० गो० गोविंदकर.
" " श्री० बावा साहेब ओझे.
" " ग० फकीरजी.
" " रा० वि० देशपांडे.
" " ना० भ० पुणेकर.
" " गणपतराव चापाजी.
" " कृष्णराव है०,धोंडे.
" " काशीनाथराव वा० भट.

## अवश्य वाचा.

ज्योतिर्मालेचा ११ वा अंक फारच उशिरानें निघाला आहे. वर्गणीदारांस वारंवार सूचना केल्या, पत्रें पाठविलीं, तरी उत्तर नाहीं आणि वर्गणीही नाहीं. कांहीं रावबहादुरानीं व्हा० पे० मागवून वर्गणी न देतां तीं परत केलीं आहेत. सुमारें ३०० शें वर्गणीदारांनीं वर्गणी न पाठविण्याचा निश्चय केलेला दिसतो. वर्गणी वेळेवर न आली म्हणजे छापखान्यांतून पुस्तक बाहेर पडत नाहीं आणि त्यामुळें ज्या वर्गणीदारांनीं वर्गणी पाठविली असते त्यांस त्रास होतो. ज्योतिर्मालेचा १२ वा अंक निघण्यापूर्वीं ज्यांनीं वर्गणी पाठविली नाहीं त्यांकडे व्हा० पे० नें अंक पाठविण्यांत येतील, आणि जे वर्गणीदार व्हा० पे० परत करतील अथवा वर्गणी पाठविणार नाहींत त्यांचीं नांवें ज्योतिर्मालेंत प्रसिद्ध होतील. ज्योतिर्मालेची वर्गणी शास्त्रीयविषयाचे पुस्तकांत अत्यंत कमी आहे. चालकांचा हेतु फक्त शास्त्राची वृद्धि करण्याचा असून पैसे मिळविण्याचा नाहीं. चालू अंकासुद्धां नुकसान सुमारें १७५ रुपये झालें आहे. तथापि हें नुकसान सोसून १२ अंक बाहेर पडतील. दुसरे वर्षाचेही १२ अंक निघतील. तेव्हां जुने व नवे वर्गणीदारांनीं आणखी एकएक वर्गणीदार मिळवून वर्गणी दुसरे वर्षाचे पहिले अंकाबरोबर पाठविल्यास ज्योतिर्मालेचा अंक वेळेवर निघेल हे कळविणें नको.

---

# ज्योतिर्माला.

पुस्तक १ लें.] मार्च, १८९६. [अंक ११ वा.

## सर्वार्थचिंतामणि.

(सातव्या अंकावरून पुढें चालू.)

### पात.

१. तनुस्थानांत पात असल्यास मनुष्य दुःखी, रोगी, क्रूर, घातकी, मूर्ख, आप्तवर्गाचा द्वेष करणारा असतो.

२. द्वितीयस्थानांत पात असल्यास मनुष्य आळशी, दुराचरणी, अति पित्तप्रकृतीचा, रोगी, निर्दय, कृतघ्न, दुष्टमनाचा आणि पापें करणारा असतो.

३. सहजस्थानांत पात असल्यास स्थिर बुद्धीचा, लढाऊ, दाता, धनाढ्य, राजप्रिय आणि सेनापति होतो.

४. चतुर्थस्थानांत पात असल्यास, बंदीवान, व्याधियुक्त, अपुत्र, दुर्दैवी असतो.

५. पंचमस्थानांत पात असल्यास दरिद्री, रूपवान्, कफपित्तवातप्रकृतीचा मनुष्य असतो. स्वभावानें निष्ठुर असून निराश्रित असतो.

६. षष्ठस्थानांत पात असल्यास शत्रूचा नाश करणारा शरिरानें धट्टाकट्टा, सर्व शस्त्रांचा संग्रही, कलांत निपुण, आणि स्वभावानें शांत असतो.

७. सप्तमस्थानांत पात असल्यास धन, दारा, सुत ह्यांनीं टाकलेला असून कामी, निर्लज्ज, परस्त्रीरत असतो.

८. अष्टमस्थानांत पात असल्यास नेत्ररोगी, कुरूप, दुर्दैवी, ब्राह्मणद्वेष्टा, रक्तजन्यविकारी असतो.

९. नवमस्थानांत पात असल्यास फार व्यापार करणारा, पुष्कळ मित्र असणारा आणि पुष्कळ ज्ञान संपादिलेला, स्त्रीप्रिय, मधुरभाषी असा मनुष्य असतो.

१०. दशमांत पात असल्यास श्रीमान्, धर्माचरण करणारा, शांत, धर्मकार्यांत प्रवीण असा मनुष्य असतो. त्याचप्रमाणें अचाट बुद्धीचा आणि विलक्षण असतो.

११. एकादशस्थानांत पात असल्यास पुष्कळ संपत्तिमान्, मानी, सत्यवादी आणि हातांत घेतलेलें काम तडीस नेणारा, पुष्कळ घोडे बाळगणारा, गाणारा असा असतो.

१२. द्वादशस्थानांत पात असल्यास कोपी, बहु कर्में करणारा, कांहीं व्यंग असणारा, धर्मलंड, आप्तांकडून द्वेष पावणारा असा असतो.

## परिधि.

१. प्रथम भावांत परिधि असल्यास विद्वान्, सत्यप्रिय, शांत, धनवान्, पुत्रवान्, शुचिर्भूत, दाता, गुरूचा आदर करणारा असतो.

२. दुसरे भावांत परिधि असल्यास श्रीमान्, रूपवान्. ऐषआराम करणारा, सुखी, धर्मपरायण, पदरीं पुष्कळ माणसें संभाळणारा असा मनुष्य असतो.

३. तिसरे भावांत परिधि असल्यास स्त्रीप्रिय, स्वरूपवान्, साधु आणि स्वजनाशीं स्नेह ठेवणारा आणि मृत्युकालीं गुरुभक्ति करणारा असा असतो.

४. चतुर्थ भावांत परिधि असल्यास शत्रूंना थक्क करणारा, सौम्यस्वभावाचा, द्रव्यवान् आणि गीतज्ञ मनुष्य असतो.



५. पंचम भावांत परिधि असल्यास लक्ष्मीवान्, शीलवान्, सुस्वरूप सर्वांस प्रिय, धर्मवत्सल आणि स्त्रियांस प्रिय असतो.

६. षष्ठ स्थानांत परिधि असल्यास स्पष्टवक्ता, संतति संपत्तियुक्त, सुखोपभोगी, सर्वांचें कल्याण करणारा आणि शत्रूंचा नाश करणारा असतो.

७. सप्तम स्थानांत परिधि असल्यास अल्पसंतति, सुखहीन, मंदबुद्धीचा, अतिनिष्ठुर, स्त्रीरोगी असा मनुष्य असतो.

८. अष्टम स्थानांत परिधि असल्यास आध्यात्मिक विषयाचा व्यासंगी, शांत, शरीरानें मजबूत, दृढनिश्चयी, समान भाव ठेवणारा असा असतो.

९. नवम भावांत परिधि असल्यास, पुत्रसंतति असते, सुखी, स्वरूपवान्, श्रीमान् आणि लडिवाळ न केलेला असतो. त्याचप्रमाणें मानी, थोड्यांत तृप्त होणारा असतो.

१०. दशमांत परिधि असल्यास तो मनुष्य क्वचितच मूर्ख असतो. भोगी, शरिरानें बळकट, मत्सर न करणारा सर्व शास्त्रपारंगत असतो.

११. एकादश भुवनांत परिधि असल्यास स्त्रीभोगी, गुणवान्, मतिमान्, स्वजनप्रिय, मंदाग्नि असा मनुष्य असतो.

१२. द्वादश स्थानांत परिधि असल्यास गुरुनिंदक असतो.

चाप.

१. धन, धान्य, संपत्ति, कृतज्ञ, विद्वान् लोकांस मान्य, निर्दोषी असा मनुष्य प्रथम भावांत चाप असल्यास असतो.

२. धन स्थानांत चाप असल्यास मनुष्य मधुरभाषी, सुविचारी, धनवान्, नम्र, विद्वान्, धर्मतत्पर असतो.

३. तिसरे भुवनांत चाप असल्यास मनुष्य कृपण, कलाभिज्ञ, अट्टल चोर, व्यंग अवयवांचा आणि उन्मत्त लोकांबरोबर स्नेह ठेवणारा असतो.

४. चवथे भावांत चाप असल्यास मनुष्य सुखी, राजप्रिय, गोधनाचा संग्रही आणि निरोगी असा असतो.

५. पंचम भावांत चाप असल्यास गुणज्ञ, दीर्घदर्शी, देवभक्त, मधुरभाषी आणि सर्वकामी मनुष्य असतो.

६. षष्ठ स्थानांत चाप असल्यास मनुष्य शत्रूचा नाश करणारा, धूर्त, सुशील, सुस्वरूप आणि प्रिय असतो.

७. सप्तम स्थानांत चाप असल्यास मनुष्य संपत्तिमान्, गुणी, शास्त्रवेत्ता, धार्मिक आणि प्रिय असतो.

८. अष्टम स्थानांत चाप असल्यास मनुष्य परकर्मरत, क्रूर, परदार गमन करणारा आणि विकलांगी असतो.

९. नवम स्थानांत चाप असल्यास मनुष्य तपस्वी, उपोषणें करण्यांत निमग्न, विद्वान्, लोकमान्य आणि कीर्तिमान् असतो.

१०. दशम स्थानांत चाप असल्यास मनुष्य धन, ऐश्वर्य आणि पुत्रवान् आणि कीर्तिमान असतो.

११. एकादश स्थानांत चाप असल्यास लाभप्राप्ति, निरोगी, अतिरागीट, मंत्र, तंत्र आणि स्त्रीपरिक्षक मनुष्य असतो.



१२. चाप द्वादश स्थानांत असल्यास मनुष्य दुष्ट, दीर्घसूत्री, दुर्बुद्धि, निर्लज्ज, परस्त्रीरत आणि निर्धन असतो.

शिखी.

१. तनुस्थानांत शिखी असल्यास सर्व विद्या जाणणारा, सुखी, वक्ता, प्रिय आणि सर्व कर्मांत पडणारा असा मनुष्य असतो.

२. दुसरे भावांत शिखी असल्यास मनुष्य वक्ता, प्रियंवद, सुस्वरूप, काव्य करणारा, पंडित, मानी, विनीत, वाहनयुक्त असतो.

३. तृतीय स्थानांत शिखी असल्यास मनुष्य कामी, क्रूर कर्मे करणारा, किडकिडीत, दरिद्री आणि तीव्ररोगी असतो.

४. चतुर्थ स्थानांत शिखी असल्यास मनुष्य रूपवान्, गुणसंपन्न, सात्विक, विद्येची अभिरुचि असणारा, सुखी असा असतो.

५. पंचम स्थानांत शिखी असल्यास मनुष्य सुखी, भोगी, कलाभिज्ञ, युक्तिवान्, मतिवान्, वाक्पटु आणि गुरुभक्ति करणारा असा असतो.

६. षष्ठ स्थानांत शिखी असल्यास मनुष्य मातृपक्षाचा क्षय करणारा असतो. शूर, सुस्वरूप, विचक्षण.

७. सप्तम स्थानांत शिखी असल्यास रक्तदोषी, भटक्या, कामी, रोगी आणि वेश्यासक्त असतो.

८. अष्टम स्थानांत शिखी असल्यास नीचकर्मरत, पापी, निर्लज्ज, निंदक, विधवागमनी, परस्त्रीगमनी असा असतो.

९. नवम स्थानांत शिखी असल्यास लिंगधारी,

प्रसन्नवृत्तीचा, सर्वांचें कल्याण करणारा, धर्मकार्यांत निपुण असा असतो.

१०. दशम स्थानांत शिखी असल्यास सौभाग्य संपन्न, स्त्रीयुक्त, दाता, चांगले लोकांत हिंडणारा असा असतो.

११. एकादश भुवनांत शिखी असल्यास मनुष्य स्वधर्मी, लाभ पावणारा, लोकमान्य, द्रव्यवान्, सुदैवी, शूर, पुण्यकर्मरत आणि निपुण असा असतो.

१२. द्वादश स्थानांत शिखी असल्यास मनुष्य पापकर्मे करणारा, शूर, श्रद्धाहीन, निर्दय, परदाररत आणि उग्र असतो.

## प्राणपद.

१. पहिले भावांत प्राणपद असल्यास मुखदुर्बल (मुका) उन्मत्त, जडांगी, हीन, कृश शरीराचा, दुःखी असतो. क्षीण प्राणपद लग्नांत असेल तर मनुष्य रोगी होईल.

२. प्राणपद दुसरे भावांत असेल तर मनुष्य धन, धान्य, संतति, सेवकयुक्त असतो.

३. प्राणपद तिसरे भावांत असेल तर हिंसा करणारा, गर्विष्ठ, चोरांशीं फार निष्ठुर, गुरुभक्तिवर्जित असतो.

४. चतुर्थ भावांत प्राणपद असल्यास तो मनुष्य सुखी, सुस्वरूप, स्नेही व स्त्रियांस प्रिय, गुरुसेवापरायण, सुशील असतो.

५. प्राणपद पंचम भावांत असल्यास मनुष्य सुखी, कोणत्याही गोष्टीची पर्वा न ठेवतां कर्तृत्व करून दाखविणारा, दयाळु, सर्व प्रकारचे ऐषआराम भोगणारा.

६. प्राणपद षष्ठ स्थानांत असल्यास बंधुजन व शत्रूंस वश, तीव्र स्वभावाचा, मंदाग्नियुक्त, निर्दय, दुष्ट, अल्परोगी, धनवान् आणि अल्पायु असा मनुष्य असतो.



७. सप्तम भावांत प्राणपद असल्यास ईर्षाळु, सदोदित कामी, तीव्र स्वभावाचा, शरीरानें भयंकर मुद्रेचा, वाईट गोष्टींत पुढें असणारा आणि कुबुद्धि असा मनुष्य असतो.

८. अष्टम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य रोगग्रस्त, पीडित, बंधु, पुत्र, सेवकांपासून मोठमोठीं दुःखें पावणारा असतो.

९. नवम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य पुत्रवान्, धनसंपन्न, सुदैव, सुस्वरूप, राजसेवक, हुद्देदार, सदा संतोषवृत्ति आणि विचक्षण असा असतो.

१०. दशम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य शक्तिमान्, बुद्धिमान्, दक्ष, राजकार्यांत प्रवीण, आणि देवार्चनपरायण असतो.

११. प्राणपद एकादश भुवनांत असल्यास मनुष्य विख्यात, गुणवान्, प्राज्ञ, ऐषआराम भोगणारा, धनवान्, गौरवर्णाचा आणि मानप्रिय असतो.

१२. द्वादश भुवनांत प्राणपद असल्यास मनुष्य क्षुद्र, दुष्ट, हीनांग, आप्त व द्विज यांचा द्वेष करणारा, नेत्ररोगी, काणा असतो.

( श्लोक १६ ) चार केंद्रांना व्योम ( दशम ) अस्त ( सप्तम ), पाताल ( चतुर्थ ) आणि विलग्न ( लग्न ) अशीं नांवें आहेत. केंद्रांस कंटक असें ह्मणतात. जें केंद्र आपले राशीचे नवमांशांत उदय पावलें असेल त्यास वर्गोत्तमी असें ह्मणतात.

( श्लोक १७ ) जलचर राशी चतुर्थ स्थानांत अस-

ल्यास बलवान्, पशुराशी दशमांत बली, नरराशि लग्नांत बली, आणि कीटराशी, सप्तम स्थानांत बलवान् असतात. ह्यावरील राशी वरील स्थानांपासून सप्तम भुवनांत असल्यास निर्बल जाणाव्या.

( श्लोक१८।१९ ) ह्यांत ग्रहांचीं उच्चत्वें आहेत. ज्यो० अं० २ पृ० १० पहा. उच्चराशीपेक्षां मूल त्रिकोण राशीचें बल कमी असतें.

( श्लोक० २० ) दिवसा मनुष्यराशी बलवान् असतात. पशुराशी रात्रीं बलवान् असतात आणि कीट व जलचरराशी संधिकालीं बलवान् असतात. ३।६।१० आणि ११ ह्या स्थानांस **चय** असें ह्मणतात.

( श्लो. २१ ) द्वादश राशींचे अनुक्रमवर्ण येणेंप्रमाणें आहेत. अंकसंख्या राशीदर्शक आहेत.

( १ ) लाल. ( २ ) श्वेत. ( ३ ) पोपटी. ( ४ ) लाल व पांढरा. ( ५ ) धूरासारखा. ( ६ ) पांडुर. ( ७ ) चित्र. ( ८ ) काळा. ( ९ ) सुवर्णासारखा. (१०) पिंगट. (११) कर्बुरी (१२) बभ्रु ( मुंगुसासारखा ) व स्वच्छ.

( श्लो. २२ ) सूर्यापासून जें द्वितीय स्थान त्यास **वेशि** असें ह्मणतात. मेषेपासून कन्येपर्यंत पूर्व चक्रार्ध चतुर्गुणित करून पांच मिळवून राशिमानें समजावीं. व तींच उलट रीतीनें तूळेपासून मेषपर्यंत समजावीं.

( श्लो. २३ ) रवि चंद्र हे राजे होत; मंगळ सेनाधिपति; बुध युवराज; गुरु व शुक्र हे मंत्री ( प्रधान ) व शनि सेवक आहे. यापैकीं ज्याचा जो लग्नाधिपति असेल त्याप्रमाणें त्याची वृत्ति असेल.

( श्लो. २४ ) **रवि** हा आत्मा आहे; **चंद्र**–मन; **मंगळ**–पराक्रम; **बुध**–भाषण; **गुरु**–ज्ञान व सुख; **शुक्र**–मद ( वीर्य ); **शनि**–दुःख आहे.



( श्लो. २५ ) **सूर्याचीं** नांवें–सूर्य, हेलि, भानुमान्, दीप्तरश्मिः, चंडांशु, भास्कर, अहस्कर. **चंद्राचीं** नांवें–अब्ज, सोम, चंद्रमा, शीतरश्मि, शीतांशु, ग्लौ, मृगांकः, कलेशः.

( श्लो. २६ ) **मंगळाचीं** नांवें–आर, वक्र, अवनेय, कुज, भौम, लोहितांग, पापी; **बुधाचीं** नांवें–विज्ञ, सौम्य, बोधन, चंद्रपुत्र, चांद्रि, शांत, श्यामगात्र, अतिदीर्घः.

( श्लो. २७ ) **गुरूचीं** नांवें–जीव, अंगिरा, देवगुरु, प्रशांत, वाचांपति, इज्य, त्रिदिवेशवंद्य. **शुक्राचीं** नांवें–भृगु, उशना, भार्गवसूनु, अच्छ, काणः, कवि, दैत्यगुरु, सित.

(श्लोक २८ व २९) **शनीचीं** नांवें–छायात्मज, पंगु, यम, अर्कपुत्र, कोण, सित, सौरि, शनि, नील, क्रूर, कृशांग, कपिलाक्ष, दीर्घ, तम, असुर. **राहूचीं** नांवें–अगु, सैंहिकेय, सुवर्भानु, विधुंतुद. **केतूचीं** नांवें–केतु, शिखी, ध्वज. **गुलिकाचीं** नांवें–शनिसुत, गुलिक, मांदि, यमात्मज, प्राणहर, अंति, पापी.

( श्लोक ३० ) **प्राणपदाचीं** नांवें–प्राण, असु.

## ग्रहांचीं स्वरूपें.

(श्लोक ३० पासून ३७ पर्यंत.)

**सूर्य**–डोळे पिंगट, पित्तप्रकृति, प्रतापवान्, सत्वगुणी, स्वल्पकेशयुक्त, प्रवाशी, संदिग्ध बोलणारा, अल्पदाता, दैविकबुद्धियुक्त, बांधेसुत, थोडा तांबूस आणि काळा.

**चंद्र**–शुभ्रकांति, बांधेसुत, वक्ता, विचारवान्, क्वचित्च सडपातळ, शांतरीतीनें बोलणारा, सत्वगुणी, वात, कफ, पित्तप्रकृतीचा.

मंगळ—रागीट व क्रूर नेत्र, तांबूस व किंचित् शुभ्र-वर्ण, पित्तप्रकृतीचा, चंचल बुद्धीचा, कृशशरीर, तामस बुद्धि, प्रतापी, आणि स्त्रीसंभोगाविषयीं आतुर.

बुध—दूर्वाप्रमाणें श्यामवर्ण, अतिविद्वान्, रजोगुणी, खरें बोलणारा, हास्यप्रिय, वात, कफ, पित्तप्रकृतीचा, प्रतापी आणि परस्त्रीगामी.

गुरु—स्थूलशरीर, कफप्रकृति, श्रेष्ठमति, सुविद्वान्, सत्वगुणी, आणि सर्व गुणांनीं संपन्न, नेत्र आणि केंस पिंगट.

शुक्र—सुंदर डोळे, इच्छापूर्तिसंपन्न ( ज्याच्या इच्छा परिपूर्ण होतात असा ) सुखी, बली, सुंदरकांति, निळे केशयुक्त, रजोगुणी, आणि सर्वगुणसंपन्न.

शनि—दुष्ट, कृश आणि दीर्घ अवयवी, पिंगट डोळे, रांठ, दांत मोठे, तामसबुद्धि, वातप्रकृति, कठोर भाषण करणारा, निंद्य.

( श्लोक ३७ पासून ३९ पर्यंत. )

वरील ग्रहांचे गुण जन्मकालीं अथवा प्रश्नकालीं त्यांचे बलाप्रमाणें पहावेत. [ पत्रिकेंत ग्रहांचें बल नवमांश कुंडलीवरून पहातात, म्हणजे नवमांश कुंडलींत जें लग्न येईल त्या लग्नाचा स्वामी जन्म कुंडलींत जसा असेल त्याप्रमाणें त्या मनुष्याचें स्वरूप व गुण असतील. आणि जर नवमांश कुंडलीचा स्वामी जन्मकुंडलींत अस्तास गेला असेल तर अथवा षष्ठ, अष्ट, आणि द्वादश स्थानीं असेल तर वरील ग्रहांचे गुण जमणार नाहींत; म्हणजे, ग्रहांचे बलाप्रमाणें त्याचें स्वरूप व गुण जमतील. नवमांश कुंडलींत चंद्र ज्या स्थानांत



असेल त्या स्थानाधिपाप्रमाणें मनुष्याचा वर्ण व स्वरूप वर्णन करतात. ] गुरु आणि शुक्र हे विप्रवर्णदर्शक आहेत. रवि आणि मंगळ क्षत्रियवर्णदर्शक आहेत. चंद्र आणि बुध हे वैश्यवर्णदर्शक आहेत. शनि हा शूद्रवर्णदर्शक आहे. राहू आणि केतु हे चांडाल ज्ञातिदर्शक आहेत. गुलिक हा ज्ञातिभ्रष्टदर्शक आहे.

( श्लोक ४० पासून ४३ पर्यंत. )

ग्रहांचे रंग—रवि—रक्तासारखा, चंद्र—धवल, मंगळ—अतितांबडा, बुध—पोपटीरंग, गुरु—पिंवळा, शुक्र—नाना प्रकारचा विचित्र रंग, शनि—काळा.

ग्रहांच्या देवता—रवि—अग्निदेवता, चंद्र—जलदेवता, मंगळ—अग्निकुमार, बुध—विष्णु, गुरु—इंद्र, शुक्र—इंद्राणी शनि—ब्रह्मदेव.

ग्रहांच्या दिशा—रवि—पूर्व, शुक्र—आग्नेय, मंगळ-दक्षिण, राहु—नैऋत्य, शनि—पश्चिम, चंद्र—वायव्य, बुध—उत्तर, गुरु—ईशान्य. ( चंद्राच्या राशि कोणत्या दिशेस बलवान् असतात तें येणेंप्रमाणें ):—




पापग्रह—क्षीण चंद्र, मंगळ, रवि आणि शनि. बुध हा पापग्रहांचे अनुरोधानें पापग्रह होतो. शुभ ग्रहांचे अनु-

रोधानें शुभ होतो. पापग्रहाखेरीज बाकीचे शुभ ग्रह जाणावेत.

**नपुंसकग्रह**–बुध आणि शनि. **स्त्रीग्रह**–चंद्र आणि शुक्र. **नरग्रह**–रवि, मंगळ, आणि गुरु. जन्मकालीं जो ग्रह बलवान् असेल त्या वृत्तीचा मनुष्य उपजतो.

मंगळ–मज्जा, गुरु–मांस, शुक्र–धातु, बुध–त्वचा, चंद्र–रक्त, रवि–अस्थि, शनि–स्नायु. याप्रमाणें सप्तधातूंचे स्वामी आहेत. हे स्वामी जेव्हां बिघडतात तेव्हां त्या धातूंचे विकारानें त्रास होतो आणि मृत्युकालीं अष्टम स्थानांत जे ग्रह असतील त्या धातूंच्या कोपानें मृत्यु होतो.

( श्लो० ४४–४६. )

**स्थानें**–रवीचें देवस्थान, चंद्राचें जलस्थान, मंगळाचें अग्निस्थान, बुधाचें क्रीडास्थान, गुरूचें कोश–( भांडार ) स्थान, शुक्राचें शय्यास्थान, शनीचें उकिरडा, कचरा इ० व राहूचें सर्पस्थान.

**वस्त्रें**–शनीचें जीर्ण, रवीचें जाडें भरडें, गुरूचें कांहीं नवें व कांहीं जुनें, शुक्राचें कठिण ( टिकाऊ ), चंद्राचें नवें, बुधाचें फाटकें छिद्रें पडलेलें, मंगळाचें जळलेलें, राहूची गोधडी (कंथा ) व केतूचें चित्रविचित्र व विशेष छिद्रें पडलेलें.

( श्लो० ४७–४९. )

**पृथ्वीवरील धातु व मणि**–रवीचें तांबें, चंद्राचा मणि, मंगळाचें सोनें, बुधाचे शिंपले, गुरूचें रुपें, शुक्राचें मोतीं, शनीचें लोखंड, राहूचें शिसें, व केतूचें पोलाद.

**वस्त्रांचे. रंग**–गुरूचें पिवळें, शुक्राचें नानाप्रकारचे रंगाचें रेशमी, रवीचें इंद्रगोप किड्याप्रमाणें तांबडें, चंद्राचें




सर्वांत जुनें इंग्रजी–मराठी साप्ताहिक पत्र

# प्रभाकर.

वर्षाची वर्गणी ४ रुपये ८ आणे. ट. इ. ५ रुपये.

ट्रामचे टर्मिनस जवळ, गिरगांव–मुंबई.

नवीन व्यवस्थेसंबंधानें विद्वानांचे उत्तम अभिप्राय आले आहेत.

## वर्गणीची पोंच.

प्रो. भडकमकर.
रा. रा. केशव कृ. वाणी.
,, श्रीधर शामराव.
,, धोंडो बावाजी.
,, आनंदराव ना. आचार्य.
,, बाळकृष्ण. ना. फाटक.
,, वामन विष्णु.
मि. रस्तुमजी जहांगीरजी.
डा. आपाजी गोविंद काळे.
रा. रा. मल्हार खंडेराव चिटणीस.
,, मोरेश्वर बा. मराठे.
,, पांडुरंग गोविंद.
सरदार लक्ष्मणराव ह. पटवर्धन.
रा. रा. रामचंद्र बापूजी रुईकर.

रा. रा. काशिनाथ ग. गोरे.
,, पुरुशोत्तम श्रा. पाटकर.
,, शंकर ना. गाडगीळ.
,, छगनलाल खें गुजर.
,, गोविंद रा. पराडकर.
,, भिकाजी म. रानडे.
,, नरहर रा. जोशी.
रा. ब. साबाजीराव चिटणीस.
रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे.
श्री. बाळासाहेब ईनामदार.
रा. सु. जनार्दन ग. वाळिंबे.
,, मार्तंड त्रिंबक आऊटी.
,, माधव गोपाळ आठले.
,, त्रिंबक बापूजी पटवर्धन.

## MODERN ASTROLOGY.

Annual Subscription 6 s. 6 d. (Rs. 5) Post free.

Annual subscribers, who remit 6/6 to the Proprietors of the *Modern Astrology* 1 & 2 Bouverie St., Fleet St., London, E. C. or the Proprietors of the Jotirmálá, are entitled to the following privilege, *free of charge*, if they send with their subscription exact time (state if before or after Mid-day,) date and place of birth.

1.—Their horoscope cast and brief deliniation given free of charge.

2.—Their directions calculated for the current year, shewing fortunate or unfortunate periods, as the case may be, with useful advice thereon.

## एजंटांचीं नांवें.

कोल्हापूर.—वे. शा. सं. रा. रा. अमृतराव महादेव बाघोलीकर—गंगावेशींत दांडेकराचा वाडा.

पुणें.—सदाशिव पेठ—वाडदेकराचा वाडा—रा० रा० आनंदराव कृष्ण हेबळेकर यांचे घरीं.

इंदूर.—इंग्लिश स्कूल—रा० रा० बापू नरसिंह भावे, असिष्टंटमास्तर.

नाशिक.—वे. शा. सं. रा रा. विष्णु रावजी राहळकर ज्योतिषी.

## ज्योतिषीलोकांकरितां केलेले

सन १८९६ चे रोजचे स्पष्टग्रह आणि भाव व दशवर्ग कोष्टकें.—ह्या पुस्तकाचे साह्यानें लग्न, स्पष्टग्रह, दशवर्गबली इत्यादि पत्रिकेचें गणित अर्ध्या तासांत करतां येतें. किंमत ४॥ आणे. ज्यो० चे वर्गणीदारांस. ६ आणे इतरांस.

पत्ता :—फणसवाडी, जगन्नाथाची चाळ—मार्केट पोष्ट, मुंबई.




मुंबई :—"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापविलें.


# ज्योतिर्माला.

THE JOTIRMALA OR THE GARLAND OF ASTROLOGY.

ग्रहा राज्यं प्रयच्छंति ग्रहा राज्यं हरंति च।
ग्रहैर्व्याप्तं सर्वमिदं त्रैलोक्यं सचराचरम् ॥

"The wise man rules his stars;
The fool obeys them."




पुस्तक १ लें.] एप्रिल, १८९६. [अंक १२ वा.



| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| यूरोपीय फलज्योतिष .... .... .... | २९–३६ |


विषयक्रमः—थोर पुरुषांच्या व संस्थेच्या कुंडल्या अंक १,५ आणि ९.
" आर्यफलज्योतिषाची सुलभ माहिती " २।६।१०.
" सर्वार्थचिंतामणीचें भाषांतर " ३।७।११.
" युरोपीय फलज्योतिषाची माहिती " ४।८।१२.


[All Rights Reserved by the Publishers.]


वर्षाची किंमत १२ आणे.

☞ हा अंक कांहीं विशेष अडचणीमुळें नियमितवेळीं छापतां आला नाहीं ह्मणून तो सपटेंबर १८९७ मध्यें छापिला आहे.

## दोन शब्द.

**मालेस** आश्रय मिळावा तसा मिळाला नाहीं. ६ शें ग्राहकांपैकीं सुमारें ३ शें ग्राहकांनीं आश्रय दिला. मालेचा छपाईखर्च पोष्टखर्च निम्में सुटला आहे. ग्राहकांनीं आमचे सूचनेचा योग्य विचार केल्यास आणि एक एक दोन दोन वर्गणीदार जास्त मिळविल्यास माला नियमीतपणें चालेल. मासिक पुस्तकांचें जीवन लोकाश्रयावर असतें. शास्त्रीयविषयाचे पुस्तकास ग्राहक थोडेच असतात. विद्वानलोकांचे आश्रयाखेरीज सामान्यशिक्षणाचे लोकांस शास्त्रीय विषयाची गोडी नसते, त्यामुळें आश्रयास विद्वान लोकांकडे धांव मारावी लागते, परंतु त्यांतच बुडवे फार भेटतात म्हणून वर्गणीदारांसच विनंति करून मालेचें सौभाग्य रक्षण्याचें श्रेय देणें योग्य वाटत आहे.

दुर्दैवानें मालेंतील ५ वे अंकांतील **लॉर्ड सँडहर्स्ट यांचे कारकीर्दीचें भविष्य** सर्व जुळलेलें पाहून आनंद व दुःख होत आहे. कोल्हापुरचे महाराज व जंजिऱ्याचे नबाब साहेब आणि विद्याखात्यांतील नौकर रा. नेने ह्यांस पदव्या मिळाल्या, प्राथमिक शिक्षणास एज्युकेशन कमीशन बसून मदत मिळाली ह्या गोष्टी चांगल्या झाल्या. नामदारांचा स्तुतिपाठ गव्हरनर साहेबांनीं गाइला तोही ठीकच झाला. परंतु दुष्काळानें शेतकरी लोकांचें झालेलें नुकसान, अन्न अन्न करून हजारों लोकांनीं सोडलेले प्राण, पुण्यास सोलजर लोकांनीं दिलेला विविध त्रास, जादा पोलीस, मुंबई व पुणें म्युनिसीपालटीवर लादलेला खर्च, नातूंची उचलबांगडी, ना. टिळकांवरील राजद्रोहाचा आरोप आणि धरपकड,ह्या गोष्टी ना. सँडहर्स्ट साहेबांच्या गूढ कारकीर्दीची व अप्रियतेची साक्ष देतात असें कष्टानें म्हणावें लागतें. विद्यार्थ्यांनीं ह्या कारकीर्दीचे कुंडलींत मंगळ कन्या राशींत म्हणजे पुणें शहरचे तनुस्थानांत आहे हें नीट लक्षांत ठेवावें. मालेच्या प्रथम अंकांत पान १० मध्यें पुण्याचें लग्न कन्या ठरविलेलें आहे. कारकीर्दीचे मध्यभागीं मंगळ पंचांगस्त सायन कन्या राशींत आला तेव्हां ह्या

# ज्योतिर्माला.

पुस्तक १ लें.] एप्रिल, १८९६. [अंक १२ वा.

## यूरोपीय फलज्योतिष.

(आठवे अंकावरून पुढें चालू.)

हर्शल उर्फ प्रजापति यास दिली आहे. कुंभ ही राशि शास्त्रिय, जिज्ञासु, शोधप्रिय, असाधारण वस्तुप्रिय, गूढशास्त्राभ्यास निमग्न असे स्वभावाची राशि आहे. प्रजापति ह्या ग्रहाचा स्वभाव वरील वर्णनाप्रमाणें आहे. प्राचीन लोकांस प्रजापतीचे अस्तित्वाची माहिती खास होती; परंतु कालांतरानें आणि बुद्धिभ्रष्टतेनें ती नष्ट झाली. ह्या ग्रह डोळ्यांनीं पाहणारास अंधक दिसतो, त्यामुळें त्याची गणना ताऱ्यांत होऊं लागली आणि त्यामुळें प्रजापतीचें ज्ञान नाहींसें झालें असें राफेलचें मत आहे.

आर्य लोकांस ह्या ग्रहाची माहिती होती असें दिसतें. शनीचा प्रदक्षिणाकाळ ३० वर्षांचा आहे. प्रजापतीचा प्रदक्षिणाकाळ ८४ वर्षांचा आहे. ह्यावरून प्रजापतीस शनिपुत्र त्याचे दुरत्वामुळें नांव मिळालें असावें. गुळिक ग्रहाचा स्वभाव प्रजापती सारखा आहे.

**ग्रहांचीं उच्चत्वें नीचत्वें इत्यादिकः**—कांहीं ग्रह कांहीं राशींत फारच बलवान असतात. त्याहून कमी बली कांहीं राशींत असतात आणि कांहीं राशींत ते दुर्बल असतात. ह्या गुणांवरून त्यांचे भेद केले आहेत. त्यांस

उच्च स्वगृह, आणि नीच असें ह्मणतात. कोष्टकांत प्रत्येक ग्रहांची राशिपरत्वें अंशात्मक उच्चें आणि नीचें दाखविलीं आहेत:—

### ग्रहांचे उच्चनीचत्वाचें कोष्टक.

| राशि. | स्वगृह. | उच्चत्व. | नीचत्व. | दुर्बलत्व. |
|---|---|---|---|---|
| मेष. | मंगळ. | रवि १९ अंश. | शनि १९ अंश. | शुक्र. |
| वृषभ. | शुक्र. | चंद्र ३ ,, | प्रजापति. | मंगळ. |
| मिथुन. | बुध. | ...... | ...... | गुरु. |
| कर्क. | चंद्र. | गुरु १५ ,, | मंगळ २८ ,, | शनि. |
| सिंह. | रवि. | ...... | ...... | प्रजापति. |
| कन्या. | बुध. | बुध १५ ,, | शुक्र २७ ,, | गुरु. |
| तूळ. | शुक्र. | शनि २१ ,, | रवि १९ ,, | मंगळ. |
| वृश्चिक. | मंगळ. | प्रजापति. | चंद्र ३ ,, | शुक्र. |
| धन. | गुरु. | ...... | ...... | बुध. |
| मकर. | शनि. | मंगळ २८ ,, | गुरु १५ ,, | चंद्र. |
| कुंभ. | प्रजापति. | ...... | ...... | रवि. |
| मीन. | गुरु. | शुक्र २७ ,, | बुध १५ ,, | बुध. |

आर्यज्योतिष मताचें कोष्टक अंक २ पृष्ठ १० यावर दिलें आहे. प्रजापतीचे उच्चत्वाचे व नीचत्वाचे अंश नक्की झाले नाहींत.

कित्येक ग्रह कोष्टकांत दिलेल्या राशीखेरीज दुसऱ्या कांहीं राशींत थोडे बलवान होतात. हें बल राशीच्या स्वभावगुणाचें साम्यामुळेंच मानलें आहे. उदाहरणार्थ बुध—हा मिथुन, कन्या, तूळ आणि कुंभ या शास्त्रीय विषयक राशींत बलवान होतो. शुक्र, कर्क व मीन या प्रसव व आर्द्र (जल) राशींत बलवान होतो. रवि



आणि मंगळ अग्नि राशींत ह्मणजे मेष, सिंह आणि धन या राशींत बलवान होतात. गुरु प्रसव व सौम्य राशींत आणि मुख्यत्वें कर्क, मीन, तूळ आणि कुंभ ह्या राशींत बलवान होतो. शनि तूळ आणि कुंभेंत बलवान होतो. प्रजापति तूळ आणि वृश्चिक राशींत बलवान होतो. चंद्र हा शुक्राप्रमाणें समजावा. ग्रहांचीं बलाबलें अन्य कोणत्याही रीतीनें पाहूं नये असें रॅफेलचें मत आहे.

### ग्रहांचीं स्थानबलें.

ग्रह जन्मकालीं आकाशाचे ज्या भागांत ह्मणजे कुंडली ह्या नकाशांत ज्या स्थानीं पडेल त्याप्रमाणें त्यांस बल प्राप्त होतें. सर्वांत उत्तम स्थानें लग्न व दशम होत. त्यानंतर सप्तमस्थान, त्यानंतर एकादशस्थान आणि नंतर चतुर्थस्थान ह्याप्रमाणें स्थानें कमी कमी बलवान होतात. वाईट स्थान फक्त ६ वें स्थान आहे. ह्या स्थानांतील ग्रह चांगलें फल देत नाहीं ह्मणजे वाईट फलें देतो. कांहीं ग्रह एका स्थानापेक्षां दुसऱ्या स्थानांत अधिक बलवान होतात. जसें:–रवि, चंद्र, गुरु आणि मंगळ हे दशम स्थानांत शनि, बुध लग्नांत, बुध तृतीय स्थानांत, शुक्र सप्तम स्थानांत आणि हर्शल उर्फ प्रजापति नवम स्थानांत बलवान होतात.

यूरोपीय फलज्योतिषाप्रमाणें कुंडली तयार करण्याची रीत ज्योतिर्माला अंक १० मध्यें दिली आहे. सायन स्पष्ट ग्रहांचे पुस्तकाप्रमाणें रॅफेलचें पुस्तक दर वर्षास प्रसिद्ध होतें. चालू वर्षाची किंमत ६ पेन्स ह्मणजे जवळ जवळ आठ आणे आहे. मागील कोणत्याही वर्षाचे एफिमिरिजला (स्पष्टग्रहदर्शक पंचांग) १ शिलिंग

ह्मणजे १ रुपया पडतो. ह्या पुस्तकांत सर्व ग्रह लंदन येथील दोन प्रहरचे ह्मणजे मध्याह्नीचे दिले असतात. मुंबई वेळ ४ वाजून ५२ मिनिटांची झाली ह्मणजे विलायतेंत १२ वाजतात. रॉफेलचें पुस्तकांत दिलेले ग्रह मुंबईचे १२ वाजून गेल्यावर ४ तास ५२ मिनिटांनीं लंदनचे मध्याह्नी येतात. तेव्हां मुंबई मध्याह्न काळचे स्पष्ट ग्रह करतांना प्रत्येक ग्रहाची २४ तासाची गति काढून त्रैराशिकानें ४ तास ५२ मिनिटांची गति उणी करावी ह्मणजे दोन प्रहरीचे ग्रह येतील.

आपले देशांत निरयण पंचांगें हल्लीं चालू आहेत. ज्योतिर्मालेंत सर्व ग्रह सायन असतात तेव्हां निरयण ग्रहांस सायन कसे करावेत हें सांगतों. निरयण ग्रह, ह्या शब्दाचा अर्थ ज्या ग्रहांचीं स्थानें ह्मणजे राशि, अंश, कला, विकला हे भाग अयनांशरहित असतात त्या ग्रहांस निरयण ग्रह ह्मणतात. संपातापासून आरंभ धरून जी गणना ती सायन गणना होय. संपात चल आहे. त्याची गति दर वर्षास सुमारें ५०-१ विकला आहे. ग्रहलाघवकाराचे मताप्रमाणें १ कला आहे. शा० शके ४४४ चे सुमारास संपात रेवतीचे अखेरीस किंवा अश्विनीचे आरंभीं होता. तेथून तो २२ अंशांवर मागें ह्मणजे उत्तराभाद्रपदावर आला आहे. हें अंतर संपात चलाचें होय. ह्यास अयनांश म्हणतात. अयनांश युक्त जी गणना ती सायन होय. आपले देशांत ग्रहलाघवावरून पंचांगें करतात; म्हणून पंचांगांतील ग्रहांस अयनांश युक्त केले म्हणजे मिळविले असतां ग्रह सायन होतात. उदाहरणार्थ शके १८१९ श्रावण कृष्ण ३० रोजचे



पंचांगांतील निरयण स्पष्टग्रह खालीं दिले आहेत. त्यास सायन करणें आहे तर त्याची रीतः—

| र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. | रा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ५ | ५ | ४ | ३ | ७ | ९ |
| १२ | १० | ७ | ८ | २६ | ४ | ३ | १२ |
| १२ | ५९ | ५३ | १४ | ५९ | ३ | १५ | ७ |
| ३४ | ४७ | ३८ | ५० | १९ | ७ | ११ | ५७ |
| ५७ | ७९८ | ३८ | ३७ | ११ | ६९ | २ | ३ |
| ५६ | ४२ | २ | ५६ | ५६ | ८ | ५९ | ११ |

ह्या ग्रहांत रवि ४ राशि भुक्त होऊन ५ वे राशींतील ह्मणजे सिंह राशींतील १२ अंश, १२ कला आणि ३४ विकला आहे असें कळतें. आणि त्याची २४ तासांची गति ५७ कला आणि ५६ विकला आहे असें अंकदर्शित करीत आहेत. आतां शके १८१९ सालचे अयनांश किती आहेत हें पाहूं. शालिवाहन शकांतून ४४४ वजा केले ह्मणजे पाहिजे त्या वर्षारंभाचें अयनांश निघतात. शके १८१९ उणे ४४४ बाकी १३७५ अयनांशाची गति वर्षाची १ कला आहे. ६० कलेचा एक अंश होतो ह्मणून १३७५÷६० भागाकार २२ अंश आला आणि बाकी ५५ कला राहिल्या ह्मणजे शके १८१९ मधील अयनांश २२ अंश ५५ कला आले. स्पष्ट रवि ४।१२।१२।३४ आहे. ह्यांत २२ अंश ५५ कला मिळविल्या ह्मणजे सायन स्पष्ट रवि झाला. तो ५।५।७।३४ आला, ह्मणजे कन्या राशींत रवि ५ अंश ७ कला ३४ विकला आला.

ह्याप्रमाणें इतर ग्रह सायन करावेत. अंक १० मध्यें उदाहरण व रीत दिली आहे त्यावरून २४ तासांतील पाहिजे त्या वेळेचे स्पष्ट ग्रह त्रैराशिकानें करतां येतील. त्याचप्रमाणें प्रत्येक ग्रहाची रोजची गति कळली ह्मणजे अमावास्येचे मागील दिवसांपैकीं कोणत्याही दिवसाचे स्पष्ट ग्रहांचे अंश, कला, विकला त्रैराशिकानें जे येतील ते अमावास्येचे दिवशींचे सूर्योदयाचे ग्रहांतून उणे करावेत ह्मणजे इष्ट दिवसाचे व घटिका पळांचे स्पष्ट ग्रह तयार होतात. वर दर्शित केल्याप्रमाणें सायन ग्रह तयार झाले तरी ते स्पष्ट सायन वेधतुल्य ग्रहांशीं अंश, कला, विकलात्मक तंतोतंत बरोबर येत नाहींत. रवीच्या कांहीं कला शनि व चंद्र यांचे अंश व कला बरोबर येत नाहींत म्हणून सूक्ष्म ग्रहांचें गणित नॉटिकल पंचांगावरून अथवा रॅफेलचे पंचांगावरून करावें. नॉटिकल व रॅफेलचे एफिमिरजमध्यें ग्रहांचे अंश, कला, विकला देतात. त्याचप्रमाणें ग्रहांच्या उत्तरदक्षिण क्रांति देतात. करणादि योग देत नाहींत.

## ग्रहांचीं स्थानफलें व दृष्टिफलें यांचा विचार.

चंद्रविचारः—चंद्र लग्नीं असेल तर तो मनुष्य भटकणारा असतो. हें लक्षण द्विस्वभाव व चरराशींत चंद्र असला तर चांगलें जमतें. मनोवृत्ति चंचल, स्त्रैण, आणि स्त्रियांत मान मिळतो. स्वभाव मनमिळाऊ, गरीब, परोपकारी, जगमित्र, भित्रा, उदार शांत असतो. आणि अडाणी लोकांचें बरोबर जे व्यवहार होतात त्यांत फायदा होतो. चंद्र अग्नि राशीचा असेल तर महत्वाकांक्षी चंद्र मेष राशींत असून प्रजापतीचे दृष्टींत असेल तर मनुष्य डोक्याचा हलका आणि चपल असतो. मकर किंवा वृश्चिक राशीचा लग्नीं असेल तर मद्यपी, कुमार्गी, दुर्व्यसनी, शिव्यागाळी करणारा असतो. मिथुन, कन्या, तूळ व कुंभ या राशींत असला तर शास्त्रप्रिय, ज्योतिषप्रिय उत्तम भाषाभिज्ञ असतो. कर्क व मीनेचा असेल तर दयाळु, सुस्वभावाचा असून लोकांकडून मान मिळेल. वृषभेंत दृढनिश्चयी, एकधोरणी, उद्योगी, दीर्घ प्रयत्न करणारा, झोंपेंत चालणारे मनुष्याचे कुंडलींत जन्मकाळीं चंद्र उदीत असतो.



चंद्रग्रहाचा स्वभाव शांत आहे आणि त्यास तंटे बखेडे आवडत नाहींत. चंद्र २ स्थानीं असला तर धनप्राप्ति व यश चांगलें मिळतें. परंतु तो वृश्चिक किंवा मकर राशींतील असेल तर द्रव्यासंबंधानें अडचण पडेल व द्रव्यहानि होईल.

चंद्र ३ रे स्थानीं असेल तर अल्प प्रवास, बंधु व शेजारी ह्यांपासून फायदा होतो.—गुप्त शास्त्रांचें अभ्यासाकडे मनाची ओढ जाते.

चंद्र ४ थे स्थानीं असला तर स्थलांतर होतें. जमिनजुमला व शेतकीपासून फायदा होतो. चंद्र चतुर्थस्थानीं स्वगृहीचा किंवा उच्च असेल तर भाग्यशाली होईल आणि शेवटीं स्वतंत्र होईल ह्मणजे स्वावलंबीपणा प्राप्त होईल.

चंद्र ५ वे स्थानीं कर्क व मीन राशीचा असेल तर संतति फार होईल आणि त्यांवर जन्मणारा फार प्रीति करील. त्याचप्रमाणें तरुण पुरुषावर तो प्रीति करील. पंचमस्थानांत चंद्र असला ह्मणजे जुगारी, स्त्रीव्यसनी आणि चैनी मनुष्य असतो.

चंद्र ६ वे स्थानीं असला ह्मणजे प्रकृति वाईट असते. द्विस्वभाव राशीचा ६ वे स्थानीं असेल तर स्त्रियास क्षयरोगाची धास्ती असते. स्थीर राशीचा असेल तर मुतखडा, मूत्रकृच्छ्र, मेहादि रोग होतात. चर राशीचा असेल तर पोटांत व स्नायूंत विकार होतो. चंद्र क्लिष्टस्थानीं, किंवा अशुभ दृष्टीनें विलोकित असेल तर वरील वर्णन केलेली फलें मिळतील. कारण चंद्रग्रहाचा स्वभाव शुभ आहे तो वाईट फलें देत नाहीं. फक्त अशुभ ग्रहांच्या दृष्टींत मात्र अशुभ फल देतो.

चंद्र ७ वे स्थानीं असल्यास विवाहसुख, स्त्रीसौख्य, कायद्यांमध्यें विजय, भागीदारापासून फायदा, प्रवास व जागेची बदलाबदली करण्याची प्रवृत्ति होते—चंद्र वृषभ, कर्क, तूळ, धन, कुंभ आणि मीन राशीचा असेल तर नवरा किंवा बायको फार उद्योगी व हुशार असतात.

चंद्र अष्टम स्थानीं असेल तर विवाहांत द्रव्यप्राप्ति होते. शनि मंगळाची त्यावर अशुभ दृष्टि असेल तर आकस्मिक मृत्यु होण्याची धास्ती असते.

चंद्र ९ वे स्थानीं असेल तर पुष्कळ प्रवास करील. शास्त्रीय विषयाकडे कल राहील, धर्मनिष्ट, चौकस व तिर्सट असा असेल, चंद्र जर बलवान् असेल तर स्त्रीच्या नातेवायकांकडून मदत होईल.

चंद्र १० स्थानीं असेल तर संपूर्ण आयुष्यांत भरभराट होत जाईल. श्रीमंताचे स्त्रियांकडून नेहमीं नजराणे होतील. चंद्र बलिष्ट असल्यास बराच लाभ होईल. लोकमान्य होईल. नित्य प्रचारांत लागणाऱ्या वस्तूंचा क्रयविक्रय केला असतां फायदा होईल.



चंद्र ११ वे स्थानीं असल्यास पुष्कळ लोकांशीं मैत्री होईल व त्यापासून फायदा होईल. बलहीन असल्यास मदत होणार नाहीं.

चंद्र १२ वे स्थानीं वृश्चिक किंवा मकर राशीचा असेल तर त्यास इतर लोक फसवितील, त्याबरोबर कपट करतील, परंतु इतर कोणत्याही राशीचा चंद्र १२ वे स्थानीं असेल तर जय आणि द्रव्यप्राप्ति होते.

प्रत्येक पत्रिकेंत चंद्राचें द्वादशस्थान वर्णन पाहावें.

### चंद्राची इतर ग्रहाबरोबर युति व दुसऱ्या दृष्टि.

चंद्र हा ग्रह बुधाबरोबर युति करील तर अथवा अन्य शुभ दृष्टि करील तर मनुष्य बुद्धीचा चपल व हुशार असतो. वायु राशींत बुध असेल तर मनुष्य समयसूचक व कल्पक असतो. ही युति १ लें, ३ रें, ९ वें आणि १० वें स्थानीं झाल्यास उत्तम समजावी. ह्या युतीचे योगावर जन्मलेला मनुष्य परकीय भाषांचा अभ्यास त्वरीत करतो आणि जन्मलग्न मिथुन, कन्या, तूळ, धन, अथवा कुंभ ह्यांपैकीं कोणतेंही लग्न असेल तर तो मनुष्य उत्तम वक्ता होतो.

बुधाबरोबर चंद्र वाईट दृष्टि रीतीत असेल तर—चाहाडखोर, खोटे बोलणारा, दुसऱ्याची मानहानि करणारा मनुष्य होतो. त्याची बुद्धि चपल, स्वभाव उद्धट असतो. शनीची वाईट दृष्टि बुध आणि चंद्र यांवर असेल तर तो मनुष्य बेइमानी होतो व तो आपले बुद्धीचा दुरुपयोग करतो.

चंद्राची शुक्रावर शुभ दृष्टि असली ह्मणजे जन्मणारा मनुष्य स्वतःचे संबंधानें फार काळजी घेतो.

पोशाखासंबंधानें फार व्यवस्थित असतो. स्त्रियांस मान्य असतो. स्त्रीसुख चांगलें लागतें. शुक्रपीडित नसल्यास चांगली बायको मिळते, आणि चिकू असतो.

शुक्र चंद्राकडून पीडित असल्यास निष्काळजी, मलीन, दारुबाज आणि आळशी असतो. स्त्रियांस स्त्रीरोग, अशक्तता आणि मुदतीचे रोग नेहमीं होतात.

रवीवर चंद्राची कोणतीही शुभ दृष्टि असेल तर आयुष्य सुखद जातें. धनप्राप्ति चांगली होते आणि महाजनांपासून फायदे, मानमरातब मिळतो. ह्या दृष्टियोगावर जन्मलेल्या मनुष्यास रोजगार मिळतोच असें जाणावें. शरीर सदृढ राहतें आणि स्त्री उदार व उदात्त मनाची मिळते. अशुभ दृष्टि असल्यास द्रव्यप्राप्ति होत नाहीं, धंदा रोजगार मिळत नाहीं. सट्टयाचे व्यापारांत द्रव्य जातें अगर स्त्रियां करितां द्रव्यनाश होतो, शरीर अशक्त राहतें आणि नाना प्रकारचे रोग होतात.

**चंद्रमंगळाची युति** अथवा अशुभ दृष्टि असल्यास स्वभाव हट्टी, मत्सरी, उद्दाम, असतो त्याच प्रमाणें वाईट कृत्य कोणतेंही असो त्यांत पडणारा मनुष्य असतो. व्यभिचारी असतो. द्रव्य व शक्ति यांचा व्यय करतो. मिथ्याभाषण करणारा, शूर आणि उदार असतो. स्त्रीसुख चांगलें मिळत नाहीं. स्त्री भांडखोर आणि मद्यपि असते. स्त्रियांस हा योग असल्यास शरीरप्रकृति चांगली राहत नाहीं. त्रास फार होतात आणि अखेरीस बेअब्रु होते. चंद्राची मंगळावर शुभ दृष्टि असेल तर मनुष्य शूर आणि निश्चयी असतो. दुसऱ्या बरोबर व्यवहारांत फायदा होतो



परंतु विषयसुखाकडे आणि मद्याकडे जास्त ओढ घेतो. शरीर सदृढ आणि विशेष चपल असतें.

**चंद्रगुरूची युति** अथवा शुभ दृष्टि असल्यास आयुष्य सुखांत जातें. द्रव्यप्राप्ति चांगली होते. स्त्रीसुख चांगलें लागतें. स्त्रीचे पत्रिकेंत हा योग असतां शरीर बळकट असतें आणि धनप्राप्ति चांगली होते. चंद्राची अशुभ दृष्टि गुरूवर असेल तर द्रव्यनाश होईल. दरिद्र येईल. सट्टयांत पैसे जातील, पोटांत आणि फुफुसांत रोग होईल.

**चंद्रशनीची युति** असल्यास अथवा अन्य अशुभ दृष्टि असल्यास द्रव्यनाश होतो. कपटी मित्रांकडून द्रव्यापहार होतो. धंद्यांत बूड येते. स्त्री चांगली मिळत नाहीं. हा योग द्विस्वभाव राशींत जाहला तर एकापेक्षां जास्त विवाह होतात. दशम, एकादश, द्वादश, तनु, धन, सहज आणि भ्रातृस्थान ह्यांत हा योग झाला तर कांहीं दिवस शरीरप्रकृति बिघडते. त्याचप्रमाणें चतुर्थ स्थानापासून दशम स्थानापर्यंत हा योग कोणतेही स्थानीं झाला तर उंचावरून पतन होतें आणि अपघात होतात.

**शनिचंद्रयुति** योग हा द्रव्य प्राप्तीस व संसारसुखास फारच वाईट आहे. स्त्रीयांस हा योग असेल तर शरीरसुख चांगलें लागत नाहीं, मद्यपी, आणि व्यसनी असते. शुक्रही पीडित असेल तर स्त्रीस शरीरसौख्य मिळणार नाहीं. चंद्र शनि शुभदृष्टियुक्त असतील तर शांत, घेतलेलें काम तडीस नेणारा, द्रव्यवान होतो. स्त्रियांस शरीरसुख चांगलें लागतें.

शहाणी आणि उद्योगी स्त्री असते. चंद्र आणि प्रजापति उर्फ हर्शल यांची युति असेल तर तो मनुष्य बेफिकीर असेल तर व्यभिचारी आणि स्त्रीनें टाकलेला असतो. स्त्रीचे पत्रिकेंत हा योग असेल तर नवरा अन्य विवाहित स्त्रियां बरोबर व्यभिचार करील. त्या योगावर जन्मलेला मनुष्य प्रवासी आणि वारंवार आपलें राहण्याचें ठिकाण बदलत असतो.

**चंद्रप्रजापतीचा** दृष्टियोग शुभ असला तर जन्मणारा मनुष्य गुप्तकर्मे करील ह्मणजे व्यभिचारी असेल परंतु तो स्त्रीत्यागी नसेल. चंद्र प्रजापति १ ले, ३ रे, ९ वे अथवा १० स्थानीं असेल तर पुष्कळ प्रवास होतील. आणि तो फलज्योतिषी असेल.*

बुध हा ग्रह तनुस्थानांत असला ह्मणजे मनुष्य चलाख व हुशार असतो. अग्निराशींत असला ह्मणजे चपल, रागीट, नाट्यकलेंत कुशल किंवा त्या कलेचा शोकी असतो. वक्ता चांगला असतो. गणिती असतो आणि चांगला शोधक असतो. धन राशींतील बुधापेक्षां मेष आणि सिंह राशींतील बुधाचें फल जास्त जमतें. धन आणि वृषभ राशींत बुध असेल तर जन्मणारा थोडा क्रोधी आणि मूर्ख असतो आणि त्यास चांगलें भाषण करतां येत नाहीं. वृषभ अथवा मकर राशींत बुध असेल तर मनुष्य खुनशी, डोकेफिरू, खादाड आणि स्वेच्छाचारी असतो.

---

* वरील सर्व चंद्रदृष्टियोग प्रत्येक पत्रिकेंत पाहिला पाहिजे. कोणते स्थानांत हा योग होतो आणि दृष्टि किती बलवान अथवा दुर्बळ आहे त्याप्रमाणें विचार करून वरील वर्णन युक्त करावें.



वरील अनिष्ट गडबडी झाल्या. मंगळ कन्याराशींत ता. ९ जुलै सन १८९७ रोजीं आला त्यावेळेपासून २६ आगष्टपर्यंत तो कन्या राशींत आहे. पुणें न्यू इंग्लिश स्कूलचे वर्णनांत १८ वे वर्षी भागीदारांत तंटे होणारे आहेत. पुणें न्यू इंग्लिश स्कूल ग्रांट कांहीं अटीवर बंद करण्यांत येणार आहे असेंही कळविण्यांत आलें आहे असें कळतें. पुणेकरांवर अथवा महाराष्ट्रीयांवर १८९८–९९ सालीं घोरपड येणारी आहे त्यासंबंधानें दोन शब्द मालेंत येतीलच.

---

## मालेचें दुसरें वर्ष.

दुसरे वर्षाचे १२ अंक एकदम छापून वर्गणिदारांस ते नव्हेंबर अखेर किंवा डिसेंबर महिन्यांत मिळतील. ह्या अंकांत विद्यार्थ्यांकरितां सुलभ माहिती आहे. होरा, द्रेष्काण, सप्तमांश, नवांशादिक कुंडल्या तयार करण्याची पद्धत, ग्रहांचे दशवर्ग, ग्रहांचीं दृष्टिफलें, ग्रहांचीं द्वादश राशिस्थफलें, द्वादश भावांचें वर्णन हे भाग क्रमवार व समजण्यासारखे सोपे लिहिले आहेत. प्रत्येक वर्गणिदारास आपली कुंडली तयार करतां येऊन ५० रुपये किंमतीची पत्रिका सुमारें १ महिन्यांत पुस्तकाचे आधारें करतां येईल, असें पुस्तक पाहिल्यावर कळेल. पत्रिकेचा धंदा करणाऱ्यास, किंवा कर्मणुकीचे वेळेंत आपले देशबांधवांची भवितव्यता कळण्याची ज्यांस इच्छा आहे त्यांस तर हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवण्यासारखें झालें आहे. ता. १ नवंबरचे आंत फक्त बारा आणे वर्गणी पाठविणारास–त्याची जन्म लग्न कुंडली सायन द्वादश भावसहित सूक्ष्म स्पष्ट ग्रहयुक्त मिळेल, इतकेंच नाहीं तर त्यास द्रव्यप्राप्तीचीं वर्षें, बढती **होण्याचीं वर्षें, संततीचा व स्त्रीसुखाचा काळ, साधारण राजयोगवर्णन** आणि **स्थूलमानानें आयुष्यप्रमाण** इतकें वर्णन फुकट मिळेल. वर्गणीदारांनीं ह्या सवलतीचा उपयोग त्वरित करावा आणि वर्गणी वरील मुदतींत पाठवावी. ह्या अंकासोबत जाहिरात पाठविली आहे ती वाचून मित्रमंडळींस कृपाकरून दाखवावी.

हे बाराही अंक सन १८९८ चे जानेवारीचे आरंभीं मिळतील.

## एजंटांचीं नांवें.

पुणें.--बुधवारपेठ—माणकेश्वराचा वाडा—रा. रा. आनंदराव कृष्ण हेबळेकर यांचे घरीं.

इंदूर.—इंग्लिश स्कूल—रा० रा० बापू नरसिंह भावे, असिस्टंट-मास्तर.

नाशिक.—वे. शा. सं. रा. रा. विष्णु रावजी रहाळकर, ज्योतिषी.

बेळगांव.—बाळकृष्ण मल्हार लाड, वकील.

पनवेल.—कृष्णराव पांडुरंग तुंगारे.

पत्ताः—फणसवाडी, जगन्नाथाची चाळ—मार्केट पोष्ट, मुंबई.


"तत्त्वविवेचक" प्रेस, मुंबई.

# ज्योतिर्माला.

THE JOTIRMALA OR THE GARLAND OF ASTROLOGY.

ग्रहा राज्यं प्रयच्छंति ग्रहा राज्यं हरंति च।
ग्रहैर्व्याप्तं सर्वमिदं त्रैलोक्यं सचराचरम्॥

"The wise man rules his stars;
The fool obeys them."



पुस्तक १ लें.] मार्च, १८९६. [अंक ११ वा.


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| सर्वार्थचिंतामणि .... .... .... .... | २१–३६ |



विषयक्रमः—थोर पुरुषांच्या व संस्थेच्या कुंडल्या अंक १,५ आणि ९.
„ आर्यफलज्योतिषाची सुलभ माहिती „ २।६।१०.
„ सर्वार्थचिंतामणीचें भाषांतर „ ३।७।११.
„ युरोपीय फलज्योतिषाची माहिती „ ४।८.


[ All Rights Reserved by the Publishers.]

वर्षाची किंमत १२ आणे.

## अवश्य वाचा.

ज्योतिर्मालेचा ११ वा अंक फारच उशिरानें निघाला आहे. वर्गणीदारांस वारंवार सूचना केल्या, पत्रें पाठविलीं, तरी उत्तर नाहीं आणि वर्गणीही नाहीं. कांहीं रावबहादुरांनीं व्ही० पे० मागवून वर्गणी न देतां तीं परत केलीं आहेत. सुमारें ३०० शे वर्गणीदारांनीं वर्गणी न पाठविण्याचा निश्चय केलेला दिसतो. वर्गणी वेळेवर न आली म्हणजे छापखान्यांतून पुस्तक बाहेर पडत नाहीं आणि त्यामुळें ज्या वर्गणीदारांनीं वर्गणी पाठविली असते त्यांस त्रास होतो. ज्योतिर्मालेचा १२ वा अंक निघण्यापूर्वी ज्यांनीं वर्गणी पाठविली नाहीं त्यांकडे व्ही० पे० नें अंक पाठविण्यांत येतील, आणि जे वर्गणीदार व्ही० पे० परत करतील अथवा वर्गणी पाठविणार नाहींत त्यांचीं नांवें ज्योतिर्मालेंत प्रसिद्ध होतील. ज्योतिर्मालेची वर्गणी शास्त्रीयविषयाचे पुस्तकांत अत्यंत कमी आहे. चालकांचा हेतु फक्त शास्त्राची वृद्धि करण्याचा असून पैसे मिळविण्याचा नाहीं. चालू अंकासुद्धां नुकसान सुमारें १७५ रुपये झालें आहे. तथापि हें नुकसान सोसून १२ अंक बाहेर पडतील. दुसरे वर्षासही १२ अंक निघतील. तेव्हां जुने व नवे वर्गणीदारांनीं आणखी एकएक वर्गणीदार मिळवून वर्गणी दुसरे वर्षाचे पहिले अंकाबरोबर पाठविल्यास ज्योतिर्मालेचा अंक वेळेवर निघेल हें कळविणें नको.

# ज्योतिर्माला.

पुस्तक १ लें.] मार्च, १८९६. [अंक ११ वा.

## सर्वार्थचिंतामणि.

(सातव्या अंकावरून पुढें चालू.)

### पात.

१. तनुस्थानांत पात असल्यास मनुष्य दुःखी, रोगी, क्रूर, घातकी, मूर्ख, आप्तवर्गाचा द्वेष करणारा असतो.

२. द्वितीयस्थानांत पात असल्यास मनुष्य आळशी, दुराचरणी, अति पित्तप्रकृतीचा, रोगी, निर्दय, कृतघ्न, दुष्टमनाचा आणि पापें करणारा असतो.

३. सहजस्थानांत पात असल्यास स्थिर बुद्धीचा, लढाऊ, दाता, धनाढ्य, राजप्रिय आणि सेनापति होतो.

४. चतुर्थस्थानांत पात असल्यास, बंदीवान, व्याधियुक्त, अपुत्र, दुर्दैवी असतो.

५. पंचमस्थानांत पात असल्यास दरिद्री, रूपवान्, कफपित्तवातप्रकृतीचा मनुष्य असतो. स्वभावानें निष्ठुर असून निराश्रित असतो.

६. षष्ठस्थानांत पात असल्यास शत्रूचा नाश करणारा शरिरानें घट्टाकट्टा, सर्व शस्त्रांचा संग्रही, कलांत निपुण, आणि स्वभावानें शांत असतो.

७. सप्तमस्थानांत पात असल्यास धन, दारा, सुत ह्यांनीं टाकलेला असून कामी, निर्लज्ज, परस्त्रीरत असतो.

८. अष्टमस्थानांत पात असल्यास नेत्ररोगी, कुरूप, दुर्दैवी, ब्राह्मणद्वेष्टा, रक्तजन्यविकारी असतो.

९. नवमस्थानांत पात असल्यास फार व्यापार करणारा, पुष्कळ मित्र असणारा आणि पुष्कळ ज्ञान संपादिलेला, स्त्रीप्रिय, मधुरभाषी असा मनुष्य असतो.

१०. दशमांत पात असल्यास श्रीमान्, धर्माचरण करणारा, शांत, धर्मकार्यांत प्रवीण असा मनुष्य असतो. त्याचप्रमाणें अचाट बुद्धीचा आणि विलक्षण असतो.

११. एकादशस्थानांत पात असल्यास पुष्कळ संपत्तिमान्, मानी, सत्यवादी आणि हातांत घेतलेलें काम तडीस नेणारा, पुष्कळ घोडे बाळगणारा, गाणारा असा असतो.

१२. द्वादशस्थानांत पात असल्यास कोपी, बहु कर्मैं करणारा, कांहीं व्यंग असणारा, धर्मलंड, आप्तांकडून द्वेष पावणारा असा असतो.

## परिधि.

१. प्रथम भावांत परिधि असल्यास विद्वान्, सत्यप्रिय, शांत, धनवान्, पुत्रवान्, शुचिर्भूत, दाता, गुरूचा आदर करणारा असतो.

२. दुसरे भावांत परिधि असल्यास श्रीमान्, रूपवान्, ऐषआराम करणारा, सुखी, धर्मपरायण, पदरीं पुष्कळ माणसें संभाळणारा असा मनुष्य असतो.

३. तिसरे भावांत परिधि असल्यास स्त्रीप्रिय, स्वरूपवान्, साधु आणि स्वजनाशीं स्नेह ठेवणारा आणि मृत्युकालीं गुरुभक्ति करणारा असा असतो.

४. चतुर्थ भावांत परिधि असल्यास शत्रूंना थक्क करणारा, सौम्यस्वभावाचा, द्रव्यवान् आणि गीतज्ञ मनुष्य असतो.



५. पंचम भावांत परिधि असल्यास लक्ष्मीवान्, शीलवान्, सुस्वरूप सर्वांस प्रिय, धर्मवत्सल आणि स्त्रियांस प्रिय असतो.

६. षष्ठ स्थानांत परिधि असल्यास स्पष्टवक्ता, संतति संपत्तियुक्त, सुखोपभोगी, सर्वांचें कल्याण करणारा आणि शत्रूंचा नाश करणारा असतो.

७. सप्तम स्थानांत परिधि असल्यास अल्पसंतति, सुखहीन, मंदबुद्धीचा, अतिनिष्ठुर, स्त्रीरोगी असा मनुष्य असतो.

८. अष्टम स्थानांत परिधि असल्यास आध्यात्मिक विषयाचा व्यासंगी, शांत, शरीरानें मजबूत, दृढनिश्चयी, समान भाव ठेवणारा असा असतो.

९. नवम भावांत परिधि असल्यास, पुत्रसंतति असते, सुखी, स्वरूपवान्, श्रीमान् आणि लडिवाळ न केलेला असतो. त्याचप्रमाणें मानी, थोड्यांत तृप्त होणारा असतो.

१०. दशमांत परिधि असल्यास तो मनुष्य क्वचितच मूर्ख असतो. भोगी, शरिरानें बळकट, मत्सर न करणारा सर्व शास्त्रपारंगत असतो.

११. एकादश भुवनांत परिधि असल्यास स्त्रीभोगी, गुणवान्, मतिमान्, स्वजनप्रिय, मंदाग्नि असा मनुष्य असतो.

१२. द्वादश स्थानांत परिधि असल्यास गुरुनिंदक असतो.

## चाप.

१. धन, धान्य, संपत्ति, कृतज्ञ, विद्वान् लोकांस मान्य, निर्दोषी असा मनुष्य प्रथम भावांत चाप असल्यास असतो.

२. धन स्थानांत चाप असल्यास मनुष्य मधुरभाषी, सुविचारी, धनवान्, नम्र, विद्वान्, धर्मतत्पर असतो.

३. तिसरे भुवनांत चाप असल्यास मनुष्य कृपण, कलाभिज्ञ, अट्टल चोर, व्यंग अवयवांचा आणि उन्मत्त लोकांबरोबर स्नेह ठेवणारा असतो.

४. चवथे भावांत चाप असल्यास मनुष्य सुखी, राजप्रिय, गोधनाचा संग्रही आणि निरोगी असा असतो.

५. पंचम भावांत चाप असल्यास गुणज्ञ, दीर्घदर्शी, देवभक्त, मधुरभाषी आणि सर्वकामी मनुष्य असतो.

६. षष्ठ स्थानांत चाप असल्यास मनुष्य शत्रूचा नाश करणारा, धूर्त, सुशील, सुस्वरूप आणि प्रिय असतो.

७. सप्तम स्थानांत चाप असल्यास मनुष्य संपत्तिमान्, गुणी, शास्त्रवेत्ता, धार्मिक आणि प्रिय असतो.

८. अष्टम स्थानांत चाप असल्यास मनुष्य परकर्मरत, क्रूर, परदार गमन करणारा आणि विकलांगी असतो.

९. नवम स्थानांत चाप असल्यास मनुष्य तपस्वी, उपोषणें करण्यांत निमग्न, विद्वान्, लोकमान्य आणि कीर्तिमान् असतो.

१०. दशम स्थानांत चाप असल्यास मनुष्य धन, ऐश्वर्य आणि पुत्रवान् आणि कीर्तिमान असतो.

११. एकादश स्थानांत चाप असल्यास लाभप्राप्ति, निरोगी, अतिरागीट, मंत्र, तंत्र आणि स्त्रीपरिक्षक मनुष्य असतो.



१२. चाप द्वादश स्थानांत असल्यास मनुष्य दुष्ट, दीर्घसूत्री, दुर्बुद्धि, निर्लज्ज, परस्त्रीरत आणि निर्धन असतो.

## शिखी.

१. तनुस्थानांत शिखी असल्यास सर्व विद्या जाणणारा, सुखी, वक्ता, प्रिय आणि सर्व कर्मांत पडणारा असा मनुष्य असतो.

२. दुसरे भावांत शिखी असल्यास मनुष्य वक्ता, प्रियंवद, सुस्वरूप, काव्य करणारा, पंडित, मानी, विनीत, वाहनयुक्त असतो.

३. तृतीय स्थानांत शिखी असल्यास मनुष्य कामी, क्रूर कर्मे करणारा, किडकिडीत, दरिद्री आणि तीव्ररोगी असतो.

४. चतुर्थ स्थानांत शिखी असल्यास मनुष्य रूपवान्, गुणसंपन्न, सात्विक, विद्येची अभिरुचि असणारा, सुखी असा असतो.

५. पंचम स्थानांत शिखी असल्यास मनुष्य सुखी, भोगी, कलाभिज्ञ, युक्तिवान्, मतिवान्, वाक्पटु आणि गुरुभक्ति करणारा असा असतो.

६. षष्ठ स्थानांत शिखी असल्यास मनुष्य मातृपक्षाचा क्षय करणारा असतो. शूर, सुस्वरूप, विचक्षण.

७. सप्तम स्थानांत शिखी असल्यास रक्तदोषी, भटक्या, कामी, रोगी आणि वेश्यासक्त असतो.

८. अष्टम स्थानांत शिखी असल्यास नीचकर्मरत, पापी, निर्लज्ज, निंदक, विधवागमनी, परस्त्रीगमनी असा असतो.

९. नवम स्थानांत शिखी असल्यास लिंगधारी,

प्रसन्नवृत्तीचा, सर्वांचें कल्याण करणारा, धर्मकार्यांत निपुण असा असतो.

१०. दशम स्थानांत शिखी असल्यास सौभाग्य संपन्न, स्त्रीयुक्त, दाता, चांगले लोकांत हिंडणारा असा असतो.

११. एकादश भुवनांत शिखी असल्यास मनुष्य स्वधर्मी, लाभ पावणारा, लोकमान्य, द्रव्यवान्, सुदैवी, शूर, पुण्यकर्मरत आणि निपुण असा असतो.

१२. द्वादश स्थानांत शिखी असल्यास मनुष्य पापकर्मे करणारा, शूर, श्रद्धाहीन, निर्दय, परदाररत आणि उग्र असतो.

## प्राणपद.

१. पहिले भावांत प्राणपद असल्यास मुखदुर्बल (मुका) उन्मत्त, जडांगी, हीन, कृश शरीराचा, दुःखी असतो. क्षीण प्राणपद लग्नांत असेल तर मनुष्य रोगी होईल.

२. प्राणपद दुसरे भावांत असेल तर मनुष्य धन, धान्य, संतति, सेवकयुक्त असतो.

३. प्राणपद तिसरे भावांत असेल तर हिंसा करणारा, गर्विष्ठ, चोरांशीं फार निष्ठुर, गुरुभक्तिवर्जित असतो.

४. चतुर्थ भावांत प्राणपद असल्यास तो मनुष्य सुखी, सुस्वरूप, स्नेही व स्त्रियांस प्रिय, गुरुसेवापरायण, सुशील असतो.

५. प्राणपद पंचम भावांत असल्यास मनुष्य सुखी, कोणत्याही गोष्टीची पर्वा न ठेवतां कर्तृत्व करून दाखविणारा, दयाळु, सर्व प्रकारचे ऐषआराम भोगणारा.

६. प्राणपद षष्ठ स्थानांत असल्यास बंधुजन व शत्रूंस वश, तीव्र स्वभावाचा, मंदाग्नियुक्त, निर्दय, दुष्ट, अल्परोगी, धनवान् आणि अल्पायु असा मनुष्य असतो.



७. सप्तम भावांत प्राणपद असल्यास ईर्षालु, सदोदित कामी, तीव्र स्वभावाचा, शरीरानें भयंकर मुद्रेचा, वाईट गोष्टींत पुढें असणारा आणि कुबुद्धि असा मनुष्य असतो.

८. अष्टम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य रोगग्रस्त, पीडित, बंधु, पुत्र, सेवकांपासून मोठमोठीं दुःखें पावणारा असतो.

९. नवम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य पुत्रवान्, धनसंपन्न, सुदैव, सुस्वरूप, राजसेवक, हुद्देदार, सदा संतोषवृत्ति आणि विचक्षण असा असतो.

१०. दशम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य शक्तिमान्, बुद्धिमान्, दक्ष, राजकार्यांत प्रवीण, आणि देवार्चनपरायण असतो.

११. प्राणपद एकादश भुवनांत असल्यास मनुष्य विख्यात, गुणवान्, प्राज्ञ, ऐषआराम भोगणारा, धनवान्, गौरवर्णाचा आणि मानप्रिय असतो.

१२. द्वादश भुवनांत प्राणपद असल्यास मनुष्य क्षुद्र, दुष्ट, हीनांग, आप्त व द्विज यांचा द्वेष करणारा, नेत्ररोगी, काणा असतो.

( श्लोक १६ ) चार केंद्रांना व्योम ( दशम ) अस्त ( सप्तम ), पाताल ( चतुर्थ ) आणि विलग्न ( लग्न ) अशीं नांवें आहेत. केंद्रांस कंटक असें ह्मणतात. जें केंद्र आपले राशीचे नवमांशांत उदय पावलें असेल त्यास वर्गोत्तमी असें ह्मणतात.

( श्लोक १७ ) जलचर राशी चतुर्थ स्थानांत अस-

त्यास बलवान्, पशुराशी दशमांत बली, नरराशि लग्नांत बली, आणि कीटराशी, सप्तम स्थानांत बलवान् असतात. ह्यावरील राशी वरील स्थानांपासून सप्तम भुवनांत असल्यास निर्बल जाणाव्या.

( श्लोक१८।१९ ) ह्यांत ग्रहांचीं उच्चत्वें आहेत. ज्यो० अं० २ पृ० १० पहा. उच्चराशीपेक्षां मूल त्रिकोण राशीचें बल कमी असतें.

( श्लोक० २० ) दिवसा मनुष्यराशी बलवान् असतात. पशुराशी रात्रीं बलवान् असतात आणि कीट व जलचरराशी संधिकालीं बलवान् असतात. ३।६।१० आणि ११ ह्या स्थानांस चय असें ह्मणतात.

( श्लो. २१ ) द्वादश राशींचे अनुक्रमवर्ण येणेंप्रमाणें आहेत. अंकसंख्या राशीदर्शक आहेत.

( १ ) लाल. ( २ ) श्वेत. ( ३ ) पोपटी. ( ४ ) लाल व पांढरा. ( ५ ) धूरासारखा. ( ६ ) पांडुर. ( ७ ) चित्र. ( ८ ) काळा. ( ९ ) सुवर्णासारखा. (१०) पिंगट. (११) कबुरी (१२) बभ्रु ( मुंगुसासारखा ) व स्वच्छ.

( श्लो. २२ ) सूर्यापासून जें द्वितीय स्थान त्यास वेशि असें ह्मणतात. मेषेपासून कन्येपर्यंत पूर्व चक्रार्ध चतुर्गुणित करून पांच मिळवून राशिमानें समजावीं. व तींच उलट रीतीनें तूळेपासून मेषपर्यंत समजावीं.

( श्लो. २३ ) रवि चंद्र हे राजे होत; मंगळ सेनाधिपति; बुध युवराज; गुरु व शुक्र हे मंत्री ( प्रधान ) व शनि सेवक आहे. यांपैकीं ज्याचा जो लग्नाधिपति असेल त्याप्रमाणें त्याची वृत्ति असेल.

( श्लो. २४ ) रवि हा आत्मा आहे; चंद्र—मन; मंगळ—पराक्रम; बुध—भाषण; गुरु—ज्ञान व सुख; शुक्र—मद ( वीर्य ); शनि—दुःख आहे.



(श्लो. २५ ) सूर्याचीं नांवें—सूर्य, हेलि, भानुमान्, दीप्तरश्मिः, चंडांशु, भास्कर, अहस्कर. चंद्राचीं नांवें—अब्ज, सोम, चंद्रमा, शीतरश्मि, शीतांशु, ग्लौ, मृगांकः, कलेशः.

( श्लो. २६ ) मंगळाचीं नांवें—आर, वक्र, अवनेय, कुज, भौम, लोहितांग, पापी; बुधाचीं नांवें—विज्ञ, सौम्य, बोधन, चंद्रपुत्र, चांद्रि, शांत, श्यामगात्र, अतिदीर्घः.

( श्लो. २७ ) गुरूचीं नांवें—जीव, अंगिरा, देवगुरु, प्रशांत, वाचांपति, इज्य, त्रिदिवेशवंद्य. शुक्राचीं नांवें—भृगु, उशना, भार्गवसूनु, अच्छ, काणः, कवि, दैत्यगुरु, सित.

(श्लोक २८ व २९) शनीचीं नांवें—छायात्मज, पंगु, यम, अर्कपुत्र, कोण, सित, सौरि, शनि, नील, क्रूर, कृशांग, कपिलाक्ष, दीर्घ, तम, असुर. राहूचीं नांवें—अगु, सैंहिकेय, सुवर्भानु, विधुंतुद. केतूचीं नांवें—केतु, शिखी, ध्वज. गुलिकाचीं नांवें—शनिसुत, गुलिक, मांदि, यमात्मज, प्राणहर, अंति, पापी.

( श्लोक ३० ) प्राणपदाचीं नांवें—प्राण, असु.

## ग्रहांचीं स्वरूपें.

(श्लोक ३० पासून ३७ पर्यंत.)

सूर्य—डोळे पिंगट, पित्तप्रकृति, प्रतापवान्, सत्वगुणी, स्वल्पकेशयुक्त, प्रवाशी, संदिग्ध बोलणारा, अल्पदाता, दैविकबुद्धियुक्त, बांधेसुत, थोडा तांबूस आणि काळा.

चंद्र—शुभ्रकांति, बांधेसुत, वक्ता, विचारवान्, क्वचित्च सडपातळ, शांतरीतीनें बोलणारा, सत्वगुणी, वात, कफ, पित्तप्रकृतीचा.

मंगळ—रागीट व क्रूर नेत्र, तांबूस व किंचित् शुभ्रवर्ण, पित्तप्रकृतीचा, चंचल बुद्धीचा, कृशशरीर, तामस बुद्धि, प्रतापी, आणि स्त्रीसंभोगाविषयीं आतुर.

बुध—दूर्वाप्रमाणें श्यामवर्ण, अतिविद्वान्, रजोगुणी, खरें बोलणारा, हास्यप्रिय, वात, कफ, पित्तप्रकृतीचा, प्रतापी आणि परस्त्रीगामी.

गुरु—स्थूलशरीर, कफप्रकृति, श्रेष्ठमति, सुविद्वान्, सत्वगुणी, आणि सर्व गुणांनीं संपन्न, नेत्र आणि केंस पिंगट.

शुक्र—सुंदर डोळे, इच्छापूर्तिसंपन्न ( ज्याच्या इच्छा परिपूर्ण होतात असा ) सुखी, बली, सुंदरकांति, निळे केशयुक्त, रजोगुणी, आणि सर्वगुणसंपन्न.

शनि—दुष्ट, कृश आणि दीर्घ अवयवी, पिंगट डोळे, रांठ, दांत मोठे, तामसबुद्धि, वातप्रकृति, कठोर भाषण करणारा, निंद्य.

( श्लोक ३७ पासून ३९ पर्यंत. )

वरील ग्रहांचे गुण जन्मकालीं अथवा प्रश्नकालीं त्यांचे बलाप्रमाणें पहावेत. [ पत्रिकेंत ग्रहांचें बल नवमांश कुंडलीवरून पहातात, ह्मणजे नवमांश कुंडलींत जें लग्न येईल त्या लग्नाचा स्वामी जन्म कुंडलींत जसा असेल त्याप्रमाणें त्या मनुष्याचें स्वरूप व गुण असतील. आणि जर नवमांश कुंडलीचा स्वामी जन्मकुंडलींत अस्तास गेला असेल तर अथवा षष्ठ, अष्ट, आणि द्वादश स्थानीं असेल तर वरील ग्रहांचे गुण जमणार नाहींत; ह्मणजे, ग्रहांचे बलाप्रमाणें त्यांचें स्वरूप व गुण जमतील. नवमांश कुंडलींत चंद्र ज्या स्थानांत



असेल त्या स्थानाधिपाप्रमाणें मनुष्याचा वर्ण व स्वरूप वर्णन करतात. ] गुरु आणि शुक्र हे विप्रवर्णदर्शक आहेत. रवि आणि मंगळ क्षत्रियवर्णदर्शक आहेत. चंद्र आणि बुध हे वैश्यवर्णदर्शक आहेत. शनि हा शूद्रवर्णदर्शक आहे. राहू आणि केतु हे चांडाल ज्ञातिदर्शक आहेत. गुलिक हा ज्ञातिभ्रष्टदर्शक आहे.

( श्लोक ४० पासून ४३ पर्यंत. )

ग्रहांचे रंग—रवि—रक्तासारखा, चंद्र—धवल, मंगळ—अतितांबडा, बुध—पोपटीरंग, गुरु—पिंवळा, शुक्र—नाना प्रकारचा विचित्र रंग, शनि—काळा.

ग्रहांच्या देवता—रवि—अग्निदेवता, चंद्र—जलदेवता, मंगळ—अग्निकुमार, बुध—विष्णु, गुरु—इंद्र, शुक्र—इंद्राणी शनि—ब्रह्मदेव.

ग्रहांच्या दिशा—रवि—पूर्व, शुक्र—आग्नेय, मंगळ—दक्षिण, राहु—नैऋत्य, शनि—पश्चिम, चंद्र—वायव्य, बुध—उत्तर, गुरु—ईशान्य. ( चंद्राच्या राशि कोणत्या दिशेस बलवान् असतात तें येणेंप्रमाणें ):—




पापग्रह—क्षीण चंद्र, मंगळ, रवि आणि शनि. बुध हा पापग्रहांचे अनुरोधानें पापग्रह होतो. शुभ ग्रहांचे अनु-

रोषानें शुभ होतो. पापग्रहाखेरीज बाकीचे शुभ ग्रह जाणावेत.

नपुंसकग्रह–बुध आणि शनि. स्त्रीग्रह–चंद्र आणि शुक्र. नरग्रह–रवि, मंगळ, आणि गुरु. जन्मकालीं जो ग्रह बलवान् असेल त्या वृत्तीचा मनुष्य उपजतो.

मंगळ–मज्जा, गुरु–मांस, शुक्र–धातु, बुध–त्वचा, चंद्र–रक्त, रवि–अस्थि, शनि–स्नायु. याप्रमाणें सप्तधातूंचे स्वामी आहेत. हे स्वामी जेव्हां बिघडतात तेव्हां त्या धातूंचे विकारानें त्रास होतो आणि मृत्युकालीं अष्टम स्थानांत जे ग्रह असतील त्या धातूंच्या कोपानें मृत्यु होतो.

( श्लो० ४४–४६. )

स्थानें–रवीचें देवस्थान, चंद्राचें जलस्थान, मंगळाचें अग्निस्थान, बुधाचें क्रीडास्थान, गुरूचें कोश–( भांडार ) स्थान, शुक्राचें शय्यास्थान, शनीचें उकिरडा, कचरा इ० व राहूचें सर्पस्थान.

वस्त्रें–शनीचें जीर्ण, रवीचें जाडें भरडें, गुरूचें कांहीं नवें व कांहीं जुनें, शुक्राचें कठिण ( टिकाऊ ), चंद्राचें नवें, बुधाचें फाटकें छिद्रें पडलेलें, मंगळाचें जळलेलें, राहूची गोधडी (कंथा ) व केतूचें चित्रविचित्र व विशेष छिद्रें पडलेलें.

( श्लो० ४७–४९. )

पृथ्वीवरील धातु व मणि–रवीचें तांबें, चंद्राचा मणि, मंगळाचें सोनें, बुधाचे शिंपले, गुरूचें रुपें, शुक्राचें मोतीं, शनीचें लोखंड, राहूचें शिसें, व केतूचें पोलाद.

वस्त्रांचे रंग–गुरूचें पिंवळें, शुक्राचें नानाप्रकारचे रंगाचें रेशमी, रवीचें इंद्रगोप किड्याप्रमाणें तांबडें, चंद्राचें

३

सर्वांत जुनें इंग्रजी–मराठी साप्ताहिक पत्र

# प्रभाकर.

वर्षाची वर्गणी ४ रुपये ८ आणे. ट. ह. ५ रुपये.

ट्रामवे टर्मिनस जवळ, गिरगांव–मुंबई.

नवीन व्यवस्थेसंबंधानें विद्वानांचे उत्तम अभिप्राय आले आहेत.

## वर्गणीची पोंच.

| | |
|---|---|
| प्रो. भडकमकर. | रा. रा. काशिनाथ ग. गोरे. |
| रा. रा. केशव कृ. वाणी. | ,, पुरुषोत्तम भा. पाटकर. |
| ,, श्रीधर शामराव. | ,, शंकर ना. गाडगीळ. |
| ,, धोंडो बाबाजी. | ,, छगनलाल खें गुजर. |
| ,, आनंदराव ना. आचार्य. | ,, गोविंद रा. पराडकर. |
| ,, बाळकृष्ण. ना. फाटक. | ,, भिकाजी म. रानडे. |
| ,, वामन विष्णु. | ,, नरहर रा. जोशी. |
| मि. रुस्तुमजी जहांगीरजी. | रा. ब. साबाजीराव चिटणीस. |
| डा. आपाजी गोविंद काळे. | रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे. |
| रा. रा. मल्लार खंडेराव चिटणीस. | श्री. बाळासाहेब ईनामदार. |
| ,, मोरेश्वर बा. मराठे. | रा. रा. जनार्दन ग. वाळिंबे. |
| ,, पांडुरंग गोविंद. | ,, मार्तंड त्रिंबक आऊटी. |
| सरदार लक्ष्मणराव ह. पटवर्धन. | ,, माधव गोपाळ आठले. |
| रा. रा. रामचंद्र बापूजी रुईकर. | ,, त्रिंबक बापूजी पटवर्धन. |

☞ हा अंक कांहीं विशेष अडचणींमुळें नियमितवेळीं छापतां आला नाहीं ह्मणून तो सप्टेंबर १८९७ मध्यें छापिला आहे.

## दोन शब्द.

मालेस आश्रय मिळावा तसा मिळाला नाहीं. ६ शें ग्राहकांपैकीं सुमारें ३ शें ग्राहकांनीं आश्रय दिला. मालेचा छपाईखर्च पोष्ट-खर्च निम्में सुटला आहे. ग्राहकांनीं आमचे सूचनेचा योग्य विचार केल्यास आणि एक एक दोन दोन वर्गणीदार जास्त मिळवि-ल्यास माला नियमीतपणें चालेल. मासिक पुस्तकांचें जीवन लोका-श्रयावर असतें. शास्त्रीयविषयाचे पुस्तकास ग्राहक थोडेच अस-तात. विद्वानलोकांचे आश्रयाखेरीज सामान्यशिक्षणाचे लोकांस शास्त्रीय विषयाची गोडी नसते, त्यामुळें आश्रयास विद्वान लोकांकडे धांव मारावी लागते, परंतु त्यांतच बुडवे फार भेटतात म्हणून वर्गणी-दारांसच विनंति करून मालेचें सौभाग्य रक्षण्याचें श्रेय देणें योग्य वाटत आहे.

दुर्दैवानें मालेंतील ५ वे अंकांतील **लॉर्ड सँडहर्स्ट यांचे कारकीर्दीचें भविष्य** सर्व जुळलेलें पाहून आनंद व दुःख होत आहे. कोल्हापुरचे महाराज व जंजिऱ्याचे नबाब साहेब आणि विद्याखात्यांतील नौकर रा. नेने ह्यांस पदव्या मिळाल्या, प्राथमिक शिक्षणास एज्युकेशन कमीशन बसून मदत मिळाली ह्या गोष्टी चांगल्या झाल्या. नामदारांचा स्तुतिपाठ गव्हरनर साहेबांनीं गाइला तोही ठीकच झाला. परंतु दुष्काळानें शेतकरी लोकांचें झालेलें नुकसान; अन्न अन्न करून हजारों लोकांनीं सोडलेले प्राण, पुण्यास सोलजर लोकांनीं दिलेला विविध त्रास, जादा पोलीस, मुंबई व पुणें म्युनिसीपालटीवर लादलेला खर्च, नातूंची उचलबांगडी, ना. टिळकांवरील राजद्रोहाचा आरोप आणि धरपकड,ह्या गोष्टी ना. सँडहर्स्ट साहेबांच्या गूढ कारकीर्दीची व अप्रि-यतेची साक्ष देतात असें कष्टानें म्हणावें लागतें. विद्यार्थ्यांनीं ह्या कारकीर्दीचे कुंडलींत मंगळ कन्या राशींत म्हणजे पुणें शहरचे तनु-स्थानांत आहे हें नीट लक्षांत ठेवावें. मालेच्या प्रथम अंकांत पान १० मध्यें पुण्याचें लग्न कन्या ठरविलेलें आहे. कारकीर्दीचे मध्यभागीं मंगळ पंचांगस्त सायन कन्या राशींत आला तेव्हां ह्या

# ज्योतिर्माला.

पुस्तक १ लें.] एप्रिल, १८९६. [अंक १२ वा.

## यूरोपीय फलज्योतिष.

( आठवे अंकावरून पुढें चालू. )

हर्शल उर्फ प्रजापति यास दिली आहे. कुंभ ही राशि शास्त्रिय, जिज्ञासु, शोधप्रिय, असाधारण वस्तु-प्रिय, गूढशास्त्राभ्यास निमग्न असे स्वभावाची राशि आहे. प्रजापति ह्या ग्रहाचा स्वभाव वरील वर्णनाप्रमाणें आहे. प्राचीन लोकांस प्रजापतीचे अस्तित्वाची माहिती खास होती; परंतु कालांतरानें आणि बुद्धिभ्रष्टतेनें ती नष्ट झाली. हा ग्रह डोळ्यांनीं पाहणारास अंधक दिसतो, त्यामुळें त्याची गणना ताऱ्यांत होऊं लागली आणि त्यामुळें प्रजापतीचें ज्ञान नाहीसें झालें असें राफेलचें मत आहे.

आर्य लोकांस ह्या ग्रहाची माहिती होती असें दिसतें. शनीचा प्रदक्षिणाकाळ ३० वर्षांचा आहे. प्रजापतीचा प्रदक्षिणाकाळ ८४ वर्षांचा आहे. ह्यावरून प्रजापतीस शनिपुत्र त्याचे दुरत्वामुळें नांव मिळालें असावें. गुलिक ग्रहाचा स्वभाव प्रजापती सारखा आहे.

**ग्रहांचीं उच्चत्वें नीचत्वें इत्यादिकः**—कांहीं ग्रह कांहीं राशींत फारच बळवान असतात. त्याहून कमी बली कांहीं राशींत असतात आणि कांहीं राशींत ते दुर्बल असतात. ह्या गुणांवरून त्यांचे भेद केले आहेत. त्यांस

उच्च स्वगृह, आणि नीच असें ह्मणतात. कोष्टकांत प्रत्येक ग्रहांची राशिपरत्वें अंशात्मक उच्चें आणि नीचें दाखविलीं आहेत:—

## ग्रहांचे उच्चनीचत्वाचें कोष्टक.

| राशि. | स्वगृह. | उच्चत्व. | नीचत्व. | दुर्बलत्व. |
|---|---|---|---|---|
| मेष. | मंगळ. | रवि १९ अंश. | शनि १९ अंश. | शुक्र. |
| वृषभ. | शुक्र. | चंद्र ३ ,, | प्रजापति. | मंगळ. |
| मिथुन. | बुध. | ...... | ...... | गुरु. |
| कर्क. | चंद्र. | गुरु १५ ,, | मंगळ २८ ,, | शनि. |
| सिंह. | रवि. | ...... | ...... | प्रजापति. |
| कन्या. | बुध. | बुध १५ ,, | शुक्र २७ ,, | गुरु. |
| तूळ. | शुक्र. | शनि २१ ,, | रवि १९ ,, | मंगळ. |
| वृश्चिक. | मंगळ. | प्रजापति. | चंद्र ३ ,, | शुक्र. |
| धन. | गुरु. | ...... | ...... | बुध. |
| मकर. | शनि. | मंगळ २८ ,, | गुरु १५ ,, | चंद्र. |
| कुंभ. | प्रजापति. | ...... | ...... | रवि. |
| मीन. | गुरु. | शुक्र २७ ,, | बुध १५ ,, | बुध. |

आयज्योतिष मताचें कोष्टक अंक २ पृष्ठ १० वावर दिलें आहे. प्रजापतीचे उच्चत्वाचे व नीचत्वाचे अंश नक्की झाले नाहींत.

कित्येक ग्रह कोष्टकांत दिलेल्या राशीखेरीज दुसऱ्या कांहीं राशींत थोडे बलवान होतात. हें बल राशीच्या स्वभावगुणाच्या साम्यामुळेंच मानलें आहे. उदाहरणार्थ बुध—हा मिथुन, कन्या, तूळ आणि कुंभ या शास्त्रीय विषयक राशींत बलवान होतो. शुक्र, कर्क व मीन या प्रसव व आर्द्र (जल) राशींत बलवान होतो. रवि



आणि मंगळ अग्नि राशींत ह्मणजे मेष, सिंह आणि धन या राशींत बलवान होतात. गुरु प्रसव व सौम्य राशींत आणि मुख्यत्वें कर्क, मीन, तूळ आणि कुंभ ह्या राशींत बलवान होतो. शनि तूळ आणि कुंभेंत बलवान होतो. प्रजापति तूळ आणि वृश्चिक राशींत बलवान होतो. चंद्र हा शुक्राप्रमाणें समजावा. ग्रहांचीं बलाबलें अन्य कोणत्याही रीतीनें पाहूं नये असें रॅफेलचें मत आहे.

## ग्रहांचीं स्थानबलें.

ग्रह जन्मकालीं आकाशाचे ज्या भागांत ह्मणजे कुंडली ह्या नकाशांत ज्या स्थानीं पडेल त्याप्रमाणें त्यांस बल प्राप्त होतें. सर्वांत उत्तम स्थानें लग्न व दशम होत. त्यानंतर सप्तमस्थान, त्यानंतर एकादशस्थान आणि नंतर चतुर्थस्थान ह्याप्रमाणें स्थानें कमी कमी बलवान होतात. वाईट स्थान फक्त ६ वें स्थान आहे. ह्या स्थानांतील ग्रह चांगलें फल देत नाहीं ह्मणजे वाईट फलें देतो. कांहीं ग्रह एका स्थानापेक्षां दुसऱ्या स्थानांत अधिक बलवान होतात. असें:—रवि, चंद्र, गुरु आणि मंगळ हे दशम स्थानांत शनि, बुध लग्नांत, बुध तृतीय स्थानांत, शुक्र सप्तम स्थानांत आणि हर्शल उर्फ प्रजापति नवम स्थानांत बलवान होतात.

यूरोपीय फलज्योतिषाप्रमाणें कुंडली तयार करण्याची रीत ज्योतिर्माला अंक १० मध्यें दिली आहे. सायन स्पष्ट ग्रहांचे पुस्तकाप्रमाणें रॅफेलचें पुस्तक दर वर्षास प्रसिद्ध होतें. चालू वर्षाची किंमत ६ पेन्स ह्मणजे जवळ जवळ आठ आणे आहे. मागील कोणत्याही वर्षाचे एफिमिरिजला (स्पष्टग्रहदर्शक पंचांग) १ शिलिंग

ह्मणजे १ रुपया पडतो. ह्या पुस्तकांत सर्व ग्रह लंदन येथील दोन प्रहरचे ह्मणजे मध्याह्नीचे दिले असतात. मुंबई वेळ ४ वाजून ५२ मिनिटांची झाली ह्मणजे विलायतेंत १२ वाजतात. रॅफेलचें पुस्तकांत दिलेले ग्रह मुंबईचे १२ वाजून गेल्यावर ४ तास ५२ मिनिटांनीं लंदनचे मध्याह्नी येतात. तेव्हां मुंबई मध्याह्न काळचें स्पष्ट ग्रह करतांना प्रत्येक ग्रहाची २४ तासाची गति काढून त्रैराशिकानें ४ तास ५२ मिनिटांची गति उणी करावी ह्मणजे दोन प्रहरीचे ग्रह येतील.

आपले देशांत निरयण पंचांगें हल्लीं चालू आहेत. ज्योतिर्मालेंत सर्व ग्रह सायन असतात तेव्हां निरयण ग्रहांस सायन कसे करावेत हें सांगतों. निरयण ग्रह, ह्या शब्दाचा अर्थ ज्या ग्रहांचीं स्थानें ह्मणजे राशि, अंश, कला, विकला हे भाग अयनांशरहित असतात त्या ग्रहांस निरयण ग्रह ह्मणतात. संपातापासून आरंभ धरून जी गणना ती सायन गणना होय. संपात चल आहे. त्याची गति दर वर्षास सुमारें ५०-१ विकला आहे. ग्रहलाघवकाराचे मताप्रमाणें १ कला आहे. शा० शके ४४४ चे सुमारास संपात रेवतीचे अखेरीस किंवा अश्विनीचे आरंभीं होता. तेथून तो २२ अंशांवर मागें ह्मणजे उत्तराभाद्रपदावर आला आहे. हें अंतर संपात चलाचें होय. ह्यास अयनांश म्हणतात. अयनांश युक्त जी गणना ती सायन होय. आपले देशांत ग्रहलाघवावरून पंचांगें करतात; म्हणून पंचांगांतील ग्रहांस अयनांश युक्त केले म्हणजे मिळविले असतां ग्रह सायन होतात. उदाहरणार्थ शके १८१९ श्रावण कृष्ण ३० रोजीचे



पंचांगांतील निरयण स्पष्टग्रह खालीं दिले आहेत. त्यास सायन करणें आहे तर त्याची रीतः—

| र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. | रा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ५ | ५ | ४ | ३ | ७ | ९ |
| १२ | १० | ७ | ८ | २६ | ४ | ३ | १२ |
| १२ | ५९ | ५३ | १४ | ५९ | ३ | १५ | ७ |
| ३४ | ४७ | ३८ | ५० | १९ | ७ | ११ | ५७ |
| ५७ | ७९८ | ३८ | ३७ | ११ | ६९ | २ | ३ |
| ५६ | ४२ | २ | ५६ | ५६ | ८ | ५९ | ११ |

ह्या ग्रहांत रवि ४ राशि भुक्त होऊन ५ वे राशींतील ह्मणजे सिंह राशींतील १२ अंश, १२ कला आणि ३४ विकला आहे असें कळतें. आणि त्याची २४ तासांची गति ५७ कला आणि ५६ विकला आहे असें अंकदर्शित करीत आहेत. आतां शके १८१९ सालचे अयनांश किती आहेत हें पाहूं. शालिवाहन शकांतून ४४४ वजा केले ह्मणजे पाहिजे त्या वर्षारंभाचें अयनांश निघतात. शके १८१९ उणे ४४४ बाकी १३७५ अयनांशाची गति वर्षाची १ कला आहे. ६० कलेचा एक अंश होतो ह्मणून १३७५÷६० भागाकार २२ अंश आला आणि बाकी ५५ कला राहिल्या ह्मणजे शके १८१९ मधील अयनांश २२ अंश ५५ कला आले. स्पष्ट रवि ४।१२।१२।३४ आहे. ह्यांत २२ अंश ५५ कला मिळविल्या ह्मणजे सायन स्पष्ट रवि झाला. तो ५।५।७।३४ आला, ह्मणजे कन्या राशींत रवि ५ अंश ७ कला ३४ विकला आला.

ह्याप्रमाणें इतर ग्रह सायन करावेत. अंक १० मध्यें उदाहरण व रीत दिली आहे त्यावरून २४ तासांतील पाहिजे त्या वेळेचे स्पष्ट ग्रह त्रैराशिकानें करतां येतील. त्याचप्रमाणें प्रत्येक ग्रहाची रोजची गति कळली ह्मणजे अमावास्येचे मागील दिवसांपैकीं कोणत्याही दिवसाचे स्पष्ट ग्रहांचे अंश, कला, विकला त्रैराशिकानें जे येतील ते अमावास्येचे दिवशींचे सूर्योदयाचे ग्रहांतून उणे करावेत ह्मणजे इष्ट दिवसाचे व घटिका पळांचे स्पष्ट ग्रह तयार होतात. वर दर्शित केल्याप्रमाणें सायन ग्रह तयार झाले तरी ते स्पष्ट सायन वेधतुल्य ग्रहांशीं अंश, कला, विकलात्मक तंतोतंत बरोबर येत नाहींत. रवीच्या कांहीं कला शनि व चंद्र यांचे अंश व कला बरोबर येत नाहींत म्हणून सूक्ष्म ग्रहांचें गणित नॉटिकल पंचांगावरून अथवा रॅफिलचे पंचांगावरून करावें. नॉटिकल व रॅफिलचे एफिमिरजमध्यें ग्रहांचे अंश, कला, विकला देतात. त्याचप्रमाणें ग्रहांच्या उत्तरदक्षिण क्रांति देतात. करणादि योग देत नाहींत.

## ग्रहांचीं स्थानफलें व दृष्टिफलें यांचा विचार.

चंद्रविचारः—चंद्र लग्नीं असेल तर तो मनुष्य भटकणारा असतो. हें लक्षण द्विस्वभाव व चरराशींत चंद्र असला तर चांगलें जमतें. मनोवृत्ति चंचल, स्त्रैण, आणि स्त्रियांत मान मिळतो. स्वभाव मनमिळाऊ, गरीब, परोपकारी, जगमित्र, भित्रा, उदार शांत असतो. आणि अडाणी लोकांचें बरोबर जे व्यवहार होतात त्यांत फायदा होतो. चंद्र अग्नि राशीचा असेल तर महत्वाकांक्षी चंद्र मेष राशींत असून प्रजापतीचे दृष्टींत असेल तर मनुष्य डोक्याचा हलका आणि चपल असतो. मकर किंवा वृश्चिक राशीचा लग्नीं असेल तर मद्यपी, कुमार्गी, दुर्व्यसनी, शिव्यागाळी करणारा असतो. मिथुन, कन्या, तूळ व कुंभ या राशींत असला तर शास्त्रप्रिय, ज्योतिषप्रिय उत्तम भाषाभिज्ञ असतो. कर्क व मीनेचा असेल तर दयाळु, सुस्वभावाचा असून लोकांकडून मान मिळेल. वृषभेंत दृढनिश्चयी, एकवेरणी, उद्योगी, दीर्घ प्रयत्न करणारा, झोंपेंत चालणारे मनुष्याचे कुंडलींत जन्मकाळीं चंद्र उदीत असतो.



चंद्रग्रहाचा स्वभाव शांत आहे आणि त्यास तंटे बखेडे आवडत नाहींत. चंद्र २ स्थानीं असला तर धनप्राप्ति व यश चांगलें मिळतें. परंतु तो वृश्चिक किंवा मकर राशींतील असेल तर द्रव्यासंबंधानें अडचण पडेल व द्रव्यहानि होईल.

चंद्र ३ रे स्थानीं असेल तर अल्प प्रवास, बंधु व शेजारी ह्यांपासून फायदा होतो.—गुप्त शास्त्रांचें अभ्यासाकडे मनाची ओढ जाते.

चंद्र ४ थे स्थानीं असला तर स्थलांतर होतें. जमिनजुमला व शेतकीपासून फायदा होतो. चंद्र चतुर्थस्थानीं स्वगृहीचा किंवा उच्च असेल तर भाग्यशाली होईल आणि शेवटीं स्वतंत्र होईल ह्मणजे स्वावलंबीपणा प्राप्त होईल.

चंद्र ५ वे स्थानीं कर्क व मीन राशीचा असेल तर संतति फार होईल आणि त्यांवर जन्मणारा फार प्रीति करील. त्याचप्रमाणें तरुण पुरुषावर तो प्रीति करील. पंचमस्थानांत चंद्र असला ह्मणजे जुगारी, स्त्रीव्यसनी आणि चैनी मनुष्य असतो.

चंद्र ६ वे स्थानीं असला ह्मणजे प्रकृति वाईट असते. द्विस्वभाव राशीचा ६ वे स्थानीं असेल तर स्त्रियास क्षयरोगाची धास्ती असते. स्थीर राशीचा असेल तर मुतखडा, मूत्रकृच्छ्र, मेहादि रोग होतात. चर राशीचा असेल तर पोटांत व स्नायूंत विकार होतो. चंद्र क्लिष्टस्थानीं, किंवा अशुभ दृष्टीनें विलोकित असेल तर वरील वर्णन केलेली फलें मिळतील. कारण चंद्रग्रहाचा स्वभाव शुभ आहे तो वाईट फलें देत नाहीं. फक्त अशुभ ग्रहांच्या दृष्टींत मात्र अशुभ फल देतो.

चंद्र ७ वे स्थानीं असल्यास विवाहसुख, स्त्रीसौख्य, कायद्यांमध्यें विजय, भागीदारापासून फायदा, प्रवास व जागेची बदलाबदली करण्याची प्रवृत्ति होते—चंद्र वृषभ, कर्क, तूळ, धन, कुंभ आणि मीन राशीचा असेल तर नवरा किंवा बायको फार उद्योगी व हुशार असतात.

चंद्र अष्टम स्थानीं असेल तर विवाहांत द्रव्यप्राप्ति होते. शनि मंगळाची त्यावर अशुभ दृष्टि असेल तर आकस्मिक मृत्यु होण्याची धास्ती असते.

चंद्र ९ वे स्थानीं असेल तर पुष्कळ प्रवास करील. शास्त्रीय विषयाकडे कल राहील, धर्मनिष्ट, चौकस व तिर्सट असा असेल, चंद्र जर बलवान् असेल तर स्त्रीच्या नातेवायकांकडून मदत होईल.

चंद्र १० स्थानीं असेल तर संपूर्ण आयुष्यांत भरभराट होत जाईल. श्रीमंताचे स्त्रियांकडून नेहमीं नजराणे होतील. चंद्र बलिष्ट असल्यास बराच लाभ होईल. लोकमान्य होईल. नित्य प्रचारांत लागणाऱ्या वस्तूंचा क्रयविक्रय केला असतां फायदा होईल.



चंद्र ११ वे स्थानीं असल्यास पुष्कळ लोकांशीं मैत्री होईल व त्यापासून फायदा होईल. बलहीन असल्यास मदत होणार नाहीं.

चंद्र १२ वे स्थानीं वृश्चिक किंवा मकर राशीचा असेल तर त्यास इतर लोक फसवितील, त्याबरोबर कपट करतील, परंतु इतर कोणत्याही राशीचा चंद्र १२ वे स्थानीं असेल तर जय आणि द्रव्यप्राप्ति होते.

प्रत्येक पत्रिकेंत चंद्राचें द्वादशस्थान वर्णन पाहावें.

### चंद्राची इतर ग्रहाबरोबर युति व दुसऱ्या दृष्टि.

चंद्र हा ग्रह बुधाबरोबर युति करील तर अथवा अन्य शुभ दृष्टि करील तर मनुष्य बुद्धीचा चपल व हुशार असतो. वायु राशींत बुध असेल तर मनुष्य समयसूचक व कल्पक असतो. ही युति १ लें, ३ रें, ९ वें आणि १० वें स्थानीं झाल्यास उत्तम समजावी. ह्या युतीचे योगावर जन्मलेला मनुष्य परकीय भाषांचा अभ्यास त्वरीत करतो आणि जन्मलग्न मिथुन, कन्या, तूळ, धन, अथवा कुंभ ह्यांपैकीं कोणतेंही लग्न असेल तर तो मनुष्य उत्तम वक्ता होतो.

बुधाबरोबर चंद्र वाईट दृष्टि करीत असेल तर—चाहाडखोर, खोटें बोलणारा, दुसऱ्याची मानहानि करणारा मनुष्य होतो. त्याची बुद्धि चपल, स्वभाव उद्धट असतो. शनीची वाईट दृष्टि बुध आणि चंद्र यांवर असेल तर तो मनुष्य बेइमानी होतो व तो आपले बुद्धीचा दुरुपयोग करतो.

चंद्राची शुक्रावर शुभ दृष्टि असली ह्मणजे जन्मणारा मनुष्य स्वतःचे संबंधानें फार काळजी घेतो.

पोषाखासंबंधानें फार व्यवस्थित असतो. स्त्रियांस मान्य असतो. स्त्रीसुख चांगलें लागतें. शुक्रपीडित नसल्यास चांगली बायको मिळते, आणि चिक्कु असतो.

शुक्र चंद्राकडून पीडित असल्यास निष्काळजी, मलीन, दारुबाज आणि आळशी असतो. स्त्रियांस स्त्रीरोग, अशक्तता आणि मुदतीचे रोग नेहमीं होतात.

रवीवर चंद्राची कोणतीही शुभ दृष्टि असेल तर आयुष्य सुखद जातें. धनप्राप्ति चांगली होते आणि महाजनांपासून फायदे, मानमरातब मिळतो. ह्या दृष्टियोगावर जन्मलेल्या मनुष्यास रोजगार मिळतोच असें जाणावें. शरीर सदृढ राहतें आणि स्त्री उदार व उदात्त मनाची मिळते. अशुभ दृष्टि असल्यास द्रव्यप्राप्ति होत नाहीं, धंदा रोजगार मिळत नाहीं. सट्टयाचे व्यापारांत द्रव्य जातें अगर स्त्रियां करितां द्रव्यनाश होतो, शरीर अशक्त राहतें आणि नाना प्रकारचे रोग होतात.

**चंद्रमंगळाची युति** अथवा अशुभ दृष्टि असल्यास स्वभाव हट्टी, मत्सरी, उद्दाम, असतो त्याच प्रमाणें वाईट कृत्य कोणतेंही असो त्यांत पडणारा मनुष्य असतो. व्यभिचारी असतो. द्रव्य व शक्ति यांचा व्यय करतो. मिथ्याभाषण करणारा, शूर आणि उदार असतो. स्त्रीसुख चांगलें मिळत नाहीं. स्त्री भांडखोर आणि मद्यपि असते. स्त्रियांस हा योग असल्यास शरीरप्रकृति चांगली राहत नाहीं. त्रास फार होतात आणि अखेरीस बेअब्रु होते. चंद्राची मंगळावर शुभ दृष्टि असेल तर मनुष्य शूर आणि निश्चयी असतो. दुसऱ्या बरोबर व्यवहारांत फायदा होतो



परंतु विषयसुखाकडे आणि मद्याकडे जास्त ओढ घेतो. शरीर सदृढ आणि विशेष चपल असतें.

**चंद्रगुरूची युति** अथवा शुभ दृष्टि असल्यास आयुष्य सुखांत जातें. द्रव्यप्राप्ति चांगली होते. स्त्रीसुख चांगलें लागतें. स्त्रीचे पत्रिकेंत हा योग असतां शरीर बळकट असतें आणि धनप्राप्ति चांगली होते. चंद्राची अशुभ दृष्टि गुरूवर असेल तर द्रव्यनाश होईल. दरिद्र येईल. सट्टयांत पैसे जातील, पोटांत आणि फुफुसांत रोग होईल.

**चंद्रशनीची युति** असल्यास अथवा अन्य अशुभ दृष्टि असल्यास द्रव्यनाश होतो. कपटी मित्रांकडून द्रव्यापहार होतो. धंद्यांत बूड येते. स्त्री चांगली मिळत नाहीं. हा योग द्विस्वभाव राशींत जाहला तर एका पेक्षां जास्त विवाह होतात. दशम, एकादश, द्वादश, तनु, धन, सहज आणि भ्रातृस्थान ह्यांत हा योग झाला तर कांहीं दिवस शरीरप्रकृति बिघडते. त्याचप्रमाणें चतुर्थ स्थानापासून दशम स्थानापर्यंत हा योग कोणतेही स्थानीं झाला तर उंचावरून पतन होतें आणि अपघात होतात.

शनिचंद्रयुति योग हा द्रव्य प्राप्तीस व संसारसुखास फारच वाईट आहे. स्त्रीयांस हा योग असेल तर शरीरसुख चांगलें लागत नाहीं, मद्यपी, आणि व्यसनी असते. शुक्रही पीडित असेल तर स्त्रीस शरीरसौख्य मिळणार नाहीं. चंद्र शनि शुभदृष्टियुक्त असतील तर शांत, घेतलेलें काम तडीस नेणारा, द्रव्यवान होतो. स्त्रियांस शरीरसुख चांगलें लागतें.

शहाणी आणि उद्योगी स्त्री असते. चंद्र आणि प्रजापति उर्फ हर्शल यांची युति असेल तर तो मनुष्य बेफिकीर असेल तर व्यभिचारी आणि स्त्रीनें टाकलेला असतो. स्त्रीचे पत्रिकेंत हा योग असेल तर नवरा अन्य विवाहित स्त्रियां बरोबर व्यभिचार करील. त्या योगावर जन्मलेला मनुष्य प्रवासी आणि वारंवार आपलें राहण्याचें ठिकाण बदलत असतो.

चंद्रप्रजापतीचा दृष्टियोग शुभ असला तर जन्मणारा मनुष्य गुप्तकर्में करील ह्मणजे व्यभिचारी असेल परंतु तो स्त्रीत्यागी नसेल. चंद्र प्रजापति १ ले, ३ रे, ९ वे अथवा १० स्थानीं असेल तर पुष्कळ प्रवास होतील. आणि तो फलज्योतिषी असेल.*

बुध हा ग्रह तनुस्थानांत असला ह्मणजे मनुष्य चलाख व हुशार असतो. अग्निराशींत असला ह्मणजे चपल, रागीट, नाट्यकलेंत कुशल किंवा त्या कलेचा शोकी असतो. वक्ता चांगला असतो. गणिती असतो आणि चांगला शोधक असतो. धन राशींतील बुधापेक्षां मेष आणि सिंह राशींतील बुधाचें फल जास्त जमतें. धन आणि वृषभ राशींत बुध असेल तर जन्मणारा थोडा क्रोधी आणि मूर्ख असतो आणि त्यास चांगलें भाषण करतां येत नाहीं. वृषभ अथवा मकर राशींत बुध असेल तर मनुष्य खुनशी, डोकेफिरू, खादाड आणि स्वेच्छाचारी असतो.

---

* वरील सर्व चंद्रदृष्टियोग प्रत्येक पत्रिकेंत पाहिला पाहिजे. कोणते स्थानांत हा योग होतो आणि दृष्टि किती बलवान अथवा दुर्बल आहे त्याप्रमाणें विचार करून वरील वर्णन युक्त करावें.



वरील अनिष्ट गडबडी झाल्या. मंगळ कन्याराशींत ता. ९ जुलै सन १८९७ रोजीं आला त्यावेळेपासून २६ आगष्टपर्यंत तो कन्या राशींत आहे. पुणें न्यू इंग्लिश स्कूलचे वर्णनांत १८ वे वर्षीं भागीदारांत तंटे होणारे आहेत. पुणें न्यू इंग्लिश स्कूल ग्रांट कांहीं अटीवर बंद करण्यांत येणार आहे असेंही कळविण्यांत आलें आहे असें कळतें. पुणेकरांवर अथवा महाराष्ट्रीयांवर १८९८–९९ सालीं घोरपड येणारी आहे त्यासंबंधानें दोन शब्द मालेंत येतीलच.

## मालेचें दुसरें वर्ष.

दुसरे वर्षाचे १२ अंक एकदम छापून वर्गणिदारांस ते नव्हेंबर अखेर किंवा डिसेंबर महिन्यांत मिळतील. ह्या अंकांत विद्यार्थीकरितां सुलभ माहिती आहे. होरा, द्रेष्काण, सप्तमांश, नवांशादिक कुंडल्या तयार करण्याची पद्धत, ग्रहांचे दशवर्ग, ग्रहांचीं दृष्टिफलें, ग्रहांचीं द्वादश राशिस्थफलें, द्वादश भावांचें वर्णन हे भाग क्रमवार व समजण्यासारखे सोपे लिहिले आहेत. प्रत्येक वर्गणिदारास आपली कुंडली तयार करतां येऊन ५० रुपये किंमतीची पत्रिका सुमारें १ महिन्यांत पुस्तकाचे आधारें करतां येईल, असें पुस्तक पाहिल्यावर कळेल. पत्रिकेचा धंदा करणाऱ्यास, किंवा करमणुकीचे वेळेंत आपले देशबांधवांची भवितव्यता कळण्याची ज्यांस इच्छा आहे त्यांस तर हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवण्यासारखें झालें आहे. ता. १ नवंबरचे आंत फक्त बारा आणे वर्गणी पाठविणारास–त्याची जन्म लग्न कुंडली सायन द्वादश भावसहित सूक्ष्म स्पष्ट ग्रहयुक्त मिळेल, इतकेंच नाहीं तर त्यास **द्रव्यप्राप्तीचीं वर्षें, बढती होण्याचीं वर्षें, संततीचा व स्त्रीसुखाचा काळ, साधारण राजयोगवर्णन** आणि **स्थूलमानानें आयुष्यप्रमाण** इतकें वर्णन फुकट मिळेल. वर्गणीदारांनीं ह्या सवलतीचा उपयोग त्वरित करावा आणि वर्गणी वरील मुदतींत पाठवावी. ह्या अंकासोबत जाहिरात पाठविली आहे ती वाचून मित्रमंडळींस कृपाकरून दाखवावी.

हे बाराही अंक सन १८९८ चे जानेवारीचे आरंभीं मिळतील.

## ज्योतिर्मालेवर आलेले अभिप्राय.

'ज्योतिर्माला'—ह्या ल्हानशा मासिक पुस्तकांत फलज्योतिषाची सत्यता दाखविण्याचा व आकाशांतील ताऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध कसा असतो तो दाखविण्याचा विचार आहे. विवेचन पद्धति चांगली पद्धतशीर असते. प्रथमतः थोर पुरुषांची लग्नकुंडली देऊन त्यावरून त्याचे गुणावगुण शास्त्रपद्धतीनें सांगितले असतात. प्रथमांकांत **श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराजांची** तसबीर व कुंडली देऊन तिचें विवेचन केलें आहे. प्रस्तुत पुस्तकावरून एका वादाच्या विषयाचें खरें स्वरूप जगांत प्रगट होऊन तथ्यातथ्य बाहेर पडण्याचा चांगला मार्ग झाला. **केरळ कोकिळ. पु. ९ अं. ९.**

**ज्योतिर्माला**—मासिकपुस्तक, अंक **दुसरा** ह्यांत ज्योतिषाविषयीं माहिती फार चांगली आणि सोप्या भाषेनें लिहिलेली आहे. अंक वाचण्याजोगा आहे. अंक ४ ह्यांत आपल्या आणि परकीय ज्योतिषाची माहिती सोप्या भाषेनें आणि थोडक्यांत फार चांगली दिलेली आहे. ह्या चौथ्या अंकांत युरोपीय फलज्योतिषाविषयीं फार चांगली माहिती दिली आहे. अवश्य वाचावी. **बालबोध पु. १५ अंक ५।६.**


**ज्योतिर्माला**—हें मासिक पुस्तक नुकतेंच निघूं लागलें आहे. आजपर्यंत ह्याचे सहा अंक निघाले. यांत भारत व आंग्लज्योतिषाविषयीं शास्त्रीय माहिती सरळ रीतीनें देण्याचा चालकांचा विचार दिसतो. प्रयत्न नवीन दिशेचा व अत्यंत आवश्यक आहे. यास लोकांनीं अवश्य हातभार लावावा. **विद्यार्थिमित्र. पु. १ लें अं. १२.**

**ज्योतिर्माला**—हें मासिक पुस्तक अर्धकच्च्या खेड्यापाड्यांतल्या जोशांना तर फारच उपयुक्त आहे. एवढेंच नाहीं तर नूतनाभ्यासी विद्यार्थ्यांनींही लक्ष्यपूर्वक याचें अध्ययन केल्यानें बराच लाभ होईल. प्रसंगविशेषीं यांत बरेच कठिण वादग्रस्त

## स्फुटवक्ता अभियोगी.

…वयाचें ना…
…रिसरकारच्या
…जागा






देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हीच क्रिया धरावी ॥

'स्फुटवक्ता अभियोगी' ह्यांचें खरें नांव रा. रा. विसाजी

र[illegible] ‘ज्यो[illegible]’ असें आहे. ह्यांचें जन्म शके १७४९ [illegible]स० १८२७ सालीं आगष्ट महिन्याचे १७ वे [illegible]वस शुक्रवारीं ४ वाजून ३९ मिनिटांनीं मुक्काम क्षेत्र नाशिक येथें झाला. ह्यांचे आजे चांगले श्रीमंत होते. परंतु, वडिलांस गरिबी प्राप्त झाली होती. तरी, लहानपणीं ह्मणजे अकरा बारा वर्षांचे वयापर्यंत ह्यांनीं शाळेंत पूर्णांक, अपूर्णांक शिकून, मातुलगृहीं रूपावली आणि अमरकोश ह्यांचा अभ्यास करून, वडिलांपाशीं पांच उपनिषदें झटलीं. पुढें त्यांचीं आईबापें यात्रेकरितां बाहेर पडलीं, आणि ह्या मुलास त्यांनीं त्याच्या मावशीच्या येथें नाशकासच ठेविलें. तेथें त्यांचा बराच अभ्यास झाल्यावर हे गृहस्थ निर्वाहाकरितां, प्रथमतः एका रोटीवाल्याच्या कारखान्यांत, जमाखर्च मांडण्यास, एक रुपया दरमहावर राहिले. आणि मग पुढें एका युरोपियन व्यापाऱ्याकडे तीन रुपयांवर राहिले. नंतर त्यांना मुनसफ कोर्टांत लहानशी जागा मिळाली. तेथें बरेंच दिवस काम केलें. इतक्यांत ह्यांचीं मातापितरें महायात्रा करून ग्वालेरीस येऊन राहिलीं होतीं, त्यांच्या जवळ ते जाऊन राहिले. ग्वालेरच्या दरबारांत मोठ्या प्रयत्नानें त्यांनीं चाकरी मिळविली होती, आणि ती चांगली लाभदायक होईल अशी आशा त्यांस उत्पन्न झाली होती. परंतु दरबारांतल्या लहान मोठ्या लोकांच्या नानाप्रकारच्या कपटांनीं आणि भानगडींनीं त्यांचा सगळा हेतु फसला; आणि तेव्हां त्यांस एक प्रकारचें वैराग्य उत्पन्न होऊन त्यांनीं असा निश्चय केला कीं, कोणीकडून तरी, सरासरीस निर्वाहास मिळेल, एवढा मात्र उद्योग करावयाचा,



ह्याच्या पलीकडे लोभाच्या पाशांत पडावयाचें नाहीं. ह्यानंतर त्यांस एक दोन ठिकाणीं शिंदेसरकारच्या मोजणी खात्यांत थोड्याशा अधिक पगाराच्या जागा मिळाल्या. ह्यावेळीं ह्मणजे इ० स० १८८० चे सुमारास त्यांची बायको आणि प्रथम पुत्र थोडे काळांत एकाएकीं वारले. शिंदेसरकारच्या हुजूरदरबारांत मालजमाखर्चाकडे हे नौकर मृत्युकालापर्यंत होते. ह्यांचें अक्षर अत्यंत सुबक असून ते छापील अक्षरासारखें दिसत असे. ह्यांचे हातून आपले कामांत एकही चूक झाली नाहीं. ह्यांची वृत्ति गंभीर असून, मनानें हे फार मोकळे असत. प्रत्येक व्यक्तीचे स्पष्ट दोष दाखविण्यांत हे गृहस्थ आळस करीत नसत. त्यामुळें हे सर्व लोकांस अप्रिय दिसत. परंतु त्यांचा स्पष्टवक्तेपणा हा ज्यास एक वेळ कळला तो ह्यांचा मित्र झालाच असेंही होत असे. ह्यांचा बांधा उंच असून फारसा उग्र नव्हता. शरीरानें हे गृहस्थ अशक्त होते. ह्यांस दम्याची व थंडीची व्यथा वारंवार होत असे.

ह्या गृहस्थास लहानपणापासून गणिताचा नाद असल्यामुळें, पुढें सुमारें ३९ वे वर्षी ज्योतिषाचा नाद लागला. कै० वा० बापूदेवशास्त्री ह्या जगमान्य ज्योतिर्विदानें एक ज्योतिष्यावर लिहिलेलें पुस्तक ह्या गृहस्थाचे वाचण्यांत आलें. त्यावरून चालू निरयण पंचांगें किती चुकीची व धर्मशास्त्रास सोडून आहेत हें त्यांस कळलें. सायनमताचें बिजारोपण प्रसिद्ध कै० वे० शा० सं० बापूदेवशास्त्री ह्यांनींच केलें परंतु रैफुटवक्ता अभियोगी ह्यानें अमरणपर्यंत सायन वृक्षास वेळोवेळीं

सिंचन करून कै० छत्रे, प्रो० टिळक, रा० भागवत इत्यादिक मंडळीचें वेळोवेळीं त्यांनीं खंडनही केलें आहे. प्रो० किलहार्न ह्यांनीं सायन पंचांग हेंच फक्त आर्य पंचांग आहे असें आपलें मत प्रसिद्ध केलें आहे. सायन पंचांग प्रचारांत आणण्याविषयीं स्फुटवक्ता अभियोगी ह्यानें इंदुप्रकाश, विविधज्ञानविस्तार, आणि ज्ञानप्रकाश ह्यांच्या द्वारें पुष्कळ लेख प्रसिद्ध केले परंतु त्यांत त्यांस, चांगलें यश आलें नाहीं, तेव्हां त्यांनीं त्याविषयीं एक चमत्कारिक नवें पद्य रचून छापून प्रसिद्ध केलें. ते बालबोधांत प्रसिद्ध झालेलें आहे.

ह्या गृहस्थाचा मृत्यु ता. ८ नव्हेंबर सन १८९९ रोजीं दुपारीं १ वाजतां ग्वालेर येथें झाला. मरणकालाचे थोडा वेळ पूर्वीं हे गृहस्थ आपले चिरंजीवाकडून एका महामहोपाध्यायास उत्तर लिहवीत होते त्या पत्राचा शेवट होत असतांना देह विसर्जन झाला.


येथपावेतों कै० वि० र० लेले ह्यांचें त्रोटक चरित्र दिलें. आतां फलज्योतिषाचे बाजूनें विचार करूं. मकरलग्न उदित असून शास्त्रीय राशि जी कुंभ ती तनुभावांत लुप्त झाली आहे. मकरेंत हर्शल अथवा प्रजापति हा ग्रह आहे. ह्या ग्रहाविषयीं निश्चयात्मक कांहीं लिहितां येत नाहीं, तथापि हर्शल हा ग्रह शास्त्रीयविषयाचा दर्शक आहे. पंचमस्थानांत मिथुन ही शास्त्रीय राशि आहे. ह्यामुळें जन्मणारा मनुष्य शास्त्रीय विषयाचा व्यासंगी असला पाहिजे. तनुभावाचा स्वामि हा षष्ठस्थानांत आहे ह्मणून शरिरास सुख लागणार नाहीं, ह्मणजे शरीर कृश पाहिजे. ( **देहाधिपः पापयुतोष्टमस्थो व्ययारिगो वांगसुखं निहन्ति**). लग्नाधिपति षष्ठस्थानांत आहे ह्मणून रा० लेले हे पराक्रमी मानी आणि मतिमान् ( बुद्धिमान् ) होते. ( **लग्नेशे सहजे षष्ठे सिंहतुल्यपराक्रमी सर्व संपद्युतो मानी द्विभार्यो मतिमान्सुखी** ). रा. लेले यांचें बाळपण दरिद्रांत गेलें आहे परंतु पुढें शिंदे यांचे आश्रयाखालीं त्यांची नौकरी मरणकालपर्यंत झाली आहे. हा योग कायमचा आहे. धनभावाचा अधिपति गुरु नवमस्थानांत आहे ह्मणून ही स्थिति रा० लेले ह्यांस प्राप्त झाली. ( **धनेशे नवमे लाभे धनवानुद्यमी पटुः बाल्ये रोगी सुखी पश्चाद्यावदायुः समाप्यते** ). रा० लेले यांचे आजे श्रीमान् गृहस्थ असून त्यांचे वडील गरीब होते ही स्थिति खालील श्लोकांत दिसते. चतुर्थस्थानाचा अधिपति शुक्र सप्तमस्थानांत आहे त्यामुळें रा० लेले ह्यांनीं बहु विद्या संपादन केल्या होत्या. राजदरबारांत ह्यांचें वजन होतें तरी ह्यांचे हातून सभेंत पांडित्य झालें नाहीं. ( **सुखेशे सप्तमे लग्ने बहुविद्यासमन्वितः पित्रार्जितधनत्यागी सभायां मूकवद्भवेत्** ). पंचमस्थानाचा अधिपति बुध सप्तमस्थानांत आहे. ह्मणून धर्मसंबंधाचा विचार करतां रा० लेले सर्वधर्मसमान मानणारे असावेत. त्याचप्रमाणें ह्यांचें शरीर उंच असून स्वामिभक्ति करण्यांत ते प्रवीण होते. ( **सुतेशे कामगे मानी सर्वधर्मसमन्वितः तुंगयष्टिस्तनुस्वामीभक्तियुक्तैकतेजसा** ). पंचमभावाचा अधिपति बुध शुक्रयुक्त असून, पंचम भावीं चंद्र हा गुरूचे नवम दृष्टींत आहे ह्मणून रा० रा० लेले बुद्धिमान् व धारणादिपटु होते. (**सूतर्क्षे शुभे शुभदृष्ट्युते बुद्धिमान् ॥ गुरौ केन्द्र-**

कोणे बुद्धिमान् ॥ पुत्रेशे केन्द्रे शुभान्विते धारणादिपटुः ॥ ज्ञे सुते वा सुतेशे बलिनि केन्द्रे वा बुद्धिमान् ॥ ). धनभावाचा अधिपति गुरु नवमस्थानांत आहे ह्मणून रा० लेले हे अभिप्राय देण्यांत प्रवीण असावेत असें दिसतें. केन्द्रे कोणे सौम्यवागीशयुक्ते वीर्योपेते बुद्धिमानिङ्गितज्ञः.

षष्ठस्थानाचा अधिपति चंद्र मिथुन राशींत २७ अंशावर असून दीप्तांश विचार करतां तो षष्ठस्थानांत आहे ह्मणून रा० लेले ह्यांस शत्रु त्यांचे ज्ञातींतीलच असावेत. सायन मताचें मंडण करतांना रा० लेले ह्यांस कै० छत्रे, प्रो० टिळक, रा० भागवत इत्यादिक मंडळींकडून बराच त्रास सोसावा लागला आहे, परंतु सायन पंचांगास मान्यता जर्मन पंडितांनीं दिली आहे. ( षष्ठेशे रिपुभावस्थे स्वज्ञातिः शत्रुवद् भवेत् परजातिर्भवेन्मित्र भूमौ न चलति ध्रुवम् ). परंतु अंतःकालचे समयासही सायनमताचे मंडणार्थ लेख लिहिण्या इतके स्वकार्यचतुर हे रा० लेले होते. ( षष्ठेशे पंचमे यस्य चलमित्र धनादिकम् दयायुक्तः सुखी सौम्यः स्वकार्ये चतुरो महान् ). रा० लेले ह्यांस दम्याचा व वाताचा विकार होता ह्याचें कारण सप्तमस्थानाचा अधिपति रवि हा अष्टमाधिपति बुधाबरोबर आहे. ( सप्तमेशे तनौ चास्ते........ दुष्टो विचक्षणो धीरो वातरुक् स्थीयतेहृदि ). रा० लेले ह्यांचें मत कांहीं अंशीं नास्तिकासारखें असावें आणि त्यांस व्रणरोग असावा. कारण अष्टमाधिपति बुध सप्तमस्थानीं आहे. ( अष्टमेशे तनौ कामे भार्याद्वयं समादिशेत् विष्णुद्रोहरतो नित्यं व्रणरोगी प्रजायते ). रा० लेले ह्यांचे पत्रिकेंत केंद्रांत मंगळ आणि बुध एकत्र आहेत ह्मणून हे गणिती होते. ( केन्द्रे बुधे वा कुजे गणितज्ञः ). रा० लेले ह्यांनीं सायन मताचे प्रसारार्थ अनेक खटपटी केल्या परंतु त्यांत यश मिळालें नाहीं ह्याचें कारण भाग्यभुवनाचा अधिपति शुक्र सप्तमस्थानांत आहे. भाग्येशेच मदे कल्पे गुणवान्कीर्तिमान् भवेत् कदाचिन्न भवे त्सिद्धं यत्कार्यं कर्तु मिच्छति. स्थलसंकोचास्तव हें चरित्र येथेंच पुरें केलें आहे.



## राष्ट्रीयसभा.




राष्ट्रीयसभेची प्रथम बैठक ता० २८ डिसेंबर सन १८८५ रोजीं दुपारीं मुंबई वेळ १२ वाजतां शेठ गो०

तेजपाल यांचे संस्कृतपाठशाळेंत भरली होती. त्या वेळीं मि० बानर्जी ह्यांनीं अध्यक्ष ह्या नात्यानें राष्ट्रीयसभेची स्थापना झाली असें विदित केलें. हा इष्टकाळ राष्ट्रीयसभेच्या जन्माचा मानिला पाहिजे. ह्या वेळीं मेष ह्या चर राशीचें लग्न नववे अंशांत उदित असून मुंबईशहरचें तनुस्थान जें तूळ तें अस्तास जात होतें. लग्नाधिपति अथवा राष्ट्रीयसभेचा प्राण जो मंगळ तो षष्ठ स्थानांत ह्मणजे पुणें शहरचें तनुस्थान जें कन्या त्यांत असून तनुस्थानावर अष्टम दृष्टीनें पाहत आहे. दक्षिण केंद्रांत उत्तर हिंदुस्थान, अलहाबाद ह्यांचें मकरलग्न आकाशांत मध्यवर्ती उदित असून तेथेंच सूर्यमालेचा चालक रवि जलतत्त्वांत वसला आहे. उत्तर केंद्रांत कलकत्त्याचें तनुस्थान जें कर्क तें उदित असून तेथेंच उत्तर हिंदुस्थानचा अधिपति जो शनि हा जलतत्त्वांत बसला आहे. अस्तकेंद्रीं ह्मणजे मुंबईशहराचे तनुस्थानांत अथवा तूळ लग्नांत हर्शल ( प्रजापति ) गुरु, आणि लोकसमुदाय दर्शक जो चंद्र हे ग्रह असून ते राष्ट्रीयसभेच्या तनुस्थानावर पहात आहेत. पृथ्वीचे ऊर्ध्वभागीं केतु, शुक्र, रवि, बुध, हर्शल ( प्रजापति ) गुरु आणि चंद्र हे ग्रह उदित होते, त्याचप्रमाणें पृथ्वीचे अधोभागीं मंगळ, राहु, शनि, आणि नेपच्यून ( वरुण ) हे ग्रह उदित होते.

राष्ट्रीयसभेच्या तनूचा मालक तनूस अष्टम दृष्टीनें पाहत असून त्यावर चंद्र आणि गुरु ह्यांची सप्तम दृष्टि आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचें आयुष्य अल्प काळाचें नाहीं. लग्नाधिपति मंगळ, कन्या ह्या द्विस्वभाव राशींत आहे ह्मणून राष्ट्रीय सभेच्या मूळ उद्देशांत आणि तिचे धुरीणत्वांत पुष्कळ वडामोडी द्विस्वभाव राशीचे स्वभावानुरूप होणार आहेत. धनभावांत नेपच्यून अथवा वरुण हा पापग्रह असून धनभावाधिपति शुक्र अधिकारयुक्त नाहीं ह्मणून राष्ट्रीयसभेचा फंड अथवा सांपत्तिक स्थिति कांहीं अंशीं समाधानकारक असणार नाहीं. तृतीय स्थानचा अधिपति बुध हा विद्वान् लोकांचा कारक ह्मणजे दर्शक असून तो नवम स्थानांत आहे ह्मणजे स्वसन्मुख राशींत आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचे चिटणीस काम करण्यास दुर्बल दिसत आहेत; परंतु नवम भावाचा अधिपति गुरु केंद्रीं आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचे चिटणीसांचें दौर्बल्य प्रसिद्धीस येणार नाहीं. चतुर्थ स्थानचा अधिपति चंद्र लोकमताचा व स्थावर मालमिळकतीचा दर्शक सप्तम स्थानांत गुरूबरोबर आहे ह्मणून जमिनीवरील सारे, मीठ इत्यादिकांविषयीं लोकांची कुरकूर नाहींशी होणार आहे. आणि राजकीय भुवनाचा ह्मणजे दशम स्थानचा कारक शनि चंद्रक्षेत्रीं आहे. शनि हा कृषीकर्माचा कारक आहे. चंद्र लोकमताचा व राष्ट्रीयसंपत्तीचा ह्मणजे स्थावराचा कारक शुक्राचें स्वगृह जें तूळ तेथें आहे. आणि शुक्र शनीचे घरीं आहे. ह्मणून लोकमत, सामान्य लोक आणि कृषीकर्मावर अवलंबून राहणारे मध्यम प्रतीचे लोक ह्यांमध्यें स्नेहभाव शुक्र, शनि आणि चंद्र ह्या ग्रहांचे क्षेत्रान्वयें वृद्धिंगत होईल. केंद्रांत चर राशि असून त्यांत पांच ग्रह आहेत ह्मणून राष्ट्रीयसभेचें स्थलांतर केंद्रान्वयें झालें आहे. राष्ट्रीयसभेची प्रथम बैठक मुंबई शहरचे तनु स्थानांत, दुसरी बैठक कलकत्त्याचे तनुस्थानांत ( कर्क लग्नांत ), तिसरी बैठक मद्रास

शहरचे तनुस्थानांत ( मेषेंत ), चवथी बैठक अलहाबादचे तनुस्थानांत ( मकरेंत ), आणि पांचवी बैठक पुन्हा मुंबईचे तनुस्थानांत ( तूळेंत ) झाली. पांच बैठकांनीं केंद्रक्रम सोडला नाहीं. त्याचप्रमाणें केंद्रांतही पांचच ग्रह आहेत. सहावी बैठक कलकत्याचे तनुस्थानांत झाल्यावर सातवे बैठकीस केंद्रक्रम बदलून ती बैठक नागपुरचें तनुस्थान जें कन्या त्यांत झाली. पुणें शहरचें तनुस्थान कन्यालग्न आहे. पेशवाईचा व भोंसलेशाईचा उत्कर्ष व अंत सारखाच झाला आहे. श्री० बाजीराव कोरेगांवीं, आणि आप्पा साहेब भोंसले सितावर्डीस एकाच काळीं पराभूत झाले आहेत आणि राजसुखास मुकले आहेत. दोन्ही शहरांचें साम्य पुष्कळ प्रमाणांनीं मिळतें ह्मणून नागपूरचें लग्न कन्या असावें असें खात्रीपूर्वक वाटतें. कलकत्याचे तनुस्थानापासून तृतीय स्थानांत राष्ट्रीय सभेची सातवी बैठक झाल्यावर आठवी बैठक पुन्हा दशमांत ह्मणजे अलहाबादचे तनुस्थानांत झाली. दशमस्थानापासून तृतीय स्थानीं ह्मणजे मीनलग्नांत नववी बैठक झाली. ही बैठक पंजाबचे राजधानींत ह्मणजे लाहोरांत झाली. मीन ही जलराशि आहे. पंजाब हा शब्द पांच नद्यांचा दर्शक आहे. १० वी राष्ट्रीय सभा केंद्रक्रमान्वयें मेष राशींत ह्मणजे मद्रासचे तनुस्थानांत झाल्यावर, अकरावी राष्ट्रीय सभा त्रिकोणांत आली. महाराष्ट्राचें तनुस्थानांत धन लग्न आहे. हे नवम स्थानांत आहे आणि पुणें शहरचे तनुस्थान पंचम भावाचे अंतीं आहे. पुणें शहराचें तनुस्थान किती अंशांत आहे हें नक्की ठरविण्याचीं अन्य साधनें



उपलब्ध झालीं नाहींत तथापि राष्ट्रीय सभेच्या पंचमांत कांहीं अंश कन्येचे आहेत हें निर्विवाद आहे. राष्ट्रीयसभेच्या बैठकीक्रमाप्रमाणें पुढील बैठका दिल्ली आणि त्राव्हनकोर ह्या शहराचे आजूबाजूस होतील असें वाटतें, परंतु कोणक्रमाप्रमाणें धनु राशीशीं साम्य पावणारा प्रांत जो काठेवाड त्याचे आजूबाजूस किंवा अमदाबाद, सुरत शहरांत १२ वी राष्ट्रीयसभा भरेल असें दिसतें. राष्ट्रीयसभेच्या १४ वे आणि पंधरावे वर्षीं सामान्य लोकांच्या मागण्याची दाद सार्वभौम सरकारापुढें जाईल आणि राष्ट्रीयसभेच्या १६ वे वर्षीं शेतकरी, मध्यम दर्जाचे लोक ह्यांचा भरणा राष्ट्रीयसभेच्या मंडपांत जास्त दिसेल. राष्ट्रीयसभेच्या षष्ठस्थानचा ह्मणजे रिपु स्थानचा मालक बुध ग्रह आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचे शत्रु विद्वान् लोकच आहेत. बुध नवम स्थानांत ह्मणजे धर्मस्थानांत आहे ह्मणून धर्माचे सुधारण्याचें ढोंग दाखविणारा एक पक्ष राष्ट्रीयसभेचा शत्रु आहे, परंतु राष्ट्रीयसभेचा मंगळ ग्रह पुण्याचे तनुस्थानांत असून तो आपले स्वराशींत आल्यामुळें सामाजिक परिषदेसंबंधानें सुधारक विद्वान् लोकांस अपयश मिळालें इतकेंच नाहीं परंतु सामाजिक परिषदेचे उत्पादक जे विद्वान् लोक, ज्यांचा कारक ग्रह बुध महाराष्ट्राचे तनुस्थानांत आहे, त्या ग्रहान्वयें संपूर्ण महाराष्ट्रीयांचा दुर्लौकिक व्हावा ही गोष्ट राष्ट्रीयसभेच्या संस्थापनकालींच दिसत आहे. राष्ट्रीयसभेचा तन्वाधिपति मंगळ परिभ्रमणकालमापन कोष्टकानें हल्लीं मेषराशींत असल्यामुळें राष्ट्रीयसभेच्या मंडपांत सामाजिक परिषद चालू सालीं

भरत नाहीं. परंतु मंगळ मेषराशींतून १॥ वर्षांनीं गेल्यावर राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद कायमचें भरणार नाहीं असें मात्र ह्मणतां येत नाहीं. कारण, नवमस्थानचा अधिपति गुरु चंद्रयुक्त आहे आणि गुरूची बुधावर द्विराश्यंतरदृष्टि आहे असें दिसतें. मंगळ हा षष्ठस्थानांत असल्यामुळें राष्ट्रीयसभेकडून सिंहासारखे पराक्रम होतील. राष्ट्रीयसभेच्या दशमांत रवि आहे. रवि हा ग्रह हल्लींच्या राजपक्षाचा दर्शक आहे. हा रवि दुर्बल असून शनीनें पीडित आहे ह्मणून राष्ट्रीयसभेस राजपक्षाकडून चांगली मदत होणार नाहीं. दशमस्थानचा अधिपति शनि कृषिकर्माचा कारक चंद्रक्षेत्रीं आहे ह्मणून राष्ट्रीयसभेच्या चळवळीचा परिणाम मध्यम दर्जाचे व शेतकरी लोकांस शुभ होईल परंतु लोकमताची हेटाळणी करण्यास राजकीय पक्ष शनीचे स्वभावानुरूप कपटी कृति केल्याशिवाय राहणार नाहीं. चंद्र शुक्रक्षेत्रीं आहे. शुक्र शनिक्षेत्रीं आहे. शनि चंद्रक्षेत्रीं असून दशम भुवनास पीडा करीत आहे ह्मणून राजकीय पक्षाकडून लोकमताची हेळसांड वारंवार होईल. तथापि जन समूहास राजकीय पक्षापेक्षां जास्त कापल्याचा मार्ग स्वीकारावा लागून लोकपक्ष आपली सरशी राजकीय पक्षावर करील. राष्ट्रीयसभेच्या केंद्रांत चर राशि असून तेथें पांच ग्रह आहेत. हे ग्रह दुर्बल आहेत. ह्यामुळें राष्ट्रीयसभेकडून नांवाजण्यासारखें एकही कृत्य होण्याचा संभव नाहीं. जमिनीवरील कर, मीठावरील कर ह्या गोष्टी मात्र राष्ट्रीयसभेस यश देतील; परंतु ह्याखेरीज कांहींही होणार नाहीं.



विषयही येण्याचा पूर्ण संभव असल्यानें मोठ्या लोकांनींही हें अवश्य संग्रहीं ठेवावें. **चंद्रकांत.** २६ जुलई १८९५.

**ज्योतिर्माला**—नांवाचें लहानसें मासिक पुस्तक मुंबईत निघूं लागलें आहे. आज आमच्या पुढें ५ अंक आहेत त्यावरून ज्योतिषाच्या विषयीं यांत थोडक्या किमतींत पुष्कळ चांगली माहिती वाचकांस मिळेल असें आह्मांस वाटतें. इंग्रजी फलज्योतिष व देशी फलज्योतिष यांचा यांत संग्रह असून उदाहरणासाठीं थोर माणसांच्या चरित्रांचा त्यांच्या पत्रिकेशीं कसा संबंध आहे हेंही यांत देण्यांत येतें. एकंदरींत किमतीच्या मानानें पुस्तक संग्रहास व आदरास पात्र आहे. **ज० हितेच्छु.**

**ज्योतिर्माला**—ह्या मासिक पुस्तकाचे आजवर सहा अंक निघाले आहेत. फलज्योतिषाचा भाग जितका आला आहे, तो त्या शास्त्रास सर्वथा धरून आहे, असें आम्ही तज्ज्ञांच्या अभिप्रायावरून म्हणूं शकतों. **ग्रंथमाला.**

## सुप्रसिद्ध ज्योतिषांचे अभिप्राय.

वे० शा० सं० रा० रा० अमृतराव महादेव वाघोलीकर, कोल्हापूर येथील प्रसिद्ध ज्योतिषी, हे कळवितात कीं ज्योतिर्माला हें पुस्तक सप्रमाण रीतीनें ज्योतिषाची माहिती चांगली देत आहे. हें पाहून मजला आनंद वाटत आहे. लोकाश्रयास पुस्तक पात्र आहे.

वे० शा० सं० रा० रा० आत्माराम गोविंद जोशी वाघंबेकर, राहणार कर्जत, जि० कुलाबा, कळवितात कीं ज्योतिर्मालेचे पहिले पांच अंक पाहण्यांत आले. कर्त्याचा उद्योग स्तुत्य आहे. विषयाचें प्रतिपादन सप्रमाण झाल्यास याहूनही बहार होईल. हें मासिक पुस्तक संग्राह्य आहे असा आमचा अभिप्राय आहे.

MODERN ASTROLOGY.

Annual Subscription 6 s. 6 d. (Rs. 6) Post free.

Annual subscribers, who remit 6/6 to the Proprietors of the *Modern Astrology* 1 & 2 Bouverie St., Fleet St., London, E. C. or the Proprietors of the Jotirmálá, are entitled to the following privilege, *free of charge*, if they send with their subscription exact time ( state if before or after Mid-day,) date and place of birth.

1.—Their horoscope cast and brief delinia-tion given free of charge.

2.—Their directions calculated for the current year, shewing fortunate or unfortunate periods, as the case may be, with useful advice thereon.

## एजंटांचीं नांवें.

कोल्हापूर.—वे. शा. सं. रा. रा. आमृतराव महादेव वाघोलीकर—गंगावेशींत दांडेकराचा वाडा.

पुणें.—बुधवारपेठ—माणकेश्वराचा वाडा—रा० रा० आनंदराव कृष्ण हेबळेकर यांचे घरीं.

इंदूर.—इंग्लिश स्कूल—रा० रा० बापू नरसिंह भावे, असिष्टंट-मास्तर.

नाशिक.—वे. शा. सं. रा. रा. विष्णु रावजी राहळकर, ज्योतिषी.

सन १८९६ सालचें रोजचें स्पष्ट ग्रहांचें पुस्तक जानेवारी अखेर साडेचार आणे पाठविणारांस मिळेल. सायन द्वादशभावात्मक पत्रिकेचें स्थूल वर्णन १ रु० १ आण्यास मिळेल.

पत्ता :—फणसवाडी, जगन्नाथाची चाळ—मार्केट पोष्ट, मुंबई.


मुंबई :—"तत्वविवेचक" छापखान्यांत छापविलें.

# ज्योतिर्माला.

THE JOTIRMALA OR THE GARLAND OF ASTROLOGY.

ग्रहा राज्यं प्रयच्छंति ग्रहा राज्यं हरंति च ।
ग्रहैर्व्याप्तं सर्वमिदं त्रैलोक्यं सचराचरम् ॥

"The wise man rules his stars;
The fool obeys them."



पुस्तक १ लें. ] जानेवारी, १८९६. [ अंक ९ वा.

| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| स्फुटवक्ता अभियोगी ( कैं० वि० र० लेले ) | २५—३१ |
| राष्ट्रीयसभा.... .... .... .... .... | ३१—३६ |

विषयक्रमः—थोर पुरुषांच्या व संस्थेच्या कुंडल्या अंक १, ५ आणि ९.
" आर्यफलज्योतिषाची सुलभ माहिती अंक २।६.
" सर्वार्थचिंतामणीचें भाषांतर " ३।७.
" युरोपिय फलज्योतिषाची माहिती " ४।८.

[ All Rights Reserved by the Publishers.]

वर्षाची किंमत १२ आणे.

## ज्योतिर्मालेवर आलेले अभिप्राय.

'ज्योतिर्माला'—ह्या लहानशा मासिक पुस्तकांत फलज्योतिषाची सत्यता दाखविण्याचा व आकाशांतील ताऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध कसा असतो तो दाखविण्याचा विचार आहे. विवेचन पद्धति चांगली पद्धतशीर असते. प्रथमतः थोर पुरुषांची लग्नकुंडली देऊन त्यावरून त्याचे गुणावगुण शास्त्रपद्धतीनें सांगितले असतात. प्रथमांकांत **श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराजांची** तसवीर व कुंडली देऊन तिचें विवेचन केलें आहे. प्रस्तुत पुस्तकावरून एका वादाच्या विषयाचें खरें स्वरूप जगांत प्रगट होऊन तथ्यातथ्य बाहेर पडण्याचा चांगला मार्ग झाला. **केरळ कोकिळ.** पु. ९ अं. ९.

**ज्योतिर्माला**—मासिकपुस्तक, **अंक दुसरा** ह्यांत ज्योतिषाविषयीं माहिती फार चांगली आणि सोप्या भाषेनें लिहिलेली आहे. अंक वाचण्याजोगा आहे. **अंक ४** ह्यांत आपल्या आणि परकीय ज्योतिषाची माहिती सोप्या भाषेनें आणि थोडक्यांत फार चांगली दिलेली आहे. ह्या चौथ्या अंकांत युरोपीय फलज्योतिषाविषयीं फार चांगली माहिती दिली आहे. अवश्य वाचावी. **बालबोध पु. १५ अंक ५।६.**

**ज्योतिर्माला**—हें मासिक पुस्तक नुकतेंच निघूं लागलें आहे. आजपर्यंत ह्याचे सहा अंक निघाले. ह्यांत भारत व आंग्लज्योतिषाविषयीं शास्त्रीय माहिती सरळ रीतीनें देण्याचा चालकांचा विचार दिसतो. प्रयत्न नवीन दिशेचा व अत्यंत आवश्यक आहे. यास लोकांनीं अवश्य हातभार लावावा. **विद्यार्थिमित्र.** पु. १ लें अं. १२.

**ज्योतिर्माला**—हें मासिक पुस्तक अर्धकच्च्या खेड्यापाड्यांतल्या जोशांना तर फारच उपयुक्त आहे. एवढेंच नाहीं तर नूतनाभ्यासी विद्यार्थ्यांनींही लक्ष्यपूर्वक याचें अध्ययन केल्यानें फराच लाभ होईल. प्रसंगविशेषीं यांत बरेच कठिण वादग्रस्त

## स्फुटवक्ता अभियोगीं.







देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।.
मना सज्जना हीच क्रिया धरावी ॥

'स्फुटवक्ता अभियोगी' ह्यांचें खरें नांव रा. रा. विसाजी

रघुनाथ लेले असें आहे. ह्यांचें जन्म शके १७४९ ह्मणजे इ० स० १८२७ सालीं आगष्ट महिन्याचे १७ वे तारखेस शुक्रवारीं ४ वाजून ३९ मिनिटांनीं मुक्काम क्षेत्र नाशिक येथें झाला. ह्यांचे आजे चांगले श्रीमंत होते. परंतु, वडिलांस गरिबी प्राप्त झाली होती. तरी, लहानपणीं ह्मणजे अकरा बारा वर्षांचे वयापर्यंत ह्यांनीं शाळेंत पूर्णांक, अपूर्णांक शिकून, मातुलगृहीं रूपावली आणि अमरकोश ह्यांचा अभ्यास करून, वडिलांपाशीं पांच उपनिषदें ह्मटलीं. पुढें त्यांचीं आईबापें यात्रेकरितां बाहेर पडलीं, आणि ह्या मुलास त्यांनीं त्याच्या मावशीच्या येथें नाशकासच ठेविलें. तेथें त्यांचा बराच अभ्यास झाल्यावर हे गृहस्थ निर्वाहाकरितां, प्रथमतः एका रोटीवाल्याच्या कारखान्यांत, जमाखर्च मांडण्यास, एक रुपया दरमहावर राहिले. आणि मग पुढें एका युरोपियन व्यापाऱ्याकडे तीन रुपयांवर राहिले. नंतर त्यांना मुनसफ कोर्टांत लहानशी जागा मिळाली. तेथें बरेंच दिवस काम केलें. इतक्यांत ह्यांचीं मातापितरें महायात्रा करून ग्वालेरीस येऊन राहिलीं होतीं, त्यांच्या जवळ ते जाऊन राहिले. ग्वालेरच्या दरबारांत मोठ्या प्रयत्नानें त्यांनीं चाकरी मिळविली होती, आणि ती चांगली लाभदायक होईल अशी आशा त्यांस उत्पन्न झाली होती. परंतु दरबारांतल्या लहान मोठ्या लोकांच्या नानाप्रकारच्या कपटांनीं आणि भानगडींनीं त्यांचा सगळा हेतु फसला; आणि तेव्हां त्यांस एक प्रकारचें वैराग्य उत्पन्न होऊन त्यांनीं असा निश्चय केला कीं, कोणीकडून तरी, सरासरीस निर्वाहास मिळेल, एवढा मात्र उद्योग करावयाचा,



ह्याच्या पलीकडे लोभाच्या पाशांत पडावयाचें नाहीं. ह्यानंतर त्यांस एक दोन ठिकाणीं शिंदेसरकारच्या मोजणी खात्यांत थोड्याशा अधिक पगाराच्या जागा मिळाल्या. ह्यावेळीं ह्मणजे इ० स० १८८० चे सुमारास त्यांची बायको आणि प्रथम पुत्र थोडे काळांत एकाएकीं वारले. शिंदेसरकारच्या हुजूरदरबारांत साळजमाखर्चाकडे हे नौकर मृत्युकाळापर्यंत होते. ह्यांचें अक्षर अत्यंत सुबक असून ते छापील अक्षरासारखें दिसत असे. ह्यांचे हातून आपले कामांत एकही चूक झाली नाहीं. ह्यांची वृत्ति गंभीर असून, मनानें हे फार मोकळे असत. प्रत्येक व्यक्तीचे स्पष्ट दोष दाखविण्यांत हे गृहस्थ आळस करीत नसत. त्यामुळें हे सर्व लोकांस अप्रिय दिसत. परंतु त्यांचा स्पष्टवक्तेपणा हा ज्यास एक वेळ कळला तो ह्यांचा मित्र झालाच असेंही होत असे. ह्यांचा बांधा उंच असून फारसा उग्र नव्हता. शरीरानें हे गृहस्थ अशक्त होते. ह्यांस दम्याची व थंडीची व्यथा वारंवार होत असे.

ह्या गृहस्थास लहानपणापासून गणिताचा नाद असल्यामुळें, पुढें सुमारें ३९ वे वर्षी ज्योतिषाचा नाद लागला. कै० वा० बापूदेवशास्त्री ह्या जगमान्य ज्योतिर्विदानें एक ज्योतिष्यावर लिहिलेलें पुस्तक ह्या गृहस्थाचे वाचण्यांत आलें. त्यावरून चालू निरयण पंचांगें किती चुकीची व धर्मशास्त्रास सोडून आहेत हें त्यांस कळलें. सायनमताचें बिजारोपण प्रसिद्ध कै० वे० शा० सं० बापूदेवशास्त्री ह्यांनींच केलें परंतु स्फुटवक्ता अभियोगी ह्यानें अमरणपर्यंत सायन वृक्षास वेळोवेळीं

सिचन करून कै० छत्रे, प्रो० टिळक, रा० भागवत इत्यादिक मंडळीचें वेळोवेळीं त्यांनीं खंडनही केलें आहे. प्रो० किलहार्न ह्यांनीं सायन पंचांग हेंच फक्त आर्य पंचांग आहे असें आपलें मत प्रसिद्ध केलें आहे. सायन पंचांग प्रचारांत आणण्याविषयीं स्फुटवक्ता अभियोगी ह्यानें इंदुप्रकाश, विविधज्ञानविस्तार, आणि ज्ञानप्रकाश ह्यांच्या द्वारें पुष्कळ लेख प्रसिद्ध केले परंतु त्यांत त्यांस, चांगलें यश आलें नाहीं, तेव्हां त्यांनीं त्याविषयीं एक चमत्कारिक नवें पद्य रचून छापून प्रसिद्ध केलें. ते बालबोधांत प्रसिद्ध झालेलें आहे.

ह्या गृहस्थाचा मृत्यु ता. ८ नव्हेंबर सन १८९९ रोजीं दुपारीं १ वाजतां ग्वालेर येथें झाला. मरणकालाचे थोडा वेळ पूर्वीं हे गृहस्थ आपले चिरंजीवाकडून एका महामहोपाध्यायास उत्तर लिहवीत होते त्या पत्राचा शेवट होत असतांना देह विसर्जन झाला.

येथपावेतों कै० वि० र० लेले ह्यांचें त्रोटक चरित्र दिलें. आतां फलज्योतिषाचे बाजूनें विचार करूं. मकरलग्न उदित असून शास्त्रीय राशि जी कुंभ ती तनुभावांत लुप्त झाली आहे. मकरेंत हर्शल अथवा प्रजापति हा ग्रह आहे. ह्या ग्रहाविषयीं निश्चयात्मक कांहीं लिहितां येत नाहीं, तथापि हर्शल हा ग्रह शास्त्रीयविषयाचा दर्शक आहे. पंचमस्थानांत मिथुन ही शास्त्रीय राशि आहे. ह्यामुळें जन्मणारा मनुष्य शास्त्रीय विषयाचा व्यासंगी असला पाहिजे. तनुभावाचा स्वामि हा षष्ठस्थानांत आहे ह्मणून शरिरास सुख लागणार नाहीं, ह्मणजे शरीर कृश पाहिजे. ( **देहाधिपः पापयुतोष्टमस्थो व्ययारिगो वांगसुखं निहन्ति** ). लग्नाधिपति



षष्ठस्थानांत आहे ह्मणून रा० लेले हे पराक्रमी मानी आणि मतिमान् ( बुद्धिमान् ) होते. ( **लग्नेशे सहजे षष्ठे सिंहतुल्यपराक्रमी सर्व संपद्युतो मानी द्विभार्यो मतिमान्सुखी** ). रा. लेले यांचें बाळपण दरिद्रांत गेलें आहे परंतु पुढें शिंदे यांचे आश्रयाखालीं त्यांचो नौकरी मरणकालपर्यंत झाली आहे. हा योग कायमचा आहे. धनभावाचा अधिपति गुरु नवमस्थानांत आहे ह्मणून ही स्थिति रा० लेले ह्यांस प्राप्त झाली. ( **धनेशे नवमे लाभे धनवानुद्यमी पटुः बाल्ये रोगी सुखी पश्चाद्यावदायुः समाप्यते** ). रा० लेले यांचे आजे श्रीमान् गृहस्थ असून त्यांचे वडील गरीब होते ही स्थिति खालील श्लोकांत दिसते. चतुर्थस्थानाचा अधिपति शुक्र सप्तमस्थानांत आहे त्यामुळें रा० लेले ह्यांनीं बहु विद्या संपादन केल्या होत्या. राजदरबारांत ह्यांचें वजन होतें तरी ह्यांचे हातून सभेंत पांडित्य झालें नाहीं. ( **सुखेशे सप्तमे लग्ने बहुविद्यासमन्वितः पित्रार्जितधनत्यागी सभायां मूकवद्भवेत्** ). पंचमस्थानाचा अधिपति बुध सप्तमस्थानांत आहे. ह्मणून धर्मसंबंधाचा विचार करतां रा० लेले सर्वधर्मसमान मानणारे असावेत. त्याचप्रमाणें ह्यांचें शरीर उंच असून स्वामिभक्ति करण्यांत ते प्रवीण होते. ( **सुतेशे कामगे मानी सर्वधर्मसमन्वितः तुंगयष्टिस्तनुस्वामीभक्तियुक्तैकतेजसा** ). पंचमभावाचा अधिपति बुध शुक्रयुक्त असून, पंचम भावीं चंद्र हा गुरूचे नवम दृष्टींत आहे ह्मणून रा० रा० लेले बुद्धिमान् व धारणादिपटु होते. ( **सूतर्क्षे शुभे शुभदृष्टयुते बुद्धिमान्॥ गुरौ केन्द्र-**


कोणे बुद्धिमान् ॥ पुत्रेशे केन्द्रे शुभान्विते धारणादिपटुः ॥ ज्ञे सुते वा सुतेशे बलिनि केन्द्रे वा बुद्धिमान् ॥ ). धनभावाचा अधिपति गुरु नवमस्थानांत आहे ह्मणून रा० लेले हे अभिप्राय देण्यांत प्रवीण असावेत असें दिसतें. केन्द्रे कोणे सौम्यवागीशयुक्ते वीर्योपेते बुद्धिमानिङ्गितज्ञः.

षष्ठस्थानाचा अधिपति चंद्र मिथुन राशींत २७ अंशावर असून दीप्तांश विचार करतां तो षष्ठस्थानांत आहे ह्मणून रा० लेले ह्यांस शत्रु त्यांचे ज्ञातींतलिच असावेत. सायन मताचें मंडण करतांना रा० लेले ह्यांस कै० छत्रे, प्रो० टिळक, रा० भागवत इत्यादिक मंडळींकडून बराच त्रास सोसावा लागला आहे, परंतु सायन पंचांगास मान्यता जर्मन पंडितांनीं दिली आहे. ( षष्ठेशे रिपुभावस्थे स्वज्ञातिः शत्रुवद् भवेत् परज्ञातिर्भवेन्मित्र भूसौ न चलति ध्रुवम् ). परंतु अंतःकालचे समयासही सायनमताचे मंडणार्थ लेख लिहिण्या इतके स्वकार्यचतुर हे रा० लेले होते. ( षष्ठेशे पंचमे यस्य चलमित्र धनादिकम् दयायुक्तः सुखी सौम्यः स्वकार्ये चतुरो महान् ). रा० लेले ह्यांस दम्याचा व वाताचा विकार होता ह्याचें कारण सप्तमस्थानाचा अधिपति रवि हा अष्टमाधिपति बुधाबरोबर आहे. ( सप्तमेशे तनौ चास्ते........ दुष्टो विचक्षणो धीरो वातरुक् स्थीयतेहृदि ). रा० लेले ह्यांचें मत कांहीं अंशीं नास्तिकासारखें असावें आणि त्यांस व्रणरोग असावा. कारण अष्टमाधिपति बुध सप्तमस्थानीं आहे. ( अष्टमेशे तनौ कामे भार्याद्वयं समा-



दिशेत् विष्णुद्रोहरतो नित्यं व्रणरोगी प्रजायते ). रा० लेले ह्यांचे पत्रिकेंत केंद्रांत मंगळ आणि बुध एकत्र आहेत ह्मणून हे गणिती होते. ( केन्द्रे बुधे वा कुजे गणितज्ञः ). रा० लेले ह्यांनीं सायन मताचे प्रसारार्थ अनेक खटपटी केल्या परंतु त्यांत यश मिळालें नाहीं ह्याचें कारण भाग्यभुवनाचा अधिपति शुक्र सप्तमस्थानांत आहे. भाग्येशेच मदे कल्पे गुणवान्कीर्तिमान् भवेत् कदाचिन्न भवे त्सिद्धं यत्कार्यं कर्तु मिच्छति. स्थलसंकोचास्तव हें चरित्र येथेंच पुरें केलें आहे.

## राष्ट्रीयसभा.




राष्ट्रीयसभेची प्रथम बैठक ता० २८ डिसेंबर सन १८८५ रोजीं दुपारीं मुंबई वेळ १२ वाजतां शेठ गो०

तेजपाल यांचे संस्कृतपाठशाळेंत भरली होती. त्या वेळीं मि० बानर्जी ह्यांनीं अध्यक्ष ह्या नात्यानें राष्ट्रीयसभेची स्थापना झाली असें विदित केलें. हा इष्टकाळ राष्ट्रीयसभेच्या जन्माचा मानिला पाहिजे. ह्या वेळीं मेष ह्या चर राशीचें लग्न नववे अंशांत उदित असून मुंबईशहरचें तनुस्थान जें तूळ तें अस्तास जात होतें. लग्नाधिपति अथवा राष्ट्रीयसभेचा प्राण जो मंगळ तो षष्ठ स्थानांत ह्मणजे पुणें शहरचें तनुस्थान जें कन्या त्यांत असून तनुस्थानावर अष्टम दृष्टीनें पाहत आहे. दक्षिण केंद्रांत उत्तर हिंदुस्थान, अलहाबाद ह्यांचें मकरलग्न आकाशांत मध्यवर्ती उदित असून तेथेंच सूर्यमालेचा चालक रवि जलतत्त्वांत वसला आहे. उत्तर केंद्रांत कलकत्त्याचें तनुस्थान जें कर्क तें उदित असून तेथेंच उत्तर हिंदुस्थानचा अधिपति जो शनि हा जलतत्त्वांत बसला आहे. अस्तकेंद्रीं ह्मणजे मुंबईशहराचे तनुस्थानांत अथवा तूळ लग्नांत हर्शल ( प्रजापति ) गुरु, आणि लोकसमुदाय दर्शक जो चंद्र हे ग्रह असून ते राष्ट्रीयसभेच्या तनुस्थानावर पहात आहेत. पृथ्वीचे ऊर्ध्वभागीं केतु, शुक्र, रवि, बुध, हर्शल ( प्रजापति ) गुरु आणि चंद्र हे ग्रह उदित होते, त्याचप्रमाणें पृथ्वीचे अधोभागीं मंगळ, राहु, शनि, आणि नेपच्यून ( वरुण ) हे ग्रह उदित होते.

राष्ट्रीयसभेच्या तनूचा मालक तनूस अष्टम दृष्टीनें पाहत असून त्यावर चंद्र आणि गुरु ह्यांची सप्तम दृष्टि आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचें आयुष्य अल्प काळाचें नाहीं. लग्नाधिपति मंगळ, कन्या ह्या द्विस्वभाव राशींत आहे ह्मणून राष्ट्रीय सभेच्या मूळ उद्देशांत आणि तिचे धुरीणत्वांत पुष्कळ घडामोडी द्विस्वभाव राशीचे स्वभावानुरूप होणार आहेत. धनभावांत नेपच्यून अथवा वरुण हा पापग्रह असून धनभावाधिपति शुक्र अधिकारयुक्त नाहीं ह्मणून राष्ट्रीयसभेचा फंड अथवा सांपत्तिक स्थिति कांहीं अंशीं समाधानकारक असणार नाहीं. तृतीय स्थानचा अधिपति बुध हा विद्वान् लोकांचा कारक ह्मणजे दर्शक असून तो नवम स्थानांत आहे ह्मणजे स्वसन्मुख राशींत आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचे चिटणीस काम करण्यास दुर्बल दिसत आहेत; परंतु नवम भावाचा अधिपति गुरु केंद्रीं आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचे चिटणीसांचें दौर्बल्य प्रसिद्धीस येणार नाहीं. चतुर्थ स्थानचा अधिपति चंद्र लोकमताचा व स्थावर मालमिळकतीचा दर्शक सप्तम स्थानांत गुरूबरोबर आहे ह्मणून जमिनीवरील सारे, मीठ इत्यादिकांविषयीं लोकांची कुरकूर नाहींशी होणार आहे. आणि राजकीय भुवनाचा ह्मणजे दशम स्थानचा कारक शनि चंद्रक्षेत्रीं आहे. शनि हा कृषीकर्माचा कारक आहे. चंद्र लोकमताचा व राष्ट्रीयसंपत्तीचा ह्मणजे स्थावराचा कारक शुक्राचें स्वगृह जें तूळ तेथें आहे. आणि शुक्र शनीचे घरीं आहे. ह्मणून लोकमत, सामान्य लोक आणि कृषीकर्मावर अवलंबून राहणारे मध्यम प्रतीचे लोक ह्यांमध्यें स्नेहभाव शुक्र, शनि आणि चंद्र ह्या ग्रहांचे क्षेत्रान्वयें वृद्धिंगत होईल. केंद्रांत चर राशि असून त्यांत पांच ग्रह आहेत ह्मणून राष्ट्रीयसभेचें स्थलांतर केंद्रान्वयें झालें आहे. राष्ट्रीयसभेची प्रथम बैठक मुंबई शहरचे तनु स्थानांत, दुसरी बैठक कलकत्त्याचे तनुस्थानांत ( कर्क लग्नांत ), तिसरी बैठक मद्रास

शहरचे तनुस्थानांत ( मेषेंत ), चवथी बैठक अलहाबादचे तनुस्थानांत ( मकरेंत ), आणि पांचवी बैठक पुन्हा मुंबईचे तनुस्थानांत ( तूळेंत ) झाली. पांच बैठकांनीं केंद्रक्रम सोडला नाहीं. त्याचप्रमाणें केंद्रांतही पांचच ग्रह आहेत. सहावी बैठक कलकत्त्याचे तनुस्थानांत झाल्यावर सातवे बैठकीस केंद्रक्रम बदलून ती बैठक नागपुरचें तनुस्थान जें कन्या त्यांत झाली. पुणें शहरचें तनुस्थान कन्यालग्न आहे. पेशवाईचा व भोंसलेशाईचा उत्कर्ष व अंत सारखाच झाला आहे. श्री॰ बाजीराव कोरेगांवीं, आणि आप्पा साहेब भोंसले सितावर्डीस एकाच काळीं पराभूत झाले आहेत आणि राजसुखास मुकले आहेत. दोन्ही शहरांचें साम्य पुष्कळ प्रमाणांनीं मिळतें ह्मणून नागपूरचें लग्न कन्या असावें असें खात्रीपूर्वक वाटतें. कलकत्त्याचे तनुस्थानापासून तृतीय स्थानांत राष्ट्रीय सभेची सातवी बैठक झाल्यावर आठवी बैठक पुन्हा दशमांत ह्मणजे अलहाबादचे तनुस्थानांत झाली. दशमस्थानापासून तृतीय स्थानीं ह्मणजे मीनलग्नांत नववी बैठक झाली. ही बैठक पंजाबचे राजधानींत ह्मणजे लाहोरांत झाली. मीन ही जलराशि आहे. पंजाब हा शब्द पांच नद्यांचा दर्शक आहे. १० वी राष्ट्रीय सभा केंद्रक्रमान्वयें मेष राशींत ह्मणजे मद्रासचे तनुस्थानांत झाल्यावर, अकरावी राष्ट्रीय सभा त्रिकोणांत आली. महाराष्ट्राचें तनुस्थानांत धन लग्न आहे. हे नवम स्थानांत आहे आणि पुणें शहरचें तनुस्थान पंचम भावाचे अंतीं आहे. पुणें शहराचें तनुस्थान किती अंशांत आहे हें नक्की ठरविण्याचीं अन्य साधनें



उपलब्ध झालीं नाहींत तथापि राष्ट्रीय सभेच्या पंचमांत कांहीं अंश कन्येचे आहेत हें निर्विवाद आहे. राष्ट्रीयसभेच्या बैठकीक्रमाप्रमाणें पुढील बैठका दिल्ली आणि त्राव्हनकोर ह्या शहराचे आजूबाजूस होतील असें वाटतें, परंतु कोणक्रमाप्रमाणें धनु राशीशीं साम्य पावणारा प्रांत जो काठेवाड त्याचे आजूबाजूस किंवा अमदाबाद, सुरत शहरांत १२ वी राष्ट्रीयसभा भरेल असें दिसतें. राष्ट्रीयसभेच्या १४ वे आणि पंधरावे वर्षी सामान्य लोकांच्या मागण्याची दाद सार्वभौम सरकारापुढें जाईल आणि राष्ट्रीयसभेच्या १६ वे वर्षी शेतकरी, मध्यम दर्जाचे लोक ह्यांचा भरणा राष्ट्रीयसभेच्या मंडपांत जास्त दिसेल. राष्ट्रीयसभेच्या षष्ठस्थानचा ह्मणजे रिपु स्थानचा मालक बुध ग्रह आहे ह्मणून राष्ट्रीयसभेचे शत्रु विद्वान् लोकच आहेत. बुध नवम स्थानांत ह्मणजे धर्मस्थानांत आहे ह्मणून धर्माचे सुधारण्याचें ढोंग दाखविणारा एक पक्ष राष्ट्रीयसभेचा शत्रु आहे, परंतु राष्ट्रीयसभेचा मंगळ ग्रह पुण्याचे तनुस्थानांत असून तो आपले स्वराशींत आल्यामुळें सामाजिक परिषदेसंबंधानें सुधारक विद्वान् लोकांस अपयश मिळालें इतकेंच नाहीं परंतु सामाजिक परिषदेचे उत्पादक जे विद्वान् लोक, ज्यांचा कारक ग्रह बुध महाराष्ट्राचे तनुस्थानांत आहे, त्या ग्रहान्वयें संपूर्ण महाराष्ट्रीयांचा दुर्लौकिक व्हावा ही गोष्ट राष्ट्रीयसभेच्या संस्थापनकालींच दिसत आहे. राष्ट्रीयसभेचा तन्वाधिपति मंगळ परिभ्रमणकालमापन कोष्टकानें हल्लीं मेषराशींत असल्यामुळें राष्ट्रीयसभेच्या मंडपांत सामाजिक परिषद चालू साली

भरत नाहीं. परंतु मंगळ मेषराशींतून १॥ वर्षांनीं गेल्यावर राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद कायमचें भरणार नाहीं असें मात्र ह्मणतां येत नाहीं. कारण, नवमस्थानचा अधिपति गुरु चंद्रयुक्त आहे आणि गुरूची बुधावर द्विराश्यंतरदृष्टि आहे असें दिसतें. मंगळ हा षष्ठस्थानांत असल्यामुळें राष्ट्रीयसभेकडून सिंहासारखे पराक्रम होतील. राष्ट्रीयसभेच्या दशमांत रवि आहे. रवि हा ग्रह हल्लींच्या राजपक्षाचा दर्शक आहे. हा रवि दुर्बल असून शनीनें पीडित आहे ह्मणून राष्ट्रीयसभेस राजपक्षाकडून चांगली मदत होणार नाहीं. दशमस्थानचा अधिपति शनि कृषिकर्माचा कारक चंद्रक्षेत्रीं आहे ह्मणून राष्ट्रीयसभेच्या चळवळीचा परिणाम मध्यम दर्जाचे व शेतकरी लोकांस शुभ होईल परंतु लोकमताची हेटाळणी करण्यास राजकीय पक्ष शनीचे स्वभावानुरूप कपटी कृति केल्याशिवाय राहणार नाहीं. चंद्र शुक्रक्षेत्रीं आहे. शुक्र शनिक्षेत्रीं आहे. शनि चंद्रक्षेत्रीं असून दशम भुवनास पीडा करीत आहे ह्मणून राजकीय पक्षाकडून लोकमताची हेळसांड वारंवार होईल. तथापि जन समूहास राजकीय पक्षापेक्षां जास्त कापल्याचा मार्ग स्वीकारावा लागून लोकपक्ष आपली सरशी राजकीय पक्षावर करील. राष्ट्रीयसभेच्या केंद्रांत चर राशि असून तेथें पांच ग्रह आहेत. हे ग्रह दुर्बल आहेत. ह्यामुळें राष्ट्रीयसभेकडून नांवाजण्यासारखें एकही कृत्य होण्याचा संभव नाहीं. जमिनीवरील कर, मीठावरील कर ह्या गोष्टी मात्र राष्ट्रीयसभेस यश देतील; परंतु ह्याखेरीज कांहींही होणार नाहीं.



विषयही येण्याचा पूर्ण संभव असल्यानें मोठ्या लोकांनींही हें अवश्य संग्रहीं ठेवावें. **चंद्रकांत.** २६ जुलई १८९५.

**ज्योतिर्माला**—नांवाचें लहानसें मासिक पुस्तक मुंबईंत निघूं लागलें आहे. आज आमच्या पुढें ५ अंक आहेत त्यावरून ज्योतिषाच्या विषयीं यांत थोडक्या किमतींत पुष्कळ चांगली माहिती वाचकांस मिळेल असें आह्मांस वाटतें. इंग्रजी फलज्योतिष व देशी फलज्योतिष यांचा यांत संग्रह असून उदाहरणार्थ थोर माणसांच्या चरित्रांचा त्यांच्या पत्रिकेशीं कसा संबंध आहे हेंही यांत देण्यांत येतें. एकंदरींत किमतीच्या मानानें पुस्तक संग्रहास व आदरास पात्र आहे. **ज० हितेच्छु.**

**ज्योतिर्माला**—ह्या मासिक पुस्तकाचे आजवर सहा अंक निघाले आहेत. फलज्योतिषाचा भाग जितका आला आहे, तो त्या शास्त्रास सर्वशा धरून आहे, असें आम्ही तज्ज्ञांच्या अभिप्रायावरून म्हणूं शकतों. **ग्रंथमाला.**

## सुप्रसिद्ध ज्योतिषांचे अभिप्राय.

वे० शा० सं० रा० रा० अमृतराव महादेव वाघोलीकर, कोल्हापूर येथील प्रसिद्ध ज्योतिषी, हे कळवितात कीं ज्योतिर्माला हें पुस्तक सप्रमाण रीतीनें ज्योतिषाची माहिती चांगली देत आहे. हें पाहून मजला आनंद वाटत आहे. लोकाश्रयास पुस्तक पात्र आहे.

वे० शा० सं० रा० रा० आत्माराम गोविंद जोशी वाघबेकर, राहणार कर्जत, जि० कुलाबा, कळवितात कीं ज्योतिर्मालेचे पहिले पांच अंक पाहण्यांत आले. कर्त्याचा उद्योग स्तुत्य आहे. विषयाचें प्रतिपादन सप्रमाण झाल्यास याहूनही बहार होईल. हें मासिक पुस्तक संग्राह्य आहे असा आमचा अभिप्राय आहे.

---

## अवश्य वाचा.

ज्योतिर्मालेचा ११ वा अंक फारच उशिरानें निघाला आहे. वर्गणीदारांस वारंवार सूचना केल्या, पत्रें पाठविलीं, तरी उत्तर नाहीं आणि वर्गणीही नाहीं. कांहीं रावबहादुरानीं व्हा० पे० मागवून वर्गणी न देतां तीं परत केलीं आहेत. सुमारें ३०० शे वर्गणी-दारांनीं वर्गणी न पाठविण्याचा निश्चय केलेला दिसतो. वर्गणी वेळेवर न आली म्हणजे छापखान्यांतून पुस्तक बाहेर पडत नाहीं आणि त्यामुळें ज्या वर्गणीदारांनीं वर्गणी पाठविली असते त्यांस त्रास होतो. ज्योतिर्मालेचा १२ वा अंक निघण्यापूर्वीं ज्यांनीं वर्गणी पाठविली नाहीं त्यांकडे व्हा० पे० नें अंक पाठविण्यांत येतील, आणि जे वर्गणीदार व्हा० पे० परत करतील अथवा वर्गणी पाठविणार नाहींत त्यांचीं नांवें ज्योतिर्मालेंत प्रसिद्ध होतील. ज्योतिर्मालेची वर्गणी शास्त्रीयविषयाचे पुस्तकांत अत्यंत कमी आहे. चालकांचा हेतु फक्त शास्त्राची वृद्धि करण्याचा असून पैसे मिळविण्याचा नाहीं. चालू अंकासुद्धां नुकसान सुमारें १७५ रुपये झालें आहे. तथापि हें नुकसान सोसून १२ अंक बाहेर पडतील. दुसरे वर्षाचेही १२ अंक निघतील. तेव्हां जुने व नवे वर्गणीदारांनीं आणखी एकएक वर्गणीदार मिळवून वर्गणी दुसरे वर्षाचे पहिले अंकाबरोबर पाठविल्यास ज्योतिर्मालेचा अंक वेळेवर निघेल हें कळविणें नको.

---

# ज्योतिर्माला.

पुस्तक १ लें.] मार्च, १८९६. [अंक ११ वा.

## सर्वार्थचिंतामणि.

(सातव्या अंकावरून पुढें चालू.)

### पात.

१. तनुस्थानांत पात असल्यास मनुष्य दुःखी, रोगी, क्रूर, घातकी, मूर्ख, आप्तवर्गाचा द्वेष करणारा असतो.

२. द्वितीयस्थानांत पात असल्यास मनुष्य आळशी, दुराचरणी, अति पित्तप्रकृतीचा, रोगी, निर्दय, कृतघ्न, दुष्टमनाचा आणि पापें करणारा असतो.

३. सहजस्थानांत पात असल्यास स्थिर बुद्धीचा, लढाऊ, दाता, धनाढ्य, राजप्रिय आणि सेनापति होतो.

४. चतुर्थस्थानांत पात असल्यास, बंदीवान, व्याधि-युक्त, अपुत्र, दुर्दैवी असतो.

५. पंचमस्थानांत पात असल्यास दरिद्री, रूपवान्, कफपित्तवातप्रकृतीचा मनुष्य असतो. स्वभावानें निष्ठुर असून निराश्रित असतो.

६. षष्ठस्थानांत पात असल्यास शत्रूचा नाश करणारा शरिरानें धट्टाकट्टा, सर्व शस्त्रांचा संग्रही, कलांत निपुण, आणि स्वभावानें शांत असतो.

७. सप्तमस्थानांत पात असल्यास धन, दारा, सुत ह्यांनीं टाकलेला असून कामी, निर्लज्ज, परस्त्रीरत असतो.

८. अष्टमस्थानांत पात असल्यास नेत्ररोगी, कुरूप, दुर्दैवी, ब्राह्मणद्वेष्टा, रक्तजन्यविकारी असतो.

९. नवमस्थानांत पात असल्यास फार व्यापार करणारा, पुष्कळ मित्र असणारा आणि पुष्कळ ज्ञान संपादिलेला, स्त्रीप्रिय, मधुरभाषी असा मनुष्य असतो.

१०. दशमांत पात असल्यास श्रीमान्, धर्माचरण करणारा, शांत, धर्मकार्यांत प्रवीण असा मनुष्य असतो. त्याचप्रमाणें अचाट बुद्धीचा आणि विलक्षण असतो.

११. एकादशस्थानांत पात असल्यास पुष्कळ संपत्तिमान्, मानी, सत्यवादी आणि हातांत घेतलेलें काम तडीस नेणारा, पुष्कळ घोडे बाळगणारा, गाणारा असा असतो.

१२. द्वादशस्थानांत पात असल्यास कोपी, बहु कर्मे करणारा, कांहीं व्यंग असणारा, धर्मलंड, आप्तांकडून द्वेष पावणारा असा असतो.

### परिधि.

१. प्रथम भावांत परिधि असल्यास विद्वान्, सत्यप्रिय, शांत, धनवान्, पुत्रवान्, शुचिर्भूत, दाता, गुरूचा आदर करणारा असतो.

२. दुसरे भावांत परिधि असल्यास श्रीमान्, रूपवान्, ऐषआराम करणारा, सुखी, धर्मपरायण, पदरीं पुष्कळ माणसें संभाळणारा असा मनुष्य असतो.

३. तिसरे भावांत परिधि असल्यास स्त्रीप्रिय, स्वरूपवान्, साधु आणि स्वजनांशीं स्नेह ठेवणारा आणि मृत्युकालीं गुरुभक्ति करणारा असा असतो.

४. चतुर्थ भावांत परिधि असल्यास शत्रूंना थक्क करणारा, सौम्यस्वभावाचा, द्रव्यवान् आणि गीतज्ञ मनुष्य असतो.



५. पंचम भावांत परिधि असल्यास लक्ष्मीवान्, शीलवान्, सुस्वरूप सर्वांस प्रिय, धर्मवत्सल आणि स्त्रियांस प्रिय असतो.

६. षष्ठ स्थानांत परिधि असल्यास स्पष्टवक्ता, संतति संपत्तियुक्त, सुखोपभोगी, सर्वांचें कल्याण करणारा आणि शत्रूंचा नाश करणारा असतो.

७. सप्तम स्थानांत परिधि असल्यास अल्पसंतति, सुखहीन, मंदबुद्धीचा, अतिनिष्ठुर, स्त्रीरोगी असा मनुष्य असतो.

८. अष्टम स्थानांत परिधि असल्यास आध्यात्मिक विषयाचा व्यासंगी, शांत, शरीरानें मजबूत, दृढनिश्चयी, समान भाव ठेवणारा असा असतो.

९. नवम भावांत परिधि असल्यास, पुत्रसंतति असते, सुखी, स्वरूपवान्, श्रीमान् आणि लडिवाळ न केलेला असतो. त्याचप्रमाणें मानी, थोड्यांत तृप्त होणारा असतो.

१०. दशमांत परिधि असल्यास तो मनुष्य क्वचितच मूर्ख असतो. भोगी, शरिरानें बळकट, मत्सर न करणारा सर्व शास्त्रपारंगत असतो.

११. एकादश भुवनांत परिधि असल्यास स्त्रीभोगी, गुणवान्, मतिमान्, स्वजनप्रिय, मंदाग्नि असा मनुष्य असतो.

१२. द्वादश स्थानांत परिधि असल्यास गुरुनिंदक असतो.

## चाप.

१. धन, धान्य, संपत्ति, कृतज्ञ, विद्वान् लोकांस मान्य, निर्दोषी असा मनुष्य प्रथम भावांत चाप असल्यास असतो.

२. धन स्थानांत चाप असल्यास मनुष्य मधुरभाषी, सुविचारी, धनवान्, नम्र, विद्वान्, धर्मतत्पर असतो.

३. तिसरे भुवनांत चाप असल्यास मनुष्य कृपण, कलाभिज्ञ, अट्टल चोर, व्यंग अवयवांचा आणि उन्मत्त लोकांबरोबर स्नेह ठेवणारा असतो.

४. चवथे भावांत चाप असल्यास मनुष्य सुखी, राजप्रिय, गोधनाचा संग्रही आणि निरोगी असा असतो.

५. पंचम भावांत चाप असल्यास गुणज्ञ, दीर्घदर्शी, देवभक्त, मधुरभाषी आणि सर्वकामी मनुष्य असतो.

६. षष्ठ स्थानांत चाप असल्यास मनुष्य शत्रूचा नाश करणारा, धूर्त, सुशील, सुस्वरूप आणि प्रिय असतो.

७. सप्तम स्थानांत चाप असल्यास मनुष्य संपत्तिमान्, गुणी, शास्त्रवेत्ता, धार्मिक आणि प्रिय असतो.

८. अष्टम स्थानांत चाप असल्यास मनुष्य परकर्मरत, क्रूर, परदार गमन करणारा आणि विकलांगी असतो.

९. नवम स्थानांत चाप असल्यास मनुष्य तपस्वी, उपोषणें करण्यांत निमग्न, विद्वान्, लोकमान्य आणि कीर्तिमान् असतो.

१०. दशम स्थानांत चाप असल्यास मनुष्य धन, ऐश्वर्य आणि पुत्रवान् आणि कीर्तिमान असतो.

११. एकादश स्थानांत चाप असल्यास लाभप्राप्ति, निरोगी, अतिरागीट, मंत्र, तंत्र आणि स्त्रीपरिक्षक मनुष्य असतो.



१२. चाप द्वादश स्थानांत असल्यास मनुष्य दुष्ट, दीर्घसूत्री, दुर्बुद्धि, निर्लज्ज, परस्त्रीरत आणि निर्धन असतो.

## शिखी.

१. तनुस्थानांत शिखी असल्यास सर्व विद्या जाणणारा, सुखी, वक्ता, प्रिय आणि सर्व कर्मांत पडणारा असा मनुष्य असतो.

२. दुसरे भावांत शिखी असल्यास मनुष्य वक्ता, प्रियंवद, सुस्वरूप, काव्य करणारा, पंडित, मानी, विनीत, वाहनयुक्त असतो.

३. तृतीय स्थानांत शिखी असल्यास मनुष्य कामी, क्रूर कर्मे करणारा, किडकिडीत, दरिद्री आणि तीव्ररोगी असतो.

४. चतुर्थ स्थानांत शिखी असल्यास मनुष्य रूपवान्, गुणसंपन्न, सात्विक, विद्येची अभिरुचि असणारा, सुखी असा असतो.

५. पंचम स्थानांत शिखी असल्यास मनुष्य सुखी, भोगी, कलाभिज्ञ, युक्तिवान्, मतिवान्, वाक्पटु आणि गुरुभक्ति करणारा असा असतो.

६. षष्ठ स्थानांत शिखी असल्यास मनुष्य मातृपक्षाचा क्षय करणारा असतो. शूर, सुस्वरूप, विचक्षण.

७. सप्तम स्थानांत शिखी असल्यास रक्तदोषी, भटक्या, कामी, रोगी आणि वेश्यासक्त असतो.

८. अष्टम स्थानांत शिखी असल्यास नीचकर्मरत, पापी, निर्लज्ज, निंदक, विधवागमनी, परस्त्रीगमनी असा असतो.

९. नवम स्थानांत शिखी असल्यास लिंगधारी,

प्रसन्नवृत्तीचा, सर्वांचें कल्याण करणारा, धर्मकार्यांत निपुण असा असतो.

१०. दशम स्थानांत शिखी असल्यास सौभाग्य संपन्न, स्त्रीयुक्त, दाता, चांगले लोकांत हिंडणारा असा असतो.

११. एकादश भुवनांत शिखी असल्यास मनुष्य स्वधर्मी, लाभ पावणारा, लोकमान्य, द्रव्यवान्, सुदैवी, शूर, पुण्यकर्मरत आणि निपुण असा असतो.

१२. द्वादश स्थानांत शिखी असल्यास मनुष्य पापकर्में करणारा, शूर, श्रद्धाहीन, निर्दय, परदाररत आणि उग्र असतो.

## प्राणपद.

१. पहिले भावांत प्राणपद असल्यास मुखदुर्बल (मुका) उन्मत्त, जडांगी, हीन, कृश शरीराचा, दुःखी असतो. क्षीण प्राणपद लग्नांत असेल तर मनुष्य रोगी होईल.

२. प्राणपद दुसरे भावांत असेल तर मनुष्य धन, धान्य, संतति, सेवकयुक्त असतो.

३. प्राणपद तिसरे भावांत असेल तर हिंसा करणारा, गर्विष्ठ, चोरांशीं फार निष्ठुर, गुरुभक्तिवर्जित असतो.

४. चतुर्थ भावांत प्राणपद असल्यास तो मनुष्य सुखी, सुस्वरूप, स्नेही व स्त्रियांस प्रिय, गुरुसेवापरायण, सुशील असतो.

५. प्राणपद पंचम भावांत असल्यास मनुष्य सुखी, कोणत्याही गोष्टीची पर्वा न ठेवतां कर्तृत्व करून दाखविणारा, दयाळु, सर्व प्रकारचे ऐषआराम भोगणारा.

६. प्राणपद षष्ठ स्थानांत असल्यास बंधुजन व शत्रूंस वश, तीव्र स्वभावाचा, मंदाग्नियुक्त, निर्दय, दुष्ट, अल्परोगी, धनवान् आणि अल्पायु असा मनुष्य असतो.



७. सप्तम भावांत प्राणपद असल्यास ईर्षाळु, सदोदित कामी, तीव्र स्वभावाचा, शरीरानें भयंकर मुद्रेचा, वाईट गोष्टींत पुढें असणारा आणि कुबुद्धि असा मनुष्य असतो.

८. अष्टम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य रोगग्रस्त, पीडित, बंधु, पुत्र, सेवकांपासून मोठमोठीं दुःखें पावणारा असतो.

९. नवम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य पुत्रवान्, धनसंपन्न, सुदैव, सुस्वरूप, राजसेवक, हुद्देदार, सदा संतोषवृत्ति आणि विचक्षण असा असतो.

१०. दशम स्थानांत प्राणपद असल्यास मनुष्य शक्तिमान्, बुद्धिमान्, दक्ष, राजकार्यांत प्रवीण, आणि देवार्चनपरायण असतो.

११. प्राणपद एकादश भुवनांत असल्यास मनुष्य विख्यात, गुणवान्, प्राज्ञ, ऐषआराम भोगणारा, धनवान्, गौरवर्णाचा आणि मानप्रिय असतो.

१२. द्वादश भुवनांत प्राणपद असल्यास मनुष्य क्षुद्र, दुष्ट, हीनांग, आप्त व द्विज यांचा द्वेष करणारा, नेत्ररोगी, काणा असतो.

( श्लोक १६ ) चार केंद्रांना व्योम ( दशम ) अस्त ( सप्तम ), पाताल ( चतुर्थ ) आणि विलग्न ( लग्न ) अशीं नांवें आहेत. केंद्रांस कंटक असें ह्मणतात. जें केंद्र आपले राशीचे नवमांशांत उदय पावलें असेल त्यास वर्गोत्तमी असें ह्मणतात.

( श्लोक १७ ) जलचर राशी चतुर्थ स्थानांत अस-

त्यास बलवान्, पशुराशी दशमांत बली, नरराशि लग्नांत बली, आणि कीटराशी, सप्तम स्थानांत बलवान् असतात. ह्यावरील राशी वरील स्थानांपासून सप्तम भुवनांत असल्यास निर्बल जाणाव्या.

( श्लोक१८।१९ ) ह्यांत ग्रहांचीं उच्चत्वें आहेत. ज्यो० अं० २ पृ० १० पहा. उच्चराशीपेक्षां मूल त्रिकोण राशीचें बल कमी असतें.

( श्लोक० २० ) दिवसा मनुष्यराशी बलवान् असतात. पशुराशी रात्रीं बलवान् असतात आणि कीट व जलचरराशी संधिकालीं बलवान् असतात. ३।६।१० आणि ११ ह्या स्थानांस चय असें ह्मणतात.

( श्लो. २१ ) द्वादश राशींचे अनुक्रमवर्ण येणेंप्रमाणें आहेत. अंकसंख्या राशीदर्शक आहेत.

( १ ) लाल. ( २ ) श्वेत. ( ३ ) पोपटी. ( ४ ) लाल व पांढरा. ( ५ ) धूरासारखा. ( ६ ) पांडुर. ( ७ ) चित्र. ( ८ ) काळा. ( ९ ) सुवर्णासारखा. (१०) पिंगट. (११) कर्बुरी (१२) बभ्रु ( मुंगुसासारखा ) व स्वच्छ.

( श्लो. २२ ) सूर्यापासून जें द्वितीय स्थान त्यास वेशि असें ह्मणतात. मेषेपासून कन्येपर्यंत पूर्व चक्रार्ध चतुर्गुणित करून पांच मिळवून राशिमानें समजावीं. व तींच उलट रीतीनें तूळेपासून मेषेपर्यंत समजावीं.

( श्लो. २३ ) रवि चंद्र हे राजे होत; मंगळ सेनाधिपति; बुध युवराज; गुरु व शुक्र हे मंत्री ( प्रधान ) व शनि सेवक आहे. यांपैकीं ज्याचा जो लग्नाधिपति असेल त्याप्रमाणें त्याची वृत्ति असेल.

( श्लो. २४ ) रवि हा आत्मा आहे; चंद्र—मन; मंगळ—पराक्रम; बुध—भाषण; गुरु—ज्ञान व सुख; शुक्र—मद ( वीर्य ); शनि—दुःख आहे.

( श्लो. २५ ) सूर्याचीं नांवें—सूर्य, हेलि, भानुमान्, दीप्तरश्मिः, चंडांशु, भास्कर, अहस्कर. चंद्राचीं नांवें—अब्ज, सोम, चंद्रमा, शीतरश्मि, शीतांशु, ग्लौ, मृगांकः, कलेशः.

( श्लो. २६ ) मंगळाचीं नांवें-आर, वक्र, अवनेय, कुज, भौम, लोहितांग, पापी; बुधाचीं नांवें-विज्ञ, सौम्य, बोधन, चंद्रपुत्र, चांद्रि, शांत, श्यामगात्र, अतिदीर्घः.

( श्लो. २७ ) गुरूचीं नांवें—जीव, अंगिरा, देवगुरु, प्रशांत, वाचांपति, इज्य, त्रिदिवेशवंद्य. शुक्राचीं नांवें—भृगु, उशना, भार्गवसूनु, अच्छ, काणः, कवि, दैत्यगुरु, सित.

(श्लोक २८ व २९) शनीचीं नांवें—छायात्मज, पंगु, यम, अर्कपुत्र, कोण, सित, सौरि, शनि, नील, क्रूर, कृशांग, कपिलाक्ष, दीर्घ, तम, असुर. राहूचीं नांवें—अगु, सैंहिकेय, सुवर्भानु, विधुंतुद. केतूचीं नांवें—केतु, शिखी, ध्वज. गुलिकाचीं नांवें—शनिसुत, गुलिक, मांदि, यमात्मज, प्राणहर, अंति, पापी.

( श्लोक ३० ) प्राणपदाचीं नांवें—प्राण, असु.

## ग्रहांचीं स्वरूपें.

(श्लोक ३० पासून ३७ पर्यंत.)

सूर्य—डोळे पिंगट, पित्तप्रकृति, प्रतापवान्, सत्वगुणी, स्वल्पकेशयुक्त, प्रवाशी, संदिग्ध बोलणारा, अल्पदाता, दैविकबुद्धियुक्त, बांधेसुत, थोडा तांबूस आणि काळा.

चंद्र—शुभ्रकांति, बांधेसुत, वक्ता, विचारवान्, क्वचित्च सडपातळ, शांतरीतीनें बोलणारा, सत्वगुणी, वात, कफ, पित्तप्रकृतीचा.

मंगळ—रागीट व क्रूर नेत्र, तांबूस व किंचित् शुभ्र-वर्ण, पित्तप्रकृतीचा, चंचल बुद्धीचा, कृशशरीर, तामस बुद्धि, प्रतापी, आणि स्त्रीसंभोगाविषयीं आतुर.

बुध—दूर्वाप्रमाणें श्यामवर्ण, अतिविद्वान्, रजोगुणी, खरें बोलणारा, हास्यप्रिय, वात, कफ, पित्तप्रकृतीचा, प्रतापी आणि परस्त्रीगामी.

गुरु—स्थूलशरीर, कफप्रकृति, श्रेष्ठमति, सुविद्वान्, सत्वगुणी, आणि सर्व गुणांनीं संपन्न, नेत्र आणि केंस पिंगट.

शुक्र—सुंदर डोळे, इच्छापूर्तिसंपन्न (ज्याच्या इच्छा परिपूर्ण होतात असा) सुखी, बली, सुंदरकांति, निळे केशयुक्त, रजोगुणी, आणि सर्वगुणसंपन्न.

शनि—दुष्ट, कृश आणि दीर्घ अवयवी, पिंगट डोळे, रांठ, दांत मोठे, तामसबुद्धि, वातप्रकृति, कठोर भाषण करणारा, निंद्य.

(श्लोक ३७ पासून ३९ पर्यंत.)

वरील ग्रहांचे गुण जन्मकालीं अथवा प्रश्नकालीं त्यांचे बलाप्रमाणें पहावेत. [ पत्रिकेंत ग्रहांचें बल नवमांश कुंडलीवरून पहातात, ह्मणजे नवमांश कुंड-लींत जें लग्न येईल त्या लग्नाचा स्वामी जन्म कुंड-लींत जसा असेल त्याप्रमाणें त्या मनुष्याचें स्वरूप व गुण असतील. आणि जर नवमांश कुंडलीचा स्वामी जन्मकुंडलींत अस्तास गेला असेल तर अथवा षष्ठ, अष्ट, आणि द्वादश स्थानीं असेल तर वरील ग्रहांचे गुण जम-णार नाहींत; ह्मणजे, ग्रहांचे बलाप्रमाणें त्याचें स्वरूप व गुण जमतील. नवमांश कुंडलींत चंद्र ज्या स्थानांत



असेल त्या स्थानाधिपाप्रमाणें मनुष्याचा वर्ण व स्वरूप वर्णन करतात. ] गुरु आणि शुक्र हे विप्रवर्णदर्शक आहेत. रवि आणि मंगळ क्षत्रियवर्णदर्शक आहेत. चंद्र आणि बुध हे वैश्यवर्णदर्शक आहेत. शनि हा शूद्रवर्णदर्शक आहे. राहू आणि केतु हे चांडाल ज्ञातिदर्शक आहेत. गुलिक हा ज्ञातिभ्रष्टदर्शक आहे.

(श्लोक ४० पासून ४३ पर्यंत.)

ग्रहांचे रंग—रवि—रक्तासारखा, चंद्र—धवल, मंगळ—अतितांबडा, बुध—पोपटीरंग, गुरु—पिंवळा, शुक्र—नाना प्रकारचा विचित्र रंग, शनि—काळा.

ग्रहांच्या देवता—रवि—अग्निदेवता, चंद्र—जलदेवता, मंगळ—अग्निकुमार, बुध—विष्णु, गुरु—इंद्र, शुक्र—इंद्राणी शनि—ब्रह्मदेव.

ग्रहांच्या दिशा—रवि—पूर्व, शुक्र—आग्नेय, मंगळ—दक्षिण, राहु—नैऋत्य, शनि—पश्चिम, चंद्र—वायव्य, बुध—उत्तर, गुरु—ईशान्य. ( चंद्राच्या राशि कोणत्या दिशेस बलवान् असतात तें येणेंप्रमाणें ):—




पापग्रह—क्षीण चंद्र, मंगळ, रवि आणि शनि. बुध हा पापग्रहांचे अनुरोधानें पापग्रह होतो. शुभ ग्रहांचे अनु-

रोधानें शुभ होतो. पापग्रहाखेरीज बाकीचे शुभ ग्रह जाणावेत.

नपुंसकग्रह–बुध आणि शनि. स्त्रीग्रह–चंद्र आणि शुक्र. नरग्रह–रवि, मंगळ, आणि गुरु. जन्मकालीं जो ग्रह बलवान् असेल त्या वृत्तीचा मनुष्य उपजतो.

मंगळ–मज्जा, गुरु–मांस, शुक्र–धातु, बुध–त्वचा, चंद्र–रक्त, रवि–अस्थि, शनि–स्नायु. याप्रमाणें सप्तधातूंचे स्वामी आहेत. हे स्वामी जेव्हां बिघडतात तेव्हां त्या धातूंचे विकारानें त्रास होतो आणि मृत्युकाळीं अष्टम स्थानांत जे ग्रह असतील त्या धातूंच्या कोपानें मृत्यु होतो.

( श्लो० ४४–४६. )

स्थानें–रवीचें देवस्थान, चंद्राचें जलस्थान, मंगळाचें अग्निस्थान, बुधाचें क्रीडास्थान, गुरूचें कोश–( भांडार ) स्थान, शुक्राचें शय्यास्थान, शनीचें उकिरडा, कचरा इ० व राहूचें सर्पस्थान.

वस्त्रें–शनीचें जीर्ण, रवीचें जाडें भरडें, गुरूचें कांहीं नवें व कांहीं जुनें, शुक्राचें कठिण ( टिकाऊ ), चंद्राचें नवें, बुधाचें फाटकें छिद्रें पडलेलें, मंगळाचें जळलेलें, राहूची गोधडी (कंथा ) व केतूचें चित्रविचित्र व विशेष छिद्रें पडलेलें.

( श्लो० ४७–४९. )

ए[illegible]वरील धातु व मणि–रवीचें तांबें, चंद्राचा मणि, मंगळाचें सोनें, बुधाचे शिंपले, गुरूचें रुपें, शुक्राचें मोतीं, शनीचें लोखंड, राहूचें शिसें, व केतूचें पोलाद.

वस्त्रांचे रंग–गुरूचें पिवळें, शुक्राचें नानाप्रकारचे रंगाचें रेशमी, रवीचें इंद्रगोप किड्याप्रमाणें तांबडें, चंद्राचें

३

सर्वांत जुनें इंग्रजी–मराठी साप्ताहिक पत्र

# प्रभाकर.

वर्षाची वर्गणी ४ रुपये ८ आणे. ट. ह. ५ रुपये.

ट्रामवे टर्मिनस जवळ, गिरगांव–मुंबई.

नवीन व्यवस्थेसंबंधानें विद्वानांचे उत्तम अभिप्राय आले आहेत.

## वर्गणीची पोंच.

प्रो. भडकमकर.
रा. रा. केशव क. वाणी.
,, श्रीधर शामराव.
,, धोंडो बावाजी.
,, आनंदराव ना. आचार्य.
,, बाळकृष्ण. ना. फाटक.
,, वामन विष्णु.
मि. रस्तुमजी जहांगीरजी.
डा. आपाजी गोविंद काळे.
रा. रा. मल्हार खंडेराव चिटणीस.
,, मोरेश्वर बा. मराठे.
,, पांडुरंग गोविंद.
सरदार लक्ष्मणराव ह. पटवर्धन.
रा. रा. रामचंद्र बापूजी रुईकर.
रा. रा. काशिनाथ ग. गोरे.
,, पुरुषोत्तम आ. पाटकर.
,, शंकर ना. गाडगीळ.
,, छगनलाल खें गुजर.
,, गोविंद रा. पराडकर.
,, भिकाजी म. रानडे.
,, नरहर रा. जोशी.
रा. ब. साबाजीराव चिटणीस.
रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे.
श्री. बाळासाहेब ईनामदार.
रा. रा. जनार्दन ग. वाळिंबे.
,, मार्तंड त्रिंबक आऊटी.
,, माधव गोपाळ आठले.
,, त्रिंबक बापूजी पटवर्धन.

## MODERN ASTROLOGY.

Annual Subscription 6 s. 6 d. (Rs. 6) Post free.

Annual subscribers, who remit 6/6 to the Proprietors of the *Modern Astrology* 1 & 2 Bouverie St., Fleet St., London, E. C. or the Proprietors of the Jotirmálá, are entitled to the following privilege, *free of charge*, if they send with their subscription exact time (state if before or after Mid-day,) date and place of birth.

1.—Their horoscope cast and brief delination given free of charge.

2.—Their directions calculated for the current year, shewing fortunate or unfortunate periods, as the case may be, with useful advice thereon.

## एजंटांचीं नांवें.

कोल्हापूर.—वे. शा. सं. रा. रा. अमृतराव महादेव वाघोलीकर—गंगावेशींत दांडेकराचा वाडा.

पुणें.—सदाशिव पेठ—वाडदेकराचा वाडा—रा० रा० आनंदराव कृष्ण हेबळेकर यांचे घरीं.

इंदूर.—इंग्लिश स्कूल—रा० रा० बापू नरसिंह भावे, असिस्टंट—मास्तर.

नाशिक.—वे. शा. सं. रा रा. विष्णु रावजी राहळकर ज्योतिषी.

### ज्योतिषीलोकांकरितां केलेले सन १८९६ चे रोजचे स्पष्टग्रह आणि भाव व दशवर्ग कोष्टकें.

—ह्या पुस्तकाचे साह्यानें लग्न, स्पष्टग्रह, दशवर्गबली इत्यादि पत्रिकेचें गणित अर्ध्या तासांत करतां येतें. किमत ४॥ आणे. ज्यो० चे वर्गणीदारांस. ६ आणे इतरांस.

पत्ता :—फणसवाडी, जगन्नाथाची चाळ—मार्केट पोष्ट, मुंबई.




मुंबई :—"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापविलें.


# ज्योतिर्माला.

## THE JOTIRMALA OR THE GARLAND OF ASTROLOGY.

ग्रहा राज्यं प्रयच्छंति ग्रहा राज्यं हरंति च ।
ग्रहैर्व्याप्तं सर्वमिदं त्रैलोक्यं सचराचरम् ॥

"The wise man rules his stars;
The fool obeys them."




पुस्तक १ लें.] एप्रिल, १८९६. [अंक १२ वा.



| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| यूरोपीय फलज्योतिष .... .... .... | २५—३६ |

विषयक्रमः—थोर पुरुषांच्या व संस्थेच्या कुंडल्या अंक १,५ आणि ९.
„ आर्यफलज्योतिषाची सुलभ माहिती „ २।६।१०.
„ सर्वार्थचिंतामणीचें भाषांतर „ ३।७।११.
„ युरोपीय फलज्योतिषाची माहिती „ ४।८।१२.



[All Rights Reserved by the Publishers.]



वर्षाची किंमत १२ आणे.

☞ हा अंक कांहीं विशेष अडचणींमुळें नियमितवेळीं छापतां आला नाहीं म्हणून तो सपटेंबर १८९७ मध्यें छापिला आहे.

## दोन शब्द.

**मालेस** आश्रय मिळावा तसा मिळाला नाहीं. ६ शें ग्राहकांपैकीं सुमारें ३ शें ग्राहकांनीं आश्रय दिला. मालेचा छपाईखर्च पोष्टखर्च निम्में सुटला आहे. ग्राहकांनीं आमचे सूचनेचा योग्य विचार केल्यास आणि एक एक दोन दोन वर्गणीदार जास्त मिळविल्यास माला नियमीतपणें चालेल. मासिक पुस्तकाचें जीवन लोकाश्रयावर असतें. शास्त्रीयविषयाचे पुस्तकास ग्राहक थोडेच असतात. विद्वानलोकांचे आश्रयाखेरीज सामान्यशिक्षणाचे लोकांस शास्त्रीय विषयाची गोडी नसते, यामुळें आश्रयास विद्वान लोकांकडे धांव मारावी लागते, परंतु त्यांतच बुडवे फार भेटतात म्हणून वर्गणीदारांसच विनंति करून मालेचें सौभाग्य रक्षण्याचें श्रेय देणें योग्य वाटत आहे.

दुर्दैवानें मालेंतील ५ वे अंकांतील **लॉर्ड सँडहर्स्ट यांचे कारकीर्दीचें भविष्य** सर्व जुळलेलें पाहून आनंद व दुःख होत आहे. कोल्हापुरचे महाराज व जंजिऱ्याचे नवाब साहेब आणि विद्याखात्यांतील नौकर रा. नेने ह्यांस पदव्या मिळाल्या, प्राथमिक शिक्षणास एज्युकेशन कमीशनें बसून मदत मिळाली ह्या गोष्टी चांगल्या झाल्या. नामदारांचा स्तुतिपाठ गव्हरनर साहेबांनीं गाइला तोही ठीकच झाला. परंतु दुष्काळानें शेतकरी लोकांचें झालेलें नुकसान, अन्न अन्न करून हजारों लोकांनीं सोडलेले प्राण, पुण्यास सोलजर लोकांनीं दिलेला विविध त्रास, जादा पोलीस, मुंबई व पुणें म्युनिसीपालटीवर लादलेला खर्च, नातूंची उचलबांगडी, ना. टिळकांवरील राजद्रोहाचा आरोप आणि धरपकड, ह्या गोष्टी ना. सँडहर्स्ट साहेबांच्या गूढ कारकीर्दीची व अप्रियतेची साक्ष देतात असें कष्टानें म्हणावें लागतें. विद्यार्थ्यांनीं ह्या कारकीर्दीचे कुंडलींत मंगळ कन्या राशींत म्हणजे पुणें शहरचे तनुस्थानांत आहे हें नीट लक्षांत ठेवावें. मालेच्या प्रथम अंकांत पान १० मध्यें पुण्याचें लग्न कन्या ठरविलेलें आहे. कारकीर्दीचे मध्यभागीं मंगळ पंचांगस्त सायन कन्यें राशींत आला तेव्हां ह्या

# ज्योतिर्माला.

पुस्तक १ लें.] एप्रिल, १८९६. [अंक १२ वा.

## यूरोपीय फलज्योतिष.

( आठवे अंकावरून पुढें चालू. )

हर्शल उर्फ प्रजापति यास दिली आहे. कुंभ ही राशि शास्त्रिय, जिज्ञासु, शोधप्रिय, असाधारण वस्तुप्रिय, गूढशास्त्राभ्यास निमग्न असे स्वभावाची राशि आहे. प्रजापति ह्या ग्रहाचा स्वभाव वरील वर्णनाप्रमाणें आहे. प्राचीन लोकांस प्रजापतीचे अस्तित्वाची माहिती खास होती; परंतु कालांतरानें आणि बुद्धिभ्रष्टतेनें ती नष्ट झाली. हा ग्रह डोळ्यांनीं पाहणारास अंधक दिसतो, त्यामुळें त्याची गणना ताऱ्यांत होऊं लागली आणि त्यामुळें प्रजापतीचें ज्ञान नाहींसें झालें असें राफेलचें मत आहे.

आर्य लोकांस ह्या ग्रहाची माहिती होती असें दिसतें. शनीचा प्रदक्षिणाकाळ ३० वर्षांचा आहे. प्रजापतीचा प्रदक्षिणाकाळ ८४ वर्षांचा आहे. ह्यावरून प्रजापतीस शनिपुत्र त्याचे दुरत्वामुळें नांव मिळालें असावें. गुलिक ग्रहाचा स्वभाव प्रजापती सारखा आहे.

**ग्रहांचीं उच्चत्वें नीचत्वें इत्यादिकः**—कांहीं ग्रह कांहीं राशींत फारच बलवान असतात. त्याहून कमी बली कांहीं राशींत असतात आणि कांहीं राशींत ते दुर्बल असतात. ह्या गुणांवरून त्यांचे भेद केले आहेत. त्यांस

उच्च स्वगृह, आणि नीच असें ह्मणतात. कोष्टकांत प्रत्येक ग्रहांची राशिपरत्वें अंशात्मक उच्चें आणि नीचें दाखविलीं आहेतः—

## ग्रहांचे उच्चनीचत्वाचें कोष्टक.

| राशि. | स्वगृह. | उच्चत्व. | नीचत्व. | बलत्व. |
|---|---|---|---|---|
| मेष. | मंगळ. | रवि १९ अंश. | शनि १९ अंश. | शुक्र. |
| वृषभ. | शुक्र. | चंद्र ३ ,, | प्रजापति. | मंगळ. |
| मिथुन. | बुध. | ...... | ...... | गुरु. |
| कर्क. | चंद्र. | गुरु १५ ,, | मंगळ २८ ,, | शनि. |
| सिंह. | रवि. | ...... | ...... | प्रजापति. |
| कन्या. | बुध. | बुध १५ ,, | शुक्र २७ ,, | गुरु. |
| तूळ. | शुक्र. | शनि २१ ,, | रवि १९ ,, | मंगळ. |
| वृश्चिक. | मंगळ. | प्रजापति. | चंद्र ३ ,, | शुक्र. |
| धन. | गुरु. | ...... | ...... | बुध. |
| मकर. | शनि. | मंगळ २८ ,, | गुरु १५ ,, | चंद्र. |
| कुंभ. | प्रजापति. | ...... | ...... | रवि. |
| मीन. | गुरु. | शुक्र २७ ,, | बुध १५ ,, | बुध. |

आर्यज्योतिष मताचें कोष्टक अंक २ पृष्ठ १० यावर दिलें आहे. प्रजापतीचे उच्चत्वाचे व नीचत्वाचे अंश नक्की झाले नाहींत.

कित्येक ग्रह कोष्टकांत दिलेल्या राशीखेरीज दुसऱ्या कांहीं राशींत थोडे बलवान होतात. हें बल राशीच्या स्वभावगुणाचें साम्यामुळेंच मानलें आहे. उदाहरणार्थ बुध—हा मिथुन, कन्या, तूळ आणि कुंभ या शास्त्रीय विषयक राशींत बलवान होतो. शुक्र, कर्क व मीन या प्रसव व आर्द्र (जल) राशींत बलवान होतो. रवि



आणि मंगळ अग्नि राशींत ह्मणजे मेष, सिंह आणि धन या राशींत बलवान होतात. गुरु प्रसव व सौम्य राशींत आणि मुख्यत्वें कर्क, मीन, तूळ आणि कुंभ ह्या राशींत बलवान होतो. शनि तूळ आणि कुंभेंत बलवान होतो. प्रजापति तूळ आणि वृश्चिक राशींत बलवान होतो. चंद्र हा शुक्राप्रमाणें समजावा. ग्रहांचीं बलाबलें अन्य कोणत्याही रीतीनें पाहूं नये असें रॅफेलचें मत आहे.

## ग्रहांचीं स्थानबलें.

ग्रह जन्मकालीं आकाशाचे ज्या भागांत ह्मणजे कुंडली ह्या नकाशांत ज्या स्थानीं पडेल त्याप्रमाणें त्यांस बल प्राप्त होतें. सर्वांत उत्तम स्थानें लग्न व दशम होत. त्यानंतर सप्तमस्थान, त्यानंतर एकादशस्थान आणि नंतर चतुर्थस्थान ह्याप्रमाणें स्थानें कमी कमी बलवान होतात. वाईट स्थान फक्त ६ वें स्थान आहे. ह्या स्थानांतील ग्रह चांगलें फल देत नाहीं ह्मणजे वाईट फलें देतो. कांहीं ग्रह एका स्थानापेक्षां दुसऱ्या स्थानांत अधिक बलवान होतात. जसें:—रवि, चंद्र, गुरु आणि मंगळ हे दशम स्थानांत शनि, बुध लग्नांत, बुध तृतीय स्थानांत, शुक्र सप्तम स्थानांत आणि हर्शेल उर्फ प्रजापति नवम स्थानांत बलवान होतात.

यूरोपीय फलज्योतिषाप्रमाणें कुंडली तयार करण्याची रीत ज्योतिर्माला अंक १० मध्यें दिली आहे. सायन स्पष्ट ग्रहांचे पुस्तकाप्रमाणें रॅफेलचें पुस्तक दर वर्षास प्रसिद्ध होतें. चालू वर्षाची किंमत ६ पेन्स ह्मणजे जवळ जवळ आठ आणे आहे. मागील कोणत्याही वर्षाचे एफिमिरिजला (स्पष्टग्रहदर्शक पंचांग) १ शिलिंग

ह्मणजे १ रुपया पडतो. ह्या पुस्तकांत सर्व ग्रह लंदन येथील दोन प्रहरचे ह्मणजे मध्याह्नीचे दिले असतात. मुंबई वेळ ४ वाजून ५२ मिनिटांची झाली ह्मणजे विलायतेंत १२ वाजतात. रॅफेलचें पुस्तकांत दिलेले ग्रह मुंबईचे १२ वाजून गेल्यावर ४ तास ५२ मिनिटांनीं लंदनचे मध्याह्नी येतात. तेव्हां मुंबई मध्याह्न काळचें स्पष्ट ग्रह करतांना प्रत्येक ग्रहाची २४ तासाची गति काढून त्रैराशिकानें ४ तास ५२ मिनिटांची गति उणी करावी ह्मणजे दोन प्रहरीचे ग्रह येतील.

आपले देशांत निरयण पंचांगें हल्लीं चालूं आहेत. ज्योतिर्मालेंत सर्व ग्रह सायन असतात तेव्हां निरयण ग्रहांस सायन कसे करावेत हें सांगतों. निरयण ग्रह, ह्या शब्दाचा अर्थ ज्या ग्रहांचीं स्थानें ह्मणजे राशि, अंश, कला, विकला हे भाग अयनांशरहित असतात त्या ग्रहांस निरयण ग्रह ह्मणतात. संपातापासून आरंभ धरून जी गणना ती सायन गणना होय. संपात चल आहे. त्याची गति दर वर्षास सुमारें ५०-१ विकला आहे. ग्रहलाघवकाराचे मताप्रमाणें १ कला आहे. शा० शके ४४४ चे सुमारास संपात रेवतीचे अखेरीस किंवा अश्विनीचे आरंभीं होता. तेथून तो २२ अंशांवर मागें ह्मणजे उत्तराभाद्रपदावर आला आहे. हें अंतर संपात चलाचें होय. ह्यास अयनांश म्हणतात. अयनांश युक्त जी गणना ती सायन होय. आपले देशांत ग्रहलाघवावरून पंचांगें करतात; म्हणून पंचांगांतील ग्रहांस अयनांश युक्त केले म्हणजे मिळविले असतां ग्रह सायन होतात. उदाहरणार्थ शके १८१९ श्रावण कृष्ण ३० रोजींचे



पंचांगांतील निरयण स्पष्टग्रह खालीं दिले आहेत. त्यास सायन करणें आहे तर त्याची रीतः—

| र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. | रा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ५ | ५ | ४ | ३ | ७ | ९ |
| १२ | १० | ७ | ८ | २६ | ४ | ३ | १२ |
| १२ | ५९ | ५३ | १४ | ५९ | ३ | १५ | ७ |
| ३४ | ४७ | ३८ | ५० | १९ | ७ | ११ | ५७ |
| ५७ | ७९८ | ३८ | ३७ | ११ | ६९ | २ | ३ |
| ५६ | ४२ | २ | ५६ | ५६ | ८ | ५९ | ११ |

ह्या ग्रहांत रवि ४ राशि भुक्त होऊन ५ वे राशींतील ह्मणजे सिंह राशींतील १२ अंश, १२ कला आणि ३४ विकला आहे असें कळतें. आणि त्याची २४ तासांची गति ५७ कला आणि ५६ विकला आहे असें अंकदर्शित करीत आहेत. आतां शके १८१९ सालचे अयनांश किती आहेत हें पाहूं. शालिवाहन शकांतून ४४४ वजा केले ह्मणजे पाहिजे त्या वर्षारंभाचें अयनांश निघतात. शके १८१९ उणे ४४४ बाकी १३७५ अयनांशाची गति वर्षाची १ कला आहे. ६० कलेचा एक अंश होतो ह्मणून १३७५÷६० भागाकार २२ अंश आला आणि बाकी ५५ कला राहिल्या ह्मणजे शके १८१९ मधील अयनांश २२ अंश ५५ कला आले. स्पष्ट रवि ४।१२।१२।३४ आहे. ह्यांत २२ अंश ५५ कला मिळविल्या ह्मणजे सायन स्पष्ट रवि झाला. तो ५।५।७।३४ आला, ह्मणजे कन्या राशींत रवि ५ अंश ७ कला ३४ विकला आला.

ह्याप्रमाणें इतर ग्रह सायन करावेत. अंक १० मध्यें उदाहरण व रीत दिली आहे त्यावरून २४ तासांतील पाहिजे त्या वेळेचे स्पष्ट ग्रह त्रैराशिकानें करतां येतील. त्याचप्रमाणें प्रत्येक ग्रहाची रोजची गति कळली ह्मणजे अमावास्येचे मागील दिवसांपैकीं कोणत्याही दिवसाचे स्पष्ट ग्रहांचे अंश, कला, विकला त्रैराशिकानें जे येतील ते अमावास्येचे दिवशींचे सूर्योदयाचे ग्रहांतून उणे करावेत ह्मणजे इष्ट दिवसाचे व घटिका पळांचे स्पष्ट ग्रह तयार होतात. वर दर्शित केल्याप्रमाणें सायन ग्रह तयार झाले तरी ते स्पष्ट सायन वेधतुल्य ग्रहांशीं अंश, कला, विकलात्मक तंतोतंत बरोबर येत नाहींत. रवीच्या कांहीं कला शनि व चंद्र यांचे अंश व कला बरोबर येत नाहींत म्हणून सूक्ष्म ग्रहांचें गणित नॉटिकल पंचांगावरून अथवा रॅफेलचे पंचांगावरून करावें. नॉटिकल व रॅफेलचे एफिमिरजमध्यें ग्रहांचे अंश, कला, विकला देतात. त्याचप्रमाणें ग्रहांच्या उत्तरदक्षिण क्रांति देतात. करणादि योग देत नाहींत.

## ग्रहांचीं स्थानफलें व दृष्टिफलें यांचा विचार.

चंद्रविचारः—चंद्र लग्नीं असेल तर तो मनुष्य भटकणारा असतो. हें लक्षण द्विस्वभाव व चरराशींत चंद्र असला तर चांगलें जमतें. मनोवृत्ति चंचल, स्त्रैण, आणि स्त्रियांत मान मिळतो. स्वभाव मनमिळाऊ, गरीब, परोपकारी, जगमित्र, भित्रा, उदार शांत असतो. आणि अडाणी लोकांचें बरोबर जे व्यवहार होतात त्यांत फायदा होतो. चंद्र अग्नि राशीचा असेल तर महत्वाकांक्षी चंद्र मेष राशींत असून प्रजापतीचे दृष्टींत असेल



तर मनुष्य डोक्याचा हलका आणि चपल असतो. मकर किंवा वृश्चिक राशीचा लग्नीं असेल तर मद्यपी, कुमार्गी, दुर्व्यसनी, शिव्यागाळी करणारा असतो. मिथुन, कन्या, तूळ व कुंभ या राशींत असला तर शास्त्रप्रिय, ज्योतिषप्रिय उत्तम भाषाभिज्ञ असतो. कर्क व मीनेचा असेल तर दयाळु, सुस्वभावाचा असून लोकांकडून मान मिळेल. वृषभेंत दृढनिश्चयी, एकधोरणी, उद्योगी, दीर्घ प्रयत्न करणारा, झोंपेंत चालणारे मनुष्याचे कुंडलींत जन्मकाळीं चंद्र उदीत असतो.

चंद्रग्रहाचा स्वभाव शांत आहे आणि त्यास तंटे बखेडे आवडत नाहींत. चंद्र २ स्थानीं असला तर धनप्राप्ति व यश चांगलें मिळतें. परंतु तो वृश्चिक किंवा मकर राशींतील असेल तर द्रव्यासंबंधानें अडचण पडेल व द्रव्यहानि होईल.

चंद्र ३ रे स्थानीं असेल तर अल्प प्रवास, बंधु व शेजारी ह्यांपासून फायदा होतो.—गुप्त शास्त्रांचें अभ्यासाकडे मनाची ओढ जाते.

चंद्र ४ थे स्थानीं असला तर स्थलांतर होतें. जमिनजुमला व शेतकीपासून फायदा होतो. चंद्र चतुर्थस्थानीं स्वगृहीचा किंवा उच्च असेल तर भाग्यशाली होईल आणि शेवटीं स्वतंत्र होईल ह्मणजे स्वावलंबीपणा प्राप्त होईल.

चंद्र ५ वे स्थानीं कर्क व मीन राशीचा असेल तर संतति फार होईल आणि त्यांवर जन्मणारा फार प्रीति करील. त्याचप्रमाणें तरुण पुरुषावर तो प्रीति करील. पंचमस्थानांत चंद्र असला ह्मणजे जुगारी, स्त्रीव्यसनी आणि चैनी मनुष्य असतो.

चंद्र ६ वे स्थानीं असला ह्मणजे प्रकृति वाईट असते. द्विस्वभाव राशीचा ६ वे स्थानीं असेल तर स्त्रियास क्षयरोगाची धास्ती असते. स्थीर राशीचा असेल तर मुतखडा, मूत्रकृच्छ्र, मेहादि रोग होतात. चर राशीचा असेल तर पोटांत व स्नायूंत विकार होतो. चंद्र क्लिष्टस्थानीं, किंवा अशुभ दृष्टीनें विलोकित असेल तर वरील वर्णन केलेली फलें मिळतील. कारण चंद्रग्रहाचा स्वभाव शुभ आहे तो वाईट फलें देत नाहीं. फक्त अशुभ ग्रहांच्या दृष्टींत मात्र अशुभ फल देतो.

चंद्र ७ वे स्थानीं असल्यास विवाहसुख, स्त्रीसौख्य, कायद्यांमध्यें विजय, भागीदारापासून फायदा, प्रवास व जागेची बदलाबदली करण्याची प्रवृत्ति होते—चंद्र वृषभ, कर्क, तूळ, धन, कुंभ आणि मीन राशीचा असेल तर नवरा किंवा बायको फार उद्योगी व हुशार असतात.

चंद्र अष्टम स्थानीं असेल तर विवाहांत द्रव्यप्राप्ति होते. शनि मंगळाची त्यावर अशुभ दृष्टि असेल तर आकस्मिक मृत्यु होण्याची धास्ती असते.

चंद्र ९ वे स्थानीं असेल तर पुष्कळ प्रवास करील. शास्त्रीय विषयाकडे कल राहील, धर्मनिष्ठ, चौकस व तिर्सट असा असेल, चंद्र जर बलवान् असेल तर स्त्रीच्या नातेवायकांकडून मदत होईल.

चंद्र १० स्थानीं असेल तर संपूर्ण आयुष्यांत भरभराट होत जाईल. श्रीमंताचे स्त्रियांकडून नेहमीं नजराणे होतील. चंद्र बलिष्ट असल्यास बराच लाभ होईल. लोकमान्य होईल. नित्य प्रचारांत लागणाऱ्या वस्तूंचा क्रयविक्रय केला असतां फायदा होईल.



चंद्र ११ वे स्थानीं असल्यास पुष्कळ लोकांशीं मैत्री होईल व त्यापासून फायदा होईल. बलहीन असल्यास मदत होणार नाहीं.

चंद्र १२ वे स्थानीं वृश्चिक किंवा मकर राशीचा असेल तर त्यास इतर लोक फसवितील, त्याबरोबर कपट करतील, परंतु इतर कोणत्याही राशीचा चंद्र १२ वे स्थानीं असेल तर जय आणि द्रव्यप्राप्ति होते.

प्रत्येक पत्रिकेंत चंद्राचें द्वादशस्थान वर्णन पाहावें.

### चंद्राची इतर ग्रहाबरोबर युति व दुसऱ्या दृष्टि.

चंद्र हा ग्रह बुधाबरोबर युति करील तर अथवा अन्य शुभ दृष्टि करील तर मनुष्य बुद्धीचा चपल व हुशार असतो. वायु राशींत बुध असेल तर मनुष्य समयसूचक व कल्पक असतो. ही युति १ लें, ३ रें, ९ वें आणि १० वें स्थानीं झाल्यास उत्तम समजावी. ह्या यूतीचे योगावर जन्मलेला मनुष्य परकीय भाषांचा अभ्यास त्वरीत करतो आणि जन्मलग्न मिथुन, कन्या, तूळ, धन, अथवा कुंभ ह्यांपैकीं कोणतेंही लग्न असेल तर तो मनुष्य उत्तम वक्ता होतो.

बुधाबरोबर चंद्र वाईट दृष्टि करीत असेल तर—चाहाडखोर, खोटे बोलणारा, दुसऱ्याची मानहानि करणारा मनुष्य होतो. त्याची बुद्धि चपल, स्वभाव उद्धट असतो. शनीची वाईट दृष्टि बुध आणि चंद्र यांवर असेल तर तो मनुष्य बेइमानी होतो व तो आपले बुद्धीचा दुरुपयोग करतो.

चंद्राची शुक्रावर शुभ दृष्टि असली ह्मणजे जन्मणारा मनुष्य स्वतःचे संबंधानें फार काळजी घेतो.

पोषाखासंबंधानें फार व्यवस्थित असतो. स्त्रियांस मान्य असतो. स्त्रीसुख चांगलें लागतें. शुक्रपीडित नसल्यास चांगली बायको मिळते, आणि चिक्कु असतो.

शुक्र चंद्राकडून पीडित असल्यास निष्काळजी, मलीन, दारुबाज आणि आळशी असतो. स्त्रियांस स्त्रीरोग, अशक्तता आणि मुदतीचे रोग नेहमीं होतात.

रवीवर चंद्राची कोणतीही शुभ दृष्टि असेल तर आयुष्य सुखद जातें. धनप्राप्ति चांगली होते आणि महाजनांपासून फायदे, मानमरातब मिळतो. ह्या दृष्टियोगावर जन्मलेल्या मनुष्यास रोजगार मिळतोच असें जाणावें. शरीर सदृढ राहतें आणि स्त्री उदार व उदात्त मनाची मिळते. अशुभ दृष्टि असल्यास द्रव्यप्राप्ति होत नाहीं, धंदा रोजगार मिळत नाहीं. सट्टयाचे व्यापारांत द्रव्य जातें अगर स्त्रियां करितां द्रव्यनाश होतो, शरीर अशक्त राहतें आणि नाना प्रकारचे रोग होतात.

चंद्रमंगळाची युति अथवा अशुभ दृष्टि असल्यास स्वभाव हट्टी, मत्सरी, उद्दाम, असतो त्याच प्रमाणें वाईट कृत्य कोणतेंही असो त्यांत पडणारा मनुष्य असतो. व्यभिचारी असतो. द्रव्य व शक्ति यांचा व्यय करतो. मिथ्याभाषण करणारा, शूर आणि उदार असतो. स्त्रीसुख चांगलें मिळत नाहीं. स्त्री भांडखोर आणि मद्यपि असते. स्त्रियांस हा योग असल्यास शरीरप्रकृति चांगली राहत नाहीं. त्रास फार होतात आणि अखेरीस बेअब्रु होते. चंद्राची मंगळावर शुभ दृष्टि असेल तर मनुष्य शूर आणि निश्चयी असतो. दुसऱ्या बरोबर व्यवहारांत फायदा होतो



परंतु विषयसुखाकडे आणि मद्याकडे जास्त ओढ घेतो. शरीर सदृढ आणि विशेष चपल असतें.

चंद्रगुरूची युति अथवा शुभ दृष्टि असल्यास आयुष्य सुखांत जातें. द्रव्यप्राप्ति चांगली होते. स्त्रीसुख चांगलें लागतें. स्त्रीचे पत्रिकेंत हा योग असतां शरीर बळकट असतें आणि धनप्राप्ति चांगली होते. चंद्राची अशुभ दृष्टि गुरूवर असेल तर द्रव्यनाश होईल. दरिद्र येईल. सट्टयांत पैसे जातील, पोटांत आणि फुफुसांत रोग होईल.

चंद्रशनीची युति असल्यास अथवा अन्य अशुभ दृष्टि असल्यास द्रव्यनाश होतो. कपटी मित्रांकडून द्रव्यापहार होतो. धंद्यांत बूड येते. स्त्री चांगली मिळत नाहीं. हा योग द्विस्वभाव राशींत जाहला तर एका पेक्षां जास्त विवाह होतात. दशम, एकादश, द्वादश, तनु, धन, सहज आणि भ्रातृस्थान ह्यांत हा योग झाला तर कांहीं दिवस शरीरप्रकृति बिघडते. त्याचप्रमाणें चतुर्थ स्थानापासून दशम स्थानापर्यंत हा योग कोणतेही स्थानीं झाला तर उंचावरून पतन होतें आणि अपघात होतात.

शनिचंद्रयुति योग हा द्रव्य प्राप्तीस व संसारसुखास फारच वाईट आहे. स्त्रीयांस हा योग असेल तर शरीरसुख चांगलें लागत नाहीं, मद्यपी, आणि व्यसनी असते. शुक्रही पीडित असेल तर स्त्रीस शरीरसौख्य मिळणार नाहीं. चंद्र शनि शुभदृष्टियुक्त असतील तर शांत, घेतलेलें काम तडीस नेणारा, द्रव्यवान होतो. स्त्रियांस शरीरसुख चांगलें लागतें.

शहाणी आणि उद्योगी स्त्री असते. चंद्र आणि प्रजापति उर्फ हर्शल यांची युति असेल तर तो मनुष्य बेफिकीर असेल तर व्यभिचारी आणि स्त्रीनें टाकलेला असतो. स्त्रीचे पत्रिकेंत हा योग असेल तर नवरा अन्य विवाहित स्त्रियां बरोबर व्यभिचार करील. त्या योगावर जन्मलेला मनुष्य प्रवासी आणि वारंवार आपलें राहण्याचें ठिकाण बदलत असतो.

चंद्रप्रजापतीचा दृष्टियोग शुभ असला तर जन्मणारा मनुष्य गुप्तकर्में करील ह्मणजे व्यभिचारी असेल परंतु तो स्त्रीत्यागी नसेल. चंद्र प्रजापति १ ले, ३ रे, ९ वे अथवा १० स्थानीं असेल तर पुष्कळ प्रवास होतील. आणि तो फलज्योतिषी असेल.*

बुध हा ग्रह तनुस्थानांत असला ह्मणजे मनुष्य चलाख व हुशार असतो. अग्निराशींत असला ह्मणजे चपल, रागीट, नाट्यकलेंत कुशल किंवा त्या कलेचा शोकी असतो. वक्ता चांगला असतो. गणिती असतो आणि चांगला शोधक असतो. धन राशींतील बुधापेक्षां मेष आणि सिंह राशींतील बुधाचें फल जास्त जमतें. धन आणि वृषभ राशींत बुध असेल तर जन्मणारा थोडा क्रोधी आणि मूर्ख असतो आणि त्यास चांगलें भाषण करतां येत नाहीं. वृषभ अथवा मकर राशींत बुध असेल तर मनुष्य खुनशी, डोकेफिरू, खादाड आणि स्वेच्छाचारी असतो.

---

* वरील सर्व चंद्रदृष्टियोग प्रत्येक पत्रिकेंत पाहिला पाहिजे. कोणते स्थानांत हा योग होतो आणि दृष्टि किती बलवान अथवा दुर्बल आहे त्याप्रमाणें विचार करून वरील वर्णन युक्त करावें.



वरील अनिष्ट गडबडी झाल्या. मंगळ कन्याराशींत ता. ९ जुलै सन १८९७ रोजीं आला त्यावेळेपासून २६ आगष्टपर्यंत तो कन्या राशींत आहे. पुणें न्यू इंग्लिश स्कूलचे वर्णनांत १८ वे वर्षी भागीदारांत तंटे होणारे आहेत. पुणें न्यू इंग्लिश स्कूल ग्रांट कांहीं अटीवर बंद करण्यांत येणार आहे असेंही कळविण्यांत आलें आहे असें कळतें. पुणेकरांवर अथवा महाराष्ट्रीयांवर १८९८–९९ सालीं घोरपड येणारी आहे त्यासंबंधानें दोन शब्द मालेंत येतीलच.

## मालेचें दुसरें वर्ष.

दुसरे वर्षाचे १२ अंक एकदम छापून वर्गणिदारांस ते नव्हेंबर अखेर किंवा डिसेंबर महिन्यांत मिळतील. ह्या अंकांत विद्यार्थ्यांकरितां सुलभ माहिती आहे. होरा, द्रेष्काण, सप्तमांश, नवांशादिक कुंडल्या तयार करण्याची पद्धत, ग्रहांचे दशवर्ग, ग्रहांचीं दृष्टिफलें, ग्रहांचीं द्वादश राशिस्थफलें, द्वादश भावांचें वर्णन हे भाग क्रमवार व समजण्यासारखे सोपे लिहिले आहेत. प्रत्येक वर्गणिदारास आपली कुंडली तयार करतां येऊन ५० रुपये किंमतीची पत्रिका सुमारें १ महिन्यांत पुस्तकाचे आधारें करतां येईल, असें पुस्तक पाहिल्यावर कळेल. पत्रिकेचा धंदा करणाऱ्यास, किंवा करमणुकीचे वेळेत आपले देशबांधवांची भवितव्यता कळण्याची ज्यांस इच्छा आहे त्यांस तर हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवण्यासारखें झालें आहे. ता. १ नवंबरचे आंत फक्त बारा आणे वर्गणी पाठविणारास–त्याची जन्म लग्न कुंडली सायन द्वादश भावसहित सूक्ष्म स्पष्ट ग्रहयुक्त मिळेल, इतकेंच नाहीं तर त्यास **द्रव्यप्राप्तीचीं वर्षें, बढती होण्याचीं वर्षें, संततीचा व स्त्रीसुखाचा काळ, साधारण राजयोगवर्णन आणि स्थूलमानानें आयुष्यप्रमाण** इतकें वर्णन फुकट मिळेल. वर्गणीदारांनीं ह्या सवलतीचा उपयोग त्वरित करावा आणि वर्गणी वरील मुदतींत पाठवावी. ह्या अंकासोबत जाहिरात पाठविली आहे ती वाचून मित्रमंडळींस कृपाकरून दाखवावी.

हे बाराही अंक सन १८९८ चे जानेवारीचे आरंभीं मिळतील.

## एजंटांचीं नांवें.

पुणें.--बुधवारपेठ–माणकेश्वराचा वाडा–रा. रा. आनंदराव कृष्ण हेबळेकर यांचे घरीं.

इंदूर.—इंग्लिश स्कूल—रा॰ रा॰ बापू नरसिंह भावे, असिस्टंट-मास्तर.

नाशिक.—वे. शा. सं. रा. रा. विष्णु रावजी रहाळकर, ज्योतिषी.

बेळगांव.—बाळकृष्ण मल्हार लाड, वकील.

पनवेल.—कृष्णराव पांडुरंग तुंगारे.

पत्ताः–फणसवाडी, जगन्नाथाची चाळ–मार्केट पोष्ट, मुंबई.

"तत्त्वविवेचक" प्रेस, मुंबई.

# ज्योतिर्माला.

पुस्तक २ रें.] मे, १८९६ एप्रिल,–१८९७. [अंक १–१२.

## आर्यफलज्योतिषाची सुलभ माहिती.

( अंक १० वरून पुढें चालू. )

सायनद्वादश भावात्मक कुंडली तयार करण्याची रीत आणि तींत स्पष्ट ग्रह कसे मांडावे ह्याची माहिती अंक १० पुस्तक १ मध्यें दिली आहे.

शालिवाहन शकाचे पूर्वीं, ४।५ हजार वर्षांचे सुमारास पत्रिकेचे गणितास ग्रह भूमध्यस्थ घेत असावेत असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. गर्गऋषींचे काळीं रविमध्यस्थ ग्रह पाहत होते असें गर्गसंहितेंतील अग्रहायन वर्षारंभाचे ग्रहावरून दिसत आहे. यूरोपीय ज्योतिर्विद् बेन्टले ह्यांनीं आपले पुस्तकाचे ९४ वे पानावर युधिष्टिरकाल ठरवितांना गर्गसंहितेंतील ग्रह दाखल केले आहेत, त्यांत रवि अनुराधा नक्षत्रावर, बुध शतभिज् नक्षत्रावर, शुक्र कृत्तिकेवर, मंगळ मूळावर, चंद्र रोहिणीवर, आणि गुरु पुष्य नक्षत्रावर असे ग्रह दिले आहेत. वरील ग्रहांत बुध आणि शुक्र हे रवीपासून ९० आणि १८० अंशांजवळ दिलेले आहेत. भूमध्यस्थ स्पष्ट ग्रहांत रवीपासून बुध आणि शुक्र इतके अंतरावर येणारे नाहींत. मंद स्पष्ट ग्रह मात्र येण्याचा संभव आहे. यूरोपीय ज्योतिषावरील प्राचीन ग्रंथांत रवीपासून बुध शुक्र चतुर्थस्थानीं

ह्मणजे ९० अंशांजवळ येतात असें मानलें आहे. आर्य व आंग्ल ज्योतिष्यांतील साम्यावरून गर्गकालीं रविमध्यस्थ ग्रह पाहण्याची वहिवाट फलज्योतिषांत दिसत आहे. रविमध्यस्थ स्पष्ट ग्रह पाहण्याची वहिवाट शालिवाहन शकाचे दुसरे किंवा तिसरे शतकांत आढळत नाहीं. वराहमिहिराचा मृत्यु शा० शके ५१८ मध्यें झाला आहे. त्यास बुध आणि शुक्र हे रवीपासून चवथे भुवनांत कसे येतात हें कळलेलें नाहीं.*

रविमध्यस्थ स्पष्टग्रह फलादेशाकरितां घेण्याची वहिवाट मोडल्यानंतर तों शालिवाहन शके ५७० पर्यंत, ग्रह मध्यममानानें पाहत असावेत असें वाटतें. खेंडा येथील ताम्रपटांत जो अधिक मास दिसत आहे तो सायन मध्यममानानें मिळतो असें रा. **शंकर बाळकृष्ण दीक्षित** आपले लेखांत कबूल करीत आहेत. मध्यममानानें संक्रांति-निर्णय करण्याची वहिवाट **शेखर** ग्रंथांतही दिसत आहे.

भावचलित कुंडली करण्याची वहिवाट केव्हां व कधीं पडली हें समजणें अत्यंत महत्वाचें आहे. पृथ्वीवरील कोणत्याही अक्षांशांवरून भाव काढतां येतात. मुंबई शहराचे अक्षांशांवरून काढलेले भावांत आणि लंडन शहराचे अक्षांशांवरून काढलेले भावांत फारच अंतर येतें. विषुववृत्तापासून उत्तरेस अथवा दक्षिणेकडे जसें जसें स्थल लांब असेल तसे तसे भाव कमीजास्त होतात. ह्यावरून भावसाधन करतांना पृथ्वीवरील इष्टस्थलाचा निर्देश झाला पाहिजे हें उघड आहे. ह्मणजे भावसाधनविचारांत पृथ्वीवरील स्थल पाहणें प्राधान्य आहे. रविमध्यस्थ स्पष्टग्रह पाहण्याची वहिवाट शालिवाहन शकाचे आरंभाचे सुमारास नाहींशी झालेली दिसते; ह्मणून भावचलित कुंडली करण्याची वहिवाट शकानंतरचीच ह्मणावी लागते. कारण रवि मध्य कल्पून भाव करण्याचें साधन अद्यापपर्यंत उपलब्ध झालेलें दिसत नाहीं. संक्रांति-निर्णय सायन मध्यममानानें शके ५७० पर्यंत करीत होते, ह्मणून ह्या कालीं देखील भावविचार झालेला असावा असें वाटत नाहीं. ह्या कालाचे सुमारास आर्यज्योतिष ग्रंथांत मोठी क्रांति झाली आहे. यूरोपीय वेध आणि फलादि ग्रंथांतील कांहीं तत्वें ह्या वेळीं आर्य ज्योतिषांत दाखल झालीं आहेत, व त्यांतच भाव साधन करण्याचें महत्व आमचे आर्य ज्योतिषांस कळलेलें दिसत आहे. सारांश शालिवाहन शकाचे ६ वे शतकाचे पुढें भावचलित कुंडली पाहण्याची वहिवाट सुरू झाली असेंच मानावें लागतें. आपले देशांत जी कुंडली मांडण्याची वहिवाट पत्रिकेंत व टिप्पणांत दिसत आहे ती फारच पुरातन आहे आणि त्यांत रविमध्यस्थ ग्रह दर्शविलेले असतात. पुष्कळ प्राचीन लोकांच्या कुंडल्यांचे संग्रहांत बुध आणि शुक्र हे रवीपासून ४,५ राशीचे अंतरानें सांपडत आहेत. प्राचीन पद्धतीस अनुसरून जी आंकडे कुंडली हल्लींचे फलज्योतिषी मांडतात ती अशास्त्र व फलादेश चुकविणारी आहे; करितां विद्यार्थ्यांनीं तिचा स्वीकार करूं नये.

* पूर्वशास्त्रानुसारेण मया वज्रादयः कृताः ।
चतुर्थे भवने सूर्याज्ज्ञसितौ भवतः कथम् ॥
( नाभसयोगाध्याय ) बृ. जा.

भावसाधन करण्याची वहिवाट शा० श० चे ६वे शतकांत चालू झाली, आणि तीही दोषयुक्त आहे. उदाहरणार्थ दशमस्थानांत मीन राशीचा १० वा अंश दशम भावारंभ आहे तर एकादश भावारंभ कुंभेचे १० वे अंशांत होणार, ह्मणजे दोन्ही भावारंभांत अंतर ३० अंशांचें राहणार. ह्या भावारंभाचा मध्य ह्मणजे १५ अंशांचा भाग झाला. आतां मीन राशींतील २७ वे अंशांतील ग्रह हा भावारंभाचे मध्यापेक्षां ह्मणजे १५ अंशांपेक्षां दोन अंशांनीं जास्त आहे, ह्मणून तो पुढील भावाचें फल देण्यास प्राप्त झाला असें मानतात. आणि हाच ग्रह दोन अंशांनीं किंवा तीन अंशांनीं कमी असता तर तो संधिगत झाला असें मानलें असतें, व तो कोणतेच भावाचें फल देत नाहीं असेंच मानलें असतें. वास्तविकपणें पहातां हा निर्णय विचारास सोडून दिसतो. कारण कोणताही ग्रह भावारंभापासून ९ अंश मागें असला तर तो पुढील भावाचें फल देत नाहीं, हें अनुभवानें सिद्ध झालें आहे. यूरोपीय ज्योतिषी भावारंभाचे मागें कोणताही ग्रह ६, ७ अंशांवर असेल तर तो पुढील भावारंभांत मानून त्याचीं फलें वर्णन करतात. आर्य ज्योतिषी १४-१५ अंशांची जी ओढाताण करतात त्याचें कारण कुंडलीचीं फलें कशीं तरी जमतीं करावींत हें आहे. रविमध्यस्थ ग्रह पाहण्याची वहिवाट असतांना जें ज्ञान परंपरेनें प्राप्त झालें तें १४-१५ अंशांपर्यंत जमतें हा अनुभव मुख्य समजून तोच अनुभव संधिविचारांत दाखल केलेला दिसतो, आणि ह्याच कारणाकरितां साधी कुंडली आणि भावचलित कुंडली निरनिराळी दाखविण्याची आवश्यकता पत्रिका वर्तविणारांनीं पत्रिकेंत ठेवलेली दिसते.



साधी कुंडली आणि भावचलित कुंडली ह्यांचें मेलन करून चांगले ज्योतिषी फलें सांगतात. परंतु बहुतेक ज्योतिषी साधी कुंडलीच पाहतात. ह्या साधे कुंडलींत फार तर लग्नाचे अंश व रवीचे अंश देतात, भौमादिक इतर ग्रहांचे अंश देत नाहींत, त्यामुळें कोणता ग्रह कोणते अंशांत व कोणते भावांत आहे हें कळण्याचें साधन नसल्यामुळें पत्रिकेचीं फलें चुकतात, आणि ज्योतिषीबुवांचे आळसामुळें व अज्ञानामुळें फलज्योतिषावरील लोकमत प्रतिकूल होतें. ज्योतिर्मालेंतील कुंडल्या दोषरहित असतात, परंतु त्यांत ग्रह मांडण्याची पद्धति, लुप्तराशी, इत्यादिक प्रकार नवीन आहेत असें पुष्कळ चांगले ज्योतिषांसही वाटतें. वास्तविक पहातां ज्योतिर्मालेंतील कुंडली ही साधी कुंडली व भावचलित कुंडली ह्यांचे मिश्रणापासून झालेली आहे ह्मणजे दोन कुंडल्या निरनिराळ्या न मांडतां एकच कुंडली मांडली आहे. अर्थात् शास्त्रोक्त कुंडली हीच आहे. ज्योतिर्मालेंतील कुंडल्या सायनमानाच्या आहेत. सायनमान हल्लीं यूरोपखंडांत चालू आहे. हिंदुस्थानदेशांत हल्लीं निरयणमानानें पत्रिका पाहतात. कित्येक लोकांचा समज ज्योतिर्मालेंतील कुंडली व फलादेश हें यूरोपियिलोकांचें स्पष्ट अनुकरण आहे असा आहे, परंतु हा समज चुकीचा आहे. सायनमान अत्यंत प्राचीन आहे. हिंदुस्थान देशांतील प्राचीन ग्रंथ सायन पद्धतीस अनुसरून आहेत. शालिवाहन शके १४४४ चे सुमारास सायन मानानें फल-

निर्णय करीत होते असें ज्योतिर्निबंधांतील वचनावरून व्यक्त होतें.* ह्या कालानंतर निरयणमानानें पत्रिका व पंचांगें करण्याची वहिवाट पडली. सांप्रत काळीं फलज्योतिषावरील ग्रंथांत रविमध्यस्थ ग्रह पाहण्याचे वेळचे ग्रंथ कोणते, सायनमानानें पाहण्याचे ग्रंथ कोणते, व निरयणमानानें अलीकडील ५ शें वर्षांत तयार झालेले ग्रंथ कोणते ह्यांचा निर्णय करून, अचुक फलें सांगण्यास किती अडचणी येतात हें समंजस वाचकांस कळेल. अनुभवानें सायनमान जास्त उतरतें असें ज्योतिर्मालेचें अध्ययन करणारांस कळून येईल.

सायन द्वादश भावात्मक कुंडली तयार झाली ह्मणजे पुढें होरा, द्रेष्काण, सप्तमांश, नवमांश, दशांश, द्वादशांश, त्रिंशांश, षोडशांश आणि षष्ठ्यंश कुंडल्या तयार कराव्या लागतात. ह्या कुंडल्यांत भावविचार मुळींच करावा लागत नाहीं. अंक १० मध्यें जी कुंडली दिली आहे तिच्यावरील नमूद केलेल्या होराद्रेष्काणादिक कुंडल्या पुस्तकाचे अखेरीस जोडल्या आहेत, त्याची एक प्रत करून त्या कुंडल्या कशा रीतीनें तयार केल्या हें सन १८९६ चे स्पष्टग्रहांचे पुस्तकांत जीं कोष्टकें अखेरीस दिलीं आहेत त्यांवरून कळेल. आरंभीं त्या कुंडल्या कोष्टकांचे आधारें कशा रीतीनें केल्या हें चांगलें कळलें ह्मणजे सरावानें प्रत्येकास आपल्या कुंडल्या तयार करतां येतील. जी गोष्ट एकवार वाचण्यानें समजणार नाहीं ती पुन्हा पुन्हा वाचल्यानें समजते.

---

* उच्चतः सप्तमं नीचं प्रोक्तांशे परिनीचता । इह कार्यः **सायनांशखचरैः फलनिर्णयः** ।



दुसरी कुंडली होराकुंडली होय. जन्मलग्न कर्क ५ अंश १७ कला आहे. हें होराचक्रांत पाहतां १५ अंशांचे आंत दिसत आहे. ५ वे सदरांत कर्कराशीचे खालीं चं ४. असें लिहिलें आहे, त्याचा अर्थ कर्कलग्न १५ अंशांपर्यंत जर असेल तर त्याचा होराधिपति अथवा होराकुंडलीचा स्वामी (मालक) चंद्र आहे. चंद्र हा कर्कराशी दर्शवीत आहे. ह्मणून जन्मलग्न कर्क मांडून पुढें क्रमानें राशीदर्शक आंकडे मांडावे. हेंच कर्कलग्न १५ अंशांपुढें असतें तर होराधिपति रवि झाला असता आणि लग्न सिंह मांडलें असतें. होराकुंडलींत ग्रह कर्क अथवा सिंह राशींत येतात. इतर राशींत येत नाहींत. आतां जन्मलग्न कुंडलींतील ग्रह होराकुंडलींत कसे मांडावे हें सांगतों. गुरु सिंहराशींत ६ अंश ३६ कला आहे. सिंहराशीचे सदरांत गुरूचे अंश पहिले १५ अंशांचे आंत आहेत, ह्मणून गुरु होराकुंडलींत सिंहराशींत मांडला आहे. येणेंप्रमाणें इतर ग्रहांविषयीं समजावें.

तिसरी कुंडली द्रेष्काणकुंडली होय. कर्कराशीचे सदरांत, जन्मलग्न प्रथम १० अंशांचे आंत दिसत आहे, ह्मणून द्रेष्काणकुंडलीचें लग्न कर्क होय. हें फक्त राशी अंकांवरूनच समजण्यासारखें आहे. जर हेंच लग्न २८ अंश असतें तर द्रेष्काणलग्न मीन आलें असतें. आतां द्रेष्काण कुंडलींत चंद्र मांडणें आहे तर तो कन्याराशीचा १६ अंश ३१ कला आहे, ह्मणजे तो कन्याराशीचे सदरांत पहातां १० ह्या अंकांचे भागांत समावेश पावतो, ह्मणून चंद्र मकरराशींत मांडला आहे. बाकीचे ग्रह चंद्राचे उदाहरणावरून कळतील.

चवथी कुंडली सप्तमांशकुंडली होय, ही पूर्वोक्त दोन उदाहरणांप्रमाणें ११ अंकावरील भागांत येते, ह्मणजे सप्तमांश कुंडलीचें लग्न कुंभ येतें. ह्यांत शनि मांडणें आहे तर वृश्चिक राशीचा शनि १६ अंश ५२ कला, हा वृश्चिक राशीचे सदरांत ५ अंकांचे भागांत, ह्मणजे सिंह राशींत येतो, ह्मणून शनि सप्तमांश कुंडलींत सिंह राशींत मांडला आहे. इतर ग्रह ह्याच प्रमाणें मांडावेत.

पांचवी कुंडली नवमांशकुंडली होय. पृष्ठ ३७ ह्यावर नवांश कोष्टक दिलें आहे. प्रथम सदरांत राशी दिल्या आहेत त्यांत कर्क राशी तिसरे भागांत आहे. जन्मलग्न ५ अंश १७ कला हें २ ह्या भागांत येतें ह्मणजे रवीचे राशींत येतें. रवीची राशी सिंह आहे ह्मणून नवांशकुंडलीचें लग्न सिंह मांडून पुढें क्रमानें राशींचे अंक मांडावेत. बुध हा ग्रह नवमांश-कुंडलींत मांडणें आहे, तर तो कसा मांडावा? बुध हा मकर राशींत २४ अंश ७ कला आहे, तर मकर राशी दुसरे सदरांत आहे, आणि २४ अंश ७ कलांचा भाग रवीचे राशींत ह्मणजे सिंह राशींत येतो, ह्मणून बुध सिंह राशींत ह्मणजे लग्नीं मांडला आहे. इतर ग्रह बुधाचे उदाहरणावरून कसे मांडावेत हें कळेल.

सहावी कुंडली दशांशकुंडली होय. दशांश चक्र ३६ व्या पानावर आहे. शेवटचे सदरांत अंश आहेत. कर्क लग्नाचा ५ अंश १७ कला हा भाग मेष राशींत येतो असें अंश ६ ह्या सदरांत पाहिलें असतां कळेल. ह्मणून दशांशकुंडलीचें लग्न मेष मांडलें आहे. आतां धनराशींतील शुक्र १ अंश १० कला हा दशांश-



कुंडलींत कोठें येतो हें पाहूं. अंश सदरांत शुक्र हा प्रथम भागांत ह्मणजे तीन ह्या अंकाचे सदरांत आहे. मेष राशीचे सदरांत प्रथम ३ अंश पर्यंतचे भागांत मं. १ असें लिहिलें आहे त्यावरून शुक्र हा मेष राशींत मांडला आहे. बाकीचे ग्रह ह्याच प्रमाणें भरावेत.

सातवी कुंडली द्वादशांशकुंडली होय. द्वादशांश चक्र ३३ वे पानावर दिलें आहे. प्रथम सदरांत अंश दिले आहेत आणि पुढें राशी दिल्या आहेत. जन्मलग्न कर्क ५ अंश १७ कला हें द्वादशांश चक्रांत तिसरे भागांत ह्मणजे जेथें ७ अंश ३० कलेचे अंशाचा भाग येत आहे तेथें आहे, त्याच ओळींत कर्क राशी खालील सदरांत कन्या राशीचा अंक ६ हा दर्शक आहे, ह्मणून द्वाद-शांशकुंडलींत लग्न कन्या मांडलें आहे. आतां हर्शल ऊर्फ प्रजापती हा ग्रह द्वादशांशकुंडलींत मांडणें आहे तर तो वृश्चिक राशींत २३ अंश १६ कला हा भाग कोठें येतो हें कोष्टकांत पाहतां तो सिंह राशींत येतो. बाकीचे ग्रह ह्याचप्रमाणें पहावेत.

आठवी कुंडली त्रिंशांशकुंडली आहे. त्रिंशांश कोष्टक ३७ वे पानावर आहे. ह्यांत विषमराशीचें एक कोष्टक आणि समराशीचें एक कोष्टक अशीं दोन कोष्टकें निराळीं केलीं आहेत. जन्मलग्न समराशीचें आहे. तें कर्क राशीचे सदरांत आणि अंश सदरांत पाहतां बुधाचे राशींत येत आहे. बुधाचे समराशींतील राशी कन्या आहे. ह्मणून त्रिंशांशकुंडलींत लग्न कन्या मांडलें आहे. आतां आपणांस धनराशींतील मंगळ १७ अंश १८ कलेचा मांडणें आहे तर विषमराशीचे सदरांत १७ अंश १८

कलाचा भाग १८ अंशांचे सदरांत पडतो, ह्मणून धनराशीचे खालीं आणि १८ अंशांचे सदरांत गुरूची विषम राशी जी धन त्यांत मंगळ मांडावा लागतो. येणेंप्रमाणें इतर ग्रह मांडावेत.

नववी कुंडली षोडशांशकुंडली होय. ही कशी मांडावी हें अंक ३ मध्यें सांगितलें आहे. षोडशांश कुंडलीचे लग्न मांडण्याचे व त्यांत ग्रह भरण्याचे प्रकार एकंदर तीन आहेत. ते अंक ७ मध्यें दिले आहेत. त्यांपैकीं दोन पक्ष गौण समजून तिसऱ्या पक्षाचा स्वीकार केला आहे. जन्मलग्न कर्क ९ अंश १८ कला आहे. तें कर्कराशीचे सदरांत पाहतां मिथूनराशीचे भागांत येत आहे. ह्मणून षोडशांशकुंडलींचें लग्न मिथून मांडून क्रमानें द्वादशराशी दर्शक अंक मांडले आहेत. १३।१४।१५ आणि १६ ह्या कल्पित भागांत ब्रम्हा, विष्णु, हर आणि दिनेश हीं कल्पित नांवें दाखल करावींत. आतां उदाहरणार्थ सिंहराशींतील गुरु ६ अंश २६ कला हा वृश्चिकराशीचे भागांत म्हणजे ८ ह्या आंकड्याचे सदरांत येतो. म्हणून गुरु वृश्चिकराशींत मांडला आहे. येणेंप्रमाणें इतर ग्रह मांडावेत.

दहावी कुंडली षष्ठ्यंशकुंडली होय. जन्मलग्न कर्क ९ अंश १७ कला आहे. दर एक अंशांचे दोन दोन भाग मिळून ३० अंशांचे ६० भाग होतात. वरील ९ अंशांची दुप्पट १० भाग आणि पुढील १७ कलांचा एक भाग मिळून ११ भाग झाले. कर्कराशी समराशी आहे. आणि समराशीचा क्रम उलट आहे म्हणून कर्कराशीपासून मागें उलट मिथून, वृषभ राशी मोजीत ११ वी राशी पहातां ती कन्या येते म्हणून षष्ट्यंशकुंडलींत जन्मलग्न कन्या मांडून त्याप्रमाणें पुढें राशी क्रमानें मांडाव्या.

विषमराशीचें लग्न असल्यास उलट राशी मोजण्याची जरूरी नाहीं. त्याचप्रमाणें ग्रहादिकांच्या राशी अंशपरत्वें मांडतांना विषमराशींतील ग्रहांस उलट मोजण्याची जरूरी नाहीं. आतां चंद्र कन्याराशींतील १६ अंश, ३१ कला, आणि ३४ विकला हा भाग ३४ वे अंशांत येतो, ह्मणून कन्याराशीपासून ३४ राशी उलट क्रमानें मोजतां धनराशी येते, ह्मणून चंद्र धनराशींत मांडावा. त्याचप्रमाणें मंगळ हा धनराशींत १७ अंश १८ कला आहे तो धनराशीपासून ३५ भाग पुढें मोजतां तो तूळराशीचा येतो ह्मणून मंगळ तूळराशींत मांडावा. येणेंप्रमाणें इतर ग्रहांविषयीं जाणावें. षष्ट्यंश चक्र बृहत् पाराशर होऱ्याचे आधारानें दिलें आहे आणि वरील कुंडलीचें उदाहरण सर्वार्थचिंतामणीचे आधारानें दिलें आहे.

होरा द्रेष्काणादि कुंडल्या मुख्यत्वें ग्रहांचें दशवर्गबल पाहण्याकरितां कराव्या लागतात. वरील नऊ कुंडल्या आणि जन्मलग्न कुंडली मिळून १० कुंडल्या होतात. बहुतेक ज्योतिषी ग्रहांचें षड्वर्गबल पाहतात. षड्वर्गांत जन्मलग्न कुंडली, होरा, द्रेष्काण, सप्तमांश, नवमांश, द्वादशांश, आणि त्रिंशांश ह्या कुंडल्या कराव्या लागतात. ग्रहांचीं बलें पाहण्याकरितां ह्या कुंडल्या कराव्या लागतात, ह्मणून ग्रहांचें बल कसें पाहतात हें पाहूं.

जे ग्रह स्वगृहींचे आहेत त्यांचें बल ३० कळा आणि शून्य विकला आहे असें समजावें. जे ग्रह अधिमित्राचे घरांत असतील त्यांचें बल २२ कला ३० विकला घ्यावें.

जे ग्रह मित्रग्रहांचे राशींत आहेत त्यांचें बल १५ कला आणि शून्य विकला घ्यावें; जे ग्रह सम आहेत त्यांचें बल ७ कला ३० विकला घ्यावें; शत्रूचे स्थानांत जे ग्रह असतील त्यांचें बल ३ कला आणि ४५ विकला घ्यावें; जे ग्रह अधिशत्रूचे घरांत आहेत त्यांचें बल १ कला ५२ विकला धरावें; ग्रह कितीही बली असला तरी तो ३ अंश आणि शून्य कला ह्यापेक्षां जास्त कधींही बली असत नाहीं. आर्यज्योतिषांत रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, आणि शनि ह्याच ग्रहांचीं बलें पाहतात; राहू आणि केतु ह्यांचीं बलें पाहत नाहींत. त्याचप्रमाणें प्रजापती" आणि वरुण हे दोन्ही ग्रह आर्यज्योतिषांस माहीत नाहींत, ह्मणून त्यांचीं हीं बलें पाहूं नयेत; प्रजापती आणि वरुण हे दोन ग्रह आहेत, परंतु ह्यांचीं फलें अमुकच निश्चयात्मक आहेत असें चांगलें कळलें नाहीं; ह्मणून त्यांचा विचार करूं नये. तथापि विद्यार्थ्यांनीं त्यांचीं फलें नोंदून ठेवल्यास काल गतीनें पुढील लोकांस त्यापासून उपयोग होईलच. ग्रहांचें नैसर्गिक मित्रामित्र कोष्टक अंक ६ पृ. १७ वर दिलें आहे, त्यावरून ग्रहांचे मित्र-सम-शत्रू आणि मित्र अधिमित्र इत्यादिक कळून येतील.

ग्रहांचे मित्र अधिमित्र पाहतांना दोन्ही बाजूंच्या तीन भुवनांत जरी कोणतीही राशी लुप्त असली, अथवा ग्रह भावारंभ अलीकडे असला तरी ग्रह ज्या ज्या भुवनांत दिसेल त्या त्या भुवनांत तो आहे असें समजून मित्र अधिमित्र पाहावे हें बरें, परंतु ज्यांस कुंडली समजण्याची माहिती चांगली झाली नाहीं त्यांनीं आंकडे कुंडली मांडावी.



आतां चालू कुंडलींत ग्रहांचे मित्र अधिमित्र पाहूं. रवि व बुध एकाच स्थानांत आहेत, बुध रवीच्या नैसर्गिक मित्रामित्र कोष्टकांत सम सदरांत आहे तो तात्काल मैत्रींत शत्रु झाला. येणें प्रमाणें बाकीचे ग्रह खालील कोष्टकावरून पहावे.

| ग्रह. | अधिमित्र. | मित्र. | सम. | शत्रु. | अधि-शत्रु. |
|---|---|---|---|---|---|
| रवि. | मंगळ ... | ......... | राहु, शनि, शुक्र, चंद्र, गुरु. | बुध. | ... |
| चंद्र. | ...... | गुरु, शनि, शुक्र, मंगळ. | रवि, बुध. ... ... | ... | राहु. |
| मंगळ. | रवि, चंद्र. | शनि, शुक्र... ... | बुध, राहु, गुरु ... | ... | ... |
| बुध. | राहु, शुक्र. | मंगळ, शनि. ... | रवि. ... ... ... | गुरु. | चंद्र. |
| गुरु. | चंद्र ... | शनि. ... ... | शुक्र, रवि, मंगळ ... | राहु. | बुध. |
| शुक्र. | बुध ... | मंगळ, गुरु... ... | रवि, चंद्र, शनि, राहु. | ... | ... |
| शनि. | बुध ... | गुरु... ... ... | मंगळ, शुक्र, रवि, चंद्र, राहु. | ... | ... |
| राहु. | बुध ... | ......... | रवि, मंगळ, शुक्र, शनि. | गुरु. | चंद्र. |

आतां ज्या कुंडल्यांचें वर्णन येथपावेतों केलें त्यांतून ग्रहांचें बल षड्वर्गात कसें येतें हें कोष्टकरूपानें देतों. हें कोष्टक, जन्मलग्नकुंडली आंकडेकुंडली मांडल्यास बरोबर येणार नाहीं. शुक्र हा धनराशीच्या पंचम भावांत आहे. मंगळ धन राशीच्या साहवे भागांत आहे. आंकडे कुंडलींत धनराशीप्रदर्शक ९ आंकड्याचे भागांत शुक्र आणि मंगळ एकत्र दिसतील ह्मणून तात्कालिक मैत्रींत ते शत्रु होतील, आणि मालेच्या कुंडलींत ते निर-

निराळ्या स्थानांत असल्या कारणानें मित्र होतात. हा भेद लक्षांत ठेवावा.

| ग्रह. | सू. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | शनि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जन्मलग्न कुंड | ७/३० | ७/३० | ७/३० | १५/० | ७/३० | १५/० | ७/३० |
| होरा. ... | २२/३० | २२/३० | २२/३० | २२/३० | २२/३० | ७/३० | ७/३० |
| द्रेष्काण. ... | १/५२ | १५/० | ३०/० | ३०/० | २२/३० | ३/४५ | ३/४५ |
| सप्तमांश. ... | ७/३० | ७/३० | ३०/० | १५/० | ७/३० | १५/० | ७/३० |
| नवमांश. ... | ७/३० | १५/० | ७/३० | २२/३० | ७/३० | ३/४५ | ३/४५ |
| द्वादशांश. ... | ३/४५ | ३/४५ | १/५२ | २२/३० | ७/३० | १५/० | ७/३० |
| त्रिंशांश. ... | २२/३० | १५/० | २२/३० | १५/० | १५/० | ३/४५ | १५/० |
| एकूण. ... | १/१३/७ | १/२६/१५ | २/१/५२ | २/२२/३० | १/३०/० | १/३/४५ | ०/५२/३० |
| फळ ... | मध्यम. | मध्यम. | उत्तम. | उत्तम. | मध्यम. | मध्यम | निर्बळ. |

वरील कोष्टकांत रवि जन्मलग्नकुंडलींत मकर राशींत ह्मणजे शनीच्या घरांत आहे, व शनि मैत्रीकोष्टकांत सम आहे, करितां रवीचें बल ७ कला व ३० विकला धरिलें. येणेंप्रमाणें बाकीच्या ग्रहांचीं बलें वरील कोष्टकावरून पहावीं.

कोणताही ग्रह दशवर्गांतील दोन किंवा अधिक वर्गीं असून स्वगृहीं मित्र किंवा अधिमित्रगृहीं असल्यास तो पारिजातांशादि योगीं आहे. हे योग आणि त्याचीं



HANSA MEHTA LIBRARY

फलें अंक ३ पृष्ट १२, आणि अंक ७ मध्यें सांगितलीं आहेत. त्याप्रमाणें वरील दशवर्ग कुंडल्यांत सूर्य, होरा, त्रिशांश, आणि षोडशांश कुंडल्यांत बलवान आहे म्हणून सूर्य उत्तमांश योगीं आहे. चंद्र देवलोकांश योगीं, मंगळ गोपुरांश योगीं, बुध ऐरावतांश योगीं, गुरु गोपुरांश योगीं, शुक्र सिंहासनांश योगीं आणि शनि उत्तमांश योगीं याप्रमाणें समजावें.

## ग्रहांचे दशवर्ग कसे करावे हें उदाहरणानें दाखविलें. आतां होरा द्रेष्काणादि कुंडल्यांचीं फलें कशीं पहावीं हें सांगतों.

**होराकुंडलीफलः**—होरा कुंडलींत ग्रह प्रथम आणि द्वितीय स्थानीं असतील तर धनप्राप्ति चांगली होईल. प्रथम आणि द्वादश स्थानीं ग्रह असतील तर धनप्राप्ति मध्यम होईल. बारावे भावांत जर पुष्कळ ग्रह आले तर दरिद्री होईल. त्याच प्रमाणें प्रथम भावांतील ग्रहांपेक्षां द्वितीय भावांत ग्रह जास्त असल्यास चांगला धनदयोग होतो. असें जाणावें. होरा कुंडलींत जर लग्न चंद्र राशीचें ह्मणजे कर्क आलें तर जन्मलेला मनुष्य लहानपणीं दुःखी आणि वृद्धावस्थेंत सुखी होतो. त्याच प्रमाणें होरा कुंडलींत सिंह लग्न असल्यास बाल्यावस्थेंत सुखी आणि पुढें दुःखी व क्रोधी होऊन तो प्राणी सुखदुःख भोगतो. होरा कुंडलीचा स्वामी जर जन्मलग्न कुंडलींत बलिष्ठ असेल तर तो मनुष्य गुणवान होईल. होरा कुंडलींत सिंह राशी असल्यास त्या राशीचा स्वामी जो

रवि त्याप्रमाणें मनुष्याची वृत्ति असते, ह्मणजे जन्मलेला मनुष्य कपटी, ठक, क्रोधी, निर्धन, परस्त्रीरत आणि विद्वानांचा किंवा श्रेष्ठजनांचा द्वेषी असतो. होरा कुंडलीचा स्वामी चंद्र असल्यास तो शांत स्वभावाचा मनुष्य असून, वरील तामस गुणांप्रमाणें तो न निघतां सात्विक गुणी निघतो ह्मणजे त्यास स्त्री, मित्र, धन, विद्या, मान, धर्मप्रीति इत्यादिक प्राप्त होतात. आणि तो स्वदेशांत राहतो. रवि-होऱ्यांत जन्मलेला मनुष्य विदेशीं ( परदेशांत ) राहतो. होराकुंडलीचा स्वामी जन्मलग्न कुंडलींत केंद्रीं असेल तर त्यास मोतीं रत्नादिक संपत्ति प्राप्त होते, आणि केंद्रीं त्या ग्रहाजवळ पापग्रह असल्यास चतुष्पादांचे क्रयविक्रयांत धनप्राप्ति होते. त्याच प्रमाणें होरा कुंडलींतील दशमस्थानाचा स्वामी बलवान असेल तर लक्ष्मीवान, कीर्तिमान, आणि लोकप्रिय असा मनुष्य असतो; पापग्रह असल्यास उलट समजावें ह्मणजे दरिद्री, अप्रिय समजावा.

**द्रेष्काणकुंडलीफलः**—यावर बंधुसुख व त्यांची संख्या पाहतात. द्रेष्काणकुंडलीचा स्वामी द्रेष्काणकुंडलींत ज्या राशींत असेल त्याप्रमाणें बंधुसंख्या जाणावी असें ग्रंथांतरीं वर्णन आहे. द्रेष्काणलग्नाचा स्वामी जर मीन राशींत असेल तर १२ बंधु होतील असें समजावें. ( हा नियम सर्वांस लागू होणारा नाहीं. ) कर्क अथवा मिथुन राशींत असल्यास अनुक्रमें ४ आणि ३ बंधु होतील असें समजावें. द्रेष्काणलग्नाचे स्वामीबरोबर जितके पापग्रह असतील, तितके बंधु नाश पावतील आणि जितके शुभग्रह असतील तितके बंधूंपासून सुख लाभेल. द्रेष्काणलग्नाचा स्वामी जन्मलग्न स्वामीचा मित्र असल्यास बंधु एकत्र राहतील, शत्रु असल्यास त्यांत तंटे होतील. द्रेष्काणलग्नस्वामीबरोबर स्त्रीग्रह असल्यास, अथवा द्रेष्काणलग्नाचा स्वामी स्त्रीग्रह असल्यास, भगिनीसुख जास्त लाभेल असें जाणावें. त्याचप्रमाणें द्रेष्काणलग्नाचा स्वामी पुरुषग्रह असल्यास बंधुसुख जास्त लाभेल.



द्रेष्काणलग्नाचा स्वामी, जन्मकुंडलींत ६।८ आणि १२ ह्या स्थानांत असेल तर तो मनुष्य आत्मघात करील. त्याचप्रमाणें तो शत्रुग्रहांचे राशींत ( ज० ल० कुंडलींत ) असेल तर शत्रूपासून मृत्यु पावेल. चंद्राबरोबर असल्यास कृष्णवर्णी असेल. पापग्रहाबरोबर असल्यास कर्णरोगी असतो, आणि बंधु व शत्रु यांचेबरोबर कलह करणारा असतो.

द्रेष्काणलग्नाचा स्वामी जन्मकुंडलींत मंगळाबरोबर अष्टमस्थानीं असेल तर त्याचे बंधूचा मृत्यु मार्गांत होईल. गुरु अथवा शनीबरोबर अष्टमस्थानीं असेल तर विषप्रयोगापासून बंधूचा मृत्यु होईल. त्याचप्रमाणें अष्टमस्थानांत क्रूरग्रह अथवा पापग्रह असल्यास वीज पडून बंधुमृत्यु होईल.

**सप्तमांशकुंडलीफलः**—सप्तमांशकुंडलीचा लग्नस्वामी जन्मलग्नकुंडलींत ज्या राशींत असेल, त्या संख्येप्रमाणें संतानसंख्या समजावी. परंतु त्या राशीचा सप्तमांशस्वामी अस्तंगत असल्यास त्या पुरुषाचे स्त्रीस संतती होणार नाहीं.

सप्तमांशकुंडलीचा लग्नस्वामी जन्मकुंडलींत नीच राशीचा असेल तर संतती दुर्बल होईल. सप्तमांशलग्न-

स्वामी शत्रुगृहीं असेल तर चांगलीं मुलें मरतील आणि वाईट मुलें जगतील. सप्तमांशलग्नस्वामी मित्रग्रहांचे राशींत अथवा उच्च असेल, अथवा मित्रग्रह जन्मकुंडलींत सप्तमस्थानांत असेल तर मुलें रूपवान व गुणवान होतील.

सप्तमांशकुंडलीचा लग्नस्वामी जन्मकुंडलींत सूर्याबरोबर असेल तर त्याचे मुलास नेत्रविकार होईल. आणि सप्तमांशाचा स्वामी जेथें असेल तेथून चंद्र किंवा शुक्र द्वादशस्थानांत असतील तर मुलास नेत्रविकार होईल. त्याचप्रमाणें सप्तमांशलग्नस्वामी गुरु अथवा शुक्राबरोबर असल्यास संतती पुण्यवान आणि दीर्घायू होते; सप्तमांश स्वामी जन्मलग्नकुंडलींत बुधाबरोबर लग्नीं असेल तर कन्यासंतती होते. सप्तमांशस्वामी जन्मकुंडलींत पापग्रहाबरोबर लग्नीं असेल तर मुलाचे माथ्यास रोग होईल आणि त्यानें तो मृत्यु पावेल. सप्तमांशलग्नस्वामी पापग्रह असून तो जन्मकुंडलींत लग्नींच असेल तर गर्भ राहणार नाहीं. त्याचप्रमाणें ११ वे भुवनांत असेल तर मस्तकांत अथवा पायास वायूचा विकार होतो, आणि तेथें पापग्रह असल्यास कठोर अंतःकरणाचा होतो. शुभग्रह असल्यास द्रव्यवान असतो. सप्तमांशलग्नस्वामी जन्मलग्नकुंडलींत सप्तम भुवनांत शनीबरोबर असेल तर संतती होणार नाहीं, परंतु तो जर शुभग्रहाबरोबर किंवा गुरूबरोबर सप्तम स्थानीं असेल तर पुत्रप्राप्ति होईल.

**नवमांशकुंडलीफलः**—नवमांशकुंडलीचा लग्नस्वामी जन्मलग्नकुंडलींत लग्नीं असेल तर लवकर विवाह



होईल, परंतु ती स्त्री लवकर मरेल. त्याचप्रमाणें तो ६।८ आणि ह्या स्थानीं असेल तर स्त्री मृत्यु पावेल. १० स्थानीं असेल तर भाग्यशाली स्त्री मिळेल. द्वितीय भावीं असेल तर विवाहानंतर सधन होईल. द्वादशस्थानीं असेल तर स्त्री व्यभिचारिणी आणि चोर असेल. त्याचप्रमाणें नवांशाधिपती जन्मलग्नकुंडलींत द्वादशभुवनांत स्वगृहींचा असेल तर स्त्री भाग्यशाली व पतिरत असते. नवांशाधिपती तृतीय, पंचम, सप्तम, नवम आणि एकादश भुवनांत असेल तर स्त्री पतिव्रता, रूपवती, आणि सुंदर नेत्राची असते. नवांशाधिपती केंद्रीं असल्यास त्याचें लग्न ६ किंवा ८ वे वर्षीं होतें, त्याचप्रमाणें ५ वे अथवा ८ वे भावांत असल्यास विवाह नववे वर्षीं होतो. नवांशाधिपति पापग्रह असून त्याबरोबर जन्मलग्नकुंडलींत पापग्रह असेल तर त्याची स्त्री खोटें बोलणारी, केंश रांठ, हस्त कठीण, अशी असते. नवांशाधिपती शुभग्रह असून जन्मलग्नकुंडलींत शुभग्रहाबरोबर असेल तर, अथवा शुभग्रहाकडून विलोकित असेल तर स्त्री पतिबरोबर चांगले रीतीनें वागेल. आणि नवांशाधिपति जन्मकुंडलींत अष्टमस्थानीं असेल तर त्याची स्त्री त्याचे हातून मृत्यु पावेल. आणि अष्टमस्थानीं चंद्र असेल तर स्त्रीचा मृत्यु जलांत होतो. नवमांशकुंडलींत सूर्य आणि राहु षष्ठस्थानीं असतील तर त्याची स्त्री विष खाऊन मरेल; आणि सूर्य, शुक्र तेथें असतील तर अग्नीपासून मृत्यु पावेल; आणि बुध असेल तर लांकूड पडून स्त्रीचा मृत्यु होईल. नवमांशकुंडलीचा लग्नस्वामी जन्मकुंडलींत चंद्राकडून विलोकित असेल तर, अथवा चंद्रासह असेल तर स्त्री

चंचल, व्यभिचारिणी, कपटी आणि पतिबरोबर थोडा वेळ स्नेह करणारी असते.

नवमांशकुंडलीचा लग्नस्वामी जन्मकुंडलींत पापग्रहाबरोबर केंद्रांत असून तेथें पापग्रह पहात असेल तर स्त्री शरीरानें क्लेश पावणारी, दरिद्री, आणि शस्त्राघातानें मरणारी जाणावी; परंतु तो ग्रह जर स्वगृहींचा, उच्च, अथवा मित्रक्षेत्रीं असेल तर स्त्री शरीरानें बळकट आणि भाग्यशाली असते. वरील उदाहरणें प्रथमस्त्रीसंबंधानें जाणावीं; कारण दुसरी, तिसरी अगर चवथी ह्यांपैकीं कोणत्याही स्त्रीचें वर्णन प्रथमस्त्रीप्रमाणें मिळणारें नाहीं. उदाहरणार्थ प्रथम स्त्री काळी, कुरूप असली तर दुसरी स्त्री गौरवर्णाची मिळते. दोन्ही स्त्रिया पतिव्रता असून त्यांचा मृत्यु झाला तर तिसरी स्त्री जारिणी निघते. सारांश कोणत्याही दोन स्त्रिया रंगारूपांत, स्वभावांत सारख्या मिळत नसतात. ह्मणून वरील नवांशवर्णन फक्त प्रथमस्त्रीस पहावें. प्रथमविवाहानंतर द्वितीय विवाह झाल्यास त्याचा विचार सप्तमांशावर होत नाहीं, ह्मणून त्याचें वर्णन पाहण्यास साधन नाहीं.

**द्वादशांशकुंडलीफलः**—ह्यावर आईबापांचे संबंधानें सुखदुःखाचा विचार करितात. द्वादशांशकुंडलीचा स्वामी जन्मलग्नकुंडलींत लग्नीं असेल तर जन्मणारा पुरुष आपले बापाप्रमाणें गुणवान् आणि धनवान् असेल. तोच धनभावांत असेल तर बापापेक्षां जास्त धनवान् होईल; तोच तिसरे भावांत असेल तर बापापेक्षां जास्त कीर्तिमान् होईल. चवथे भावांत असेल तर जास्त भाग्यशाली, द्रव्यवान् आणि पित्यासंबंधानें असुखी असेल. ५ वे भावांत असल्यास भाग्यवान् आणि स्वपराक्रमानें द्रव्य संपादन करणारा आणि बापाचें सुख पावणारा असा असतो. षष्ठभावांत असल्यास शत्रू जास्त होतात. सप्तमभावांत असल्यास राजापासून बहुमान पावणारा होतो. अष्टमभावांत असेल तर त्याचे पित्याचा मृत्यु शस्त्राघातानें अथवा जलघातानें, अथवा विषप्रयोगानें अथवा वीज पडून अथवा आत्मघात करून होतो. नवमभावांत असल्यास तीर्थयात्रा करणारा, धर्मावर श्रद्धा ठेवणारा, ब्राह्मण पाळणारा असा होतो. दशमभावांत असल्यास बापाचेपेक्षां अधिक प्रतापवान् होतो. बापास त्यापासून जास्त सुख लाभतें. एकादशभावांत असल्यास पित्याचें गुप्त धन मिळून त्यापासून धनप्राप्ति होते. द्वादशस्थानीं असल्यास जन्मणारा वाईट कर्में करणारा आणि द्रव्य उडवणारा होतो.



द्वादशांशकुंडलीचा लग्नस्वामी जन्मकुंडलींत स्वगृहींचा अथवा उच्च असल्यास, आणि त्याचे बरोबर शुभग्रह असेल अथवा पाहत असेल तर तो मनुष्य भाग्यशाली आणि सुखी जाणावा. द्वादशांशकुंडलीचा लग्नस्वामी जन्मकुंडलींत पापग्रहांचे घरीं असेल अथवा पाप ग्रहाबरोबर असेल तर, अथवा नीच असेल तर अथवा अस्तास गेला असेल तर त्या मनुष्यास शत्रु जास्त होतील, अग्नीपासून त्रास होईल, आणि सर्व प्रकारें त्रास होईल.

**त्रिंशांशकुंडलीचें फलवर्णनः**—त्रिंशांशकुंडलीचा लग्नस्वामी पापग्रह असून तो जन्मलग्नकुंडलींत नीच असेल तर तो मनुष्य कुटुंबविरोधी असतो आणि तो शुभग्रह असल्यास शरीरानें चांगला असतो, त्रिंशांश-

कुंडलीचा स्वामी षष्ठभावांत असेल तर त्या मनुष्यास राजबंधन होईल. आणि अष्टमस्थानीं असेल तर राजापासून मृत्यु पावेल आणि १२ वे स्थानीं असेल तर तक्रारखोर असेल. त्रिंशांशकुंडलीचा लग्नस्वामी सप्तमस्थानीं जन्मलग्नकुंडलींत असेल तर त्या पुरुषास स्त्रिया फार होतील.

षड्वर्गांत समावेश पावणाऱ्या कुंडल्यांचीं फलें वर्णन केलीं तीं सर्वत्र लागू पडतील असें समजूं नये. दशांश, षोडशांश आणि षष्ठ्यंश ह्या कुंडल्यांचा विचार ग्रहांचीं बलें पाहण्यासाठींच केलेला असतो, ह्मणून त्यांचीं फलें वर्णन केलेलीं नाहींत.

जन्मलग्नकुंडली व त्याचप्रमाणें होराद्रेष्काणादि कुंडल्या तयार करण्याची रीत व फलें ह्यांचें वर्णन दिलें. नवांशादि कुंडल्या करण्याचें मुख्य कारण ग्रहांचीं राशिपरत्वें आणि अंशपरत्वें बलाबलें पाहून फलें जास्त बरोबर यावीं हेंच आहे. हें मुख्य तत्व ध्यानांत ठेवून आर्यज्योतिषावरील सर्व ग्रंथांत नवांशकुंडलीवर फारच जोर दिला आहे. जन्मलग्नकुंडलींत ग्रहांचीं फलें वर्णन करतांना फारच गोंधळ उडतो. दोन शुभग्रहांत एखादा पापग्रह असला ह्मणजे शुभपापग्रहांचें मिश्रण करून फलें मिश्र घ्यावीं लागतात. त्यांतून एखादे भावांत पुष्कळ चांगले ग्रह असले आणि त्या भावाचा स्वामी वाईट स्थानीं पडला असेल तर शुभग्रहांचीं फलें अनुभवास येत नाहींत. सारांश जन्मलग्नकुंडलीचीं फलें पाहणें ह्मणजे शुद्ध न्यायतत्वाप्रमाणें ग्रहांचीं बलाबलें पाहून, देश, काल, स्थिति, प्रमाणें आणि जन्मणाराचे



स्थितीची पूर्ण ओळख करून घेऊन त्याप्रमाणें फलें वर्णन करावीं लागणारीं आहेत. जेथें न्यायतत्व चुकलें, तेथें फलें ही चुकलीं. प्रथम शिकणारांनीं ह्या गोष्टी लक्षांत ठेवून आपली पत्रिका तयार करते वेळेस शुभ आणि अशुभ फलें पत्रिकेंत लिहित जावीं. जन्मलग्नकुंडलींत १२ राशींत आणि १२ भावांत नऊ ग्रह क्रमानें फलवर्णनासहित दिले आहेत त्यावरून त्यांचीं फलें पाहावीं.

### रविद्वादशराशीस्थफलें.

**सूर्य प्रथम भावांत** ह्मणजे जन्मलग्नकुंडलींत तनुभावांत उच्च, किंवा स्वगृहींचा असेल तर तो मनुष्य कीर्तिमान्, बळकट, आणि दूरदृष्टी असतो. नीच असेल तर प्रतापि असतो, परंतु ज्ञानी नसतो; दरिद्री, नेत्रविकारी असतो. कर्कराशीचा सूर्य असेल तर ज्ञानी असतो. मकर कुंभराशीचा असेल तर छातींत रोगी असतो. धन आणि मीन राशींत असेल तर स्त्रीची सेवा करील. मिथुन व कन्या राशींत असेल तर कन्यासंतती होईल आणि स्त्रीचें सुख चांगलें लाभणार नाहीं. वृषभ आणि तूळ राशींत असेल तर कृतघ्न आणि स्त्रीसुखरहित असतो. मेष आणि वृश्चिक राशींत असेल तर तो प्रतापी, वाचाळ, व्यापारधंद्यांत दक्ष, आणि अंतरगलाच्या व्याधीनें युक्त असतो.

**सूर्य धनभावांत** ह्मणजे दुसरे भावांत असेल तर जन्मणाराचे मुखांत रोग होईल, व राजदंड होईल. परंतु रवि स्वगृहींचा अथवा उच्च असल्यास हें फल मिळणार नाहीं; उलट तो मनुष्य धनवान्, विद्वान्, नेत्ररोगी, कुशल, तेजस्वी, आणि स्वपराक्रमानें पैसा मिळविणारा होतो, व

त्याचप्रमाणें वाचाळ आणि ज्ञानी असतो. धनभावांत रवि धन किंवा मीन राशीचा असेल तर तो मनुष्य धनवान्, वाचाळ, कुटुंबापासून सुख पावणारा, व मित्राकरितां धन खर्चणारा असतो. मिथुन किंवा कन्या राशीचा रवि असेल तर ज्ञानी व कुटुंबापासून क्लेश पावणारा असतो; त्यास धन मिळतें व तें जातें. वृषभ आणि तूळराशीचा रवि धनभावांत असेल तर कुटुंबसुख व द्रव्यप्राप्ती यांचा अभाव असतो. मकर, कुंभ राशीचा रवि असेल तर धन-नाश, कुटुंबक्लेश होतात. कर्क राशीचा रवि असेल तर कुटुंबांत प्रमुख असतो. मेष, वृश्चिक राशीचा रवि असेल तर स्वपराक्रमानें धन मिळवील आणि वाचाळ असेल.

**रवि तिसरे भावांत** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर तो मनुष्य बुद्धिवान् असतो व त्यास बंधुसुख असतें. नौकर पदरीं असतात. वृषभ, तूळ राशीचा रवि असेल तर बंधुसुख लाभणार नाहीं, व नौकररहित राहील. कर्क राशीचा रवि असेल तर बंधुसुख लाभेल, व व्यापारधंदा चांगला चालेल, आणि कीर्तिमान् असेल. मिथुन किंवा कन्येचा असेल तर शूर, बुद्धिवान्, असून बंधु थोडे असतील. मेष आणि वृश्चिक राशीचा रवि असेल तर बंधु होणार नाहींत; झाले तरी त्यांपासून सुख लाभणार नाहीं. धन किंवा मीन राशीचा रवि असेल तर बंधूंबरोबर स्नेह राहील, पण नौकर वाईट मिळतील. मकर, कुंभ राशीचा रवि असेल तर बंधुनाश होईल. नौकर वाईट मिळतील, आणि नास्तिक असेल.

**रवि चवथे भावांत** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर वाहनसुख, वैभव, मातापित्यांचें सुख लाभेल. भाग्यशाली



होईल. वृषभ किंवा तूळराशीचा असेल तर मातापित्यां-पासून सुख लाभणार नाहीं. जनावरापासून घात होईल. मिथुन, कन्या राशीचा असेल तर मातापिता सुखी, वैभव-युक्त, मस्तकरोगी, अहंकारी, आणि गुप्तरोगी असतो. कर्कराशीचा असेल तर जमीनजुमल्याचें सुख लाभतें. मेष, वृश्चिक राशीचा असेल तर मित्रापासून सुख, अग्नी-पासून भय असून, तो अहंकारी असेल. धन, मीन राशींत रवि असेल तर मित्र बहुत होतील, परंतु ते हानिकारक होतील. मकर आणि कुंभ राशीचा रवि असेल तर शरी-रास पीडा होईल. अहंकारी, विरोधी मनुष्य असतो. त्याचें शरीर तप्त असून इंद्रियांस पीडा असते.

**रवि पांचवे भावांत** सिंह किंवा मेष राशीचा असेल तर सुखी जाणावा. बुद्धि, विद्या, संतान, मंत्र, विवेक, नीती यांत निपुण असतो. वृषभ किंवा तूळ राशीचा रवि असेल तर पुत्ररहित, भ्रमी, क्रोधी, अल्प विद्येचा मनुष्य असतो. मिथुन किंवा कन्या राशीचा रवि असेल तर मंदबुद्धीचा असतो आणि त्याचा पुत्राबरोबर कलह होतो. कर्करा-शीचा रवि असेल तर चंचलबुद्धीचा, कन्यासंतती अस-णारा मनुष्य असतो. मेष आणि वृश्चिक राशीचा रवि असेल तर संतती आज्ञाधारक नसते परंतु पराक्रमी असते. मकर कुंभ राशींत रवि असेल तर एक किंवा दोन पुत्र होतील. चंचलबुद्धीचा असून आणि पुत्राबरोबर तंटे होतील. म्लेंच्छ विद्येचा अभ्यास करून धनप्राप्ती होईल. मीन आणि धन राशीचा रवि असेल तर पुत्ररहित, ज्ञानी, निष्कपटी, आणि पुण्यवान् असतो.

**रवि साहवे भावांत** सिंह किंवा मेष राशीचा असेल तर मातुलपक्षाकडून सुख मिळेल; त्याचप्रमाणें रोग व शत्रु यांचा नाश होईल. वृषभ आणि तूळ राशीचा असेल तर रोग आणि शत्रु यांची वृद्धि होते. मातुलपक्षाकडून सुख लाभत नाहीं. मिथून आणि कन्या राशींत रवि असेल तर शत्रुनाश करील पण त्याला कफाची व्यथा होईल. कर्क राशीचा रवि असेल तर दमा होईल. धन आणि मीन ह्या राशींत रवि असेल तर शत्रुनाश होईल, मातुलपक्षाकडून सुख लभेल, स्वभावानें शांत राहील, शरीरसुख आणि वैभव चांगलें राहील. मकर, कुंभ राशीचा रवि असेल तर रोग आणि शत्रु यांची वृद्धि होईल. मातुलपक्षाचें सौख्य लभेल. मेष आणि वृश्चिक राशीचा रवि असेल तर रोग आणि शत्रु होणार नाहींत; परंतु मातुलसुख लाभणार नाहीं.

**रवि सातवे भावांत** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर स्त्रीसुख चांगलें लाभेल. अन्य देशांतून लाभ प्राप्त होईल, व्यापारांत सुख लागेल. वृषभ किंवा तूळेचा रवि असेल तर स्त्री दीर्घायु मिळेल, पण स्वतः व्यभिचारी असेल, स्वस्त्रीबरोबर प्रेम ठेवणार नाहीं. मेष किंवा वृश्चिक राशीचा रवि असेल तर दोन स्त्रिया होतील, व प्रवासी होईल. मिथुन आणि कन्या राशीचा रवि असेल तर अभक्ष्य भक्ष्य करील, हलके प्रतीचें अन्न खाईल; परंतु आनंदी राहील. कर्कराशीचा रवि असेल तर मानसिक चिंता, व शरीरास व्याधि होतील. मकर, कुंभेचा असेल, तर स्त्रीसुखाचा नाश होईल, व प्रवासांत भय उत्पन्न होईल. व्यापारांत दुःख होईल. धन आणि मीन राशीचा रवि असेल तर व्यापारासंबंधानें सर्व प्रकारची माहिती त्यास मिळेल.

**रवि आठवे भावांत** स्वगृहींचा, किंवा उच्च असेल तर तो मनुष्य बहुत वर्षे जगेल, त्याचें वैभव चांगलें वाढेल. वृषभ आणि तूळराशीचा असेल तर त्यास पुत्र, किंवा द्रव्य प्राप्ति होणार नाहीं. मेष वृश्चिक राशीचा रवि असेल तर नेत्रास विकार होईल. उष्णतेचे विकार होतील, त्यास पशूचें सुख लाभणार नाहीं. मिथुन कन्या राशीचा असेल तर त्यास रोग होईल. धन मीन राशीचा असेल तर त्याचे शरीरास नेहमीं रोग होतील आणि धन प्राप्ति चांगली होणार नाहीं. मकर कुंभ राशींत असेल तर आयुष्य थोडेंच आहे असें समजावें, व तो दरिद्री जाणावा. कर्केचा रवि अष्टम स्थानीं असेल तर नेत्रास विकार होईल.

**सूर्य नवम भावीं** स्वगृहींचा, किंवा उच्च असेल तर जन्मणारा पुण्यवान्, धनवान्, संतानसुखी असतो. वृषभ आणि तूळ राशीचा असेल तर अल्पभाग्यवान समजावा. मिथुन आणि कन्या राशीचा असेल तर संतानस्त्रीसुख मिळेल. धन आणि मीन राशीचा असेल तर आईबापांचें सुख लभेल, प्रवासी होईल आणि त्यांत त्यास फायदा होईल. मकर आणि कुंभ राशीचा असेल तर अल्पभाग्यवान व नास्तिक जाणावा. मेष आणि वृश्चिक राशीचा असेल तर पापबुद्धीचा, पापकर्मे करणारा जाणावा. कर्क राशीचा असेल तर भाग्यवान आणि देशांतरावर गमन करणारा होतो.

**सूर्य दशम भावीं** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर त्यास राजदरबारांत सुखप्राप्ति होईल. त्यास पित्याचें सुख

लाभेल. वृषभ आणि तूळ राशीचा रवि असेल तर पित्याचें सुख थोडें लाभेल, राजदरबारीं अपयश मिळेल आणि अपकीर्ति होईल. कर्क राशीचा असेल तर कीर्तिमान होईल. मिथुन आणि कन्या राशीचा असेल तर राजसुखी होईल. धन आणि मीन राशीचा असेल तर राजसुख मिळेल आणि राजकीय कामांत तो कुशल असेल. मेष वृश्चिक राशीचा असेल तर कीर्तिमान आणि शूर असतो. मकर कुंभ राशीचा असेल तर राजदरबारीं अपेशी, व्यापारांत अपेशी आणि आईबापाचें अल्प सुख भोगणारा असा मनुष्य असतो.

**सूर्य एकादश भावीं** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर अनेकप्रकारांनीं लाभ प्राप्त होईल. वृषभ आणि तूळ राशीचा असेल तर दरिद्री होईल, संतानाचा द्वेष करील. कुंभराशीचा असेल तर नीच मनुष्यापासून नुकसान होईल आणि पुत्र मूर्ख होतील. मेष-वृश्चिक राशीचा असेल तर संतानाचा रोध करील. त्याची बुद्धि वाईट असेल, त्यास द्रव्याचा फायदा होईल. धन आणि मीन राशीचा असेल तर बुद्धिवान आणि संततीयुक्त होईल, अनेक प्रकारांनीं त्यास लाभ होतील. कर्क राशीचा असेल तर त्यास संतान सुख आणि वस्त्रलाभ होईल. मिथुन आणि कन्या राशीचा असेल तर यशस्वी आणि धनवान् जाणावा.

**सूर्य द्वादशस्थानीं** स्वराशीचा किंवा उच्च असेल तर तो मनुष्य पुण्यवान असतो आणि चांगलीं कामें करतो, पण स्वतः तो फार कंजूष असतो. वृषभ आणि तूळ राशीचा असेल तर तो पापी होतो. मकर आणि कुंभ राशीचा असेल तर पापकर्मांत तो द्रव्य खर्चील, व तो रोगी



असेल. मेष आणि तूळ राशीचा असेल तर तो ज्ञातिभ्रष्ट होईल, हिंसक बनेल, व अन्य देशांत वास करील. मिथून आणि कन्या राशीचा असेल तर अल्प धनवान आणि अल्पसुखी असेल. धन आणि मीन राशीचा असेल तर आपले द्रव्याचा विनियोग चांगले कृत्यांत करील, त्याजवळ धन थोडें राहील, आणि संसारसुख त्यास थोडेंच लाभेल. कर्क राशीचा असेल तर तो योग्य कामांत धनाचा व्यय करील.

## चंद्र द्वादश राशिस्थ फलें.

**चंद्र प्रथम भावीं** स्वराशीचा किंवा उच्च असेल तर शरीर सुंदर असून, निरोगी राहील. तो मनुष्य चंचल राहील आणि विद्वान होईल. मेष आणि वृश्चिक राशीचा असेल तर दरिद्री जाणावा. वृषभ किंवा तूळ राशीचा असेल तर त्याचे हाडास रोग होईल, मिथुन आणि कन्या राशीचा असेल तर धनवान, सुखी राहील, स्वकुळांत श्रेष्ठ आणि राजदरबारांत अधिकारी होईल आणि तो गोड भाषण करणारा असतो. धन आणि मीन राशीचा असेल तर बुद्धिवान जाणावा. मकर आणि कुंभ राशीचा असेल तर शरीर कुरूप, सदा रोगी असेल. सिंह राशीचा असेल तर नेत्ररोगी होतो.

**चंद्र द्वितीय भावीं** स्वराशीचा किंवा उच्च असेल, अथवा बलवान असेल, तर धन, कुटुंब त्यास चांगलें मिळतें. त्याची भाषण करण्याची वाणी मृदू असते ह्मणजे तो कठोर भाषण करीत नाहीं. मेष वृश्चिक राशीचा असेल तर अथवा क्षीण चंद्र असेल तर दरिद्री आणि कुटुंबक्लेशी असतो. मिथुन आणि कन्या

राशीचा असेल तर बुद्धिवान, वैभवयुक्त, व सुखी असतो. धन आणि मीन राशीचा असेल तर मृदुभाषण करणारा, वाचाळ आणि प्रतापी असतो. मकर आणि कुंभ राशीचा असेल तर असंतोषी जाणावा. सिंह राशीचा असेल तर तोतरा बोलतो आणि त्यास दम्याची व्यथा होते. वृषभ आणि तूळ राशीचा असेल तर धनवान आणि बहु कुटुंबांचा पोशिंदा होतो.

**चंद्र तिसरे भावांत** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर तो मनुष्य पराक्रमी, उद्यमधंदा करणारा आणि बंधुसुखी असतो. मेष किंवा वृश्चिक राशींचा असेल तर आळशी, निरुद्योगी, बंधुविहित असतो. मिथुन व कन्या राशींचा असेल तर त्याचे शरीरांत वायूचा विकार होईल. धन-कन्यादिकांची प्राप्ति होते. वृषभ आणि तूळ राशीचा असेल तर साधारण पराक्रमी आणि उद्यम करणारा होतो. सिंह राशीचा असेल तर चहाडखोर असतो. त्यास राजदंड होतो. धन आणि मीन राशींचा असेल तर त्यास धन आणि पशु यांची प्राप्ति होते, व बुद्धि चांगली असून बंधुसुख चांगलें मिळतें. मकर आणि कुंभ राशींत असेल तर बंधुसुख थोडें लाभतें परंतु तो मनुष्य पराक्रमी आणि उद्यमी, भाग्यवान आणि पुण्यवान होतो.

**चंद्र चवथे भावांत** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर त्यास आईचें सुख, घरदार, शेतवाडी, मित्र, आणि वाहनसुख चांगलें मिळतें. मेष आणि वृश्चिक राशींचा असेल तर शरीरास व्याधि होऊन, मातृसुख थोडें मिळतें. मित्र आणि पशु यांपासून लाभ थोडा होतो आणि शरीरास



एक प्रकारची व्याधि असते. वृषभ आणि तूळ राशींतील असेल तर आईस व्याधि होईल. मिथुन आणि कन्या राशींतील असेल तर द्वितीय-स्त्रीलाभ होतो. धन आणि मीन राशींतील असल्यास मिष्टान्नभोजन मिळतें व अनेक प्रकारचें वैभव मिळतें. मकर आणि कुंभ राशींचा असेल तर परस्त्रीरत होईल. त्यास आईबापांचें सुख लाभेल. घरदार, जमीनजुमला, पशु, वाहन इत्यादिकांचा लाभ होईल. मित्र आणि वैभवयुक्त होईल. सिंह राशींतील असेल तर आई आणि स्वतां रोगी असतो.

**चंद्र पंचम भावांत** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर कन्यासंतती होते. स्त्री रूपवान असते. बुद्धि चांगली असते. विद्या, धन यांचा लाभ होतो. मेष आणि वृश्चिक राशींत असेल तर मंद बुद्धीचा, अविद्वान, व संतानरोधी, असून त्यास कन्या संतती होते. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर मोठे कष्टानें निर्वाह करील, परंतु तो विद्वान चांगला असतो. मिथुन आणि कन्या राशींचा असेल तर मुलाचें सुख लाभेल परंतु तो मुलगा आज्ञाधारक निघणार नाहीं. धन आणि मीन राशींचा असेल तर त्यास धनप्राप्ति, पुत्रप्राप्ति, वैभवप्राप्ति होईल. मकर आणि कुंभ राशींतील असेल तर मंदमती, नीच कामें करणारा आणि बुद्धीचा व्यय नीच कर्मांकडे करणारा होतो. सिंह राशीचा असेल तर त्यास राजविद्या आणि पुत्रप्राप्ति होते.

**चंद्र सहावे भावांत** स्वगृहींचा किंवा उच्च असेल तर त्यास मातुलसुख चांगलें लाभेल. रोग आणि शत्रु यांचा नाश होईल. मेष आणि वृश्चिक राशींचा असेल

तर त्यास नेहमीं रोग आणि शत्रुभय होईल. मातुलसुख कमी लागेल. दरिद्री असेल. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर विधवा स्त्रीबरोबर संभोग करील. पापकर्में करील. मिथुन आणि कन्या राशींचा असेल तर अघोर पापकर्में करील. धन आणि मीन राशींचा असेल तर रोग आणि शत्रु यांकडून त्रास होईल, आणि मातुल पक्षाकडून सुख लागणार नाहीं. मकर आणि कुंभ राशींचा असेल तर रोग आणि शत्रु यांचा नाश होईल. मस्तक मोठें तेजदार असतें. भाग्यवान व वैभवयुक्त असतो. मातुलसुख चांगलें लाभतें. चांगले रीतीनें वर्तन करतो. स्वज्ञातीबरोबर स्नेह ठेवतो. सिंह राशीचा असेल तर नेहमीं रोगी असतो.

**चंद्र सातवे भावांत** स्वराशीचा किंवा उच्च असेल तर मृदुभाषण करितो. स्त्रीसुख, प्रवाससुख, आणि व्यापारांत सुख मिळतें. मेष वृश्चिक राशीचा असेल तर त्याचें शरीर स्थूळ असते, आणि त्याची बायको व्यभिचारिणी असते, त्या मनुष्यास घरची व्यवस्था चांगली पाहतां येते, विचारी असतो आणि अन्य देशांत वास करितो. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर स्त्रीलंपट असतो. मिथुन आणि कन्या राशींचा असेल तर स्त्रीबरोबर बेबनाव होतो. धन आणि मीन राशीचा असेल तर राजवैभव, सुखप्राप्ति होते. मकर आणि कुंभ राशींचा असेल तर स्त्री कुमार्गी मिळते. सिंह राशीचा असेल तर स्त्रीपुरुषांमध्यें तंटे होतील.

**चंद्र आठवे भावांत** स्वगृहीचा किंवा उच्च असेल तर तो मनुष्य फार वर्षें जगतो, त्याचें शरीर निरोगी



असतें त्याची प्रीति देवावर असते आणि तो पुण्यकर्में करितो. मेष व वृश्चिक राशींचा असेल तर तो अल्पायू असतो, शरीर कृश असतें आणि पापकर्में करितो. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर अल्पायू जाणावा. मिथुन व कन्या राशीचा असेल तर उदर आणि दम्याची व्यथा होते. सिंह राशींचा असेल तर त्यास बाल्यावस्थेमध्यें क्लेश व त्रास होतील. धन आणि मीन राशींचा असेल त्यास सुख मध्यम प्रकारचें लाभतें आणि मध्यमायू असतो. मकर आणि कुंभ राशींचा असेल तर शरीरास क्लेश होतील आणि दरिद्री असतो.

**चंद्र नवम भावांत** स्वराशीचा किंवा उच्च असेल तर पुण्यवान, तेजस्वी, तीर्थयात्रा करणारा, अनेक शास्त्रें जाणणारा, घरदार, जमीनजुमला बाळगणारा असून त्यास पुत्रसंतती होते व भाग्यवान होतो. मेष वृश्चिक राशींचा असेल तर पापकर्में करणारा, कपटी आणि व्यभिचारी असतो. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर भाग्यवान असतो. मिथुन आणि कन्या राशींचा असेल तर पित्याचें सुख जास्त लाभेल. ( नवमस्थानावर कांहीं ग्रंथकार बापाचा विचार करतात. ) सिंह राशीचा असेल तर अल्पकाळांत पिता मरतो. धन व मीन राशींतील असेल तर नशीबवान व पुण्यवान असतो, अन्य देशांत धन मिळवितो, मकर व कुंभ राशींतील असेल तर कपटी, पापकर्में करणारा, क्रोधी आणि अल्पभागी असतो.

**चंद्र दहावे भावांत** स्वराशीचा किंवा उच्च असेल तर राजदरबारचा लाभ मिळतो, बापाचें सुख लाभतें, मान, कीर्ति व व्यापार यांत यशस्वी असतो, आणि तो

सत्कार्यें करितो. मेष व वृश्चिक राशींचा असेल तर बापाचें सुख कमी, व व्यापारांत नुकसान होऊन, राजभय प्राप्त होतें; परंतु बुद्धिमान असतो. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर, कीर्ति आणि यश मिळतें. धन व मीन राशींतील असेल तर दयावंत असतो. मकर कुंभ राशींतील असेल तर पापकर्में करणारा, राजभय पाळणारा, आणि पित्याचें अल्प सुख भोगणारा असा असतो.

**चंद्र आकरावे भावांत** स्वराशीचा किंवा उच्च असेल तर अनेक शास्त्रें जाणणारा व हरएक प्रकारानें द्रव्य मिळवणारा मनुष्य होतो, धनधान्य, वस्त्रप्रावर्ण, बुद्धि, संततीयुक्त असून परोपकारी असतो. मेष व वृश्चिक राशींतील असेल तर दरिद्री, मूर्ख, संतानरहित अथवा संततींत कन्यासंतती जास्त होते. वृषभ आणि तूळ राशींतील असेल तर तो गुणवान आणि धनवान असतो. मिथुन आणि कन्या राशींतील असेल तर त्यास अनेक प्रकारांनीं लाभ होतील. सिंह राशींतील असेल तर अथवा क्षीण चंद्र असेल तर त्यास पुत्रापासून कर्ज होईल, आणि प्राप्तीपेक्षां खर्च जास्त करील. धन आणि मीन राशींतील असेल तर अथवा चंद्रकलावृद्धिंगत असेल तर, ह्मणजे पौर्णिमेजवळ येत असेल तर, त्यास जमिनी-पासून धनप्राप्ति होईल. मकर व कुंभ राशींतील असेल तर त्यास अपयश प्राप्त होईल व तो खर्चिक निघेल.

**चंद्र बारावे भावांत** स्वराशीचा, किंवा उच्च असेल तर शरीर निरोगी, फार वर्षें वाचणारा आणि चांगल्या कामांत पैसे खर्च करणारा होतो. मेष व वृश्चिक राशींचा असेल तर कदान्नें खातो. आणि वाईट मार्गांनीं पैशाचा



व्यय करतो. त्यास लहान वयांत पुष्कळ दुःखें सोसावीं लागतात. आणि तो रोगी असतो. वृषभ आणि तूळ राशींतील असेल तर क्रोधी, व्यसनी, व संसारांत दुःखी असतो. मिथुन व कन्या राशींतील असेल तर सर्व प्रका-रचे समृद्धीनें युक्त असतो. परंतु दुःख भोगतो. सिंह राशींतील असेल तर तो आपल्या जातींत श्रेष्ठ असतो. धन आणि मीन राशीचा असेल तर त्याची आई सदा रोगी असते. मकर आणि कुंभ राशींतील असेल तर तो सदा रोगी असून त्यास द्रव्य व वैभव यांचें सुख लाभत नाहीं.

## मंगळ द्वादश राशिस्थ फलें.

**मंगळ तनुस्थानांत**—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास जन्मणारा मनुष्य निरोगी आणि मजबूत होईल, त्यास राजकीय कामांत मान मिळून त्याची कीर्ति वाढेल, व तो पुष्कळ वर्षें जगेल. कर्केचा असल्यास उष्णतेनें फोड येऊन अंगावर पुष्कळ व्रण राहतील, व तो चोरी कर-णारा होईल. हाताचे पंजे नेहमीं लाल असून तो मनुष्य रागीट होईल. मिथुन किंवा कन्या राशीचा असल्यास मूर्ख आणि क्रोधी होईल. वृषभेचा किंवा तूळेचा अस-ल्यास नाभी मोठी होईल, बळवान आणि शूर होईल. सिंहेचा असल्यास स्वभावानें चंचळ आणि धनवान होईल, चित्रकलेंत निपुण होईल पण ठकबाजी करील. धनेचा किंवा मीनेचा असल्यास विद्वान आणि धनवान होईल. कुंभेचा असल्यास फार वर्षें जगणार नाहीं व संतती कमी होईल; वायू, शूळ आणि गरमीचा रोग होईल; तसेंच कुरूप होईल.

**मंगळ धनस्थानांत**–मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास विद्वान. वाचाळ धनवान आणि मोठें कुटुंबवान होईल. कर्केचा असल्यास नेत्ररोगी, निर्धन आणि कुटुंब विरहित होईल, शरीरानें रोगी आणि पापकर्में करणारा होईल. मिथुन किंवा कन्या राशींचा असल्यास नेत्ररोगी, पुष्कळ धन खर्चून दुःखी होईल. कुटुंबापासून दुःख होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास कुटुंबापासून आणि द्रव्यापासून सुख भोगील. वस्त्र आणि दागिने मिळवील, संपत्ति मिळवील आणि दागिने, घर किंवा चांगलीं कामें करण्यांत पैसा खर्च करील, अभक्षाभक्ष करील आणि कधीं कधीं कुटुंबामध्यें तंटाभांडण करील. सिंहेचा असल्यास नेत्ररोगी आणि गुप्त इंद्रियरोगी होईल, वैभव वाढेल आणि पुष्कळ खर्च करणारा होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास राजकीय कामांत धन मिळवील, प्रवास करील आणि दुसऱ्याचा मतलब काढून घेणारा होईल. कुंभेचा असल्यास धन आणि कुटुंबविरहित असून दुःखी होईल.

**मंगळ सहजस्थानीं** मेष वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास तो मोठा पराक्रमी होईल, उद्योगी होईल, आणि त्यास बहीणभाऊ पुष्कळ असून त्यांपासून सुख होईल. कर्केचा असल्यास भावंडें पुष्कळ होतील, पण त्यांचें परस्पर जमणार नाहीं, दास चाकर ठेवील आणि चांगला उद्योग करील पण त्याची स्त्री जारिणी होईल. मिथुन किंवा कन्येचा असल्यास भावंडांशीं शत्रुत्व होईल आणि स्वधर्मावर अप्रीति करील. वृषभ किंवा तूळेचा असल्यास भावंडें असणार नाहींत पण मोठा पराक्रमी होईल. सिंहेचा असल्यास एखादें भावंड असेल पण त्याच्याशीं वांकडें राहील. धनेचा किंवा मीनेचा असल्यास चांगलीं कामें करणारा होईल. कुंभेचा असल्यास अपराक्रमी व निरुद्योगी असेल. पापकर्म करणारा आणि स्वधर्मनास्तिक होईल, भावंडें जिवंत राहणार नाहींत किंवा होणार नाहींत.



**मंगळ सुहृत्स्थानीं**–मेष, वृश्चिक आणि मकरेचा असल्यास आईचें सुख लाभेल, घर शेतवाडीचें वैभव मिळेल, पशु आणि वाहनाचा सुखी असेल, जाग्याचा लाभ होईल. कर्केचा असल्यास आईचें सुख लाभणार नाहीं, घर, जागा असणार नाहीं, मित्रांशीं विरोध करणारा, निर्धन आणि पशुविरहित असा होईल. मिथुन किंवा कन्येचा असल्यास घरांत तंटा भांडण करणारा होईल. आईबापाचें सुख लाभणार नाहीं. आणि दुसऱ्याचे घरीं त्यास राहणें भाग पडेल. वृषभ किंवा तूळेचा असल्यास आई रोगी होईल किंवा आईला पीडा करील. वाहनापासून भीति किंवा वाहनापासून घात होईल. सिंहेचा असल्यास जमीनजुमलाविरहितहि होईल आणि मित्राशीं विरोध करील. धनेचा किंवा मीनेचा असल्यास धनधान्यापासून सुख लाभेल, मित्र आणि वाहनापासून सुख होईल. कुंभेचा असल्यास स्थानभ्रष्ट, मित्रांनीं सोडलेला असेल. बाप आणि बायकोचें थोडें सुख लाभेल ह्मणजे त्याचा थोड्या मुदतींत नाश होईल. पुष्कळ माणसांशीं आणि भावांशीं द्वेष करील. परदेशांत राहणारा असून, धन आणि वस्त्र यांचें सुख त्यास लाभणार नाहीं.

**मंगळ सुतस्थानीं**—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास सूक्ष्मविचार करणारा, तामसी, विद्वान् होईल, संततीपासून उत्तम सुख होईल, अनेक रीतीनें पैसा मिळविणारा होईल, वस्त्र आणि दागिन्याचा सुखी होईल. कर्केचा असल्यास बुद्धिहीन, संतानहीन आणि धनहीन होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास कुकर्म करण्याची बुद्धि होईल, वाईट छंदांत पडून राजाचा कोप होईल, शरीरावर शस्त्राचे घाव पडतील. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास तामसबुद्धीचा, रागीट, पापबुद्धीचा होईल. सिंहेचा असल्यास एकच मुलगा होईल आणि तो राजविद्या शिकणारा होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास राजविद्येंत निपुण, सूक्ष्मविचार करणारा, सदाचारी, तामसी होईल, संतानापासून सुख लाभणार नाहीं. कुंभेचा असल्यास मुलें जगणार नाहींत, परंतु शेवटीं एखाद्या मुलाचें सुख लाभेल; मंदबुद्धि आणि थोडें बोलणारा, स्वभावानें गंभीर आणि अल्प विद्वान असा होईल.

**मंगळ रिपुस्थानीं**—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास मातुलपक्षाच्या सुखाचा नाश करील. कर्केचा असल्यास रोग आणि शत्रु फार होतील, व मातुलपक्षाला सुख होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास आंगावर कोड उठेल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास स्त्रीच्या आंगावर कोड उठेल, व मातुलपक्षाचें सुख लाभणार नाहीं. सिंहेचा असल्यास सार्वजनिक काम करून कीर्ति मिळवील आणि संतानाचें थोडें सुख लाभेल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास शत्रूंना जिंकणारा होईल.



संतानापासून सुख लाभेल आणि वैभवाचें सुख होईल. रोग, शत्रु यांची भीति होईल.

**मंगळ जायास्थानीं**—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास स्त्रीचें सुख लाभेल, मार्गांत लाभ होईल, व्यापारापासून सुख होईल, देण्याघेण्यांत चतुरपणा राहील. कर्केचा असल्यास बायका दोन किंवा जास्त होतील तरी बायकोचें सुख लाभणार नाहीं, व प्रवास भीतिकारक होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास बायका दोन होतील आणि त्या रोगी होतील किंवा नाश पावतील. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास परदेशांत राहील. सिंहेचा असल्यास स्त्री चोर किंवा व्यभिचारिणी होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास भगचुंबन करणारा आणि मुष्टिमैथुन करणारा होईल. कुंभेचा असल्यास पशुमैथुनी, दारूबाज आणि अभिमानी होईल.

**मंगळ मृत्युस्थानीं**—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास पूर्णायुषी आणि निरोगी होईल. कर्केचा असल्यास अल्पायुषी आणि रोगी होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास बापास कष्ट होतील, एखादें मूल होईल आणि गुप्त रोग होईल. वृषभ किंवा तूळेचा असल्यास स्त्रीचें सुख लाभणार नाहीं. व्यापारांत नुकसान सोसावें लागेल. सिंहेचा असल्यास नेत्ररोगी अल्पायुषी आणि मूत्रकृच्छ्र रोगी होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्याम व्यापाराच्या कामांत कुशळ होईल, राजाकडून वैभव मिळेल, शरीराचा शुष्क किंवा दुर्बळ असेल आणि उंच वाढेल. कुंभेचा असल्यास बायको रागीट असेल आणि त्याचें व त्याचे बायकोचें आयुष्य अल्प असेल.

मंगळ धर्मस्थानीं—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास भाग्यशाली, पुण्यशाली, पुत्रवान्, परदेशांत लाभ पावणारा, स्वधर्मावर प्रीति करणारा आणि महंतलोकांची सेवा करणारा होईल. कर्केचा असल्यास नास्तिक, दुर्भागी, पुत्रविरहित, व परदेशांत दुःख पावणारा होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास नास्तिक होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास बापाचें थोडें आयुष्य असेल किंवा बापावर संकटें येतील, कमनशिबी आणि गुरूच्या स्त्रीशीं व्यभिचार करणारा होईल. सिंहेचा असल्यास भावंडें होणार नाहींत. धनेचा किंवा मीनेचा असल्यास तीर्थाटण करणारा होईल. कुंभेचा असल्यास नास्तिक होईल.

मंगळ कर्मस्थानीं—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास राजकीय कामांत पुष्कळ फायदा होईल, बापाचें सुख लाभेल, व्यापारांत फायदा होईल, कीर्तिवान् होईल, आणि चांगलीं कामें करणारा होईल. कर्केचा असल्यास राजभय होऊन बापाचें सुख लाभणार नाहीं, व्यापारांत हानी होईल, आणि अपयशास पात्र होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास बापास पीडा करील आणि भावंडांपासून सुख लाभणार नाहीं. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास पराक्रमी आणि बापाचा फार लाडका होईल. सिंहेचा असल्यास भाग्यशाली, व गुणवान् होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास स्वधर्मीं रत होईल. कुंभेचा असल्यास कपटी आणि कावेबाज होईल.

मंगळ आयस्थानीं—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास अनेक रीतीनें लाभ होईल, वस्त्र आणि दागिन्यांचें सुख लाभेल, बुद्धि आणि संतानाचें सुख होईल. कर्केचा असल्यास लाभ न होतां उलट तोटा होईल, मूर्ख आणि पुत्रसुखविरहित असेल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास मूर्ख होईल आणि संतानाचें सुख लाभणार नाहीं. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास पुष्कळ काम करणारा, धनवान् आणि गुणवान् होईल. सिंहेचा असल्यास कीर्तिमान्, धनवान् आणि राजकीय कामांत सुखी होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास राजकीय कामांत सुखी आणि धनवान् होईल. कुंभेचा असल्यास धन मिळेल आणि धन जाईल.

मंगळ व्ययस्थानीं—मेष, वृश्चिक किंवा मकरेचा असल्यास कृपण, थोडा खर्च करणारा आणि चांगल्या मार्गानें चालणारा होईल. कर्केचा असल्यास वाईट कामीं पैसा खर्च करणारा होईल. अग्नीपासून आणि चोरांपासून हानी होईल. शरीरावर शस्त्रघाव लागतील. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास अभिमानी आणि दरिद्री होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास लोभी आणि दरिद्री होईल. सिंहेचा असल्यास राजदंड होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास फार खर्च करणारा आणि पुष्कळ माणसांबरोबर द्वेष करणारा होईल. कुंभेचा असल्यास भीक मागून गुजराण करील.

बुध तनुस्थानांत—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास शरीरास सुख चांगलें लाभेल. सुस्वभावी, दीर्घायुषी, आस्तिक, विद्वान् आणि भाग्यशाली होईल. कर्केचा असल्यास तीर्थ आणि जलाशयाचा लाभ होईल. पित्त आणि पंडुरोग होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास गोड बोलणारा, विद्वान्, क्षमावान्, आणि

दयावान् होईल. सिंहेचा असल्यास सुवर्णमयकांती होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास विद्वान्, पुष्कळ शास्त्रें जाणणारा, बहुश्रुत, ज्योतिर्विद्येंत चतुर, मंत्र तंत्र विद्येची आवड असणारा, गोडबोल्या आणि सुंदर वेषी आणि रूपवान् होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास शरीरसुख लाभणार नाहीं, व नास्तिक आणि मूर्ख होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास शरीरांत खोड असणारा, चांगल्या माणसांचा द्वेष करणारा, नेत्ररोगी आणि ठकबाजी करणारा असा होईल.

**बुध धनस्थानांत**—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास धन आणि कुटुंबाचें सुख लभेल, वाचाळ होईल, डोळे मोठे असतील, पुष्कळ पुत्र होतील, स्वधर्मावर प्रीति करील, गोड बोलणारा, चिंतित काम करणारा, धनवान्, गुणवान्, आणि वैभववान् होईल. कर्केचा असल्यास वायूपासून पीडा होईल व मस्करी करणारा असा होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास चांगलें लिहिणारा, गणितज्ञ आणि कवि होईल. सिंहेचा असल्यास उत्पाती, तामसी, चंचळ बुद्धीचा, साहसी आणि दीर्घायुषी होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास वाचाळ, विद्वान् आणि धनवान् होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास निर्धन आणि कुटुंबाशीं तंटा करणारा असा होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास थोडें बोलणारा आणि मध्यमायुषी होईल.

**बुध सहजस्थानांत**—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास पराक्रमी होईल, भावंडांचें सुख लभेल, व चांगलीं कामें करणारा होईल. कर्केचा असल्यास धैर्यवान् होईल.



वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास धनवान् आणि धर्मावर आस्था बाळगणारा होईल. सिंहेचा असल्यास भावंडांशीं वांकडें राहील. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास भावंडांचें सुख लाभेल आणि उत्तम गुणवान् होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास भावंडांचें सुख लाभेल, निरुद्योगी आणि पराक्रमहीन होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास भितरा, मध्यमायुषी होईल आणि भावंडांचें मध्यम सुख लाभेल.

**बुध सुहृत्स्थानांत**—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास आईचें सुख लभेल; घर, जागा, मित्र आणि पशु यांपासून सुख होईल व जमीनदार होईल. कर्केचा असल्यास आईचा द्वेष करणारा आणि अज्ञानी होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास बापाचें सुख लाभेल. सिंहेचा असल्यास व्यापारांत सुख होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास हातानें झटपट काम करणारा होईल, व डोळे मोठे आणि तेजस्वी असतील. धनेचा किंवा मीनेचा असल्यास आईचें सुख लाभणार नाहीं. घर, जमिन जुमला आणि मित्र विरहित असेल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास वाहनाचें सुख लाभेल, पण त्यापासून घात होईल, जमीन जुमला विकणारा, मित्रांशीं तंटा करणारा आणि कपटी असा होईल.

**बुध सुतस्थानांत**—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास बुद्धि आणि संतान यांपासून सुख होईल. कर्केचा असल्यास दत्तक पुत्र घेईल आणि पुत्राचा द्वेष करील. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास बुद्धिवान् होईल आणि संतानापासून सुख होईल. सिंहेचा असल्यास पाप-

बुद्धीचा होईल व मंत्र तंत्र शिकेल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास अभिमानी, पुत्रांचे सुख कमी आणि बुद्धिवान होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास मूर्ख आणि संतानविरहित होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास एखादा मुलगा होईल, चांगल्या मस्तकाचा वैभववाला, राजविद्या मध्यम जाणणारा, साहसी बुद्धिवान आणि परदेशांत राहणारा होईल.

**बुध रिपुस्थानांत**—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास, रोग आणि शत्रु यांचा नाश होईल. मातुलपक्षाचें सुख लाभेल. कर्केचा असल्यास खोकला आणि दम्याचा रोग होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास राजाशीं मैत्री करील, लिहिणारा आणि गणित करणारा असा होईल. सिंहेचा असल्यास मातुलपक्षाचें सुख लाभणार नाहीं. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास राज्यामध्यें मुख्य होईल पण विद्येंत विघ्न येईल; अभिमानी, व वादविवाद करणारा आणि शूर होईल. धनेचा किंवा मीनेचा निर्बळ असल्यास रोग आणि शत्रु नाहींसे होतील, मातुलपक्षाचें सुख लाभेल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास स्वज्ञातीचा द्वेष करणारा असून त्यास प्रबल शत्रू फार होतील.

**बुध जायास्थानांत**—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास, चांगली सुंदर स्त्री मिळेल, व्यापारांत सुख होईल. रस्त्यांत लाभ होईल, घेण्यादेण्यांत कुशल होईल. कर्केचा असल्यास स्त्रीचा द्वेष करणारा असून त्यास व्यापारांत नुकसान होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास उदार आणि कीर्तिमान् होईल. सिंहेचा असल्यास राजापासून मान मिळेल पण त्याची स्त्री खराब असेल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास आईचें सुख लाभेल, गाडी, घोडे ठेवील आणि धर्मात्मा होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास स्त्रीचें सुख लाभणार नाहीं. प्रवासांत भीति होईल, व्यापारांत आणि देण्याघेण्यांत नुकसान होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास अभक्षाभक्ष करणारा असून त्याची बायको कुरूप असेल.



**बुध मृत्युस्थानांत**—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास पूर्णायुषी होईल व शरीरसुख चांगलें लाभेल. कर्केचा असल्यास पोटफुगीचा रोग आणि अल्पायुषी होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास कीर्तिमान् आणि धनवान् होईल. सिंहेचा असल्यास कमनशिबी जाणावा. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास पूर्णायुषी, शेतवाडीचा मालक होईल आणि त्यास संतानापासून सुख होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास अल्पायुषी आणि रोगी होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास अल्पायुषी आणि परदेशांत राहणारा होईल.

**बुध धर्मस्थानांत**—मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास मोठा भाग्यशाली, पुण्यवान् आणि स्वधर्मावर प्रीति करणारा होईल, तसेंच बाप आणि मुलें यांचें सुख उत्तम लाभेल. कर्केचा असल्यास भाग्यशाली आणि धनवान् होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास चतुर, तीर्थें करणारा आणि तपस्वी होईल. सिंहेचा असल्यास आस्तिक, प्रतापी, पुष्कळ लाभ मिळविणारा असा होईल; आणि त्याचा बाप पुष्कळ वर्षें जगेल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास मुलें पुष्कळ होतील, शास्त्रज्ञ

होईल आणि गायनकलेंत निपुण होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास कमनशिबी, नास्तिक आणि परदेशांत भटकणारा होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास बापाचा द्वेष करणारा आणि नास्तिक होईल.

**बुध कर्मस्थानांतः**–मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास बापाचें सुख चांगलें लाभेल, राज्याच्या भरभराटींत सुखी होईल, व्यापारांत कुशळ होईल, मान, कीर्ती पुष्कळ मिळेल. कर्केचा असल्यास बापाशीं वांकडें राहील. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास त्यास स्थावर मिळेल व पुष्कळ मित्र होतील. आई आणि पशूंचें सुख चांगलें लभेल, धनवान् होईल आणि संतानाचें सुख लभेल. सिंहेचा असल्यास दयावान्, राजसत्तावान्, आणि धनवान् होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास चांगलीं कामें करील, राजसत्ता भोगील आणि पुष्कळ धनवान् होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास बापाचें सुख लाभणार नाहीं, व्यापारांत नुकसान होईल, अपयश आणि अपकीर्ति मिळेल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास नीचजातींत मान मिळेल आणि नीचजातीपासून धनलाभ आणि कीर्ति होईल.

**बुध आयस्थानांत**–मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास अनेक रीतीनें लाभ मिळेल, वस्त्र आणि दागिने पुष्कळ मिळवील. कर्केचा असल्यास व्यापार करणारा होईल आणि मोतीं पोवळ्यांचा संग्रह करील. वृषभेचा किंवा मिथुनेचा असल्यास त्यास मुली होतील आणि स्त्रीच्या मदतीनें धनवान् होईल. सिंहेचा असल्यास क्षत्रिय जातीपासून धन मिळवील. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास तामसी होईल आणि राजसत्तेपासून धन मिळवील. धनेचा किंवा मीनेचा असल्यास पुष्कळ रीतीनें नुकसान होईल आणि दरिद्री होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास म्लेंच्छ जातीपासून धन मिळवील.



**बुध व्ययस्थानांत**–मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास चांगल्या कामीं धन खर्च करील, शरीरानें सुखी असेल. कर्केचा असल्यास मातुलपक्षाचा द्वेष करील, व पुष्कळ शत्रु होतील. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास चांगल्या कामीं धन खर्च करील व अनुभवी, शास्त्रांत प्रवीण, व्यापारांत चतुर, स्वधर्मावर प्रीति करणारा, विश्वासू असा होईल. सिंहेचा असल्यास राजाची सेवा करणारा होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास राजविद्या जाणणारा, चपळ आणि लोभी होईल. धनेचा किंवा मीनेचा असल्यास फार खर्च करणारा आणि शरीरानें रोगी होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास नीचजातीची सेवा करणारा, विषयी आणि फार खर्च करणारा होईल.

**गुरु तनुस्थानांत**–धनेचा, मीनेचा, किंवा कर्केचा असल्यास पुष्कळ शास्त्रें जाणणारा होईल, संतानाचें उत्तम सुख लाभेल, ज्ञानवान्, धनवान्, राजसत्ता भोगणारा, सुंदर आणि सुखी होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास स्त्रीचें सुख लाभेल, मार्गांत आणि व्यापारांत धन मिळवील. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास देह स्थूळ होईल, स्वभावानें गंभीर, घरकामांत कुशळ, निरोगी, थोडें परंतु कोमल वाणीनें बोलणारा, वैभवी, सुखी आणि यशस्वी होईल; व मुलें थोडीं होतील. सिंहेचा असल-

ल्यास मध्यमायुषी होईल आणि संतानाचें सुख लाभेल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास साहसकर्मे करणारा आणि मनाचा चंचल होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास स्वकुटुंबानें दूर केलेला, संतानसुखविरहित, कृतघ्नी, अभिमानी, पुष्कळ माणसांचा द्वेषकरणारा, प्रवास करणारा, पापी आणि तंटेखोर असून नेहमीं शोक आणि संताप पावणारा होईल.

**गुरु धनस्थानांत**–धनेचा, मीनेचा किंवा कर्केचा असल्यास धनवान्, कुटुंबवान्, वैभवी, सुखी, चांगलें भाषण करणारा, बुद्धिवान् धर्मावर आस्था ठेवणारा आणि आयुष्यमान् होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास चोर पण धनवान्, कटुभाषण करणारा, व खोल्यावर प्रीति करणारा होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास विद्वान् होईल पण विद्येंत विघ्न येईल. कुटुंबाशीं द्वेष करणारा आणि ठकबाजी करणारा होईल. सिंहेचा असल्यास राजसत्तेनें धन मिळवील. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास धैर्यवान्, बलवान्, लोभी, वरकामांत कुशळ होईल. डोळे मोठे असतील, कपाळ मोठें असेल, लोभी होईल, आणि कुले मोठे होतील. मकरेचा असल्यास मद्यपी, कुटुंबांतून भ्रष्ट झालेला, कुळाला कलंक लावणारा किंवा कुल नाश करणारा, मध्यमायुषी होईल, पुष्कळ बायका करील पण पुत्र होणार नाहीं. कुंभेचा असल्यास कटुभाषण करणारा, निर्धन होईल आणि त्यास कुटुंबाचें सुख लाभणार नाहीं.

**गुरु सहजस्थानांत**–धनेचा, मीनेचा किंवा कर्केचा असल्यास भावंडांचें सुख लाभेल; चांगलीं कामें करणारा,



दास चाकर ठेवणारा, पराक्रमी, पुण्यशाली आणि नशीबवान् होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास बुद्धिमान्, भाग्यशाली आणि तीर्थें करणारा होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास भावंडांशीं वांकडें राहील. सिंहेचा असल्यास पापबुद्धिमान्, कानाचा रोगी व दूरदृष्टि होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास व्यापाराचें काम करणारा, पराक्रमी, पुण्याचीं कामें करणारा, भावंडांचा सुखी, चांगला धंदा करणारा, दास चाकर ठेवणारा आणि भोळ्या स्वभावाचा होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास भावंडांचें सुख लाभणार नाहीं, निरुद्योगी आणि लाजाळू होईल.

**गुरु सुहृत्स्थानांत**–धनेचा, मीनेचा किंवा कर्केचा असल्यास घर शेतवाडीचा मालक होईल, मित्र पुष्कळ आणि चांगले मिळतील, आईबापाचें सुख चांगलें लाभेल, वाहन, पशु आणि धन यांपासून सुख होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास जागा आणि वाहन यांपासून भीति प्राप्त होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास मित्रांचा आणि स्त्रीचा द्वेष करणारा होईल. सिंहेचा असल्यास वाहनांपासून सुख होईल; पण आईचें सुख लाभणार नाहीं, मित्र पुष्कळ होतील, घरें पुष्कळ असतील आणि सुखी होईल. मेषेचा किंवा तूळेचा असल्यास शरीराचें आणि संसाराचें सुख चांगलें लाभेल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास आईचें सुख लाभणार नाहीं, मित्रांपासून दुःख होईल, पशु किंवा वाहनापासून घात होईल.

**गुरु सुतस्थानांत**–धनेचा किंवा मीनेचा असल्यास विद्वान्, बुद्धिवान् होईल, पण पुत्रसुखविरहित असेल.

कर्केचा असल्यास उत्तम विद्वान् असून संतान चांगलें होईल. तसेंच हरतऱ्हेनें लाभ मिळवून धनवान् होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास संतानाचें सुख लाभेल, प्रीतिमान् आणि बुद्धिवान् होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास पुत्राचा द्वेष करणारा आणि भ्रमिष्टबुद्धीचा होईल. सिंहेचा असल्यास कुळामध्यें प्रिय होईल, सेनाधिपति, राजसत्तावान् होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास चतुर, तेजदार, मोठे नेत्रवान्, वाचाळ, प्रतापी आणि अन्नदान करण्याची प्रीति असणारा होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास पुत्राचें सुख थोडें होईल, मंदमति, म्लेंच्छविद्या जाणणारा, गंभीर स्वरवाला, बापाचें धन भोगणारा आणि सहनशील होईल.

गुरु **रिपुस्थानांत**—धनेचा, मीनेचा किंवा कर्केचा असल्यास मातुलपक्षाचें सुख चांगलें लाभेल, रोग आणि शत्रु असणार नाहींत. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास शूळ आणि गुल्म रोगी होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास आंगावर फोड येऊन त्यांचे डाग पुष्कळ राहतील आणि शत्रूची भीति फार राहील. सिंहेचा असल्यास मातुलपक्षापासून फार सुख होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास त्यास स्वज्ञातीचा शत्रु बलिष्ट होईल, तो मुलाचे मुलगे पाहील इतकें आयुष्य भोगील. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास शरीरानें रोगी असून नेहमीं त्यास शत्रूकडून त्रास होईल.

गुरु **जायास्थानांत**—धनेचा, मीनेचा किंवा कर्केचा असल्यास स्त्री सुंदर असून तीपासून सुख होईल. व्यापारांत लाभ होईल, परदेशापासून कीर्ति, धन आणि यश मिळेल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास स्त्री विद्वान्, परमेश्वरभक्ति करणारी आणि पतिव्रता होईल; पण तो स्त्रीचा द्वेष करील. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास स्त्रीचा द्वेष करणारा आणि चिंतातुर असेल. सिंहेचा असल्यास व्यापारांत कीर्ति होईल, धनवान् होईल, व त्यास परदेशांत आणि शेतींत लाभ मिळेल. मेषेचा किंवा तूळेचा असल्यास विद्वान्, धनवान् होईल आणि पुष्कळ तऱ्हेनें लाभ मिळवून सुखी होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास स्त्रीपासून नेहमीं दुःख होईल, व्यापारांत त्याचें नुकसान होईल, प्रवासांत आणि परदेशांत अपयश व दरिद्रीपणा येईल.



गुरु **मृत्युस्थानांत**—धनेचा मीनेचा किंवा कर्केचा असल्यास पूर्णायुषी, निरोगी, व धनवान् होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास खराब स्त्रीशीं संग करून त्यापासून पुष्कळ दिवस रोगी राहील. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास ज्ञानी पण भ्रष्ट होईल. सिंहेचा असल्यास मध्यमायुषी आणि मध्यम धनवान् जाणावा. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास अल्पायुषी आणि स्वमताचा अभिमानी होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास अल्पायुषी, शरीरानें दुर्बळ आणि रोगी होईल.

गुरु **धर्मस्थानांत**—धनेचा, मीनेचा किंवा कर्केचा असल्यास मोठा भाग्यवान्, परदेशांत पुष्कळ लाभ मिळविणारा होईल, बापाचें सुख लाभेल, देवावर आस्था ठेवणारा, पुण्याचीं कामें करणारा आणि तीर्थयात्रा करणारा होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास कीर्तिमान्, चांगलें काम करणारा, पण सज्जनांशीं द्वेष करणारा होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास

बापाचा द्वेष करणारा आणि परदेशांत राहणारा होईल. सिंहेचा असल्यास पुष्कळ माणसांचें पालन पोषण करणारा होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास बापाचें सुख लाभेल, धैर्यवान् आणि धनवान् होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास कमनशिबी, नास्तिक आणि परदेशांत दुःख पावणारा होईल.

गुरु कर्मस्थानांत–धनेचा मीनेचा किंवा कर्केचा असल्यास जमिनींत पुरलेलें धन मिळेल, बापाचें सुख लाभेल, राजसत्ता भोगणारा होईल, व्यापारांत नफा होईल, मान आणि कीर्ति मिळवील, व घराचा सुखी असून मित्रांपासून सुख होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास चांगलें लिहिणारा, पुष्कळ जाणणारा आणि कवि होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास पुष्कळ माणसांला प्रिय होईल. सिंहेचा असल्यास राजसत्ता भोगणारा होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास चांगलें काम करणारा, गायनकलेंत कुशल, कीर्तिमान् आणि प्रामाणिक होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास बापाचें सुख लाभणार नाहीं, राजापासून भय होईल, व्यापारांत नुकसान होईल, अपकीर्ति आणि अपयश मिळेल.

गुरु आयस्थानांत–धनेचा, मीनेचा किंवा कर्केचा असल्यास अनेक प्रकारें लाभ मिळेल, वस्त्र आणि दागिन्यांचा वैभवी होईल, आणि कीर्तिमान् होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास खंडितकीर्ति ह्मणजे कीर्ति होऊन पुढें अपकीर्तिही होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास लाभ होईल व पुढें नुकसानही होईल. सिंहेचा असल्यास



वाहनांपासून सुख होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास संतानापासून दुःख होईल. विद्वान् आणि धनवान् होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास दरिद्री होईल.

गुरु व्ययस्थानांत–धनेचा, मीनेचा किंवा कर्केचा असल्यास शरीरास सुख लाभेल, अनेक रीतीनें धन मिळवून त्याचा चांगला उपयोग करील, रोग आणि शत्रूचा नाश होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास कामी होईल ह्मणजे पुष्कळ स्त्रिया भोगील, पोटांत किंवा आंगावर गांठीचा रोग होईल, आंगावर डाग राहतील आणि अप्रामाणिक होईल. वृषभेचा किंवा तूळेचा असल्यास निर्धन होईल, संतती थोडी होईल, साधारण बुद्धिवान् व विद्वान् होईल. सिंहेचा असल्यास व्यभिचारी होईल, व फार खर्च करील. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास ब्राह्मण किंवा क्षत्रिय आणि गर्भवती स्त्रीशीं संभोग करील, फार खर्च करणारा होईल आणि वारंवार रोग व शत्रु यांपासून पीडा होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास शरीरास सुख लाभणार नाहीं, रोग आणि शत्रूपासून दुःख होईल.

## शुक्र द्वादश राशिस्थ फलें.

शुक्र तनुस्थानांत–वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास देह स्थूळ होईल, निरोगी, शहाणा आणि चांगल्या स्वभावाचा व वजनदार मनुष्य होईल, थोडें पण गोड बोलणारा, उंच कुळांत जन्म घेतलेला, धनवान्, पूर्णायुषी, प्रामाणिक, निष्कपटी, लोकप्रिय, परदेशवासी असा होईल, स्त्री चांगली मिळेल व तीपासून फार सुख

मिळेल. कर्केचा असल्यास सुखी तसाच दुःखीही होईल, पण स्त्रीला प्रिय होईल, वस्त्र आणि दागिन्यांचा शोकी होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास कपटी, छलभेदी, मूर्ख, कृशदेही आणि कडू बोलणारा होईल. सिंहेचा असल्यास क्रोधी, छलभेदी आणि कपटी होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास पूर्णायुषी, निरोगी, चतुर, सुंदर आणि पराक्रमी होईल. धनेचा असल्यास विद्वान्, वस्त्र आणि दागिन्यांची इच्छा करणारा, सुस्वरूप, ठकबाजी करणारा होऊन त्यास वायूचा विकार होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास रूपवान्, नम्र, लोकप्रिय, गुणवान् आणि धनवान् होईल.

**शुक्र धनस्थानांत**–वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास द्रव्यवान् होऊन त्यास कुटुंबापासून सुख होईल. कर्केचा असल्यास मुख सुंदर होईल, व नीच स्वभावाचा आणि मतलबी होईल. मिथुनेचा असल्यास कडू बोलणारा, वाचाळ, चंचळ, विद्वान् आणि धनवान् होईल. कन्येचा असल्यास दरिद्री होऊन त्यास कुटुंबापासून दुःख होईल. सिंहेचा असल्यास राजवंशांतील लोकांच्या मदतीनें धनवान् होईल, आणि कुटुंबाशीं तंटा करणारा होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास हलकें अन्न खाणारा, नम्र आणि चांगले नेत्र असणारा असा होईल. धनेचा असल्यास दयावान्, परोपकारी असून त्यास उत्तम स्त्री मिळेल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास कुटुंबांत चांगल्या प्रेमानें राहील, व लोभी आणि धनवान् होईल.

**शुक्र सहजस्थानांत**–वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास भावंडांचें सुख लाभेल, व चांगला धंदा करणारा,



पराक्रमी आणि दास, चाकर ठेवणारा होईल. कर्केचा असल्यास दास, चाकर ठेवणारा होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास भावंडांचें सुख लाभणार नाहीं, व निरुद्योगी आणि पराक्रमविरहित होईल. सिंहेचा असल्यास चांगलीं कामें करणारा आणि नशीबवान् होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास लोभी आणि चतुर होईल, व मनांत आणलेलें काम पूर्ण करील. धनेचा असल्यास पराक्रम करील; पण मागून अपमान होईल, आणि स्वतःच्या पाठीवर भावंडें होतील. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास शूद्रांच्या मदतीनें पराक्रम करणारा होईल.

**शुक्र सुहृत्स्थानांत**–वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास आईचें सुख लाभेल. घर, वाडी, शेत, जागा आणि मित्र यांपासून सुख होईल, तसेंच वाहन आणि धन यांचें सुख लाभेल. कर्केचा असल्यास सुस्वरूप, कीर्तिवान् आणि क्षमावान् होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास आईपासून दूर राहील, परदेशांत वास करणारा, मित्र आणि पशुविरहित होईल. सिंहेचा असल्यास बुद्धिवान्, पुष्कळ पशु राखणारा आणि खंडितमित्र होईल ह्मणजे पहिल्यानें मित्र असणारे शत्रु होतील. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास कुलदीपक व विद्वान् होईल, आणि त्यास आईबापांचें सुख लाभेल. धनेचा असल्यास विद्वान् होईल मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास शूद्र लोकांच्या मदतीनें जागा मिळवील, आणि नीच लोकांशीं मैत्री करील.

**शुक्र सुतस्थानांत**–वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास बुद्धिवान् आणि संतान सुखी होईल. कर्केचा

असल्यास मुली होतील. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास मंदबुद्धि होऊन त्यास संतानापासून नेहमीं दुःख होईल. सिंहेचा असल्यास मुलगे होतील आणि राजाकडून मान मिळेल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास राजकीय विद्या जाणणारा आणि प्रधान होईल. धनेचा असल्यास शहाणा, विद्वान् आणि संतानविरहित जाणावा. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास मंदबुद्धि, अल्पसंतति आणि ठकबाजी करणारा होईल.

**शुक्र रिपुस्थानांत**—वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास मातुलपक्षाचें सुख लाभेल, रोग आणि शत्रुविरहित असेल. कर्केचा असल्यास चांगल्या कामीं पैसा खर्च करील, पण वणीज्यांचा शत्रु होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास मातुलपक्षाचें सुख लाभणार नाहीं आणि त्यास रोग व शत्रु होतील. सिंहेचा असल्यास आडमार्गीं धन खर्च करील आणि त्यास राजवंशीं शत्रु उत्पन्न होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास स्वज्ञातीबरोबर चांगलें राहील. धनेचा असल्यास मंत्र, तंत्र आणि किमयावाला होईल, लोकप्रिय आणि सुशील पुत्रवान् होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास आंगावर डाग असून विषापासून वात होईल.

**शुक्र जायास्थानांत**—वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास स्त्री स्थूळ मिळेल, तो व्यापारधंदा करील, परदेशांत वास करील, देण्याघेण्यांत कुशल होईल, त्यास उंच कुळांतील आणि शहाणी स्त्री मिळेल. आणि स्वतः भोळा असेल. कर्केचा असल्यास स्त्री फार चपळ, रूपवती आणि खराब चालीची मिळेल, व छंदी फंदी मित्र होतील. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास स्त्री वाईट मिळेल आणि ती शरीरानें दुर्बळ असेल, तो देश भटकणारा आणि दरिद्री होईल. सिंहेचा असल्यास स्त्रीचा द्वेष करणारा होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास निर्धन होईल, शस्त्रांच्या आधारानें गुजराण चालवील आणि मुखचुंबन करणारा होईल. धनेचा असल्यास व्यभिचारी, धनवान्, वाहनसुखी आणि सर्व कामांत कुशळ होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास स्त्री फार कपटी, ठकबाजी करणारी आणि लुच्ची मिळेल.

**शुक्र मृत्युस्थानांत**—वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास पूर्णायुषी, शरीरानें सुखी, धनवान्, मजबूत, मध्यम बांध्याचा होईल. कर्केचा असल्यास मध्यमायुषी होईल, आणि त्या पुरुषाची स्त्री रोगी होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास अल्पायुषी, निर्धन, शरीरानें दुर्बळ आणि रोगी होईल. सिंहेचा असल्यास आंगावर फोड उठतील, आणि अल्पायुषी होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास लोभी, संतोषी होईल, त्याचे आईला देवीचा रोग होईल, व तो मध्यमायुषी होईल. धनेचा असल्यास फार कामी परंतु धनवान् जाणावा. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास वायूचा आणि गुल्म रोग होईल आणि तो अल्पायुषी होईल.

**शुक्र धर्मस्थानांत**—वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास नशीबवान्, परदेशांत यशस्वी, पुण्यशाली, यात्रा करणारा, होईल व त्यास आई आणि संतान यांचें सुख लाभेल कर्केचा असल्यास देशपर्यटण करणारा होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास कमनशिबी, परदेशांत

राहून दुःख भोगणारा, नास्तिक आणि पाप कर्म करणारा होईल. सिंहेचा असल्यास नशीबवान् होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास पुत्रवान्, स्त्रीपासून सुखी, आणि दीर्घायुषी होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास गुरूच्या स्त्रीशीं समागम करील, आणि शूद्राच्या मदतीनें नशीबवान् होईल. धनेचा असल्यास नशीबवान् होऊन पुन्हां कमनशिबी होईल.

**शुक्र कर्मस्थानांत**—वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास राज्याधिकारी होईल, बापाचें सुख लाभेल, मान, कीर्ति मिळेल आणि व्यापारापासून श्रीमान होईल. कर्केचा असल्यास शुभकर्में करणारा होईल आणि त्यास वाहनापासून सुख होईल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास बापाचें सुख लाभणार नाहीं, दुसऱ्याची सेवा करून गुजराण करील, अपकीर्ति आणि अपमान पावेल. सिंहेचा असल्यास राजसत्ता मिळून ती जाईल, आणि राजापासून विघ्न येईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास प्रतापी आणि मनइच्छित कामें करणारा होईल. धनेचा असल्यास कुलदीपक आणि कीर्तिमान् होईल. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास वाचाळ होईल आणि शूद्रांच्या मदतीनें राजसत्ता मिळवील.

**शुक्र आयस्थानांत**—वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास बुद्धिवान्, संतानसुखी, अनेक रीतीनें लाभ मिळविणारा, वस्त्र आणि दागिने मिळविणारा होईल. कर्केचा असल्यास नशीबवान् होऊन मग कमनशिबी होईल, पण दयाळू असेल. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास दारिद्री होईल. सिंहेचा असल्यास वाहन-



सुखी होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास राजविद्या शिकणारा, धनवान् होईल व त्यास जमिनीचा लाभ होईल. धनेचा असल्यास पुत्रवान् आणि धनवान् होईल. मकरेचा असल्यास शूद्रांच्या मदतीनें धन मिळवील.

**शुक्र व्ययस्थानांत**—वृषभेचा, तूळेचा किंवा मीनेचा असल्यास मातुलपक्षाचें सुख लाभेल, रोग, शत्रुविरहित, फार श्रीमान्, आणि चांगल्या कामीं पैसा खर्च करणारा होईल. कर्केचा असल्यास व्यभिचारी होऊन फार खर्च करील. मिथुनेचा किंवा कन्येचा असल्यास सामान सुमान घेण्यामध्यें पैसा वापरील. सिंहेचा असल्यास दरिद्री होईल. मेषेचा किंवा वृश्चिकेचा असल्यास वाईट कामांत धन खर्च करील, व दरिद्री होईल. धनेचा असल्यास मेल्यानंतर मुक्ति मिळेल, व जिवंत असतां धर्मार्थ पुष्कळ धन खर्च करील. मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास चोर लुटतील, अथवा मिळकत आगीनें जळून जाईल.

## शनि द्वादश राशिस्थ फलें.

**शनि प्रथम भावांत**—स्वराशीचा किंवा उच्च असेल तर जन्मणारा मध्यम बांध्याचा, रूपवान्, ग्रामाधिपति अथवा जमीनदार, धनधान्ययुक्त, वडिलार्जित धन भोगणारा असा असतो. मेष किंवा वृश्चिक राशीचा असेल तर काळा, दरिद्री, आणि कुरूप असतो. वृषभ आणि तूळ राशीचा असेल तर त्यास पित्तविकार आणि वायूचा विकार होतो. मिथुन किंवा कन्या राशीचा असेल तर बोलण्यांत अडखळतो आणि त्याचें व त्याचे मुलाचें पटत नाहीं. कर्क राशीचा असेल तर मातृद्वेषी होतो. सिंह राशीचा असेल तर बापाचा द्वेष करतो. धन

किंवा मीन राशींचा असेल तर ब्राह्मणांचा द्वेष करतो, संत, साधु आणि विद्वानांचा द्वेष करतो, आणि भिक्षा मागतो.

**शनि दुसरे भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर द्रव्यप्राप्ति आणि कुटुंबप्राप्ति चांगली होईल. मेष किंवा वृश्चिक राशींचा असेल तर कुटुंबाचें सुख मिळणार नाहीं. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर भिक्षा मागेल, परंतु धन मिळवील आणि कुटुंबाचें रक्षण करील. धन किंवा मीन राशींचा असेल तर धनलोभी, कुटुंबाबरोबर कलह करणारा, व साधारण धनिक होईल. मिथुन किंवा कन्या राशींचा असेल तर भिकारी जाणावा. कर्क राशीचा असेल तर कुटुंबाचा द्वेष करील आणि दरिद्री असेल. सिंहेचा असेल तर नेत्ररोगी, दरिद्री आणि रोगी असा होईल.

**शनि तिसरे भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर पराक्रमी, व्यापारनिपुण, नौकरयुक्त आणि बंधुसुखी असा मनुष्य असतो. मेष आणि वृश्चिक राशींचा असेल तर त्यास बंधुसुख, नौकरसुख, व धंदा रोजगार यांचें सुख लाभणार नाहीं. वृषभ किंवा तूळ राशींचा असेल तर तो पराक्रमी निघेल. मिथुन किंवा कन्या राशींचा असेल तर त्यास बहिणी होतील. धन किंवा मीन राशींचा असेल तर त्यास बंधुसुख थोडें लाभेल. कर्क राशीचा असेल तर संपत्ति प्राप्त होईल आणि तो व्यापार करील, पण कुटुंबाचें पोषण वाईट रीतीनें करील. सिंहेचा असेल तर बंधुद्वेष करील, मोलमजुरी करून उदरनिर्वाह करील, व आचरणानें वाईट असून पापकर्में करील.



**शनि चतुर्थ भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर त्यास माता, बंधु, जमीनजुमला यांचें सुख लाभेल. मित्र आणि पशूंपासून लाभ होईल. मेष किंवा वृश्चिक राशींचा असेल तर आई, मित्र, यांचें सुख लाभणार नाहीं. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर मातृसुख लाभणार नाहीं. मिथुन किंवा कन्या राशींचा असेल तर धनप्राप्ति होणार नाहीं. कर्क राशीचा असेल तर माता, घरदार, मित्रादिकांचें सुख चांगलें लाभेल आणि विद्वानांचा स्नेह होईल. सिंहराशीचा असेल तर माता आणि पिता यांचा द्वेष करील. धन आणि मीन राशींचा असेल तर त्यास अन्य देशांत वास घडेल, त्यास घरदार, व जमीन यांपासून लाभ होईल, पण वाहनसुख चांगलें मिळणार नाहीं. मातृसुख जास्त मिळून त्यास मित्रप्राप्ति चांगली होईल, आणि त्याचा स्वभाव भोळसर राहील.

**शनि पांचवे भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर त्याची बुद्धि चांगली असून त्यास संतानसुख चांगलें मिळेल, आणि तो म्लेंच्छ विद्येचा अभ्यास करील. मेष किंवा वृश्चिक राशींचा असेल तर मूर्ख आणि संतानरहित जाणावा. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर दरिद्री जाणावा, आणि त्यास दत्तक पुत्र घ्यावा लागेल व आपलें पोषण चांगले प्रकारांनीं करतां येणार नाहीं. मिथुन किंवा कन्या राशींचा असेल तर त्यास मुली होतील. कर्कराशीचा असेल तर व्यापारी होईल. सिंह राशीचा असेल तर राजविद्या शिकेल. धन किंवा मीन राशीचा असेल तर त्यास संतानसुख लाभणार नाहीं, आणि तो पापाचरण करील.

**शनि सहावे भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर रोग, शत्रु, मातुलपक्ष यांचें सुख लाभणार नाहीं. मेष किंवा वृश्चिक राशीचा असेल तर रोग, शत्रु आणि मातुलसुख लाभेल. वृषभ आणि तूळ राशींचा असेल तर त्याची ज्ञात त्यास शत्रु होईल, व धनधान्यादिक प्राप्त होतील. मिथुन किंवा कन्या राशीचा असेल तर स्त्री शत्रु होईल, परंतु त्यास राजसत्तेचा लाभ होईल. कर्क राशीचा असेल तर सदा रोगी असून शरीरावर कुष्ठ दिसेल. सिंह राशीचा असेल तर मातुलांचा द्वेष करील. धन किंवा मीन राशीचा असेल तर राजसत्ता भोगून विद्वानांचा आदर करील.

**शनि सातवे भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर स्त्रीपासून सुख चांगलें मिळेल. व्यापारापासून धनप्राप्ति होईल. मेष किंवा वृश्चिक राशीचा असेल तर स्त्रीदुःखी, व्यापारांत नुकसान आणि चोरभीति पावणारा होईल. वृषभ किंवा तूळ राशीचा असेल तर स्त्री काळी, कुरूप मिळेल. त्यास दुखणीं दीर्घ कालाचीं होतील. मिथुन किंवा कन्या राशीचा असेल तर स्त्री गुणवान् जाणावी. सिंह राशीचा असेल तर दुःख आणि चोरापासून भय प्राप्त होईल. धन किंवा मीन राशीचा असेल तर भगचुंबन करील असें जाणावें.

**शनि आठवे भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर आयुष्य दीर्घ कालाचें आणि शरीर निरोगी जाणावें. मेष किंवा वृश्चिक राशीचा असेल तर शरीर कृश आणि आयुष्य थोडें जाणावें. वृषभ किंवा तूळ राशीचा असेल तर दरिद्री आणि मध्यमायुषी जाणावा. मिथुन किंवा



कन्या राशीचा असेल तर शूद्रस्त्रीबरोबर संभोग करील. परसेवा करील. कर्क राशीचा असेल तर अत्यंत कष्टानें कुटुंबाचें संरक्षण करील. सिंह राशीचा असेल तर त्यास गुप्त रोग होईल. धन किंवा मीन राशीचा असेल तर भिक्षा मागून कुटुंबाचें रक्षण करील.

**शनि नवबे भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर द्रव्यप्राप्ति चांगली होईल. संतानसुख लाभेल. पित्याचें सुख लाभेल. मेष किंवा वृश्चिक राशीचा असेल तर अन्यगृहीं वास करील आणि दरिद्री होईल. स्त्री मोठी मिळेल. अन्य देशांत वास करील. वृषभ किंवा तूळ राशींचा असेल तर कर्मभ्रष्ट किंवा ज्ञातीभ्रष्ट होईल. मिथुन किंवा कन्या राशीचा असेल तर बापाचें सुख थोडें लाभेल. कर्क राशीचा असेल तर मंदभाग्य समजावें. सिंह राशीचा असेल तर तो पापी जाणावा. धन किंवा मीन राशीचा असेल तर पंडित होईल, आणि त्यास द्रव्यप्राप्ति होईल, व तो प्रवास करील.

**शनि दहावे भावांत**–स्वराशीचा किंवा उच्च असेल तर पित्याचें सुख लाभेल. राजदरबार, व्यापार आणि कीर्ति यांत यश मिळेल. धनप्राप्ति होईल. मेष किंवा वृश्चिक राशीचा असेल तर पित्याचें सुख कमी, मिळून राजदंड भोगील. व्यापारांत नुकसान होईल. वृषभ किंवा तूळ राशीचा असेल तर तीर्थयात्रा करील. लोभी होईल. मिथुन किंवा कन्या राशीचा असेल तर पित्तविकार होईल. कर्क राशीचा असेल तर मातेपासून सुख कमी लाभेल. सिंह राशीचा असेल तर पित्याचें

सुख कमी लाभेल. कार्यांत विघ्नें येतील. धन किंवा मीन राशीचा असेल तर राजवैभव भोगील.

शनि अकरावे भावांत—स्वराशीचा किंवा उच्च असेल तर अनेक प्रकारांनीं लाभ होतील. संतानें थोडीं होतील. मेष आणि वृश्चिक राशींचा असेल तर दरिद्री जाणावा. वृषभ किंवा तूळ राशीचा असेल तर संतति होणार नाहीं. मिथुन किंवा कन्या राशीचा असेल तर गृहसुख मिळेल. कर्कराशीचा असेल तर व्यापारांत फायदा होईल. धन किंवा मीन राशीचा असेल तर विद्वान्, भाग्यवान्, धनवान् आणि वाहनसुखी होतो.

शनि बारावे भावांत—स्वराशीचा किंवा उच्च असेल तर शरीरास सुख लाभेल, धनप्राप्ति होईल, परंतु तो मनुष्य लोभी जाणावा. त्यास मातुलसुख चांगलें लाभेल, आणि शत्रु होणार नाहींत. मेष किंवा वृश्चिक राशीचा असेल तर अनेक प्रकारांनीं खर्च करील. शत्रु होतील, व नुकसान होईल. आप्त फसवतील. वृषभ आणि तूळ राशीचा असेल तर तो मनुष्य वेडा होईल आणि भ्रष्ट होईल. मिथुन किंवा कन्या राशीचा असेल तर शरीर सुंदर जाणावें. कर्क राशीचा असेल तर नेत्रांस विकार होतील, आणि त्यास नेहमीं रोग होतील. सिंह राशींतील असेल तर मातुलसुख लाभणार नाहीं. वाईट मार्गानें खर्च करील. धन किंवा मीन राशीचा असेल तर मातुलपक्षाचें सुख लाभेल. तो फार कंजूष होईल, आणि त्याचे शरीरास व्याधी होईल.



## राहू आणि केतू यांची द्वादश राशिस्थ फलें.

( राहू आणि केतू यांचें फल एकच समजावें. )

राहू आणि केतू प्रथम भावीं—स्वराशीचे किंवा उच्च असतील तर, अथवा मेष, वृषभ, कर्क राशींचे असतील तर जन्मणारा दयाळू, वैभवयुक्त आणि सुखी राहील. राहू हा धन अथवा मीन राशीचा, केतू हा मिथुन किंवा कन्या राशीचा, अथवा राहू, व केतू हे तूळ, वृश्चिक, मकर आणि कुंभ राशींचे असतील तर मृत्युतुल्य स्थितींत जन्म होईल, किंवा त्याची संतति मरून जाईल. सिंह राशीचा राहू किंवा केतू असेल तर, तोंडावर चिन्ह राहील, ह्मणजे तोंडाचे कांहीं अवयव विद्रूप दिसतील.

राहू आणि केतू दुसरे भावीं—स्वराशीचे किंवा उच्च असतील तर, धनवान्, आणि कुटुंबाचें संरक्षण करणारा मनुष्य होईल. राहू हा धन अथवा मीन राशीचा असेल तर, अथवा केतू हा मिथुन किंवा कन्या राशीचा असेल, तर तो मनुष्य दरिद्री आणि कुटुंबाचें संरक्षण करण्यास असमर्थ असतो. राहू किंवा केतू हे मेष आणि वृश्चिक राशींचे असतील तर, अथवा मकर, कुंभ राशींचे असतील तर, अथवा सिंह राशीचे असतील तर संतानसुख चांगलें लाभणार नाहीं. त्यास स्त्रिया दोन होतील. आणि त्याचे मनास शोक होईल. कर्क, वृषभ आणि तूळ राशींत असतील तर त्याचा रंग काळसर असतो, आणि त्याचे हनुवटीवर चिन्ह असतें.

राहू किंवा केतू तिसरे भावीं—स्वराशीचे किंवा उच्च असतील तर, त्यास बंधुसुख चांगलें लाभेल. तो परा-

क्रमी होईल, व त्याचेजवळ नौकर, चाकर राहतील. आणि त्याचा आयुष्यक्रम चांगले कृत्यांत जाईल. राहू हा धन किंवा मीन राशीचा असेल तर, अथवा केतू हा मिथुन किंवा कन्या राशीचा असेल तर, त्यास बंधुसुख लाभणार नाहीं. तो पराक्रमी निघणार नाहीं, आणि निरुद्योगी होईल. राहू किंवा केतू मेष, वृश्चिक राशींचा, किंवा मकर, कुंभ राशींचा, अथवा सिंहराशीचा असेल तर बंधुसुख न मिळतां त्यांचा नाश होईल. तो पराक्रमी होणार नाहीं, आणि त्यास अंडवृद्धीचा विकार होईल. वृषभ, तूळ, किंवा कर्क राशींत असेल तर चांगला उद्यम करील, आणि त्यास द्रव्य चांगलें मिळेल.

राहू किंवा केतू चवथे भावांत—स्वराशींचे किंवा उच्च असतील तर वस्त्र आणि धनधान्य यांचें सुख चांगलें लाभेल. धन आणि मीन राशींतील राहू असेल तर तो दरिद्री होईल. मिथुन अथवा कन्या राशींतील केतू असेल तर दरिद्री जाणावा. मेष, वृश्चिक राशींतील, अथवा मकर, कुंभ राशींतील, अथवा सिंह राशींतील, राहू किंवा केतू असतील तर स्त्री, माता, घरदार आणि राजसेवा यांचें सुख चांगलें लाभेल.

राहू किंवा केतू पंचम भावांत—स्वराशीचे किंवा उच्च असतील तर पुत्राचें सुख लाभेल. धनेचा राहू आणि मिथुनेचा केतू, किंवा मीनेचा राहू आणि कन्येचा केतू असल्यास तो मूर्ख असून त्यास पुत्राचें सुख लाभणार नाहीं. मेषेचा, वृश्चिकेचा, सिंहेचा, मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास संतती अल्प होईल, परदेशवास करील, राजसेवक होईल, सर्पदंशानें मुलगा मरेल, आणि चंचळबुद्धीचा होईल. वृषभेचा, तूळेचा किंवा कर्केचा असल्यास पुत्रसुख लाभणार नाहीं, धैर्यवान् आणि रजोगुणी होईल, त्यास गरमी आणि गुप्त रोग होईल, व तो कपटी होईल.



राहू किंवा केतू सहावे भावांत—स्वराशींचे किंवा उच्च असतील तर शत्रु आणि रोग होणार नाहींत. धनेचा राहू आणि मिथुनेचा केतू, किंवा मीनेचा राहू, कन्येचा केतू असल्यास शत्रूपासून भीति होईल. मेषेचा, वृश्चिकेचा, सिंहेचा, मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास शत्रु आणि रोग होणार नाहींत. मातुलपक्षाचें सुख लाभेल, निर्धन आणि चोर होईल. वृषभेचा, तूळेचा किंवा कर्केचा असल्यास धैर्यवान्, सुखी, जितेंद्रिय आणि रोगशत्रूविरहित असेल.

राहू किंवा केतू सप्तम भावांत—स्वराशीचे किंवा उच्च असल्यास स्त्रीचें सुख लाभेल व परदेशांत सुख मिळेल. धनेचा राहू आणि मिथुनेचा केतू, किंवा मीनेचा राहू आणि कन्येचा केतू असल्यास स्त्रीसुख लाभणार नाहीं, व परदेशांत रखडावें लागेल. मेषेचा, वृश्चिकेचा, सिंहेचा, मकरेचा, किंवा कुंभेचा असल्यास दोन स्त्रिया करील, तरी स्त्रीसुख लाभणार नाहीं. वृषभेचा, तूळेचा किंवा कर्केचा असल्यास स्त्रीस देवी येतील आणि परदेशांत अल्प सुख मिळेल.

राहू किंवा केतू अष्टम भावांत—स्वराशीचे किंवा उच्च असतील तर मध्यमायुषी आणि निरोगी होईल. धनेचा राहू आणि मिथुनेचा केतू, किंवा मीनेचा राहू आणि कन्येचा केतू असल्यास अल्पायुषी आणि रोगी

होईल. मेष, वृश्चिक, सिंह, मकर किंवा कुंभेचा असल्यास बहुरोगी आणि दरिद्री होईल. वृषभेचा, तूळेचा किंवा कर्केचा असल्यास पुष्कळ प्रयासानें गुजराण करील व वारंवार आजारी पडेल.

**राहू किंवा केतू नवमभावांत**—स्वराशीचे किंवा उच्च असल्यास भाग्यवान्, पुण्यवान् आणि परदेशांत सुखी होईल. धनेचा राहू आणि मिथुनेचा केतू, किंवा मीनेचा राहू आणि कन्येचा केतू असल्यास कमनशिबी, नास्तिक आणि परदेशांत भटकणारा होईल. मेषेचा, वृश्चिकेचा, सिंहेचा, मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास पुत्रविरहित, शूद्रस्त्रीशीं संभोग करणारा, चाकर व धर्महीन आणि नास्तिक होईल. वृषभेचा, तूळेचा किंवा कर्केचा असल्यास अल्पपुत्रवान्, आस्तिक, व्यापारांत कुशल आणि भाग्यवान् होईल.

**राहू किंवा केतू दशम भावांत**—स्वराशींत किंवा उच्च असतील तर राजसत्ता भोगील, बापाचें सुख लाभेल, कीर्तिमान् आणि शत्रुविरहित होईल. धनेचा राहू आणि मिथुनेचा केतू, किंवा मीनेचा राहू आणि कन्येचा केतू असल्यास शत्रुविरहित, राजसत्ता भोगणारा, पण पितृद्वेषी होईल. वृषभेचा, तूळेचा किंवा कर्केचा असल्यास राजसत्ता भोगील, आईबापाचें सुख लाभेल, घर आणि जमीन जुमल्याचा सुखी, वैभवी आणि धनवान् होईल. मेषेचा, वृश्चिकेचा, सिंहेचा, मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास राजवैभवी आणि शत्रुविरहित होईल.

**राहू किंवा केतू एकादश भावांत**—स्वराशीचे किंवा उच्च असतील तर बुद्धिवान्, संतानाचा सुखी, अनेक



रीतीनें लाभ मिळविणारा आणि धनवान् होईल. धनेचा राहू आणि मिथुनेचा केतू, किंवा मीनेचा राहू आणि कन्येचा केतू असल्यास अल्पबुद्धि, अल्पसंतति आणि पुष्कळ मेहनत करून थोडेसें मिळविणारा होईल. मेषेचा, वृश्चिकेचा, सिंहेचा, मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास छळभेद करणारा, कपटी, अल्प विद्वान् आणि गोड बोलणारा होईल. वृषभेचा, तूळेचा किंवा कर्केचा असल्यास अल्पसंतति, राजसेवक, भोळा, अनेक जातीचें वस्त्रप्रावर्ण, दागदागिना आणि भोजन यांचा समृद्धिवान् आणि सुखी होईल.

**राहू किंवा केतू द्वादश भावीं**—स्वराशीचे किंवा उच्च असतील तर लोभी, श्रीमंत आणि शरीरानें सुखी होईल. धनेचा राहू आणि मिथुनेचा केतू, किंवा मीनेचा राहू आणि कन्येचा केतू असल्यास कर्जबाजारी, दरिद्री आणि रोगी होईल. मेषेचा, वृश्चिकेचा, सिंहेचा, मकरेचा किंवा कुंभेचा असल्यास शत्रुविरहित, अल्पसंततिमान्, निरोगी, स्थूलदेही होईल. वृषभेचा, तूळेचा किंवा कर्केचा असल्यास नेत्ररोगी, पापकर्म करणारा, छळभेदी आणि कपटी, नास्तिक, पुष्कळ खर्च करणारा, कर्जबाजारी, दरिद्री, रोगी, आणि अल्पायुषी होईल.

## ग्रहांचीं दृष्टिफलें.

ग्रह आपल्या भावापासून ३ व १० भावांवर एकपाद दृष्टीनें पाहतात, व त्याचें फल $\frac{1}{4}$ देतात. ५ व ९ भावांवर द्विपाद दृष्टीनें पाहतात, व त्याचें फल $\frac{1}{2}$ देतात. ४ व ८ भावांवर त्रिपाद दृष्टीनें पाहतात, व त्याचें फल $\frac{3}{4}$ देतात. व सप्तम भावावर पूर्ण दृष्टीनें पाहतात, व त्याचें

फल पूर्ण देतात. सर्व ग्रह सप्तम भावावर पूर्ण दृष्टीनें पाहतात. त्यांत मंगळ चार, सात व आठ ह्या भावांवर पूर्ण दृष्टीनें पाहतो; गुरु पांच, सात व नऊ ह्या भावांवर पूर्ण दृष्टीनें पाहतो; शनि तीन, सात व दहा ह्या भावांवर पूर्ण दृष्टीनें पाहतो; व राहू पांच, सात व नऊ ह्या भावांवर पूर्ण दृष्टीनें पाहतो.

## सूर्याचीं दृष्टिफलें.

१ **सूर्याची**–लग्नावर दृष्टि असली तर तो अनेक प्रदेशांत भ्रमण करवील, भाग्योदय करील, पुण्य करण्याकडे थोडी प्रीति राहील, शरीरास किंचित् पीडा होईल व त्याचप्रमाणें स्त्रीसुखही थोडेंच देईल.

२ **सूर्याची**–धन भावावर दृष्टि असली तर पित्याच्या धनाचा नाश होईल, स्वतःच्या पराक्रमानें संसार करील, व चतुष्पाद जनावरांचें सुख मिळेल.

३ **सूर्याची**–सहज भावावर दृष्टि असली तर पराक्रमी होईल, राजापासून यश मिळवील व पाहिल्या भावंडाचा नाश होईल.

४ **सूर्याची**–चतुर्थ भावावर दृष्टि असेल तर आईस पीडा होईल, व त्याप्रमाणें भावंडांसही पीडा होईल पण यश व सुखाची वृद्धि होईल.

५ **सूर्याची**–पंचम भावावर दृष्टि असेल तर पहिल्या संततीचा नाश होईल, शरीरास वातपीडा होईल व स्त्रीसुख थोडें मिळेल.

६ **सूर्याची**–षष्ठ भावावर दृष्टि असेल तर नेहमीं शत्रुनाश होईल पण स्वतःच्या उजव्या नेत्रास पीडा होईल, व मातृसुख मिळेल.



७ **सूर्याची**–सप्तम भावावर दृष्टि असेल तर स्त्रीनाश होईल, शत्रूपासून पीडा होईल व स्वतःला पंडुरोग होईल.

८ **सूर्याची**–अष्टम भावावर दृष्टि असेल तर गुदस्थानास पीडा होईल, पित्यानें पराक्रमानें केलेला धंदा स्वतःस होणार नाहीं, पित्याच्या वृत्तीप्रमाणें वृत्ति राहणार नाहीं व व्यभिचार करील.

९ **सूर्याची**–नवम भावावर दृष्टि असेल तर मातृ, पितृ व स्वगुरु ह्या तिन्ही पक्षांचा नाश करील, पापाचरण करील, व वृद्धापकाळीं सुख पावेल.

१०. **सूर्याची**–दशम भावावर दृष्टि असली तर तो सिद्धकर्मी होईल, स्वतःच्या पहिल्या अवस्थेंत मातृनाश होईल व जर सूर्य स्वगृहींचा किंवा मेषेचा असला तर मातृसुख मिळेल व फार पराक्रमी होईल.

११ **सूर्याची**–एकादश भावावर दृष्टि असली तर सर्व वस्तूंची प्राप्ति होईल, प्रथम पुत्राचा नाश होईल व चांगल्या बुद्धीचा मनुष्य होईल.

१२ **सूर्याची**–द्वादश भावावर दृष्टि असेल तर गृहनाश होईल व वाहनापासून अथवा चतुष्पादापासून पीडा होईल.

## चंद्राचीं दृष्टिफलें.

१ **चंद्राची**–लग्नावर दृष्टि असेल तर दुष्टबुद्धि होईल, प्रवास करील व तेणेंकरून सुखी होईल.

२ **चंद्राची**–द्वितीय भावावर दृष्टि असेल तर कुटुंबसुख भोगील, बरीच संतति होईल परंतु आठव्या वर्षी जलघात होईल, किंवा दगडापासून पीडा होईल.

३ चंद्राची–तृतीय भावावर दृष्टि असेल तर भाग्यवान् व पराक्रमी होईल, व पहिल्या अवस्थेंत बराचसा पैसा मिळवील व त्याचप्रमाणें वृद्धावस्थेंतही सुख मिळेल.

४ चंद्राची–चतुर्थ भावावर दृष्टि असेल तर शरीरसंपत्ति चांगली राहील, व पितृसुख मिळेल.

५ चंद्राची–पंचम भावावर दृष्टि असेल तर पहिल्या अवस्थेंत पुत्रसंतान होईल व परदेशांत उपजीविका चालेल.

६ चंद्राची–षष्ठ भावावर दृष्टि असेल तर शत्रु फार होतील, कफप्रकृति राहील व धातुक्षय होईल.

७ चंद्राची–सप्तम भावावर दृष्टि असेल तर चांगली रूपवती स्त्री मिळेल, अति कामी, परस्त्रीचा संग करणारा होऊन, स्वतः बोलल्याप्रमाणें चालेल.

८ चंद्राची–अष्टम भावावर दृष्टि असेल तर मृत्यु होण्याएवढी एक वेळ पीडा होईल, नेहमीं रोगी राहील, शरीर शीत राहील व आठव्या वर्षी पीडा फार होईल.

९ चंद्राची–नवम भावावर दृष्टि असेल तर भावांचें सुख मिळेल, धनसुख थोडें मिळेल, व फार खर्च करणारा होईल.

१० चंद्राची–दशम भावावर दृष्टि असेल तर चतुष्पाद जनावरांपासून फायदा होईल; पुत्र, स्त्री व कुटुंबसुख मिळेल.

११ चंद्राची–एकादश भावावर दृष्टि असेल तर धनप्राप्ति होईल, व मनेच्छा पूर्ण होईल. पुत्र व स्त्रीपासून फार सुख मिळेल, शरीराची कांती सुवर्णाप्रमाणें राहील, पण सर्व सुख सावकाश मिळेल.



१२ चंद्राची–द्वादश भावावर दृष्टि असेल तर पितृसुख थोडें मिळेल, राजापासून यश मिळेल, आणि तो न्यायी व निरंतर चांगल्या वस्तूंचा सांठा करणारा होईल.

## मंगळाचीं दृष्टिफलें.

१ मंगळाची–प्रथम भावावर दृष्टि असेल तर एक स्त्री मरेल, स्त्रीसुख थोडें मिळेल, नेत्रांस उष्णतेपासून पीडा होईल, पायांस थोडी इजा होईल व पहिल्या पुत्राचा नाश होईल.

२ मंगळाची–द्वितीय भावावर दृष्टि असेल तर कुटुंबाचें सुख थोडें मिळेल, द्रव्यलाभ होईल, परंतु धनाचा नाशही होईल, पण तो सावकाश होईल व गुदस्थानी उपद्रव होईल.

३ मंगळाची–तृतीय भावावर दृष्टि असेल तर कुटुंबसुख थोडें मिळेल, राजापासून मान मिळेल व भावंडांचा नाश होईल.

४ मंगळाची–चतुर्थ भावावर दृष्टि असेल तर मातेला त्याच्या चौथ्या महिन्यांत पीडा होईल, व तो राजापासून व वाहनापासून किंचित् भय पावेल.

५ मंगळाची–पंचम भावावर दृष्टि असेल तर पहिल्या संततीचा नाश होईल, व जठराग्नि फार प्रदीप्त करील.

६ मंगळाची–षष्ठ भावावर दृष्टि असेल तर शत्रूंचा नाश होईल; त्याचप्रमाणें मातृपक्षाच्या सुखाचा अभाव, व शोणितानें किंवा शोणितपीडेनें शरीरास त्रास होईल.

७ मंगळाची–सप्तम स्थानावर दृष्टि असेल तर स्त्रीचा नाश होईल, रोग होईल, व स्त्रीपुत्रांचें सुख थोडें मिळेल.

८ मंगळाची—अष्टम भावावर दृष्टि असेल तर मूळव्याधीचा उपद्रव होईल, क्लेश भोगील, नेहमीं चिंताग्रस्त राहील, व धन व सुख यांपासून पराङ्मुख राहील.

९ मंगळाची—नवम भावावर दृष्टि असेल तर भाग्योदय होईल, मेहुण्यापासून सुख मिळेल, भ्रातृसुखाचा नाश होईल, व तो धर्मवान् व चांगल्या बुद्धीचा असा होईल.

१० मंगळाची—दशम भावावर दृष्टि असेल तर सर्व सिद्धी होईल, गृहसुख मिळेल, पराक्रमी होईल, पण स्वजन्मापासून पित्यास चौथ्या वर्षी पीडा होईल.

११ मंगळाची—एकादश भावावर दृष्टि असेल तर दीर्घायु जाणावा, मुलें होतील पण बहुतकरून जगणार नाहींत व गर्भपातही होतील, वृद्धावस्थेंत पुत्रसुख मिळेल, व त्याचप्रमाणें दुसरीं सुखें मिळतील.

१२ मंगळाची—द्वादश भावावर दृष्टि असेल तर स्वतःस अल्प सुख मिळेल, पण मातृसुख फार मिळेल, सर्व शत्रूंचा नाश होईल, व संतोषयुक्त राहील.

## बुधाचीं दृष्टिफलें.

१ बुधाची—प्रथम भावावर दृष्टि असेल तर व्यापारप्रिय होईल. वस्त्रालंकारादिकांपासून सुख मिळेल, व उदार असून गर्वरहित असा होईल.

२ बुधाची—द्वितीय भावावर दृष्टि असेल तर धनसंपत्तीचें पुष्कळ सुख मिळेल, व भाग्यवान् होईल.

३ बुधाची—तृतीय भावावर दृष्टि असेल तर भावंडांपासून सुख मिळेल, व्यापार करील, व नम्र असून तीर्थयात्रा करील.



४ बुधाची—चतुर्थ भावावर दृष्टि असेल तर मातृसुख मिळेल, राजापासून सुख मिळेल, व धनवान् होईल. वडिलोपार्जित धनाचा लाभ होईल व कांति सुंदर होईल.

५ बुधाची—पंचम भावावर दृष्टि असेल तर कन्या फार होतील, व चार मुली झाल्यानंतर मुलगा होईल; यशवान् व समृद्धिवान् जाणावा.

६ बुधाची—षष्ठ भावावर दृष्टि असेल तर मातृपक्षाकडील सुख मिळेल, व परक्याबरोबर वादविवाद करणारा असून शत्रु फार उत्पन्न होतील.

७ बुधाची—सप्तम भावावर दृष्टि असेल तर रूपवती स्त्री मिळेल, शरीरसुख मिळेल, दीर्घायु, व सर्व धातूंचा क्रयविक्रय करणारा होईल.

८ बुधाची—अष्टम भावावर दृष्टिअसेल तर हव्या तशा अरिष्टाचा नाश करील, राज्यकारभारापासून आपली उपजीविका करील, व पर्वताजवळ मृत्यु होईल.

९ बुधाची—नवम भावावर दृष्टि असेल तर फार सुखी होईल, भाग्यवान् व पर्यटन करणारा होईल, राजापासून मान मिळेल, व त्याराजापासून उपजीविका करील व पितृसुख मिळेल.

१० बुधाची—दशम भावावर दृष्टि असेल तर संसार चांगल्या रीतीनें करील, राजमान्य होईल, कीर्तिमान् होईल, व पितृसुख मिळेल.

११ बुधाची—एकादश भावावर दृष्टि असेल तर भाग्यवान् होईल, सर्व प्रकारचें सुख मिळेल, पुत्रसुख मिळेल व मोठा पराक्रमी होईल.

१२ बुधाची–द्वादश भावावर दृष्टि असेल तर विवाहादिक शुभ कामांत खर्च करणारा होईल, छातींत रोग होईल, त्याचप्रमाणें वायुपीडा होईल.

### गुरूचीं दृष्टिफलें.

१ गुरूची–प्रथम भावावर दृष्टि असेल तर स्त्रीसुख फार मिळेल, भाग्यवान् पुरुष होईल, धनसुख मिळेल व नेहमीं आपला पैसा शुभकार्यीं लावील.

२ गुरूची–द्वितीय भावावर दृष्टि असेल तर धनसुख मिळेल, पण पितृधनाचें सुख मिळणार नाहीं, त्याचप्रमाणें बापाचा धंदा न करितां दुसराच धंदा करणारा असा होईल व कुटुंबसुख मिळेल.

३ गुरूची–तृतीय भावावर दृष्टि असेल तर भावंडांचें सुख मिळेल, भाग्यवान्, धनवान् व सोनें, रुपें इत्यादिकांनीं परिपूर्ण होईल.

४ गुरूची–चतुर्थ भावावर दृष्टि असेल तर मातृपितृसुख मिळेल, बंधुजनसुख मिळेल, व फार यशस्वी होईल.

५ गुरूची–पंचम भावावर दृष्टि असेल तर संतानसुख फार मिळेल ( ९ पुत्र होतील, ) धनाचें, व त्याचप्रमाणें विद्येचें सुख मिळेल.

६ गुरूची–षष्ठ भावावर दृष्टि असेल तर शत्रु फार उत्पन्न होतील व त्यांपासून फार त्रास होईल, स्वगृहाचा नाश होईल, धननाश होईल, व मातेस पीडा होईल.

७ गुरूची–सप्तम भावावर दृष्टि असेल तर स्त्री चांगली, रूपवान् व सुखदेणारी अशी मिळेल, द्रव्यलोभी होईल व कामी पुरुष होईल.



८ गुरूची–अष्टम भावावर दृष्टि असेल तर आठव्या वर्षीं मृत्यु होण्याइतकी पीडा होईल, राजापासून भीति, स्त्रीसमागमानें द्रव्यनाश होईल व तसाच बुद्धिनाशही होईल.

९ गुरूची–नवम भावावर दृष्टि असेल तर धर्मशील होईल, शास्त्रप्रिय होईल, व नियमानें वागणारा असून पितृसुख फार मिळेल.

१० गुरूची–दशम भावावर दृष्टि असेल तर कर्मसिद्धि प्राप्त होईल, राजापासून मान मिळेल, पुत्र व स्त्रीसुख मिळेल, व वैभव भोगणारा असा होईल.

११ गुरूची–एकादश भावावर दृष्टि असेल तर दीर्घायु होईल, पुत्र, स्त्री, धन इ० सर्व सुख मिळेल. निरोगी राहील व मित्रसुख मिळेल.

१२ गुरूची–द्वादश भावावर दृष्टि असेल तर आपलें द्रव्य चांगल्या कर्मीं खर्चील, पण सर्व प्रकारची पीडा होईल, शत्रु उद्भवतील, व बुद्धीचा नाश होईल.

### शुक्राचीं दृष्टिफलें.

१ शुक्राची–प्रथम भावावर दृष्टि असेल तर शरीरसुख मिळेल, मोठा पराक्रमी होईल, व स्वरूपवान् होईल.

२ शुक्राची–द्वितीय भावावर दृष्टि असेल तर द्रव्यसुख मिळेल, कुटुंबसुख मिळेल, स्वपराक्रमानें द्रव्य मिळविणारा, व सुखी होईल.

३ शुक्राची–तृतीय भावावर दृष्टि असेल तर भाऊबहिणींचें सुख मिळेल, व कनिष्ट भावंड बधिर होईल, व राजापासून मान मिळेल.

४ शुक्राची–चतुर्थ भावावर दृष्टि असेल तर मातृसुख मिळेल, कर्मवान्, धर्मवान् होईल व चतुष्पादांचें सुख मिळेल.

५ शुक्राची–पंचम भावावर दृष्टि असेल तर पुत्र फार थोडे होतील, व कन्या फार होतील; धन व स्त्रीसुख मिळेल, व मोठा विद्वान् पण वाईट बुद्धीचा असा होईल.

६ शुक्राची–षष्ठ भावावर दृष्टि असेल तर मातृपक्षाचें सुख मिळेल, स्वपराक्रमानें भाग्यवान् होईल, परंतु किंचित् कष्टी असून शत्रु फार होतील.

७ शुक्राची–सप्तम भावावर दृष्टि असेल तर फार रूपवती स्त्री मिळेल, पहिला मुलगा होईल, व द्रव्यसुख मिळेल.

८ शुक्राची–अष्टम भावावर दृष्टि असेल तर नेहमीं व्याधिग्रस्त राहील, पैसा फार कष्टानें मिळवील व साधुसमागम करील.

९ शुक्राची–नवम भावावर दृष्टि असेल तर दीर्घायु होईल, कुटुंबवत्सल असून धनवान्ही होईल, शत्रुनाश करील, व कुलधर्मानें आचरणारा होईल.

१० शुक्राची–दशम भावावर दृष्टि असेल तर भाग्यशाली होईल, राजापासून यश मिळेल, व पैसा शुभमार्गाला लावील.

११ शुक्राची–एकादश भावावर दृष्टि असेल तर दीर्घायु होईल, धनवान् व कुलाचाराप्रमाणें वागणारा होईल.

१२ शुक्राची–द्वादश भावावर दृष्टि असेल तर विवाहादिक शुभकार्यांत पैसा खर्च करील, व पुत्र लवकर मरतील.



## शनीचीं दृष्टिफलें.

१ शनीची–प्रथम भावावर दृष्टि असेल तर तिसऱ्या वर्षीं शरीरास पीडा होईल, धन व मित्र यांचा नेहमीं नाश होईल, व शरीरास तापापासून दुःख होईल.

२ शनीची–द्वितीय भावावर दृष्टि असेल तर धननाश होईल, कुटुंबास शत्रु असा भासेल, व तेराव्या वर्षीं जलापासून घात होईल किंवा दगड लागून पीडा होईल.

३ शनीची–तृतिय भावावर दृष्टि असेल तर फार पराक्रमी व फार बलवान् होईल, बहिणी भावंडांचें दुःख होईल, व लाभ होतांना नुकसान होईल.

४ शनीची–चतुर्थ भावावर दृष्टि असेल तर पहिल्या वर्षीं शरीरास पीडा होईल, व आईबापांस चौथ्या वर्षीं पीडा होईल.

५ शनीची–पंचम भावावर दृष्टि असेल तर नेहमीं पुत्रनाश होईल, धननाश होईल पण शरीर निरोगी राहील.

६ शनीची–षष्ठ भावावर दृष्टि असेल तर शत्रूचा नाश करील, मातृपक्षाचें सुख मिळणार नाहीं, नेत्रांस व पायांस पीडा होईल किंवा परमा होईल.

७ शनीची–सप्तम भावावर दृष्टि असेल तर स्त्रीच्या शरीरास पीडा होईल, व ती पीडा मृत्युतुल्य होईल, पंडुरोग होईल व अतिसारादि पीडा होईल.

८ शनीची–अष्टम भावावर दृष्टि असेल तर चोरीचा आरोप येईल, दगड लागून पीडा होईल, राजापासून भीति व धननाश होईल.

९ शनीची–नवम भावावर दृष्टि असेल तर म्लेंच्छापासून भाग्योदय होईल, व बंधुजनाचें सुख मिळणार नाहीं.

१० शनीची–दशम भावावर दृष्टि असेल तर पितृसुख मिळणार नाहीं पण मातृसुख फार मिळेल, व स्वपराक्रमानें आपली उपजीविका करील.

११ शनीची–एकादश भावावर दृष्टि असेल तर वृद्धावस्थेंत पुत्रसुख मिळेल, व सर्व प्रकारचें सुख मिळेल.

१२ शनीची–द्वादश भावावर दृष्टि असेल तर वाईट मार्गाकडे पैसा लावील. स्त्रीपुत्रांपासून नेहमीं क्लेश भोगील, व अति कामी होईल.

## राहूचीं दृष्टिफलें.

१ राहूची–प्रथम भावावर दृष्टि असेल तर शरीरसुख फार थोडें मिळेल, वायूपासून शरीरास पीडा होईल, व रक्तदोषापासून पीडा होईल.

२ राहूची–द्वितीय भावावर दृष्टि असेल तर कुटुंबसुख मिळणार नाहीं, पाणी किंवा दगडापासून पीडा होईल, व आठव्या वर्षी शरीरास महापीडा होईल.

३ राहूची–तृतीय भावावर दृष्टि असेल तर स्वपराक्रमानें मनोरथ पूर्ण करून घेईल, व पुत्रसुख भोगील.

४ राहूची–चतुर्थ भावावर दृष्टि असेल तर त्यास मातृसुख मिळणार नाहीं, व म्लेंच्छापासून भाग्योदय होईल.

५ राहूची–पंचम भावावर दृष्टि असेल तर एकाच पुत्राचें सुख मिळेल, व थोड्याच श्रमांनीं मनोरथ पूर्ण होतील.

६ राहूची–षष्ठ भावावर दृष्टि असेल तर शत्रूंचा नाश होईल, त्याचप्रमाणें धननाश होईल व प्राप्तीच्या चौपट खर्च करील.



७ राहूची–सप्तम भावावर दृष्टि असेल तर तो मनुष्य फार कामी होईल, वाणी मधुर असेल व राहूचे महादशेंत बायको मरेल.

८ राहूची–अष्टम भावावर दृष्टि असेल तर वायूपासून पीडा होईल व नीच कर्म करून उपजीविका करील.

९ राहूची–नवम भावावर दृष्टि असेल तर भावंडांपासून किंचित् पीडा होईल. व स्वतःचें धन पुत्र चोरून नेतील.

१० राहूची–दशम भावावर दृष्टि असेल तर मातापित्यांचें सुख फार थोडें मिळेल.

११ राहूची–एकादश भावावर दृष्टि असेल तर दीर्घायु व धनवान् होईल.

१२ राहूची–द्वादश भावावर दृष्टि असेल तर वृत्ति नेहमीं आनंदी राहील, व शत्रु व रोग ह्यांचा नाश होईल. परंतु वाईट मार्गाकडे खर्च करील, व नेत्रांस पीडा होईल.

केतूचीं दृष्टिफलें–राहूप्रमाणेंच समजावीं.

## द्वादशभावविचार.

[ द्वादश भावांचें त्रोटक वर्णन सर्वार्थचिंतामणी ग्रंथांतून घेतलें आहे. द्वादश भावांचें संपूर्ण वर्णन सर्वार्थचिंतामणीचे भाषांतरांत येईल. पुस्तकाचा ह्यांचा लहान असल्यामुळें, आणि पत्रिकेचें वर्णन मुख्यत्वें करून ह्या द्वादश अंकांत देणें आहे म्हणून, भावविचार त्रोटक करणें जरूर पडलें. ]

## तनुभावविचार.

लग्नाधिपति उच्च, किंवा नवमांशकुंडलींत मित्रग्रहाचे घरीं, किंवा आपले नवमांशीं असेल तर, देहसौख्य उत्तम

मिळेल; त्याचप्रमाणें लग्नाधिपति शुभग्रहयुक्त किंवा शुभग्रहांनीं विलोकित असेल, तर देहसौख्य उत्तम मिळेल. त्याचप्रमाणें लग्नाधिपति केंद्रीं, ह्मणजे १।४।७।१० ह्या ठिकाणीं, आणि त्रिकोणीं, ह्म० ५।९ ह्या स्थानीं पापग्रहयुक्त नसेल तर सौख्य चांगलें मिळेल; जन्मलग्नाधिपति बलिष्ठ, षड्वर्ग कुंडलींत शुभग्रहाचे राशींत, किंवा उच्च असेल तर, किंवा मित्रग्रहांचे राशींत असेल तर, अथवा नवमांश कुंडलींत स्वराशीचा असेल तर, आणि त्याबरोबर जन्मलग्नकुंडलींत केंद्रभावराशीचा स्वामि शुभराशींत असेल तर, जन्मलेला मनुष्य भाग्यशाली, कीर्तिमान्, धन धान्य युक्त होतो आणि बहुत वर्षें जगतो.

जन्मलग्नाधिपति पापग्रहाबरोबर असेल तर, अथवा अष्टमस्थानीं असेल तर, शरीरास व्याधि होईल परंतु लग्नाधिपतीवर शुभग्रहाची दृष्टि असल्यास त्यास शरीरसुख कांहीं वर्षें चागलें लाभेल. सहा, आठ आणि बारा ह्या स्थानांचे स्वामिबरोबर जर लग्नाधिपति असेल तर जन्मणारा रोगी अथवा अशक्त राहील, आणि लग्नाधिपति निर्बळ असूनही जर केंद्रांत किंवा त्रिकोणांत असेल तर शरीरास सुख लाभेल. जन्मलग्नाचा स्वामी ज्या भावीं पडला असेल त्या भावांचा स्वामि जर ६।८ आणि १२ ह्या स्थानांत असेल तर शरीरास सुख लाभणार नाहीं. ह्या नियमाप्रमाणें आपला पिता, माता, भाऊ ह्यांचे आयुष्य पहावें. ह्मणजे दशमस्थानाचा अधिपती जर दशमस्थानापासून ६।८ आणि १२ ह्या भावांत असेल तर, अथवा दशमस्थानाचा स्वामि ज्या भावांत पडला असेल त्या राशीचा स्वामि जर ६।८ आणि १२ ह्या भावांत असेल तर, त्यास पित्याचें सुख चांगलें लाभणार नाहीं. त्याचप्रमाणें चतुर्थस्थानाचा स्वामि जर ६।८ आणि १२ ह्या स्थानीं असेल तर, किंवा चतुर्थस्थानाचा मालक ज्या राशींत बसला असेल त्या राशीचा स्वामि जर ६।८ आणि १२ ह्या स्थानांत असेल तर, मातेचें सुख लाभणार नाहीं. लग्नांत राहू, अथवा शनि, मंगळ राहूयुक्त असतील तर जन्मणारा मनुष्य वीर्यवान् ह्मणजे सदृढ असतो. लग्नाधिपति मंगळ असल्यास, आणि तो पापग्रहयुक्त असल्यास, शस्त्रघातानें मृत्यु होतो. शनि लग्नस्वामी असल्यास, आणि पापग्रहयुक्त असल्यास, त्याचे मस्तकास वायूचा विकार होतो, किंवा अग्नि, किंवा शस्त्र ह्यांचें चिन्ह मस्तकास असतें. जन्मलग्न कर्क, वृश्चिक किंवा मीन राशीचें असून तेथें शुभ ग्रह असतील तर शरीर चांगलें राहील. लग्नस्वामि जलग्रह बलिष्ठ असून त्याबरोबर शुभग्रह असेल तर शरीर पुष्ट राहील. लग्नस्वामी जलराशींत असून त्याबरोबर शुभ ग्रह असतील तर, त्याचप्रमाणें लग्नस्वामीवर जलग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा जन्मलग्न शुभराशीचें असेल तर, देहसौख्य चांगलें लाभेल. लग्नीं गुरु असेल, अथवा जलराशींतील गुरु लग्नावर पहात असेल, तर शरीर उत्तम राहील. जलराशीचे लग्नांत शुभ ग्रह असतील तर, अथवा जलराशीचे लग्नावर शुभ ग्रहांची दृष्टि असेल तर, देहसौख्य चांगलें लाभेल. लग्नीं राहू अथवा शनि असल्यास पिशाचबाधेपासून पीडा होईल. लग्नीं सूर्यावर मंगळाची दृष्टि असेल तर श्वास, क्षय आणि गुल्म रोग होतील. लग्नांत मंगळ असून त्यावर रवि आणि शनीची

दृष्टि असेल तर शस्त्रघात होईल. लग्नीं केतू आणि बरेच पापग्रह असतील तर भूतबाधा होईल. चरराशीचे लग्नावर जन्म झाला असेल तर, अथवा लग्नस्वामि चरराशींत असेल तर, जन्मणारा मनुष्य मुशाफर ह्मणजे भटकणारा होतो. जन्मलग्न चर आणि त्याचा नवमांश चर असेल तर जन्मलेल्या मनुष्यास प्रवासाची आवड राहील. जन्मलग्न चर, आणि लग्नाधिपति चरराशींत असून त्यावर चरग्रह विलोकीत असतील तर तो मनुष्य अन्य देशांत भाग्यास येतो.

स्थिरराशीचें लग्न स्थिर नवमांशांत असून त्यावर स्थिरग्रहांची दृष्टि असेल तर तो स्वदेशांत भाग्यास येतो, आणि त्यास बहु धनप्राप्ति होते. मिश्रग्रहांची दृष्टि द्विस्वभाव राशीचे लग्नावर असेल तर जन्मणारा मनुष्य भाग्यवान् होतो, परंतु तो कुमार्गी असतो. लग्नस्वामि बलिष्ठ किंवा उच्च असल्यास मनुष्य गंभीर असतो. लग्नस्वामी निर्बल असल्यास जड असतो. शुभ ग्रहाचे राशीचें जन्मलग्न असेल तर, आणि त्यावर शुभग्रह विलोकीत असेल तर, बाल्यावस्थेंत मनुष्य सुखी असतो. त्याचप्रमाणें पापग्रहाची राशी असून त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर तो मनुष्य बाल्यावस्थेंत दुःखी असतो. त्याचप्रमाणें लग्नांत जास्त पाप ग्रह असल्यास बाल्यावस्थेंत मरण येतें. जन्मलग्नस्वामी नवमांश कुंडलींत वर्गोत्तम राशीचा (जेव्हां कोणतीही राशी स्वनवमांश असते तेव्हां तीस वर्गोत्तम असें ह्मणतात.) अथवा उच्च असेल, आणि द्रेष्काण कुंडलींत आपले मित्रग्रहाचे राशींत असून जन्मकुंडलींत लग्नस्वामि शुभ



ग्रहांनीं विलोकित असेल तर तो मनुष्य धनवान् होऊन मरेल.

लग्नीं, द्वादश आणि एकादश भावांत शुभग्रह असून लग्नस्वामी बलवान्, केंद्रीं असतो तेव्हां, आणि गुरु सिंहासनांशांत असतो तेव्हां, प्रथम आणि मध्य आयुष्यांत सुख लाभतें. लग्नांत दोन अथवा तीन शुभग्रह, किंवा लग्नावर दोन तीन शुभग्रहांची दृष्टि असेल, आणि लग्नस्वामी शुभग्रह असेल, आणि शुक्र पारावतांशवर्गांत असेल, तर प्रथम आणि मध्य वयांत सुख लाभेल. गुरु केंद्रांत, आणि लग्नाधिपति बलिष्ठ अथवा पारावतांशांत असेल तर स्त्री, पुत्र, मित्र आणि धन यांनीं युक्त मनुष्य असतो. लग्नांत शुभ, धनस्थानांत पाप, असे ग्रह असून, केंद्रांतही शुभग्रह असल्यास अथवा लग्नाधिपति देवलोकांशांत असेल तर बाल्यावस्थेंत सुख आणि नंतर दुःख लाभतें. जन्मलग्नस्वामी धनभावांत असेल, अथवा नवांश कुंडलींत ज्या राशींत तो असेल त्या राशीचा स्वामी धनभावांत, अथवा एकादश भुवनाचा स्वामी धनभावांत असेल तर २० वर्षांनंतर सुख लाभतें.

जन्मलग्नाचा स्वामी नवांशकुंडलींत ज्या राशीचा असेल त्या राशीचा स्वामी जन्मकुंडलींत, केंद्रीं, त्रिकोणांत किंवा उच्च असेल, अथवा ११ वे भावाचा स्वामी केंद्रीं, त्रिकोणांत किंवा उच्च असेल, तर ३० वर्षांनंतर सुख लाभेल.

अष्टमभुवनाचा स्वामी जेव्हां जन्मलग्नाचे स्वामीपेक्षां बलिष्ठ असतो, अथवा केंद्रांत असतो, आणि आठ व बारा ह्या स्थानांत जेव्हां पापग्रह असतात, तेव्हां

जन्मणारा मनुष्य मध्यमायु समजावा. जास्त जगल्यास त्याचें आयुष्य दुःखांत जातें.

**द्वितीय भावावर**—धन, कुटुंब, मुख, वाणी, नेत्र व विद्या यांचा विचार करतात.

जन्मलग्नस्वामीबरोबर धनस्थानाचा अधिपति ६।८।१२ ह्या स्थानीं असेल तर नेत्रनाश होईल. धनभुवनाचा स्वामी लग्नांत शुक्र आणि चंद्रसहित असेल तर रातांधळें लागेल. सूर्य, चंद्र आणि लग्नस्वामी ह्यांबरोबर धनभावाचा अधिपति असेल तर तो जन्मांध होईल. त्याचप्रमाणें धन भुवनाचा स्वामी ६।८।१२ ह्या स्थानीं असेल तर जन्मांध असतो. द्वादशस्थानीं मंगळ असेल तर डाव्या नेत्रास विकार होईल, आणि १२ वे भावांत शनि असेल तर जन्मांध होईल; सिंहलग्नीं रवि आणि चंद्र असतील तर, आणि त्यावर शनि आणि मंगळ यांची दृष्टि असेल तर, मनुष्य आंधळा होतो. परंतु सूर्य अथवा चंद्र हे शुभग्रहयुक्त असतील तर, अथवा शुभ ग्रहांनीं विलोकित असतील तर, वरील योग होणार नाहीं आणि शुभ पापग्रह युक्त असतील अथवा त्यांचि दृष्टि असेल तर त्या मनुष्याचे डोळे अधू असतात.

धनभुवनाचा स्वामी शुभ ग्रहाबरोबर केंद्रांत असेल, अथवा स्वराशीचा किंवा उच्च असेल, अथवा मित्रग्रहाच्या राशींत अथवा शुभग्रहाच्या राशींत असेल, तर तो मनुष्य पुण्यवान्, कुटुंबरक्षण करणारा, बोलण्यांत चतुर आणि सुख भोगणारा असा असतो. धनभुवनाचा स्वामी गुरु, बुध किंवा शुक्र धनभावांत, अथवा ते ग्रह स्वगृहींचे किंवा उच्च असतील तर, अथवा



मित्रग्रहांच्या राशींत असतील तर, आपले कुटुंबाचें व मित्रवर्गाचें रक्षण करणारा मनुष्य होईल. धनभावाचा स्वामी पापग्रह, आणि त्याबरोबर पाप ग्रह असतील तर, अथवा त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा लग्नस्वामी दुर्बल असेल तर, त्या मनुष्यास आपले कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यास बहुत प्रयास पडतील व त्यास इतरांस मदत करतां येणार नाहीं. धनभुवनाचा स्वामी तिसरे भावांत असेल तर, आणि त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा नवम भावांत मेषराशीचा सूर्य असेल तर तो मनुष्य बहुत मनुष्यांचें पालनपोषण करतो आणि पृथ्वीपति होतो. धनभुवनाचा स्वामी नीचराशीचा असेल, किंवा धनभुवनाच्या स्वामीबरोबर पापग्रह असतील, अथवा धनभावावर पापग्रह पहात असतील, तर त्या मनुष्याचें भाषण कठोर ह्मणजे लोकांस अप्रिय वाटेल. धनभावाधिपति गुरूबरोबर अष्टमस्थानीं असल्यास जन्मणारा मुका असतो. धनभावाचा स्वामी पापग्रहाबरोबर असून तो दशमस्थानीं तूळराशीचे सूर्याबरोबर असेल तर त्या मनुष्याच्यानें सभेंत भाषण होणार नाहीं. केंद्रांत बुध, आणि धनभुवनाधिपति बलिष्ठ असेल, आणि धनभुवनांत किंवा तिसरे भुवनांत शुभग्रहाबरोबर शुक्र असेल, अथवा धनभावीं उच्च शुक्र असेल, तर तो मनुष्य उत्तम ज्योतिषी होतो. धनभावांत चंद्र, मंगळ असून त्यांवर बुधाची दृष्टि असेल तर, अथवा बुध केंद्रांत असेल तर, मनुष्य गणितविद्या जाणणारा होतो. गुरु केंद्रांत किंवा त्रिकोणांत असून, शुक्र मीनराशींत, अथवा बुध धनभुवनाचा स्वामी असेल तर मनुष्य

गणिती होतो. धनभुवनाचा स्वामी गुरु किंवा शुक्र असेल तर, आणि त्यावर सूर्य किंवा मंगळाची दृष्टि असेल तर, आणि ते मूळ त्रिकोणचे किंवा उच्च असतील तर, तो मनुष्य तर्कशास्त्र जाणणारा होतो. धनभुवनाचा स्वामी गुरु बलवान् असून त्यावर गुरु किंवा शुक्र पहात असतील तर तो मनुष्य व्याकरणी जाणावा. धनभुवनाचा स्वामी उच्च, शनि गोपुरांशांत आणि गुरु सिंहासनांशांत असेल तर जन्मणारा वेदांती जाणावा.

लग्नस्वामी धनभावांत, धनभावाचा स्वामी अकरावे भावीं, आणि अकरावे भावाचा स्वामी लग्नीं असेल तर त्या मनुष्यास भूमींतील द्रव्य मिळेल. धनभुवनाचा स्वामी दुर्बळ असून पापग्रहाबरोबर असेल तर, अथवा धनभुवनाचा स्वामी रवीबरोबर द्वादशस्थानीं असेल तर, अथवा धनभुवनाचा स्वामी नीच पापग्रहांनीं विलोकित असेल तर, राजदंडांनीं धनहानि होईल. १२ वे भावाचा स्वामी २ रे भावांत, आणि ११ वे भावाचा स्वामी १२ वे भावांत असेल तर, अथवा धनभावाचा स्वामी ६।८ आणि १२ ह्या स्थानीं, किंवा नीच असेल तर, राजदंड होईल. धनभावाधिपति, किंवा एकादश भावाचे अधिपतीबरोबर मंगळ असेल तर, किंवा मंगळाची दृष्टि असेल तर, किंवा ते क्रूर अंशांत, किंवा निर्बल असून पापग्रहयुक्त असतील तर, त्याचें द्रव्य चोरीस जाईल, अथवा अग्नींत नाश पावेल, अथवा राजदंडानें नाहींसें होईल. धनभुवनाचा नवमांशपति ६।८ आणि १२ वे स्थानीं पापग्रहयुक्त, अथवा क्रूर षष्ठ्यंशांत असेल तर मनुष्य निर्धन जाणावा. धनभाव, धनभावाचा स्वामी, आणि



लाभभावाचा स्वामी पापग्रहांबरोबर किंवा पापग्रहांनीं विलोकित असेल तर मनुष्य निर्धन जाणावा. द्वादशभावाचा स्वामी ज्या राशींत असेल त्या राशीचा नवमांशस्वामी धनभावाचे स्वामीसह असेल, अथवा त्यावर पहात असेल तर, अथवा नीच असेल, किंवा अस्तास गेला असेल तर, किंवा निर्बल असेल तर, किंवा पापग्रहाबरोबर केंद्रीं असेल तर, निर्धन जाणावा.

लग्नस्वामी धनभावांत, लाभस्थानाचा स्वामी दशमभावांत, आणि धनभावाचा नवमांशपति शुभग्रह असेल, तर तो मनुष्य फक्त नांवाचा श्रीमान् असेल ह्मणजे जहागिरदार असून भिकारी राहील.

**तृतीयभावावर**–बंधु, पराक्रम, औषध, सहाय, छाती, आणि कान ह्यांचा विचार होतो.

तिसरे भावाचा स्वामी आणि मंगळ अष्टमस्थानीं असतील तर, आणि त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर, सहोदरांचा नाश होतो. तिसरे भावाचा स्वामी नवांशकुंडलींत ज्या राशींत बसला असेल त्या राशीचा स्वामी जन्मकुंडलींत अष्टमस्थानीं असून तो नीच राशीचा असेल, अथवा शत्रूचे घरीं अथवा अस्तास गेला असेल, तर बंधूचा नाश होईल. तिसरे भावाचा स्वामी शनि अथवा केतू युक्त असेल तर, आणि त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा तो नीच राशीस असेल तर, बंधुनाश होईल. तिसरे भावांत कोणीही पापग्रह असल्यास बंधुनाश होतो. तिसरे भावांत शुभग्रह असेल तर, अथवा तिसरे भावाचा स्वामी शुभग्रहांनीं विलोकित असेल तर, अथवा त्या भावाचा स्वामी बलिष्ठ असेल तर बंधुसुख लाभेल. तिसरे

भावाचा स्वामी तिसरे भावीं असेल तर, किंवा उच्च, अथवा स्वगृहींचा, किंवा मूळ त्रिकोणचा असेल तर सहोदर होतील. तिसरे भावाचा मालक षष्ठ्यंशांत मृदु अंशांत असेल तर, किंवा त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा शुभग्रहयुक्त असेल तर, सहोदर होतील. लग्नस्वामी आणि तिसरे भावाचा स्वामी परस्पर मित्र असतील तर सहोदरप्राप्ति होईल, आणि ते मित्राप्रमाणें वागतील; परंतु लग्नस्वामी आणि तिसरे भावाचा स्वामी शत्रुक्षेत्रीं असतील तर ते एकमेकांत कलह करतील.

तिसरे भुवनाचा कारकग्रह नवमांशकुंडलींत जर समराशींत असेल तर, त्याचप्रमाणें जन्मलग्नकुंडलींत सम राशींत असेल तर, आणि तिसरे भावाची राशीही सम असल्यास, आणि तेथें शुक्र किंवा चंद्र पहात असतील तर भगिनीपासून सुख लाभेल.

जन्मकुंडलींत अथवा नवमांशकुंडलींत तिसरे भावाचा स्वामी आणि कारकग्रह, बुध किंवा शनीचे राशींत असेल तर, आणि तिसरा भाव हा शनीची राशि असेल तर, अथवा त्यावर शनि, बुध पहात असतील तर नपुंसक सहोदर होईल असें जाणावें.

तिसरे भावाचा स्वामी उच्च किंवा बलवान् असून केंद्रांत किंवा त्रिकोणांत असेल तर, आणि तेथें शुभग्रह असतील तर, अथवा शुभग्रहांनीं विलोकित असेल तर, अथवा तिसरे भावाचा स्वामी स्वगृहींचा, अथवा मित्रक्षेत्रींचा असेल, अथवा वैशेषिकांशांत असेल तर, ह्मणजे वैशेषिकांचें बल त्यास आलें असेल तर, जन्मलेला मनुष्य महा धैर्यवान् असतो. तिसरे भावाचा स्वामी नवमांशकुंडलींत



शुभ ग्रहाचे राशींत असेल तर, किंवा जन्मलग्नकुंडलींत शुभग्रहयुक्त असेल तर, तो पुरुष धीरवान् होईल, आणि त्याचप्रमाणें कारकग्रह असतील तर तो पुरुष शूर, वीर होईल. तिसरे भावाचा स्वामी उच्च किंवा स्वगृहींचा अष्टमस्थानीं, अथवा कारकग्रह बलहीन असून षष्ठ्यंश कुंडलींत क्रूर षष्ठ्यंशांत असतील तर युद्धांत पराजय होईल.

तिसरे भावाचा स्वामी गुरूबरोबर लग्नीं असेल तर तो मनुष्य जनावराकडून भय पावेल; ह्मणजे त्यास जनावराकडून जखम होईल. त्याचप्रमाणें तिसरे भावाचा स्वामी गुरूबरोबर कर्क, वृश्चिक, मीन ह्या लग्नीं असेल तर जलघाताची भीति जाणावी.

जन्मकुंडलींत राहू ज्या राशींत असेल त्या राशीच्या स्वामीबरोबर तिसरे भावाचा स्वामी असेल तर, आणि लग्नीं राहू असेल तर, सर्पपीडा होईल. आणि तिसरे भावाचे स्वामीबरोबर बुध असेल तर गलरोग ह्मणजे गळ्यास रोग होईल. तिसरे भावांत ग्रह नीच असेल तर, आणि सहावे भावांत ग्रह अस्तास गेलेले असतील तर, अथवा तिसरे भावावर पापग्रहाची दृष्टि असेल तर, विषारी औषधांचा प्रयोग होईल किंवा विषबाधा होईल. शुक्र बलवान् असेल तर, अथवा चंद्र बलवान् असेल तर, अथवा शुभग्रहयुक्त असतील तर, अथवा चंद्र, शुक्र तिसरे भावीं असतील तर, अथवा ते स्वगृहींचे किंवा उच्च आणि नवमांशकुंडलींत मित्रग्रहांचे राशींत असतील तर, सोनें, रुपें, यांचीं भूषणें प्राप्त होतात.

चतुर्थभावावर—आई, मित्र, बंधु, घर, स्थान, वाहन आणि सुख यांचा विचार करतात.

जन्मकुंडलींत, लग्नस्वामी चवथे भुवनाचे स्वामीसह लग्नीं असेल तर, अथवा चवथे भावीं असेल तर, त्या मनुष्यास घराचा लाभ होईल. चवथे भावाचा स्वामी बलिष्ठ केंद्रांत असेल तर, अथवा शुभग्रहांनीं युक्त किंवा विलोकित असेल तर, घराचा लाभ होईल. जन्मकुंडलींत चवथे भावाचा स्वामी नवमांशकुंडलींत ज्या राशींत असेल त्या राशीचा स्वामी जन्मकुंडलींत केंद्रांत असेल तर घराचा लाभ होईल. जन्मकुंडलींत तिसरे भावीं शुभ ग्रह आणि चतुर्थ भुवनाचा स्वामी स्वगृहींचा असून संपूर्ण बलवान् असेल तर किल्ल्याप्रमाणें मजबूत घरांत राहील. जन्मकुंडलींत चवथे भावाचा स्वामी, आठवे भावांत असून त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर त्याचे घराचा नाश होईल. त्याचप्रमाणें चतुर्थ भुवनाचा स्वामी नवमांशकुंडलींत ज्या राशींत असेल त्या राशीचा स्वामी जन्मकुंडलींत ८ वे स्थानीं असेल तर त्याचे घराचा नाश होईल.

चतुर्थ स्थानांत गुरु असेल तर, अथवा अन्य शुभ ग्रह असतील आणि त्यांचे दोहोंबाजूस ह्मणजे तिसरे भावांत आणि पंचम भावांत शुभ ग्रह असतील, आणि ते, लग्नाधिपतीपेक्षां जास्त बलिष्ठ असतील तर, त्या मनुष्यास सुख आणि सर्व जनांत मान मिळेल. चतुर्थ भावांत बलहीन गुरु पापग्रहयुक्त असेल त्या मनुष्यास द्रव्याभावामुळें दुःख होईल.

चंद्र अथवा शुक्र बलवान् असून त्यावर शुभ ग्रह पहात असतील तर, आणि चंद्र, शुक्र नवमांशकुंडलींत शुभ ग्रहाच्या राशींत असतील तर, किंवा चंद्र, शुक्र केंद्रांत असतील तर, किंवा चतुर्थस्थान शुभ ग्रहाची राशि असेल तर, त्या मनुष्याची माता दीर्घायु ह्मणजे बहुत वर्षें जगेल.



जन्मलग्नकुंडलींत चंद्र अथवा शुक्र ह्यांपासून सप्तमस्थानीं पापग्रह असल्यास मातेचें आयुष्य थोडें आहे असें समजावें. चतुर्थस्थानीं शनि पापग्रहांनीं युक्त किंवा विलोकित असेल तर मातृसुख थोडें लाभेल.

चतुर्थस्थानीं शनि, मंगळ आणि राहू असून कोणताही शुभग्रह नसेल तर, किंवा चतुर्थस्थानाधिपतीबरोबर शनि, मंगळ आणि राहू कोणतेही भावीं असतील तर, त्या मनुष्याचे अंतःकरणांत कपट राहील. चतुर्थस्थानीं शुभ ग्रह असून तो स्वगृहींचा, किंवा मित्रक्षेत्रींचा, किंवा उच्च असेल, अथवा चतुर्थभावाची राशि शुभग्रहाची राशि असेल, तर मनुष्य निष्कपटी असतो. चतुर्थस्थानीं राहू असून त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर अंतःकरणांत कपटी असून बाह्यात्कारीं गोड बोलणारा असा मनुष्य असतो. चतुर्थस्थानाचा स्वामी आणि लग्नस्वामी मित्रक्षेत्रीं असतील तर जन्मणारा मनुष्य आणि त्याची आई ह्यांत सौख्य राहील. तेच शत्रुक्षेत्रीं असतील तर त्यांत कलह होतील. चतुर्थस्थानाचा स्वामी बलवान् चतुर्थभुवनांत असून शुभग्रहयुक्त किंवा विलोकित असेल तर त्यास वाहनसुख ह्मणजे पालखी, मेणा, गाडी, अश्व इत्यादिकांचें सुख लाभेल. चतुर्थस्थानाचा अधिपति शुभग्रहसहित चतुर्थ भुवनांत असेल तर शस्त्र, भांडार, घोडा इत्यादिकांचा संग्रह होतो. चतुर्थस्थानाचा स्वामी ११ वे भावीं बलिष्ठ असेल, अथवा चतुर्थस्थानीं

मंगळासह असेल तर, अथवा मंगळाचे राशींत असेल तर राजापासून धन, भूषणें आणि वाहन युक्त असतो. जन्मलग्नकुंडलींत केंद्रांत सर्व शुभग्रह असून पापग्रह ३।६ आणि १२ ह्या स्थानीं असेल तर त्यास सिंहासनप्राप्ति होते. चतुर्थस्थानाचा स्वामी द्वादशभावीं असेल तर जन्मणारा आपले बापाचा देश ( राहण्याचें ठिकाण ) सोडून अन्य प्रदेशांत जाईल. त्याचप्रमाणें चतुर्थस्थानाचा अधिपति आठव्या भावांत असेल तर स्वतःचे पराक्रमावर घर बांधील.

**पंचमभावावर**—पुत्र, बुद्धि इत्यादिकांचा विचार करतात.

जन्मकुंडलींत चतुर्थस्थानांत सूर्य असेल तर बापाचें धन भोगणारा होईल. पंचमभावांत चंद्र असेल तर माता मरेल. पंचमभावीं शुभग्रह असेल तर, अथवा पंचमभावाचा स्वामी शुभग्रह असेल तर, पुत्रप्राप्ति होईल. धनभावाचा स्वामी बलवान् पंचमभावीं असेल तर, आणि त्यावर गुरूची दृष्टि असेल तर, पुत्रप्राप्ति होईल. जन्मलग्नस्वामी आणि पंचमभावाचा स्वामी केंद्रीं असून त्याबरोबर शुभग्रह असेल तर, आणि धनभुवनाचा स्वामी बलवान् असेल तर, पुत्रप्राप्ति होईल. लग्नस्वामी आणि पंचमभावाचा स्वामी हे परस्परांस पहात असतील तर पुत्रप्राप्ति होईल. पंचमभावाचा स्वामी नवमांशकुंडलींत ज्या राशींत असेल त्या राशीचा स्वामी जन्मलग्नकुंडलींत शुभग्रहसहित अथवा विलोकित असेल तर पुत्रसुख लाभेल. पंचमभावाचा स्वामी ६।८ आणि १२ ह्या स्थानीं असेल तर, अथवा पंचमभावाचे स्वामीवर



पापग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा पंचमभावाचा स्वामी षष्ठ्यंशांत क्रूरभागांत असेल तर, पुत्र होऊन त्याचा नाश होईल. जन्मकुंडलींत चंद्र दशमभावांत, शुक्र सप्तमभावांत आणि बाकी सर्व पापग्रह चतुर्थस्थानांत असतील तर त्या पुरुषाचे वंशाचा नाश होतो. पापग्रह १२।५।८ ह्या स्थानीं असतील तर मनुष्य निर्धनी आणि वंशरहित असतो. लग्नीं गुरुसहित चंद्र आणि सप्तमस्थानांत शनि, मंगळ, आणि बाकीचे पापग्रह चतुर्थस्थानीं असतील तर वंशनाश होईल. लग्न, द्वादश, पंचम, अष्टमभावांत पापग्रह असतील तर वंशक्षय होईल. पंचमभावाची राशि शुक्राची असल्यास आणि तेथें शुक्र किंवा चंद्र असल्यास कन्यासंतति होईल.

पंचमभावाचा स्वामी शुभग्रह असून त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा शुभग्रहयुक्त असेल तर, अथवा पंचमभावाची राशि शुभग्रहाची असेल तर, त्या मनुष्याची बुद्धि आणि नीति चांगली असते.

पंचमभावाचा स्वामी नवमांशकुंडलींत ज्या राशींत असेल त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर अथवा तो ग्रह वैशेषिकांशवर्गांत असेल तर, तो मनुष्य तीक्ष्ण बुद्धीचा जाणावा.

पंचमभावाचा स्वामी शुभग्रहसहित केंद्रांत असेल आणि तो शुभग्रह उच्च असेल तर जन्मलेल्या मनुष्याची स्मरणशक्ति चांगली आहे असें समजावें. पंचमभावीं पापग्रह असेल तर, अथवा पंचमभावाचा स्वामी पापग्रहयुक्त असेल तर, अथवा पंचमभावाचा स्वामी षष्ठ्यंशकुंडलींत क्रूर अंशांत असेल तर, बुद्धिहीन समजावा.

पंचमभावाचा स्वामी नीच अथवा अस्तास गेला असेल तर, अथवा त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर, किंवा षष्ठ्यंशांत क्रूर अंशांत असेल तर, बुद्धिहीन समजावा. लग्नाचा स्वामी आणि पंचमभावाचा स्वामी परस्परांस विलोकित असतील तर, अथवा नवमांशकुंडलींत परस्परांचे घरांत असतील तर, पुत्र नम्र असतात. पंचमभावाचा स्वामी ६।८।१२ ह्या स्थानीं असून त्यावर लग्नस्वामीची दृष्टि असेल तर, अथवा राहू, मंगळ हे विलोकित असतील तर, पुत्र बापाची कीर्ति आणि लौकिक मलीन करतील. पंचमभावीं गुरु, शुक्र, असतील अथवा त्याबरोबर सूर्य असेल तर, अथवा पंचमभावाची राशि वरील तीन ग्रहांपैकीं एकाची असेल तर, त्या मनुष्याचा पुत्र पराक्रमी असतो. तिसरे भावाचा स्वामी तिसरे भावांत असून पंचमभावाचा स्वामी चवथे स्थानांत असेल तर, आणि तेथें शुभग्रह उच्च असेल तर, पुत्र पराक्रमी होईल.

षष्ठभावावर—रोग, शत्रु, मातुलसुख, दुःख, चोर, रस ह्यांचा विचार होतो.

जन्मलग्नकुंडलींत सहावे स्थानाचा स्वामी पापग्रहयुक्त लग्नीं असेल तर, अथवा आठवे भुवांनत असेल तर, त्यास व्रणरोग होतो; त्याचप्रमाणें दशमभावांत शुभग्रहयुक्त जरी सहावे स्थानाचा स्वामी असेल तरी व्रणरोग होतो. माता, पिता, पुत्र ह्यांचे स्थानापासून वरील नियमाप्रमाणें त्यांस व्रणरोग होईल असें समजावें. वरील योगांत रवि ग्रह असेल तर मस्तकांत व्रण होईल. चंद्र मुखांत, बुध कानांत,गुरु नाकांत, शुक्र गुह्यस्थानांत, शनि हातांत,



राहु पायांत, केतू असेल तर कुक्षींत, व्रणरोग होतो. लग्नाधिपति आणि त्याचप्रमाणें मंगळ, बुध हे दोन्ही ग्रह एकत्र चतुर्थभुवनांत अगर व्ययभुवनांत असतील तर, आणि सहावे भुवनावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, त्यास अपान वायूचा विकार होतो. चंद्र, बुध, राहु, अथवा केतु आणि लग्नस्वामी चतुर्थ अथवा बारावे भुवनांत एकत्र असतील तर, आणि त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, कुष्ठरोग होईल. ह्या नियमाप्रमाणें लग्नस्वामीखेरीज अन्य ग्रह चंद्र, बुध, राहु, अथवा केतु वरील स्थानांत असले तरी कोड होतो. आई, बाप, स्त्री, पुत्र ह्यांचे भुवनापासून वरील योग वर दर्शित केल्याप्रमाणें दिसत असतील तर त्यांसही वरील रोग होतील असें जाणावें. वरील योगांत लग्नस्वामी मंगळ असेल तर पित्त, शनि असेल तर शीत, आणि सूर्य असेल तर रक्तकुष्ठ त्या त्या स्थानीं होईल असें समजावें. लग्नस्वामी आणि सहावे भावाचा स्वामी सूर्य किंवा चंद्र याबरोबर असतील तर तापापासून पीडा होईल, मंगळाबरोबर असतील तर जलघात अथवा युद्धांत जखम होईल, किंवा फोड येतील किंवा मेंदू खराब होईल.

लग्नस्वामीबरोबर अथवा सहावे भावाचे स्वामीबरोबर बुध असेल तर चित्तास विकार होईल. गुरूबरोबर असेल तर व्याधिरहित असेल, शुक्राबरोबर असेल तर स्त्रीसंबंधी पीडा, आणि शनि असेल तर नीच प्रकारचे वायुविकार होतील; राहू किंवा केतू बरोबर असेल तर सर्प, चोर, अग्नि अथवा वायू यांचें भय उत्पन्न होतें.

सहावे भावाचा स्वामी बुधसहित लग्नीं असेल तर

इंद्रियास रोग होतो. सहावे भुवनाचा स्वामी मंगळयुक्त लग्नीं असेल तर, आणि तेथें राहु असेल तर, इंद्रियास रोग होऊन इंद्रियाचा नाश होईल. सप्तम स्थानाचा स्वामी शुक्रसहित सहावे भुवनांत असेल तर स्त्रीस संतति होणार नाहीं. सहावे भुवनाचा स्वामी आणि शनि लग्नस्वामीसहित केंद्र अथवा त्रिकोण स्थानांत असतील तर तो मनुष्य बंदीखान्यांत पडेल, आणि राहु केतुयुक्त असेल तर तो बंदीखान्यांत पडून त्यास बेड्या घालतील. माता, पिता, पुत्र आणि स्त्री यांचे कारक ग्रह अथवा त्यांचे स्थानापासून वर लिहिलेल्या नियमाप्रमाणें केंद्रांत अथवा त्रिकोणांत योग होतील तर त्यांसही बंधनयोग समजावा. उदाहरणार्थ पित्याचे भुवनापासून सहावे भावाचा स्वामी अथवा पितृस्थानाचा कारक ग्रह शनि, राहुसहित केंद्रांत किंवा त्रिकोणांत असतील तर पित्यास बंधनयोग होईल. हे योग त्या त्या ग्रहांच्या महादशेंत किंवा अंतर्दशेंत होतात.

नवमस्थानांत शनि, तिसरे भुवनांत गुरु, अथवा सूर्य अष्टमभावांत किंवा १२ वे भावांत असेल तर हात कापले जातील. चंद्र सातवे किंवा आठवे स्थानीं असून तेथेंच मंगळ अथवा गुरु असतील तर हात कापले जातील. दशम भावांत राहु, शनि, बुध असतील तर त्यांचे महादशेंत, अंतर्दशेंत, पाय कापले जातील. त्याचप्रमाणें दशम भावांत मंगळ, शनि, राहु असून तेथें जर रवि, शुक्र, गुरु, पहात असतील तरीही पाय कापले जातील असें समजावें.

द्रेष्काणकुंडलीचा लग्नस्वामी आणि जन्मलग्नकुंडलींतील आठवे भुवनाचा स्वामी शनि राहुसहित अथवा केतुसहित असेल तर बंधनयोग होतो.



सहावे भावाचा स्वामी सहावे भावीं, आठवे भावीं किंवा १२ वे भावीं बसला असेल तर, अथवा नीच असेल किंवा अस्तास गेला असेल तर, अथवा शत्रूचे घरीं असेल तर, आणि लग्नाधिपति बलवान् असेल तर शत्रूंचा नाश होईल. सहावे भावाचा स्वामी शुभग्रहसहित शुभग्रहांच्या राशींत असेल तर, आणि त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, शत्रूबरोबर मित्रता होईल. लग्नस्वामी सहावे भावीं असून त्यावर सहावे भुवनाचा स्वामी पहात असेल तर, किंवा दोन्ही ग्रह लग्नीं असतील तर, त्यास *स्वज्ञातीपासून त्रास होईल. गुरु शुक्र लग्नीं असून त्यासह सहावे भुवनाचा स्वामी असेल तर, आणि त्यावर शनि किंवा मंगळ यांची दृष्टि असेल तर, स्वज्ञातीपासून त्रास होईल. लग्नस्वामी पारावतांशबल पावला असेल तर, आणि त्यास शुभग्रह पहात असतील तर, आणि सहावे भुवनाचा स्वामी निर्बल असेल तर, स्वज्ञातीवर उपकार करणारा मनुष्य होईल. नवमस्थानाचा स्वामी सहावे भुवनांत असेल तर, आणि त्यावर सहावे भुवनाचा स्वामी पहात असेल तर, आणि सहावे भुवनाचा स्वामी मंगळ आणि शनिसहित असेल तर, चोर आणि अग्नि यांपासून पीडा होईल. सहावे भुवनाचा स्वामी गोपुरांशबली असेल तर, आणि त्यावर सूर्य पहात असेल तर, आणि लग्नस्वामी बलवान् असेल तर, स्वज्ञातीवर उपकार करील. सहावे भुवनाचा स्वामी गुरु अथवा शुक्र असून तो गोपुरांशवर्गीं असेल तर त्या

मनुष्याची प्रीति मिष्टान्नावर राहील. सहावे भावीं शुक्र, अथवा बुध असून त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, आणि बुध, शुक्र बलवान् असतील तर, आणि नवमांश-कुंडलींत शुभग्रहाच्या राशींत असतील तर, मिष्टान्न नेहमीं मिळेल. सहावे भावीं शुक्र असून, त्यावर मंगळाची दृष्टि असेल तर, अथवा सहावे भावीं मंगळ असेल तर, आंबट खाण्याची इच्छा होईल. सहावे स्थानाचा स्वामी मंगळसहित असेल, अथवा मंगळाचे घरीं असेल, आणि त्यावर राहु केतूची दृष्टि असेल, तर तो मनुष्य ठकबाजी, चोरी करील.

सप्तमभावावर—विवाह, स्त्री, गमन, आगमन ह्यांचा विचार होतो.

जन्मकुंडलींत सप्तमभावीं शुक्र असेल तर तो मनुष्य कामी असतो. बुध सप्तमस्थानीं असेल तर परस्त्री-आसक्त होईल, गुरु असेल तर स्वस्त्रीबरोबर आसक्त राहील, व शनि असल्यास कुस्त्रीबरोबर रत होतो. सप्तमस्थानाचा स्वामी शुभग्रह असेल तर स्त्री चांगली मिळेल. मंगळ सप्तमस्थानीं असेल तर बहुत स्त्रियां-बरोबर व्यभिचार करील. रवि असेल तर कुटुंबांत व्यभिचार करील. २।७ आणि ६ ह्या भावांचा स्वामी लग्नीं शुक्राबरोबर असेल तर, अथवा पापग्रहाबरोबर असेल तर, कुमार्गी आणि परस्त्री रत होईल. परंतु शुभग्रहाची दृष्टि असेल तर हा योग होणार नाहीं. सप्तमस्थानाचा स्वामी राहू अथवा केतू बरोबर असेल तर, अथवा त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर, तो पुरुष व्यभिचारी जाणावा. दशमभाव, धनभाव यांचे



अधिपति दशमभावीं असतील तर तो पुरुष जार समजावा. पंचमभावाचा स्वामी आणि सप्तमभावाचा स्वामी हे बलवान् असतील, अथवा सहावे भावाचा स्वामी त्यावर पहात असेल, अथवा युक्त असेल, तर तो पुरुष परस्त्री गमन करतो. दशमभाव, धनभाव आणि सप्तमभाव ह्यांचे स्वामींपैकीं एकही ग्रह चतुर्थ-स्थानीं असेल तर तो पुरुष व्यभिचारी समजावा. सातवे भावाचा स्वामी पापग्रहाबरोबर धनभावीं असेल तर, आणि मंगळाची सप्तमस्थानावर दृष्टि असेल तर, त्यास जार-पुत्र होईल. सप्तमस्थानाचे स्वामीबरोबर पंचम आणि नवम भावांचे अधिपति असतील तर, आणि ते ६।८ आणि १२ ह्या स्थानीं असतील तर, त्याचप्रमाणें बल-हीन असून शुभग्रहाची पंचमदृष्टि त्यावर असेल तर, त्यास स्त्रिया बहुत होतील परंतु पुत्र होणार नाहीं.

पंचमस्थानाचा स्वामी सातवे भावीं असेल, आणि सातवे भावाचा स्वामी पापग्रहाबरोबर असून शुक्र बल-हीन असेल, तर स्त्री गर्भिणी होऊन मृत्यु पावेल. शुक्र नीच किंवा चंद्र नीच असेल तर स्त्रीस जलघात होईल. सप्तमभावाचा स्वामी राहुकेतुसहित द्रेष्काणकुंडलींत सप्तमभावीं असेल तर स्त्री विषाचे विकारानें मृत्यु पावेल. सप्तमस्थानाचा स्वामी शुभग्रहाबरोबर असेल, आणि तो नीच राशीचा अथवा शत्रूचे घरचा असेल, आणि सातवे स्थानांत पापग्रह असेल, तर त्याचीं दोन लग्नें होतील. धनस्थान अथवा सप्तमस्थान ह्या स्थानीं पापग्रह असून त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर, आणि धन आणि सप्तम भावाचे स्वामी बलहीन असतील तर, दुसरी

स्त्री होईल. सप्तमस्थान त्याचप्रमाणें अष्टमस्थान ह्या स्थानीं पापग्रह असून मंगळ बारावे स्थानीं असून जर सप्तम आणि अष्टम स्थानाचे स्वामी त्यावर पहात नसतील तर द्विभार्य होईल. धनस्थानांत पापग्रह असतील तर, अथवा सातवे भावांत पापग्रह असतील तर, आणि धनभाव आणि सप्तमभाव यांचे स्वामींवर पापग्रहांची दृष्टि नसेल तर तीन स्त्रिया होतील.

लग्नस्वामीबरोबर बुध दशमांत बलिष्ठ असेल तर, आणि सप्तमभावाचे स्वामीबरोबर चंद्र तिसरे भुवनांत असेल तर, त्यास बहुत स्त्रिया प्राप्त होतील. नववे भुवनाचा स्वामी सातवे भावीं असून सातवे भुवनाचा स्वामी चवथे भुवनांत असेल तर, अथवा अकरावे भुवनाचा स्वामी आणि सातवे भुवनाचा स्वामी केंद्रांत असतील तर बहुत स्त्रिया होतात, अथवा अस्तास गेले असतील तर विवाहानंतर भाग्यनाश होईल. सप्तमभावीं गुरु किंवा शुक्र पहात असतील तर स्त्री गुणवती व रूपवती मिळेल. सप्तमस्थानीं पापग्रह असतील तर उलट वर्णनाची स्त्री मिळेल. सप्तमस्थानीं सूर्य असेल तर तो पुरुष वंध्या स्त्रीबरोबर व्यभिचार करील, चंद्र असेल तर दासीसमान स्त्रीबरोबर व्यभिचार करील, मंगळ असेल तर रजस्वला अथवा वंध्या स्त्रीबरोबर व्यभिचार करील, बुध असल्यास वैश्यस्त्रीबरोबर, गुरु असेल तर ब्राह्मणस्त्रीबरोबर, शुक्र असेल तर गर्भिणी स्त्रीबरोबर, शनि, राहु आणि केतु असतील तर नीच जातीचे स्त्रीबरोबर व्यभिचार करील. चार केंद्रांत पापग्रह असतील तर, अथवा चारही केंद्रांवर पापग्रहाची दृष्टि असेल तर, पशूप्रमाणें मैथुन करील, किंवा केंद्रांत आणि त्रिकोणांत पापग्रह असतील तर पशूप्रमाणें मैथुन करील. शनि, चंद्र पापग्रह युक्त असतील तरीही वरील प्रमाणें जाणावें. सप्तमस्थानाचे स्वामीवर शुक्राची दृष्टि असेल तर, अथवा तो मंगळाचे राशींत असेल तर, अथवा सप्तमभुवनाधिपतीबरोबर शुक्र असेल तर भगचुंबन करणारा मनुष्य असतो.



मंगळ सप्तमस्थानीं असेल तर स्त्रीचें स्तन लहान असतात. शनि, राहु असतील तर स्तन लांब असतात. सूर्य असल्यास उंच स्तन असतात. बाकीचे ग्रहांतून कोणताही ग्रह असेल तर स्तन मोठे व चांगले असतात. सप्तमस्थानीं पापग्रह पुष्कळ असतील तर, अथवा आठवे भावांत असतील तर, किंवा ६ वे भावांत असतील तर, किंवा षष्ठ्यंशकुंडलींत क्रूरभागांत असतील तर, मूत्रकृच्छ्ररोग होतो.

सातवे भावाचा स्वामी केंद्रांत असून त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा नवमांशकुंडलींत शुभग्रहाच्या राशींत असेल तर, अथवा जन्मलग्नकुंडलींत शुभग्रहाचे राशींत असेल तर, स्त्री पतिव्रता जाणावी. सातवे भावाचा स्वामी, सूर्य नवमांशकुंडलींत पापग्रहाचे राशींत असतील तर, आणि जन्मलग्नकुंडलींत सूर्य पापग्रहयुक्त असेल तर, त्याची स्त्री पापिणी समजावी.

सप्तमस्थानाचा स्वामी, व सूर्य बलवान् असून शुभग्रहयुक्त असतील तर, अथवा नवमांशकुंडलींत शुभग्रहाचे राशींत असतील तर, अथवा जन्मकुंडलींत त्यांवर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा लग्नाधिपति रवीचा मित्र असेल तर, स्त्री पतीची भक्ति करणारी जाणावी. सप्तमस्थानाचा

स्वामी शुक्र पापग्रहसहित असून तेथें जर नीच ग्रह असेल तर, अथवा शुक्र नीच असेल तर, अथवा अस्तास गेला असेल तर, अथवा षष्ठ्यंशकुंडलींत क्रूरांशांत असेल तर, स्त्री वेश्यासमान मनाची कठोर आणि चोर जाणावी. लग्न, द्वितीय, आणि सप्तम भावीं शुभग्रह असतील तर, आणि ते ग्रह नवमांशकुंडलींत शुभग्रहाचे राशींत असतील तर, आणि त्या भावांचे स्वामी जन्मलग्नकुंडलींत शुभग्रहांनीं विलोकित असतील तर, अथवा शुभग्रहयुक्त असतील तर, लहानपणीं विवाह होईल. जन्मलग्नकुंडलींत शुक्र अस्तास गेला असून तो ३।६।१० किंवा ११ वे भावीं असेल तर, अथवा त्याचप्रमाणें धनभावाचा स्वामी असेल तर, अथवा लग्नस्वामीवर शुभग्रहाची दृष्टि असेल तर, अथवा शुभग्रहयुक्त असेल तर, त्या मनुष्याचा विवाहानंतर भाग्योदय होईल. सप्तमस्थानाचा कारकग्रह आणि सातवे स्थानाचा स्वामी आणि धनभावाचा स्वामी, आणि लग्नस्वामी हे सर्व ग्रह ६।८ आणि १२ ह्या स्थानीं असतील तर, अथवा नवमांशकुंडलींत नीच अथवा शत्रूचे घरीं असतील तर विवाहानंतर भाग्यनाश होईल.

अष्टमभावावरू–मृत्यु, जिनगी, गुह्यस्थान, व मृत्यूचें कारण ह्यांचा विचार करतात.

जन्मलग्नकुंडलींत आठवे भावाचा स्वामी पापग्रहाबरोबर सहावे अथवा बारावे भावीं असेल तर त्या मनुष्याचें आयुष्य दुःखकारक जातें. त्याचप्रमाणें लग्नस्वामी सहावे किंवा बारावे भावीं असेल तर आयुष्य दुःखद जातें.

अष्टमभावाचा स्वामी स्वगृहींचा असेल तर आयुष्य पुष्कळ वर्षें आहे असें समजावें. शनि स्वगृहींचा किंवा मित्रक्षेत्रींचा असेल, अथवा उच्च असेल, तर आयुष्य दीर्घ जाणावें. आठवे भुवनाचा स्वामी आणि लग्नस्वामी सहावे अथवा बारावे भावीं, अथवा सहावे किंवा आठवे भावींचे स्वामी लग्नीं असतील तर आणि त्यांवर शुभग्रह पहात असतील तर आयुष्य दीर्घ जाणावें. दशमभावाचा स्वामी मित्रक्षेत्रीं अथवा स्वगृहींचा अथवा उच्च असेल तर आयुष्य दीर्घ जाणावें. लग्नस्वामी केंद्रांत शुक्रयुक्त असेल तर, अथवा गुरुशुक्राकडून विलोकित असेल तर, आयुष्य दीर्घ जाणावें. लग्नस्वामी आणि गुरु किंवा शुक्र त्रिकोणांत असतील तर आयुष्य दीर्घ जाणावें. तिसरे, सहावे आणि अकरावे भावीं पापग्रह असतील तर, आणि केंद्रीं, त्रिकोणांत शुभग्रह असतील तर, आणि लग्नस्वामी बलवान् असेल तर, आयुष्य दीर्घ जाणावें.

सहावे, आठवे आणि बारावे भावीं पापग्रह असतील तर, आणि लग्नस्वामी निर्बल असून त्यावर शुभग्रहाची दृष्टि नसेल तर, तो मनुष्य अल्पायु व संतानरहित असतो. सर्व पापग्रह केंद्रांत असून त्यांवर शुभग्रह पहात नसतील तर, आणि लग्नस्वामी दुर्बल असेल तर, अल्पायु समजावा.

दुसरे आणि बारावे भावीं पापग्रह असतील तर, आणि त्यांवर शुभग्रहाची दृष्टि नसेल तर, अथवा ते षष्ठ्यंशकुंडलींत क्रूरभागांत असतील तर, अल्पायु* जाणावा.



* ( अल्पायु ३२ वर्षेपर्यंत जगतो. ३२ पासून ७० वर्षेपर्यंत मध्यमायु राहतो. ७० चे पुढें जो मरतो तो दीर्घायु जाणावा. )

लग्नस्वामी आणि सूर्य परस्पर शत्रु असतील तर अल्पायु समजावा. सम असतील तर मध्यमायु, आणि मित्र असतील तर दीर्घायु समजावा. लग्नस्वामी दुर्बळ, सहावे, आठवे, किंवा बारावे भावीं पापग्रहयुक्त, आणि गुरु केंद्रीं, त्रिकोणांत असे असतील तर मध्यमायु समजावा. सहावे अथवा आठवे भावीं पापग्रह असतील तर, आणि शुभग्रह केंद्रांत किंवा त्रिकोणांत असतील तर, आणि शनि बलवान् असेल तर, मध्यमायु समजावा. केंद्रीं, त्रिकोणांत पापग्रह असतील तर, अथवा लग्नांत पापग्रह असतील तर, मध्यमायु समजावा. अल्पायूचे कुंडलींत ६ आणि ८ भावांचे स्वामीची दशा वाईट जाते. मध्यमायूचे कुंडलींत लग्नस्वामीचे जे शत्रु असतील त्या ग्रहांचे दशेंत अरिष्टयोग होतो. दीर्घ आयुष्याचे मनुष्याचे कुंडलींत फक्त आठवे भावाचे स्वामीची दशा चालली असतां मृत्युयोग होतो. आठवे भावाचा स्वामी निर्बल असेल तर, आणि सहावे भावाचा मंगळ कोठेंही असेल तर, युद्धांत जय होईल. लग्नस्वामी अथवा आठवे भुवनाचा स्वामी सहावे भावीं असेल तर, आणि तेथें शनि, राहु अथवा केतु असेल तर, त्या ग्रहांच्या दशेंत चोराचे शस्त्रापासून मृत्यु येईल.

आठवे भावाचा स्वामी आणि लग्नस्वामी चवथे भावाचे स्वामीबरोबर सहावे भुवनांत असतील तर जनावराकडून मृत्यु येईल. आणि त्या ग्रहाबरोबर गुरु असेल तर अजीर्णापासून मृत्यु येईल. लग्नस्वामी आणि चतुर्थभावाचा स्वामी गुरुसहित सहावे भावीं असेल तर अजीर्णापासून मृत्यु येईल. लग्नस्वामी, चतुर्थस्थानाचा स्वामी, दुसरे भावाचा स्वामी मिळून तीन हे सहावे भावीं असतील तर अजीर्णापासून मृत्यु येईल. आठवे भावाचा स्वामी लग्नस्वामीसह शनिसहित आठवे अथवा बारावे भावीं असेल तर विषापासून मृत्यु येईल, राहु केतुसहित असेल तर फांशीं जाईल, सहावे भावाचा स्वामी, शनि अथवा केतु सहित असेल तर मृगापासून भीति आहे असें समजावें. सहावे भावाचे स्वामीबरोबर गुरु असेल तर हत्तीपासून भय जाणावें आणि चंद्र असेल तर घोड्यापासून जाणावें. अष्टमभावीं चंद्र, राहु असतील तर, अथवा चंद्र, शनि असतील तर, वायूचा विकार होईल. चंद्र दुर्बल असेल तर जलभीति अथवा भूतबाधा होईल, नवमस्थानीं अगर दशमस्थानीं मंगळ असून त्यावर पापग्रहांची दृष्टि असेल तर मामाचा मृत्यु होईल, मंगळाबरोबर शनि असेल तर पुत्राचा मृत्यु होईल, चंद्र असेल तर आईचा मृत्यु होईल. मंगळाबरोबर रवि असेल तर बापाचा मृत्यु होईल. लग्नीं चंद्र, दोन पापग्रहयुक्त असेल तर जन्मणारा लहानपणीं मृत्यु पावेल. आठवे भावात चरराशि असेल तर, अथवा दहावे भावाचा स्वामी चरराशींत असेल तर जन्मणाराचा बाप जन्मकाळीं घरीं नव्हता असें समजावें; त्याचप्रमाणें दशमभावाचा स्वामी स्थिरराशींत असेल तर घरीं, आणि द्विस्वभावराशींत असेल तर गृहासन्निध जन्मणाराचा बाप होता असें समजावें.

**नवमभावविचार**—नवमभावावर भाग्य, दान, तप आणि धर्म यांचा विचार होतो.

नवमभावाचा स्वामी शुभग्रह असून तो शुभग्रहयुक्त असेल तर पिता, गुरु आणि मामा यांचें सुख लाभेल

असें समजावें. पापग्रह असेल तर दुःख जाणावें. नवमभावांत चंद्र पापग्रहाबरोबर असेल, अथवा शुक्र पापग्रहाबरोबर असेल तर तो मनुष्य गुरूचे स्त्रीबरोबर व्यभिचार करील. नवमभावाचा स्वामी आणि चंद्र पापग्रहसहित कोणतेही स्थानीं असतील तर गुरूचे स्त्रीबरोबर व्यभिचार करील. नवांशकुंडलींत गुरु अथवा शुक्र स्वगृहीं अथवा उच्च अथवा मित्रक्षेत्रींचे असतील तर आणि ते जन्मलग्नकुंडलींत नवमस्थानीं असतील तर आणि बलवान् असतील तर स्वधर्माचें संरक्षण करणारा मनुष्य होतो. राहु, शनि नवमस्थानीं असतील तर आणि नवांशकुंडलींत पापग्रहाचे राशींत असतील तर आणि नवमस्थानाचा स्वामी पापग्रहाचे राशींत जन्मलग्नकुंडलींत अथवा नवमांशकुंडलींत असेल तर तो मनुष्य पापी समजावा. नवमभावाचा स्वामी शुभग्रहसहित बलवान् केंद्रीं किंवा त्रिकोणीं असेल तर आणि नवांशकुंडलींत शुभग्रहाचे राशींत असेल तर आणि तो पारावतांशबली असेल तर बहु भाग्यशाली मनुष्य जाणावा. धनभावाचा स्वामी अकरावे भावीं आणि अकरावे भावाचा स्वामी नवमभावांत आणि नवमभावाचा स्वामी धनभावांत असेल तर धनभावाचे ग्रहाचे दशेंत तो मनुष्य बहु भाग्यशाली होईल.

नवमभावीं पुष्कळ पापग्रह असतील तर आणि नवमभावाचा स्वामी निर्बळ असेल तर आणि लग्नस्वामी निर्बळ असेल तर भाग्याची वृद्धि होणार नाहीं. दशमभावाचा स्वामी नवमभावीं असेल तर आणि नवमभावाचा स्वामी बलवान् असेल तर, आणि त्यावर गुरु, शुक्र पहात असतील तर तो मनुष्य जप, ध्यान, समाधि ह्यांत कुशल असतो. नवमभावाचा स्वामी स्वगृहींचा, उच्च असून त्यावर शुभग्रह पहात असेल तर तो मनुष्य दान करणारा होईल. नवमस्थानाचा स्वामी पारावतांशबली असेल तर आणि त्यावर गुरूची दृष्टि असेल तर, आणि लग्नस्वामीवर शुक्र पहात असेल तर मोठा दानशूर होतो.

**दशमभावविचार**—दशमभावावर कर्म, कीर्ति, मान, प्रख्याति, राजद्वार, मुख्य व्यापारधंदा व पित्याचें सुखदुःख यांचा विचार करावयाचा असतो.

दशमभावाचा स्वामी बलहीन असून पापग्रहसहित कोणत्याही भावीं असल्यास तो वाईट कामें करणारा होतो.

दशमभावाचा स्वामी बुध किंवा गुरु बलवान् असल्यास तो मनुष्य यज्ञयाग करणारा होतो; व त्यावर शुभग्रहांची दृष्टि असल्यास तो मोठा यज्ञ करणारा होतो, पण बुध, गुरु आणि शुक्र त्रिकांत असल्यास ( ६।८ आणि १२ स्थानीं ) व त्यांजवर पापग्रहांची दृष्टि असल्यास कर्मनाश होतो. बुध, गुरु आणि शुक्र नवमांशकुंडलीमध्यें ज्या ग्रहांच्या राशींत पडले असतील, त्या राशींचे स्वामी जन्मकुंडलीमध्यें आठव्या भावांत असतील तरीही कर्मनाश होईल.

दशमभावीं राहु किंवा सूर्य असल्यास तो मनुष्य गंगास्नान करील. दशमभावांत पौर्णिमेचा चंद्र गुरूसहित जलराशीचा असल्यास गंगास्नान करील. दशमभावीं किंवा धनभावीं गुरु, शुक्र असतील किंवा प्रथम, चतुर्थ

अथवा सप्तमभावीं ते उच्च असल्यास गंगास्नान करील. बुध बाराव्या भावांत आणि बाराव्या भावाचा स्वामी उच्च असल्यास, तसेंच चंद्र जलराशीचा असून शुभग्रहसहित तिसऱ्या भावांत असल्यास गंगास्नान करील. नवव्या भावाचा स्वामी केंद्रांत जलराशींचा असून शुभग्रहांनीं विलोकित असल्यास तो गंगास्नान करील.

दशमभावांत किंवा मीन राशींत शुभग्रह असल्यास किंवा त्याबरोबर मंगळ असल्यास मोक्ष होईल.

बुधसहित मंगळ किंवा गुरु कोणत्याही भावीं असल्यास तो किल्ला बांधण्याचे कामांत, मंडप उभारण्याचे कामांत, आणि दारें बांधण्याचे कामांत हुशार असतो.

दशमभावाचा स्वामी दशमांत असल्यास तो मनुष्य जुन्या इमारतीची डागडुजी करणारा होईल.

दशमभावाचा स्वामी गोपुरांश बली असल्यास अथवा षष्ठ्यंशकुंडलींत मृदु अंशभागांत असल्यास व शुभग्रहांनीं विलोकित असल्यास अथवा नवव्याभावाच्या स्वामीची त्यावर दृष्टि असल्यास तो विहिरी वगैरे बांधितो.

दशमभावीं बुध असून दशमभावाचा स्वामी नवमभावांत पापग्रहविरहित असल्यास, आणि शुभग्रहांनीं विलोकित असून तो नवम आणि दशम भावांत शुभग्रहांच्या राशींत असल्यास तो मनुष्य यज्ञ करणारा होतो. दशमभावाचा स्वामी बुध उच्च असल्यास अथवा तो नवव्या भावांत पापग्रहविरहित असल्यास यज्ञ करणारा होतो. बुध उच्चीचा कोणत्याही भावीं असल्यास अथवा दशमभावाचा स्वामी कोणत्याही भावीं उच्च असल्यास



आणि त्याजवर बुधाची किंवा दुसऱ्या शुभग्रहाची दृष्टि असल्यास, किंवा बुध स्वगृहींचा असल्यास तो मनुष्य यज्ञ करणारा होतो.

दशमभावाचा स्वामी उच्चीचा पापग्रहसहित आठव्या भावांत असल्यास आणि नवमांश कुंडलींत तो नीच होत असल्यास, अथवा षष्ठ्यंशकुंडलींत क्रूर भावांत असल्यास यज्ञांत विघ्न येईल.

दशमभावाचा स्वामी शुभग्रह, शुभग्रहांनीं विलोकित किंवा शुभग्रहसहित, अथवा नवमांशकुंडलींत शुभग्रहांच्या राशींत असल्यास तो मनुष्य आज्ञा करणारा होतो.

दशमभावांत सूर्य किंवा मंगळ असल्यास आणि दशमभावाचा स्वामी केंद्रांत असल्यास तो क्रूराज्ञा करणारा होतो. दशमभावाचा स्वामी शनिसहित, अथवा कोणतेही भावीं असल्यास, आठव्या भावाचा स्वामी नवमांशकुंडलींत पापग्रहाच्या घरचा असल्यास, अथवा दशमभावाचा स्वामी शनिसहित केंद्रांत असल्यास तो क्रूराज्ञा करणारा होतो. दशम किंवा अष्टमभावांत राहु अथवा केतु असल्यास आणि नवव्याभावाचा स्वामी नीच असल्यास तो क्रूराज्ञा करणारा होतो.

दशमभावाचा स्वामी शुभग्रहसहित केंद्रांत असून शुभग्रहांनीं विलोकित असल्यास, अथवा षष्ठ्यंशकुंडलींत शुभ भावांत असल्यास तो शुभाज्ञा करणारा होतो.

चंद्र कर्कराशीचा पारावतांशबली, आणि गुरु, शुक्र यांनीं विलोकित असल्यास तो मनुष्य सुकीर्तिमान् होतो. दशमभावाचा स्वामी शुभग्रहसहित अथवा

शुभग्रहांचे मध्यें असल्यास अथवा नवमांशकुंडलींत शुभग्रहांच्या राशींत असल्यास सुकीर्तिमान् होतो. दशमभावाचा स्वामी शुभग्रह, स्वगृहींचा, उच्च, अथवा मित्रगृहींचा असून तो नवमांशकुंडलींत स्वगृहीं असल्यास अथवा षष्ठ्यंशकुंडलींत सौम्य भावांत असल्यासही तो सुकीर्तिमान् होतो. दशमभावाचा स्वामी देवलोकांश बली असल्यास आणि नवमभावाचा स्वामी सिंहासनांश बली असल्यास, आणि लग्नाचा स्वामी, याचप्रमाणें बलवान् असल्यास तो सुकीर्तिमान् होतो.

दशमभावाचा स्वामी निर्बळ असून पापग्रहांनीं विलोकित असल्यास किंवा पापग्रहसहित असल्यास, किंवा पापग्रहाच्या राशींत असून षष्ठ्यंशकुंडलींत क्रूर भावांत असल्यास अपकीर्तिमान् होईल. दशमभावांत सूर्य आणि शनि असल्यास किंवा सूर्य आणि शनि नवमांशकुंडलींत पापग्रहांच्या राशींत असल्यास, आणि जन्मकुंडलींत ते पापग्रहांनीं विलोकित असल्यास अथवा पापग्रहांचे मध्यें असल्यास अपकीर्तिमान् होईल.

दशमभावाचा स्वामी स्वगृहींचा किंवा उच्च असल्यास तो मनुष्य मानी आणि दृढनिश्चयी होतो.

दशमभावांत गुरु अथवा शुभग्रह असल्यास आणि दशमभावाचा स्वामी शुभग्रहसहित अथवा शुभग्रहांच्या कर्तरींत असल्यास तो मानी आणि दुसऱ्याच्या मनांतील मतलब जाणणारा होतो.

दशमभावांत पापग्रह असल्यास आणि दशमभावाचा स्वामी पापग्रहांनीं विलोकित असून नीच राशीचा असल्यास, अथवा नवमांशकुंडलींत तो पापग्रहांच्या राशींत असल्यास त्यास मान मिळणार नाहीं.



दशमभावाचा स्वामी नवमांशकुंडलींत चरराशीचा असल्यास तो नेहमीं प्रवास करणारा होतो, स्थीरराशीचा असल्यास स्थीरवृत्तीनें एकाच जागीं राहणारा होतो, आणि द्विस्वभावराशीचा असल्यास शिकार करण्याच्या निमित्तानें प्रदेश पाहणारा होतो.

साहाव्या भावाचा स्वामी दशमभावांत असल्यास आणि दशमभावाचा स्वामी शनीसहित केंद्रांत, किंवा त्रिकोणांत असल्यास पुष्कळ दासदासी ठेवणारा होईल.

दशमभावाचा स्वामी नवमांशकुंडलींत ज्या ग्रहाच्या राशींत असेल, तो ग्रह जन्मकुंडलींत शनीसहित अथवा साहाव्या भावाच्या स्वामीसहित किंवा साहावे भावाचे स्वामीकडून विलोकित असल्यास तो चाकर नोकर ठेवणारा होतो.

दशमभावाचा स्वामी दशमभावांत असून शुभग्रहसहित किंवा विलोकित असल्यास त्यास नोकरचाकरांपासून पुष्कळ सुख होईल.

**एकादशभावविचार**—अकराव्या भावावर लाभ, प्राप्ति, पाय, डावाकान, मोठेपणा, हत्तीघोड्यांचें व वस्त्रालंकारांचें सुखदुःख वगैरेचा विचार होतो.

अकराव्या भावाचा स्वामी शुभग्रह असून केंद्रांत किंवा त्रिकोणांत असल्यास द्रव्यलाभ होईल. दुसऱ्या भावाचा स्वामी अकराव्या भावांत, आणि अकराव्या

भावाचा स्वामी दुसऱ्या भावांत असल्यास, अथवा दोघेही दोन केंद्रांत असल्यास धनलाभ होईल. अकरावा भाव शुभग्रहांच्या कर्तरींत असल्यास अथवा अकराव्या भावाचा स्वामी शुभग्रहांच्या कर्तरींत असल्यास अथवा **पारावतांश बली** असल्यास द्रव्यलाभ होईल. अकराव्या भावाचा स्वामी आणि नवमांशकुंडलीचा लग्नस्वामी शुभग्रह असून ते जन्मकुंडलींत एके ठिकाणीं असून दुसऱ्या भावाच्या स्वामीनें विलोकित असल्यास द्रव्यप्राप्ति होते. अकराव्या भावाचा स्वामी आणि द्रेष्काणकुंडलीचा लग्नस्वामी शुभग्रह असून ते जन्मकुंडलींत एके ठिकाणीं असून दशमभावाच्या स्वामीनें विलोकित असल्यास द्रव्यप्राप्ति होते. अकराव्या भावाचा स्वामी ज्या ग्रहाच्या राशींत असेल तो ग्रह शुभग्रहांनीं विलोकित असल्यास अथवा शुभ ग्रहांचे मध्यें असल्यास द्रव्यलाभ होईल.

अकराव्या भावाचा स्वामी पापग्रहांनीं विलोकित किंवा पापग्रहसहित असल्यास लाभनाश होईल.

अकराव्या भावाचा स्वामी शुभग्रह असून तो बलवान् असल्यास आणि शुभग्रहांनीं तो विलोकित असल्यास कर्णभूषण प्राप्त होईल.

अकराव्या भावाचा स्वामी पापग्रहसहित किंवा पापग्रहांनीं विलोकित असल्यास तो कानांत दागिने घालील, पण त्यांचा नाश होईल.



अकराव्या भावाचा स्वामी आणि तिसऱ्या भावाचा स्वामी शुभग्रहानें विलोकित असल्यास किंवा शुभग्रहसहित असल्यास कर्णरोग होणार नाहीं, परंतु ते पापग्रहानें विलोकित किंवा पापग्रहसहित असल्यास कर्णरोग होईल.

**द्वादशभावविचार**—बाराव्या भावावर खर्च, हानि, दंड, कैद, नरकप्राप्ति, डावानेत्र, दोन्ही पाय आणि शय्यास्थान यांचा विचार करितात.

बाराव्या भावांत पापग्रह असल्यास आणि बाराव्या भावाचा स्वामी पापग्रह असल्यास व त्या दोहोंवरही पापग्रहांची दृष्टि असल्यास पापकृत्यांत धन खर्च होईल. बाराव्या भावांत पापग्रह किंवा बाराव्या भावाचा स्वामी पापग्रह, श[illegible] किंवा राहुसहित असल्यास, आणि नवमांशकुंडलींत पापग्रहाच्या राशींत बाराव्या भावाचा स्वामी असेल तर पापकृत्यांत धन खर्च होईल.

द्वादशभावांत गुरु किंवा शुक्र असेल अथवा चंद्र, बुध असतील आणि त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर अथवा ते सर्व ग्रह शुभ असून पारावतांशबली असतील तर धर्मकृत्यांत धनाचा व्यय होईल. बारावे भावाचा स्वामी शनि क्रूर षष्ठ्यंशांत असेल तर किंवा केंद्र, त्रिकोण यांत पापग्रह असतील तर कुमार्गी धन खर्च होईल. दशमभावाचा स्वामी पापग्रह बारावे भावाचे

स्वामीनें विलोकित असेल अथवा शत्रुगृहीं किंवा नीच असेल तर, अथवा जन्मकुंडलींत अथवा नवमांशकुंडलींत नीच किंवा शत्रुगृहीं असेल तर कुमार्गी धन खर्च करील. बारावे भावाचा स्वामी उच्च किंवा स्वगृहींचा, अथवा मित्र ग्रहांचे राशींतील असेल तर आणि त्यावर दशमभावाचे स्वामीची दृष्टि असेल तर धर्मकार्यांत धन खर्च होईल. बारावे भावाचा स्वामी दुर्बल असून, तो आणि सहावे भावाचा स्वामी एकत्र असतील तर शत्रूकडून धनहानि होईल. बारावे भावाचा स्वामी निर्बल असून तो नवांशकुंडलींत पाप ग्रहाचे राशींत असेल तर आणि त्यावर सप्तमभावाचा स्वामी निर्बल असून त्याची दृष्टि असेल तर स्त्रीचे संबंधानें धन खर्च होईल. ह्या लक्षणाप्रमाणें ज्या ज्या भावांचे स्वामी आढळतील, त्या त्या प्रमाणें फळें पहावींत, ह्मणजे पुत्रसंबंधानें पाहतांना पंचमभावाचा स्वामी निर्बल असून त्यावर बारावे भावाचा स्वामी पहात असेल तर पुत्रापासून धननाश होईल. बारावे भावाचा स्वामी निर्बल असून नवमांशकुंडलींत पापग्रहाचे राशींत नीच असेल तर चित्तभ्रम होईल. बारावे भावाचे स्वामीबरोबर पापग्रह असतील तर किंवा बारावे भावांत पापग्रह असतील तर चित्तभ्रम होईल. बारावे भावांत बुध, गुरु आणि शुक्र असतील तर वाहनसुख लाभेल. बारावे भावाचा स्वामी परम उच्च असेल तर आणि त्यावर नवमभावाचा स्वामी पहात असेल तर



शय्यासुख चांगलें लाभतें. लग्नस्वामी बारावे भावांत नीच असेल तर अथवा शनि, राहु युक्त असेल तर आणि त्यावर सहावे भुवनाचा स्वामी पहात असेल तर शय्यासुख मिळणार नाहीं. पंचमभावांत शुक्र किंवा चंद्र असतील तर अथवा पंचमभावावर त्यांची दृष्टि असेल तर देवाची उपासना करील असें जाणावें.

---

[ द्वादश भावांचें त्रोटक वर्णन विद्यार्थ्यांस कळेल इतकेंच दिलें आहे. विद्यार्थ्यांनीं आपली पत्रिका पाहतांना सर्व वर्णन लिहीत जावें आणि जेथें वर्णन चुकलें आहे असें आढळेल तेथें खुणा करून ठेवाव्यात. ज्योतिषावरील ग्रंथांत निरनिराळीं मतें अनेक आहेत म्हणून सर्व वर्णन कोणत्याही ग्रंथकाराचें मिळणार नाहीं. अनुभवानींच ह्या गोष्टी ठरविण्याच्या असतात. दोन, तीन, चार, पांच ग्रहांचे एकत्र योग झाले असतां फळें निरनिराळीं येतात तीं स्थळ संकोच्यास्तव दिलीं नाहीं.]

**दशाविचार**—ग्रहांचे स्वभाव आणि त्यांचीं राशीपरत्वें फळें कशीं पहावीं ह्या संबंधाची प्राथमिक माहिती दिली. आतां त्यांचीं फळें अनुभवास येणाऱ्या काळाचे संबंधानें माहिती देतों. कोणता ग्रह कोणते काळीं आपलें फल उत्पन्न करतो, त्या काळास त्या ग्रहाचा दशाकाल असें ह्मणतात. हिंदुस्थान देशांत दशा पाहण्याच्या अनेक पद्धति आहेत, परंतु त्यांत दोन मुख्य आहेत. त्यांचीं नांवें **अष्टोत्तरी** आणि **विंशोत्तरी** दशा अशीं आहेत. या दोन दशांत प्राचीन अष्टोत्तरी दशा

आहे. अष्टोत्तरी दशेची माहिती ज्या ग्रंथांत आहे, त्यास **गौरीजातक** असें ह्मणतात. ह्या दशेची माहिती शंकरानें पार्वतीस सांगितली, असें कथानक आहे. ह्या पद्धतीचा कर्ता गर्ग नांवाचा ऋषि आहे. ह्या गर्गाचे कालीं वसंतसंपात आर्द्रा नक्षत्रावर होता. संपातानुरोधें किंवा सायन मेषादि राशींचे अनुरोधें, गर्ग ऋषीनें आर्द्रा नक्षत्रापासून अष्टोत्तरी दशेचा आरंभ केला असावा असें अनुमान दिसतें. आर्द्रा नक्षत्राची देवता रुद्र (महादेवाचें नांव) आहे, ह्मणून संपातानुरोधें आर्द्रा नक्षत्रारंभ करून त्या दशेचे ग्रंथास गौरीजातक हें नांव योग्यच दिलेलें दिसतें. ह्या जातकांत २८ नक्षत्रें घेतलीं आहेत. विंशोत्तरी दशेंत २७ नक्षत्रें घेतलीं आहेत. पंचांगांत जीं नक्षत्रें देतात, तीं सर्व समान अंतराचीं असतात. ह्मणजे दरएक नक्षत्र १३ अंश २० कलेचे भागाचें असतें. तारात्मक नक्षत्रें कमीजास्त अंतराचीं असतात. तारापुंजात्मक नक्षत्रांत जे गुणधर्म एक वेळ अनुभवानें कायम केले होते, ते आतां त्यांत आढळत नाहींत. ह्याचें कारण नक्षत्रपुंजांत एक वेळ समावेश पावलेले तारे आपले गतीनें तीं नक्षत्रें सोडून गेलेले आहेत. प्राचीन आर्यांस ताऱ्यांचे सूक्ष्म गतीचें ज्ञान उत्तम प्रकारचें होतें, युगारंभकालीं अमुक ग्रहांची विवक्षित स्थिति आणि ताऱ्यांची विवक्षित स्थिति आली ह्मणजे युगारंभ होतो, असें ज्योतिष्यावरील ग्रंथांतून मान-



लेलें स्पष्ट दिसत आहे, ह्मणून निरयण अथवा तारात्मक नक्षत्रांतील व त्यांचे प्रमाणें निरयण राशींतील गुणधर्म सर्व अनुभवास येणारे नाहींत. सायन गणनेंत नक्षत्रें व राशि यांचें मेलन आहे तसें निरयण नक्षत्रांत व राशींत नाहीं. राशि चर आहेत, आणि नक्षत्रें स्थीर आहेत, ह्मणून निरयण मानानें नक्षत्रारंभ व दशारंभ केला तर राशींचा आरंभ निराळा दिसतो, ह्मणून ग्रहांचे उच्चत्वादिकांचे जे गुण आहेत, ते निरयण गणनेंत कालत्रयीं मिळावयाचे नाहींत; ह्मणून जे जे गुणधर्म नक्षत्रांत आणि राशींत आहेत ते सर्व सायन नक्षत्रांत व राशींत आहेत असें मानलें ह्मणजे सर्व ठीक होईल.

गर्गऋषीनें अष्टोत्तरी दशेंत २८ नक्षत्रें दिलीं आहेत, परंतु अभिजित् नक्षत्राचे विषुवांश दिले नाहींत, अभिजित् नक्षत्राचे अंश घेतांना ३ अंश २० कलेचा भाग किंवा १९ घटिकेचा नक्षत्रभाग हा उत्तराषाढा नक्षत्रांतून उणा करून घेतात. त्याचप्रमाणें श्रवण नक्षत्रांतून सुमारें ४ घटका किंवा जवळ जवळ ४० कला इतका भाग श्रवणांतून घेतात. ह्मणजे अभिजित् नक्षत्राची व्याप्ति ४ अंश १३ कला जवळ आहे असें मानावें लागतें. हा भेद पंचांगांतून नक्षत्रें पहातांना विद्यार्थ्यांनीं लक्षांत ठेवला पाहिजे. गर्गसंहितेंत नक्षत्रांचीं जीं अंतरें दिलीं आहेत त्यांत अभिजित् नक्षत्राचे अंश ऋण व अधिक करून, इतर नक्षत्रांचीं अंतरें पुढें दिलीं आहेत.

| नक्षत्रें. | अंतरें. अंश. कला. | नक्षत्रें. | अंतरें. अंश. कला. | नक्षत्रें. | अंतरें. अंश. कला. |
|---|---|---|---|---|---|
| अश्विनी. | १३-२० | मघा. | १२६-४० | मूळ. | २४६-४० |
| भरणी. | २०- ० | पूर्वा. | १४०- ० | पूर्वाषाढा. | २६०- ० |
| कृत्तिका. | ३३-२० | उत्तरा. | १६०- ० | उत्तराषा० | २७६-४० |
| रोहिणी. | ५३-२० | हस्त. | १७३-२० | अभिजित्. | २८०-४० |
| मृगशीर्ष. | ६६-४० | चित्रा. | १८६-४० | श्रवण. | २९३-२० |
| आर्द्रा. | ७३-२० | स्वाति. | १९३-२० | धनिष्ठा. | ३०६-४० |
| पुनर्वसु. | ९३-२० | विशाखा. | २१३-२० | शततार० | ३१३-२० |
| पुष्य. | १०६-४० | अनुराधा. | २२६-४० | पू०भाद्रपदा | ३२६-४० |
| आश्लेषा. | ११३-२० | ज्येष्ठा. | २३३-२० | उ०भाद्रप० | ३४६-४० |
| | | | | रेवति. | ३६०- ० |

वरील कोष्टकावरून सायन चंद्र ज्या राशींत असेल त्याचे मेषादिपासून अंश, कला, विकला, वरील नक्षत्र-भागांत जेथें येतील त्या नक्षत्राची दशा जन्मकालीं होती असें जाणावें. उदाहरणार्थ कन्या राशिचा चंद्र १६ अंश ३२ कला आहे, तर तो मेषादिपासून ५ राशि भुक्त होऊन, सहावे राशींत १६ अंश ३२ कला आहे, ह्मणजे १६६ अंश आणि ३२ कलेंत आहे; ह्मणजे तो हस्त-नक्षत्रांत आहे. हस्तनक्षत्राचा अंत १७३ अंश २० कलेंत होतो. ह्मणून १७३ अंश २० कला, उणें १६६ अंश ३२ कला करतां, शेष अंश ६ आणि ४८ कला राहिल्या. हे अंश जन्मणाराचे जन्मकालचे झाले, ह्मणजे जन्मणारास ह्या नक्षत्रावरील ग्रहदशेचा अनुभव भोगणें आहे. शेष भाग जन्मकालापूर्वी पूर्वजन्मीं भोगला गेला होता, असें मानण्यांत आलें. खालील कोष्टकांत जीं नक्षत्रें आहेत त्यांतून पापग्रहास चार नक्षत्रें व शुभग्रहास तीन



नक्षत्रें असे विभाग वाटून दिले आहेत, व तीं नक्षत्रें जो ग्रह भोगितो त्याची वर्षसंख्या दिली आहे.

दशाक्रमचक्र.

| ग्रह. | रवि. | चंद्र. | मंगळ. | बुध. | शनि. | गुरु. | राहु. | शुक्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दशाकाल. | ६ वर्षे. | १५ वर्षे. | ८ वर्षे. | १७ वर्षे. | १० वर्षे. | १९ वर्षे. | १२ वर्षे. | २१ वर्षे. |
| नक्षत्रें. | १ आर्द्रा.<br>२ पुनर्वसु.<br>३ पुष्य.<br>४ आश्लेषा. | १ मघा.<br>२ पूर्वा फा०<br>३ उ० फा० | १ हस्त.<br>२ चित्रा.<br>३ स्वाति.<br>४ विशाखा. | १ अनुराधा.<br>२ ज्येष्ठा.<br>३ मूळ. | १ पूर्वाषाढा.<br>२ उत्तराषा०<br>३ अभिजित्<br>४ श्रवण. | १ धनिष्ठा.<br>२ शततारा.<br>३ पू० भा० | १ उ० भा०<br>२ रेवति.<br>३ अश्विनी.<br>४ भरणी. | १ कृत्तिका.<br>२ रोहिणी.<br>३ मृगशीर्ष. |
| मेषादिपा-सून अंश. | ६६-४०<br>११३-२० | ११३-२०<br>१६०- ० | १६०- ०<br>२१३-२० | २१३-२०<br>२५६-४० | २५६-४०<br>२९३-२० | २९३-२०<br>३३६-४० | ३३६-४०<br>३०- ० | ३०- ०<br>६६-४० |

वरील कोष्टकांत हस्तनक्षत्र मंगळाच्या सदराखालीं

आहे. मंगळाची महादशा ८ वर्षेंपर्यंत आहे, ती हस्त नक्षत्रापासून विशाखा नक्षत्रापर्यंत विभागावी ह्मणजे दर-एक नक्षत्रास २ वर्षें मंगळाची महादशा वाटणीस येईल. आतां उदाहरणार्थ घेतलेला चंद्र १६६ अंश ३२ कला आहे आणि हस्त नक्षत्राचा अंत १७३ अंश २० कलेंत होतो ह्मणून चंद्राचे अंश उणें करितां बाकी ६ अंश ३२ कला उरल्या. आतां हस्त नक्षत्राची व्याप्ति १३ अंश २० कला आहे आणि मंगळाची दशा दोन वर्षें आहे तर त्रैराशिकानें १३ अंश २० कलेस जर दोन वर्षें तर ६ अंश ३२ कलेस किती वर्षें, ह्याप्रमाणें गणित करतां ६ महिने २९ दिवस मंगळाची दशा येते. ह्मणजे मंगळाची हस्त नक्षत्रावरील दशा ६ महिने २९ दिवस आणि इतर तीन नक्षत्रांवरील ६ वर्षें मिळून ६ वर्षें, ६ महिने, २९ दि०, मंगळाची दशा भोग्य जाणावी. दशाकाल नक्षत्रांवर समान वाटून नंतर नक्षत्राचे अंशां-वर तो काल विभागावा. हें तत्व विद्यार्थ्यांनीं लक्षांत ठेवावें. मंगळाची महादशा सरल्यानंतर पुढें १७ वर्षें बुधाची महादशा लागणार. याप्रमाणें वरील कोष्ट-कांतील अनुक्रमानें ग्रहांच्या महादशा जाणाव्या.

वर लिहिलेल्या **आठ ग्रहांच्या आठ महादशा** आहेत, आणि त्या प्रत्येक महादशेंत त्याच ग्रहांच्या **अंतर्दशाही आठ आहेत.** ह्मणजे ८ अंतर्दशा मिळून एक महादशा होते.

कोणत्याही ग्रहाच्या महादशेंत कोणत्याही ग्रहाची अंतर्दशा काढणें जाहल्यास त्या दोनही ग्रहांच्या महाद-शेच्या वर्षसंख्येनें परस्परांस गुणून त्या गुणाकारास ९ नें



भागावें. भागाकार येईल तेवढे महिने जाणावे. जसें:—सूर्याचे महादशेंत चंद्राची अंतर्दशा काढावयाची आहे, तर सूर्याचे महादशेचा काल ६ वर्षें आहे आणि चंद्राचे महादशेचा काल १५ वर्षें आहे, त्या दोहोंचा गुणाकार करितां गुणाकार ९० आला, त्यास ९ नें भागिलें, तेव्हां भागाकार १० आला, ह्मणजे १० महिने सूर्याचे महाद-शेंत चंद्राची अंतर्दशा झाली. किंवा चंद्राचे महाद-शेंत सूर्याची अंतर्दशा १० महिने झाली. महादशेंत अंतर्दशेचा आरंभ त्याच ग्रहाचे अनुक्रमानें करावा. ह्मणजे सूर्याचे महादशेंत पहिली अंतर्दशा सूर्याची होय. त्यापुढें चंद्राची, पुढें मंगळाची, हा अनुक्रम घ्यावा. चंद्राचे महादशेंत पहिली अंतर्दशा चंद्राची, पुढें मंगळाची, त्या पुढें बुधाची, व पुढें शनीची, ह्याप्रमाणें अनुक्रमानें दशा गणाव्या. खालीं आठही महादशेंत कोणत्या ग्रहाची किती अंतर्दशा असते हें कोष्टकांत दाखविलें आहे त्यावरून स्पष्ट कळेल.

**सूर्याचे महादशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशांचें कोष्टक.**

| ग्रह. | सूर्य. | चंद्र. | मंगळ. | बुध. | शनि. | गुरु. | राहु. | शुक्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षें. | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| महिने | ४ | १० | ५ | ११ | ६ | ० | ८ | २ |
| दिवस. | ० | ० | १० | १० | २० | २० | ० | ० |

## चंद्राचे महादशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशांचें कोष्टक.

| ग्रह. | चंद्र. | मंगळ. | बुध. | शनि. | गुरु. | राहु. | शुक्र. | सूर्य. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षें. | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | ० |
| महिन. | १ | १ | ४ | ४ | ७ | ८ | ११ | १० |
| दिवस. | ० | १० | १० | २० | २० | ० | ० | ० |

## मंगळाच्या महादशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशांचें कोष्टक.

| ग्रह. | मंगळ. | बुध. | शनि. | गुरु. | राहु. | शुक्र. | सूर्य. | चंद्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षें. | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | १ |
| महिने. | ७ | ३ | ८ | ४ | १० | ६ | ५ | १ |
| दिवस. | ३ | ३ | २६ | २६ | २० | २० | १० | १० |
| घटका. | २० | २० | ४० | ४० | ० | ० | ० | ० |

## बुधाच्या महादशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशांचें कोष्टक.

| ग्रह. | बुध. | शनि. | गुरु. | राहु. | शुक्र. | सूर्य. | चंद्र. | मंगळ. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षें. | २ | १ | २ | १ | ३ | ० | २ | १ |
| महिने. | ८ | ६ | ११ | १० | ३ | ११ | ४ | ३ |
| दिवस. | ३ | २६ | २६ | २० | २० | १० | १० | ३ |
| घटका. | २० | ४० | ४० | ० | ० | ० | ० | २० |



## शनीच्या महादशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशांचें कोष्टक.

| ग्रह. | शनि. | गुरु. | राहु. | शुक्र. | सूर्य. | चंद्र. | मंगळ. | बुध. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षें. | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | १ |
| महिने. | ११ | ९ | १ | ११ | ६ | ४ | ८ | ६ |
| दिवस. | ३ | ३ | १० | १० | २० | २० | २६ | २६ |
| घटका. | २० | २० | ० | ० | ० | ० | ४० | ४० |

## गुरूच्या महादशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशांचें कोष्टक.

| ग्रह. | गुरु. | राहु. | शुक्र. | सूर्य. | चंद्र. | मंगळ. | बुध. | शनि. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षें. | ३ | २ | ३ | १ | २ | १ | २ | १ |
| महिने. | ४ | १ | ८ | ० | ७ | ४ | ११ | ९ |
| दिवस. | ३ | १० | १० | २० | २० | २६ | २६ | ३ |
| घटका. | २० | ० | ० | ० | ० | ४० | ४० | २० |

## राहूच्या महादशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशांचें कोष्टक.

| ग्रह. | राहु. | शुक्र. | सूर्य. | चंद्र. | मंगळ. | बुध. | शनि. | गुरु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षें. | १ | २ | ० | १ | ० | १ | १ | २ |
| महिने. | ४ | ४ | ८ | ८ | १० | १० | १ | १ |
| दिवस. | ० | ० | ० | ० | २० | २० | १० | १० |

### शुक्राच्या महादशेंत इतर ग्रहांच्या अंतर्दशांचें कोष्टक.

| ग्रह. | शुक्र. | सूर्य. | चंद्र. | मंगळ. | बुध. | शनि. | गुरु. | राहु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षें. | ४ | १ | २ | १ | ३ | १ | ३ | २ |
| महिने. | १ | २ | ११ | ६ | ३ | ११ | ८ | ४ |
| दिवस. | ० | ० | ० | २० | २० | १० | १० | ० |

ज्याप्रमाणें महादशेमध्यें ८ अंतर्दशा आहेत, त्याचप्रमाणें प्रत्येक अंतर्दशेमध्यें ८ उपदशा आहेत. ज्या ग्रहाच्या महादशेमधील अंतर्दशेच्या उपदशा काढावयाच्या, त्या ग्रहाच्या महादशाकालाच्या वर्षांचे महिने करावे. येईल त्या संख्येनें ज्या ग्रहाची उपदशा काढावयाची त्याच्या अंतर्दशाकालाच्या महिन्यांचा परस्पर गुणाकार करून त्यास भागावें, भागाकार येईल ती संख्या महिने समजावे. जसें:—रवीच्या महादशेमध्यें रवीची अंतर्दशा ४ महिने आहे, त्या चार महिन्यांत ह्मणजे रवीचे महादशेंतील अंतर्दशेंत उपदशा काढणें आहे, तर वर सांगितल्या नियमाप्रमाणें रवीच्या महादशेचीं वर्षें ६ आहेत, त्यांचे महिने ७२ होतात. रवीची अंतर्दशा ४ महिने आहे, ह्मणून ४×४÷७२=$\frac{२}{९}$ महिने किंवा ६ दिवस ४० घटका ही रविमहादशेंतील रवीच्या अंतर्दशेंतील रवीची उपदशा जाणावी. चंद्राची वरील नियमाप्रमाणें ४×१०÷७२=$\frac{५}{९}$ महिने किंवा १६ दिवस ४० घटका ही चंद्राची उपदशा समजावी.



### रवीच्या महादशेंतील रवीच्या अंतर्दशेंतील उपदशाकोष्टक.

| ग्रह. | रवि. | चंद्र. | मंगळ. | बुध. | शनि. | गुरु. | राहु. | शुक्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिवस. | ६ | १६ | ८ | १८ | ११ | २१ | १३ | २३ |
| घटका. | ४० | ४० | ५३ | ५३ | ६ | ६ | २० | २० |
| पळें. | ० | ० | २० | २० | ४० | ४० | ० | ० |

वरील कोष्टकाप्रमाणें सर्व उपदशाकोष्टकें केल्यास ६४ होतील. आणि ज्याप्रमाणें प्रत्येक महादशेंत ८ अंतर्दशा आहेत, व प्रत्येक अंतर्दशेमध्यें ८ उपदशा आहेत, तसेंच प्रत्येक उपदशेमध्यें ८ विदशाही आहेत, त्या सर्वांचीं कोष्टकें केल्यास ६४ कोष्टकें उपदशेचीं व ५१२ कोष्टकें विदशेचीं होतील. तीं सर्व येथें स्थलसंकोचास्तव देत नाहीं. उपदशा आणि विदशा काढून पळें, विपळें, यांचा फलादेश पाहावयाचा असतो. आयुष्यांतील प्रत्येक दिवसाचें फळ समजल्यास पुष्कळ आहे. ज्यांना त्या दिवसांतील घटकापळाचेंही फळ पाहिजे असेल त्यांनाच विदशा काढल्या पाहिजेत.

ग्रह आपले महादशेंत राशिफल, भावफल, दृष्टिफल व राजयोगफल हीं फलें उत्पन्न करितात. आणि तीं अंतर्दशा, उपदशा व विदशांत उत्पन्न होतात.

बलवान् ग्रह आपले महादशेंत चांगलें फल देतात, निर्बळ ग्रह वाईट फलें देतात. जो ग्रह उच्च, स्वगृहींचा, मूळ त्रिकोणचा, स्वमित्राचे क्षेत्रींचा असतो तो ग्रह बळी समजावा.

भावबलाचे नियम–१ पापग्रह जर उपचयस्थानीं असले तर ते बलवान् जाणावे.

२ शुभग्रह केंद्रीं किंवा त्रिकोणीं असतील तर ते बलवान् जाणावे.

३ कोणताही ग्रह तिसरे किंवा अकरावे स्थानीं असल्यास बलवान् जाणावा.

४ पापग्रह त्रिकोणांत मध्यम बली जाणावे.

५ शुभग्रह धनस्थानीं संपत्ति देतात.

६ पापग्रह धनस्थानीं, स्वगृहींचे किंवा उच्चीचे नसल्यास अनिष्ट जाणावे.

७ कोणताही ग्रह त्रिकस्थानीं (६।८।१२) निर्बली जाणावा.

योगबल–ज्या ग्रहाबरोबर शुभ ग्रह असेल, किंवा ज्या ग्रहाबरोबर त्याचा मित्र ग्रह असेल, किंवा ज्या ग्रहावर शुभग्रहाची दृष्टि असेल तो ग्रह बलवान् जाणावा.

निर्बल ग्रहयोग–१ जो ग्रह नीच असेल, किंवा जो ग्रह शत्रूचे क्षेत्रांत (घरांत) असेल, किंवा जो ग्रह पापग्रहाचे राशींत असेल तर, तो ग्रह राशिनिर्बली जाणावा.

२ जो ग्रह त्रिकस्थानांत असेल, किंवा जो ग्रह त्रिकस्थानाचा मालक असेल तो ग्रह स्थाननिर्बल जाणावा.

३ ज्या ग्रहाला पापग्रहाचा योग असेल, किंवा जो ग्रह शत्रुयुक्त असेल, किंवा ज्या ग्रहावर पापग्रहाची दृष्टि असेल तो ग्रह निर्बली जाणावा.

४ जो ग्रह रवियुक्त असेल तो ग्रह निर्बली जाणावा. राशीवरून प्रत्येक ग्रहाचे क्रम कोष्टकांत दर्शित केले



आहेत, त्यावरून ते ग्रह महादशेंत व अंतर्दशेंत फलें देतात असें समजावें.

| क्रम. | र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. | रा. | के. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेष. | वृष. | मकर. | कन्या. | कर्क. | मीन. | तूळ. | मिथुन | धन. |
| २ | सिंह. | कर्क. | मेष. | मिथुन | धन. | वृषभ. | मकर. | कन्या. | मीन. |
| ३ | धन. | धन. | वृश्चिक | तूळ. | मीन. | तूळ. | कुंभ. | कुंभ. | सिंह. |
| ४ | मीन. | मीन. | सिंह. | वृषभ. | सिंह. | मिथुन | वृषभ. | वृषभ. | वृश्चिक |
| ५ | कर्क. | सिंह. | धन. | सिंह. | मेष. | कर्क. | मिथुन | तूळ. | मेष. |
| ६ | मिथुन | तूळ. | मीन. | कर्क. | तूळ. | मकर. | कन्या. | मेष. | वृषभ. |
| ७ | कन्या. | मिथुन | कन्या. | मकर. | वृषभ. | कुंभ. | मीन. | मकर | तूळ. |
| ८ | वृश्चिक | कन्या. | मिथुन | कुंभ. | कुंभ. | धन. | धन. | कर्क. | कुंभ. |
| ९ | वृषभ. | मेष. | कुंभ. | मेष. | वृश्चिक | सिंह. | वृश्चिक | सिंह. | मकर. |
| १० | मकर. | कुंभ. | वृषभ. | वृश्चिक | कन्या. | वृश्चिक | सिंह. | वृश्चिक | कर्क. |
| ११ | कुंभ. | मकर. | तूळ. | धन. | मिथुन | मेष. | कर्क | मीन. | कन्या. |
| १२ | तूळ. | वृश्चिक | कर्क. | मीन. | मकर. | कन्या. | मेष. | धन. | मिथुन. |

महादशेचीं फलें व अंतर्दशेचीं फलें राशीवरून पाहण्यास वरील कोष्टक फारच उपयोगी आहे.

१ धन, मीन व कर्केचे रवीचीं फलें सारखीं असतात.

२ मिथुन, कन्या व वृश्चिकेचे रवीचीं फलें सारखीं असतात.

३ वृषभ, मकर व कुंभेचे रवीचीं फलें सारखीं असतात.

४ धन, मीन व सिंहेचे चंद्राचीं फलें सारखीं असतात.

५ तूळ व मेषेचे चंद्राचीं फलें सारखीं असतात.

६ मिथुन व कन्येचे चंद्राचीं फळें समान जाणावीं.

७ मकर व कुंभेचे चंद्राचीं फळें सारखीं जाणावीं.

८ मेष व वृश्चिकेचे मंगळाचीं फळें सारखीं जाणावीं.

९ सिंह, धन आणि मीनेचे मंगळाचीं फळें सारखीं जाणावीं.

१० कन्या, मिथुन, तूळ, वृषभ, आणि कुंभेचे मंगळाचीं फळें सारखीं जाणावीं.

११ तूळ, वृषभ आणि सिंहेचे बुधाचीं फळें सारखीं जाणावीं.

१२ मेष व वृश्चिकेचे बुधाचीं फळें सारखीं जाणावीं.

१३ मकर व कुंभेचे बुधाचीं फळें सारखीं जाणावीं.

१४ सिंहेचे व मेषेचे गुरूचीं फळें सारखीं जाणावीं. तूळ व वृषभेचे गुरूचीं फळें सारखीं जाणावीं. कुंभ व वृश्चिकेचे गुरूचीं फळें सारखीं जाणावीं.

१५ मिथुन, व कन्येचे गुरूचीं फळें सारखीं जाणावीं.

१६ मिथुन, कर्क, मकर, व कुंभस्थ शुक्राचीं फळें सारखीं जाणावीं.

१७ धन, सिंह, वृश्चिक व मेषस्थ शुक्राचीं फळें सारखीं जाणावीं.

१८ वृषभ, कन्या, मिथुन व मीनस्थ शनीचीं फळें सारखीं जाणावीं.

१९ धन, वृश्चिक, सिंह व कर्कस्थ शनीचीं फळें सारखीं जाणावीं.

२० वृषभ व तूळेचे राहूचीं फळें सारखीं जाणावीं. मेष व मकरेचे राहूचीं फळें सारखीं जाणावीं.



२१ कर्क, सिंह, वृश्चिक, व मीनेचे राहूचीं फळें सारखीं जाणावीं.

### राशीवरून रवीचे महादशेचीं फळें.

**मेष**:—स्वधर्मावर व कर्मावर अभिरुचि ठेवील. बापानें मिळविलेले गृहादिकांचा व द्रव्याचा लाभ होईल. स्त्री व संततीपासून नानाप्रकारचीं सुखें मिळतील. राजापासून मान मिळेल. कीर्ति व शौर्य या दोहोंची वृद्धि होईल. भूमिगत द्रव्य प्राप्त होईल.

**सिंह**:—स्वबंधुसुख मिळेल. धन, कीर्ति, लाभ, मिळेल. राजसन्मान मिळेल. भूमिलाभ होईल. विद्येंत यश मिळेल. शौर्य वाढेल. दुर्गप्रदेशांतून व अरण्यांतून देखील कृषिक्रियेमध्यें प्रचुर धन मिळेल. नृपगौरव व ख्याति होईल.

**कर्क**:—ख्याति, नृपप्रीति, स्त्रीवश, महत्प्रकोप, व आप्तजनाला पीडा होईल.

**धन**:—कलत्र, पुत्र, धनादिक सौख्य, राजकुल व मोठेलोकांपासून मान मिळेल, व संगीतशास्त्रावर अभिरुचि होईल.

**मीन**:—स्त्री, वित्त, सौख्याची वृद्धि, प्रतिष्ठा, संतानास ज्वरादिकापासून पीडा होईल.

**वरील तीन राशी मिळून साधारण फळें**:—राजापासून मान मिळेल. मित्रापासून लाभ होईल. धनलाभ होईल. स्वजनसंग होईल. स्वगृहीं स्थिर वास होईल. स्त्रीपुत्रादिकांस सौख्य, अतिसौख्यप्राप्ति होईल.

**मिथुन**:—मंत्रशास्त्रोत्तम, काव्यकर्त्ता, पुराण वगैरे धर्मशास्त्राचे पुस्तकांची आवड, धान्य-धन-समृद्धि होईल.

कन्या :—कन्याजन्म, मोठेलोकांपासून मानप्राप्ति, धनप्राप्ति व सौख्य लाभेल.

वृश्चिक :—शस्त्रपीडा, विष-अग्नीपासून पीडा, आईबापांस पीडा व चित्तशुद्धि होईल.

**वरील तीन राशी मिळून साधारण फलें :**—भूमि, धन, धान्य वगैरे लाभ, मधून मधून देहसौख्य, रणपीडा व स्त्रीपुत्रादिकांस पीडा होईल.

वृषभ :—स्त्रीपुत्रादिकांस पीडा, धननाश, डोळ्यांस व तोंडास रोग होतील, हृद्रोग होईल, व सर्वस्वी दुःख आणि काळजी होईल.

मकर :—सदा रोग, जाया व पुत्रादिकांस पीडा, सुखाचा नाश, पराधीन, दरिद्री व चिंताक्रांत होईल.

कुंभ :—हृद्रोग, देहपीडा, पुत्र व कांता यांस पीडा, चिंताक्रांत, शत्रूपासून भीति, परान्नभोजी, असुखी व अतिदीन असा होईल.

**वरील तिन्ही राशींचीं साधारण फलें :**—दुःखी, स्त्रीपुत्रादिकांचा वियोग व अर्थनाश, राजापासून, अग्नीपासून, चोरापासून भीति व बापाबरोबर विरोध होईल.

तूळ :—नीचवृत्ति होईल, कुशील होईल, स्त्रीपुत्रादिकांचा वियोग, धनहानि, राजदंड, चोरापासून, व अग्नीपासून भीति, नेत्ररोग, क्षयादिपीडा, मृत्युसम रोग होतील, अनेकांशीं शत्रुत्व घडेल, अनेक मिथ्या आरोप येतील, कदाचित् मृत्यु देखील येईल, नाना मनोविकार, परदेशीं गमन करावें लागेल. नीच लोकांबरोबर सहवास, राजादिकांचा महत्कोप होईल.



वर सांगितलेलीं राशींपासून आलेलीं जीं फलें तीं स्थानास लावल्यानंतर त्या दशेचें खरोखर फल काय मिळावयाचें तें कळेल. त्यासाठीं स्थानस्थ रवींचीं फलें वर्णन करितों. या दोन्हींचा विचार केल्याशिवाय एकदम नुसतीं राशिफलें किंवा नुसतीं स्थानफलें सांगणें मोठें चुकीचें काम आहे.

### स्थानकोष्टक.

| बलक्रम. | रवि. | चंद्र. | मंगळ. | बुध. | गुरु. | शुक्र. | शनि. | राहु व केतु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लाभ. | लाभ. | लाभ. | लग्न. | लग्न. | लग्न. | लाभ. | लाभ. |
| २ | पराक्रम. | लग्न. | पराक्रम. | लाभ. | नवम. | नवम. | सहज. | दशम. |
| ३ | दशम. | धन. | दशम. | दशम. | पंचम. | लाभ. | दशम. | पराक्रम. |
| ४ | भाग्य. | भाग्य. | भाग्य. | भाग्य. | लाभ. | दशम. | षष्ठ. | षष्ठ. |
| ५ | षष्ठ. | चतुर्थ. | षष्ठ. | धन. | दशम. | धन. | नवम. | भाग्य. |
| ६ | धन. | दशम. | लग्न. | सुत. | धन. | पंचम. | धन. | धन. |
| ७ | पंचम. | सप्तम. | सुत. | सुख. | चतुर्थ. | चतुर्थ. | पंचम. | लग्न. |
| ८ | लग्न. | पंचम. | सुख. | सप्तम. | सप्तम. | सप्तम. | लग्न. | पंचम. |
| ९ | चतुर्थ. | पराक्रम. | जाया. | सहज. | पराक्रम. | पराक्रम. | सप्तम. | सप्तम. |
| १० | सप्तम. | व्यय. | धन. | व्यय. | षष्ठ. | षष्ठ. | चतुर्थ. | चतुर्थ. |
| ११ | व्यय. | षष्ठ. | अष्टम. | षष्ठ. | अष्टम. | अष्टम. | अष्टम. | व्यय. |
| १२ | मृत्यु. | अष्टम. | व्यय. | मृत्यु. | व्यय. | व्यय. | व्यय. | अष्टम. |

वरील दिलेल्या कोष्टकांत जसे प्रत्येक ग्रहाचे स्थानबलांचे क्रम लाविलेले आहेत त्याप्रमाणें ते ग्रह इष्ट अनिष्ट फलें देत असतात.

कोणत्याहि ग्रहाचे महादशेचें फळ काढावयाचें असेल तर नंबर १ कोष्टकांत त्याचा कोणता क्रम आहे तो पहावा, नंतर नंबर २ कोष्टकांत त्याचा कितवा क्रम लागतो तें पहावें. या दोन्ही गोष्टींचा विचार केल्यावर त्या ग्रहाचे महादशेचें खरें फळ ह्मणजे राशिफळ व स्थानफळ या दोहोंचें जें मिश्रण तें मिळेल.

## रवीचीं स्थानफलें.

**केंद्रस्थ रवीचीं फलें:**—नृपदंड, दुःख, स्थानच्युति, बंधुवियोग, चित्तपरिभ्रम.

**त्रिकोणस्थ रवीचीं फलें:**—बुद्धिभ्रम, राजविमानन, सौख्यादिहानि, पितृमरण, व कर्मादिवैकल्य.

**अष्टमस्थ रवीचीं फलें:**—देहकष्ट, अग्नीपासून पीडा, चातुर्थिक ज्वर, नेत्रविकार, अतिसार, व स्थानच्युति.

**व्ययस्थ रवि असल्यास:**—क्लेश, अर्थहानि, स्त्री-बंधु-पुत्र-भूमि वगैरेंचा नाश, पितृमरण, कलह, राजभय, पादरोग व देशांतरगमन.

**धनस्थानीं रवि असल्यास:**—पुत्रोत्पत्ति, विपत्ति, क्लेश, बंधुवियोग, दुःख, कलह, वाग्दूषण, क्रोध, स्त्रीनाश, धननाश, व नृपभय.

**तृतीयस्थानीं रवि असल्यास:**—धैर्य व महत्सुख प्राप्त होईल. राजाकडून मान मिळेल. राजाकडून नौकरी मिळेल. धनप्राप्ति होईल. परंतु बंधुवैर असेल.

**लाभस्थानीं रवि असल्यास:**—धन मिळेल. चांगलीं कामें करण्याची इच्छा व ती पुरविण्याचे प्रसंग येतील, अंगीं धैर्य येईल, उद्योगांत सिद्धि प्राप्त होईल, यश मिळेल, देहसौख्य लाभेल व पुत्रादिकांसहि सुख मिळेल.



**चतुर्थस्थानीं रवि असल्यास:**—सुख व द्रव्य वगैरेचा नाश होईल. चाकर, बायको वगैरेची हानि होईल. स्थानच्युति, चोर, विष, अग्नि व शस्त्र यांपासून भय, व स्थानच्युति होईल.

**सप्तमस्थ रवि असल्यास:**—बायकोस रोग होईल, कदाचित् मरणही पावेल, वाईट प्रकारचें अन्न खाण्यास मिळेल, दरिद्री व पराधीन राहील व शत्रू उत्पन्न होतील.

**दशमस्थ रवि असल्यास:**—राज्य, धन, वगैरेचा लाभ, उद्योगांत यश, जयप्राप्ति होईल, व राजापासून मान वगैरे मिळेल.

## लक्षांत ठेवण्याजोगे मुद्दे.

स्थानफलांमध्यें ज्याठिकाणीं अनिष्ट फलें सांगितलेलीं असतील त्याठिकाणीं नेहमीं ही गोष्ट ध्यानांत ठेवावी कीं, जर त्याठिकाणीं तो ग्रह नंबर १ कोष्टकांत लाविलेले अनुक्रमामध्यें वर असेल तर तीं अनिष्ट फलें न मिळतां राशिफलाचा जोर विशेष चालेल. उदाहरणार्थः—चतुर्थ स्थानीं रवि असला तर त्याचे महादशेंत तो मनुष्य कंगाल होईल, पण जर तो त्या ठिकाणीं स्वगृहीं किंवा उच्चीचा असला तर राशिफल १०० त ६० या प्रमाणानें मिळेल, व स्थानफल १०० त ४० या प्रमाणानें मिळेल. मुख्य राशीचे फलावर जास्त लक्ष ठेवावें. ही गोष्ट ध्यानांत ठेवणें हें दशा, अंतर्दशा, उपदशा व विदशा यांतील फलें सांगतांना विशेष जरूरीचें आहे. राशिफल ...चफलापेक्षां जास्त जोराचें असतें. उदाहरणार्थः—

... रवि असला तर तो फारच उत्तम फल देतो,

परंतु जर तो नीचांत असला तर तो मनुष्य दरिद्री होतो. कारण राशिफलाचा जोर स्थानफलापेक्षां अधिक आहे.

मेषेचे रवींत पापग्रहांचा योग झाला किंवा पापग्रहाची त्याजवर पूर्ण दृष्टि असली तर इष्टफळामध्यें ह्मणजे, योगामध्यें दृष्टीचीं वर सांगितलेलीं फलें महादशेंत मिळतात. शुभयुति किंवा शुभदृष्टि असली तर तीं देखील फलें महादशेंत मिळतात. हा योग किंवा ही दृष्टि जर तो रवि नेष्टस्थानीं असतांना त्याजवर पडलेली असेल तर, राशिफळ, अनिष्टस्थानफळ, व इष्ट किंवा अनिष्ट दृष्टि, किंवा योगफळ, हीं तिन्ही महादशेंत अनुभवास येतील. ह्मणून सूर्याचे महादशेचीं फलें थोडक्यांत खालीं देतों.

१ जर सूर्याची उत्कृष्ट दशा असेल तर त्या दशेंत मनुष्यास ज्ञानप्राप्ति, व सुखप्राप्ति, शौर्यवृद्धि, पुत्र व बुद्धि, व विद्वान् लोकांत मान व यशवृद्धि होईल.

२ सूर्याची अनिष्ट दशा असली तर उद्योगास फल येणार नाहीं, द्रव्यहानि होईल व रोग होईल, चित्तप्रकोप होईल, राजकोप व दंड होईल, बापावर अरिष्ट येईल व अग्नीपासून पीडा होईल.

३ मूल त्रिकोणस्थ, स्वक्षेत्रीं, उच्चीचा रवि असला, किंवा जर तो लाभस्थानीं, दशमस्थानीं किंवा भाग्येश, किंवा दशमेश युक्त असला, तर त्याचे महादशेंत महासौख्य, धनलाभ, शुभ कर्में, अत्यंत राजसन्मान, सुताधिपयुक्त असेल तर पुत्रलाभ होईल. रवि बलयुक्त असेल तर राजाची कृपा होईल, धन पुष्कळ प्राप्त होईल.



४ रवि नीचीचा, षष्ठ, अष्टमस्थानीं, व्ययस्थानीं दुर्बल किंवा पापयुक्त असला तर, किंवा राहु-केतु-युक्त असला तर, किंवा अनिष्ट स्थानाचा मालक असला तर, त्याचे महादशेंत महापीडा, धन-धान्य-नाश, राजकोप व दंड, प्रवास, पितृनाश किंवा रोग, घरांत नेहमी अशुभ गोष्टी होतील. पितृवर्गाविषयीं मनांत नेहमी ताप उत्पन्न होईल, लोकांशीं वैर होईल. परंतु शुभ दृष्टि किंवा शुभ योग असला तर त्यांत कांहीं सुख मिळेल. पापयुक्त असला तर पाप फल मिळेल.

## रवीचीं स्थानपरत्वें व राशिपरत्वें विशेष फलें.

१ मेष लग्न असतां जर धनस्थानीं रवि असेल तर त्याचे महादशेंत चोरीचा आळ येऊन कैद होईल, व नेत्ररोग होईल.

२ कोणत्याहि लग्नीं रवि असेल तर त्याचे महादशेंत शरीरांत ऊष्ण विकार जास्त होईल, व स्त्रीस सदैव पीडा होईल.

३ तृतीयस्थानाचे रवीचे महादशेंत पाठचीं भावंडें जगणार नाहींत, हातास पीडा होईल, व आईचे व्ययस्थानीं असल्यामुळें आईस पीडा होईल.

४ मिथुनेचा रवि पराक्रमांत असेल तर त्याचे महादशेंत पिता मरण पावेल.

५ चतुर्थस्थानाचे महादशेंत आई व बाप हे रोगग्रस्त होतील. पंचमस्थानाचे रवीचे महादशेंत बुद्धिनाश व संतानहानि होईल.

६ षष्ठस्थानीं कन्येचा रवि असेल तर, त्याचे महादशेंत बापावरून मोठीं अरिष्टें जातील, व स्त्रीविरह घडेल.

७ सप्तमस्थानीं तूळेचा रवि असेल तर त्याचे महादशेंत त्यास कैद होईल, त्याची स्त्री विलक्षण रीतीनें मृत्यु पावेल व बापास अकालिक मृत्यु येईल.

८ अष्टमांत वृश्चिकेचा रवि असेल तर दशेस आरंभ होतांच बाप मरण पावेल व या महादशेंत त्यास नेत्ररोग व अतिसार होईल.

९ दशमांत मकरेचा रवि असेल तर दशेच्या आरंभीं राजदंड व कैद होईल. ही दशा लहानपणीं आल्यास दशेचे आरंभीं पितृवियोग घडेल व मातृकष्ट होतील.

१० कुंभेचा रवि लाभांत असेल तर ही दशा लहानपणीं आल्यास आईस मृत्यु येईल.

लाभस्थानांत जर रवि असेल तर त्याचे महादशेंत किंवा अंतर्दशेंत ज्येष्ठ संतानाचा नाश होईल.

११ व्ययस्थानीं रवि मीनेचा असेल तर पितृनाश, स्त्रीमृत्यु, व संतानक्षय होईल.

१२ वृषभेचा रवि लग्नीं असेल तर त्याची दशा लागतांच मृत्यु येतो.

१३ तूळेचा रवि षष्ठांत असेल तर त्याची दशा लागतांच मृत्यु येईल.

१४ कर्केचा रवि तृतीयस्थानीं किंवा कन्येचा रवि अष्टमांत असेल तर या महादशेंत बापास मृत्युसमान रोग होतील.

१५ मकरेचा रवि नवमांत असेल तर दशा लागतांच मृत्यु येईल. बाप जिवंत असल्यास त्यासहि मृत्यु यईल व या महादशेंत मातृवियोग घडेल.

१६ कुंभेचा रवि दशमांत असेल तर कैद होईल, व मातृनाश व पितृनाश व तोहि या महादशेंत मरेल.



१७ तूळेचा रवि पंचमात असल्यास या महादशेंत बापास मृत्यु येईल, व विशेष पापदृष्टि असल्यास तो मनुष्य देखील मरण पावेल.

१८ मकरेचा रवि अष्टमांत असेल तर अपमृत्युयोग, बंधुवर्गाचा समूलनाश, व पितृनाश होईल.

१९ कुंभेचा रवि नवमस्थानीं असेल तर त्याचे महादशेंत पितृवियोग होऊन, ज्येष्ठ बंधु नाश पावेल.

२० वृषभेचा रवि व्ययस्थानीं असेल तर दशा लागतांच कैद होईल, डोळे जातील, बंधुवर्गाचा नाश होईल, व त्यास मृत्यु येईल.

२१. सिंहेचा रवि धनस्थानीं असेल तर त्याची महादशा लागतांच स्त्रीवियोग होईल व मातेस दुःख होईल.

२२ कन्येचा रवि सहजस्थानीं असेल तर महादशेंत आईस मृत्युसम रोग होईल व विशेष कुदृष्टि असेल तर आई मरेल.

२३ मकरेचा रवि सप्तमांत असेल तर दशारंभीं स्त्रीवियोग, व कुंभेचा रवि अष्टमांत असेल तर दशारंभीं मृत्यु येईल.

२४ मीनेचा रवि नवमांत असेल तर, किंवा वृषभेचा रवि लाभस्थानीं असेल तर, महादशेंत आई खात्रीनें मरेल.

२५ कर्क लग्न असून षष्ठ, सप्तम, अष्टम, एकादश किंवा द्वादश स्थानीं रवि असल्यास रवीचे दशेंत स्त्रीवियोग होईल.

२६ तूळेचा रवि चतुर्थस्थानीं किंवा पराक्रमस्थानीं असल्यास दशारंभीं मृत्यु येईल.

२७ सिंह लग्न असून व्ययस्थानीं रवि असेल तर दशेंत स्त्रीवियोग आणि पितृवियोग होईल, द्वितीयस्थानीं असल्यास स्त्रीवियोग होईल.

२८ मकरेचा रवि षष्ठांत असल्यास दशा लागतांच अपमृत्युकारक दुखणें येईल, व स्त्रीवियोग होईल. सप्तमस्थानीं कुंभेचा रवि असल्यास स्त्रीवियोग व पितृवियोग होईल.

२९ वृषभेचा रवि दशमांत असल्यास त्याचे महादशेंत पितृवियोग, व राजदंड होईल.

३० कुंभेचा रवि षष्ठांत असल्यास, दशारंभींच मृत्यु येईल. तूळेचा रवि धनस्थानीं असल्यास दशारंभीं कैद भोगावी लागेल, डोळे जातील, स्त्रीवियोग होईल व अखेरीस मृत्यु येईल.

३१ मकरेचा रवि पंचमांत असल्यास, दशेंत सर्व संतानाचा नाश होईल, व त्यास भ्रम होऊन तो वेडा होईल.

## अनुभवावरून मिळालेलीं रवीचीं फलें.

१ वृषभेचा रवि चंद्रयुक्त लग्नीं असल्यास त्याचे महादशेंत मृत्यु येणार नाहीं.

२ मीनेचा रवि चंद्र, मंगळ, व शुक्रयुक्त भाग्यस्थानीं असल्यास महादशेंत मृत्यु येईल.

३ सिंहस्थ रवि लाभस्थानीं असल्यास त्याचे अंतर्दशेंत अकालिक महत् लाभ होतील.

४ धनेचा रवि पंचमांत असल्यास महादशा सौख्यकारक होईल.



५ तूळेचा रवि चतुर्थस्थानीं, असल्यास महादशा लागतांच मृत्यु येईल.

६ मकरेचा रवि चतुर्थांत मंगळयुक्त असेल तर, महादशारंभींच स्त्रीस वैधव्य प्राप्त होईल.

७ मेषेचा रवि दशमांत असून जन्मतःच जर रवीची महादशा असेल तर तो मनुष्य गर्भश्रीमंत जाणावा.

८ कर्केचा रवि पराक्रमस्थानीं असल्यास महादशेंत बापास मृत्यु येईल.

९ तूळेचा रवि जर पराक्रमस्थानीं शनियुक्त असेल तर दशा मृत्युकारक होईल.

१० तूळेचा रवि अष्टमस्थानीं गुरुयुक्त असल्यास महादशा मृत्युकारक होणार नाहीं.

११ नीच रवि अष्टमस्थानीं असल्यास अंतर्दशेंत अपमृत्यु येईल.

१२ पंचमस्थानीं मेषेचा रवि शुक्रयुक्त असेल तर महादशेंत स्त्रीवियोग होईल.

१३ कुंभेचा रवि षष्ठांत असून व्ययस्थानांत शनि असल्यास दशेंत मृत्यु येईल.

१४ मेषेचा रवि लाभस्थानीं असल्यास महादशा लागतांच राजकुलोत्पन्न नसतांही राज्यप्राप्ति होईल.

१५ मेषेचा रवि पंचमस्थानीं असल्यास महादशेंत राजापासून मोठा सन्मान मिळेल.

१६ कन्येचा रवि नवमांत असल्यास महादशा बापास मृत्युकारक होईल.

१७ पंचमस्थानीं धनेचा रवि असून त्याजवर शनीची पूर्ण दृष्टि असल्यास महादशेंत मृत्यु येईल,

१८ वृश्चिकेचा रवि षष्ठांत असल्यास महादशेंत आई मरेल.

१९ वृषभेचा रवि धनस्थानीं शनियुक्त असल्यास त्याचे दशेंत मृत्यु येईल.

२० जर कर्केचा रवि अष्टमांत असेल तर महादशेचे अंतीं मातृ व पितृ वियोग होईल.

२१ मकरेचा रवि चतुर्थांत असल्यास महादशेंत त्याचे दिवस मोठे कष्टांत जातील.

२२ तूळेचा रवि गुरुयुक्त चतुर्थस्थानीं असल्यास महादशेंत मृत्यु येणार नाहीं, पण दिवस मोठे दुःखांत जातील.

२३ मीनेचा रवि दशमांत मंगळयुक्त असेल तर महादशेंत बाप मरेल व धंदा रोजगार मिळेल.

२४ उच्चीचा रवि लग्नांत असल्यास महादशेंत उत्तम यश मिळेल.

२५ कुंभेचा रवि लाभस्थानीं असेल तर महादशा दुःखानें जाईल.

२६ मीनेचा रवि अष्टमस्थानीं असल्यास महादशेंत बाप मरेल.

२७ वृश्चिकेचा रवि पंचमांत असल्यास महादशा फार कष्टांत जाईल, मोठमोठालीं संकटें येतील व संतानाचा नाश होईल.

२८ मिथुनेचा रवि अष्टमांत असल्यास महादशेंत आईस महापीडा होईल.

२९ कन्येचा रवि पराक्रमस्थानीं असल्यास महादशा लागतांच मातेस महान् पीडा होईल.



३० कुंभेचा रवि लाभस्थानीं असल्यास महादशेंत दरिद्रावस्थेंत राहावें लागेल.

३१ लाभस्थानीं वृश्चिकेचा रवि गुरुयुक्त असल्यास महादशेंत राजापासून सन्मान प्राप्त होईल व प्रत्येक कामांत यशोवृद्धि होईल.

३२ कुंभेचा रवि लग्नांत असल्यास महादशेंत मातृनाश होईल व लहानपणीं महारोग होतील, परंतु लग्नेश बलवान् असल्यास मृत्यु येणार नाहीं.

३३ सिंहेचा रवि पंचमांत असल्यास जरी तो दशमेशाचा शत्रु होतो तरी त्याचे महादशेंत बाप मरणार नाहीं पण संतानाचा अगदीं नाश होईल.

३४ वृषभेचा रवि गुरुयुक्त अष्टमांत असल्यास महादशेंत मृत्यु येणार नाहीं, पण गुरुयुक्त नसल्यास महादशेंत मृत्यु येईल.

३५ वृषभेचा रवि अष्टमांत असल्यास दशेच्या अंतीं आईबापांचा मृत्यु होईल.

३६ वृषभेचा रवि षष्ठस्थानीं शनियुक्त असल्यास महादशेंत मृत्यु येईल.

३७ मीनेचा रवि पंचमस्थानीं असल्यास महादशा लागतांच स्त्री मरण पावेल, व स्वतःस कैद भोगावी लागेल.

३८ नीच रवि शनियुक्त लग्नीं असल्यास महादशेंत मृत्यु येईल.

३९ कन्येचा रवि अष्टमस्थानीं असल्यास महादशेच्या आरंभींच बापास मृत्यु येईल.

## रवीची महादशा मृत्युकारक कोणते वेळेस होते त्याविषयीं नियम.

कोणत्याहि मनुष्याचें आयुष्य काढण्यापूर्वी पहिल्यानें तो अल्पायु, मध्यमायु किंवा दीर्घायु आहे हें पहावें. अल्पायु ह्मणजे ३२ वर्षेपर्यंत, मध्यमायु ७० वर्षेपर्यंत आणि दीर्घायु ७० वर्षांचे पुढें वांचणारा असें समजावें, व त्या मुदतींत कोणत्या ग्रहांची अनिष्टदशा येते हें पाहिल्यानें अमुक महादशेंत मृत्यु येईल हें नक्की कळेल. मृत्यूची दशा कायम करणें हें महत्वाचें काम आहे, त्याचप्रमाणें बापाचा मृत्यु काढणें असेल तर पहिल्यानें बाप फार वर्षें किंवा थोडीं वर्षें जगण्याचा मुलाचे पत्रिकेंत योग आहे किंवा काय तें नक्की करावें, नंतर त्या अनुरोधानें दशमस्थानाधिपतीस अनिष्ट दशा कोणती येते ती काढावी. आई व स्त्री यांचा मृत्यु काढण्यापूर्वी वरील प्रमाणेंच विचार केला पाहिजे.


रवीची महादशा मकर किंवा कुंभ लग्न असेल तर शरीरास अनिष्टकारक होते. तसेंच तूळ किंवा वृषभ लग्न असेल तर क्लेशकारक होते. परंतु प्रत्येक रवीची दशा मकर, कुंभ, वृषभ व तूळ लग्नास अनिष्टकारक होत नाहीं. ह्या लग्नास खालीं लिहिलेल्या रवीच्या महादशा मृत्युदायक होतात.

मेष लग्न असून द्वितीयस्थानीं, पापग्रहयुक्त रवि असल्यास, सातवा असून पापयुक्त असल्यास, दशमस्थानीं व एकादशस्थानीं पापग्रहयुक्त असल्यास महादशेंत खात्रीनें मृत्यु येईल, याचें कारण रवीचे महादशेंत रवि निर्बळी असला पाहिजे, तसें वर सांगितलेले ठिकाणीं रवि










सप्तमांश कुंडली.
चवथी कुंडली.
लग्न कुंभ.
शु. ९ बु.
म. र. रा.
८
७
६
शु.
व.
१०
११
५ श.
१२
४
मं. १ के.
२
३ चं.


नवमांश कुंडली.
पांचवी कुंडली.
लग्न सिंह.
३
र. चं गु. २
१ शु.
४
१२
रा. बु. ५
वरुण.
के. ११
मं. ६
१० प्र.
७
८
श. ९


दशांश कुंडली.
सहावी कुंडली.
लग्न मेश.
प्रजा. ११
र. १० रा.
श. ९ शु.
१२
वरुण ८
१
गु. चं. ७
३
बु. मं. २
६
७
के. ४
५


द्वादशांश कुंडली.
सातवी कुंडली.
लग्न कन्या.
४
मं. ३ र.
रा. २ श.
५ प्रजा.
१
६
१२ चं.
गु. शु ७
११
वरु. ९ शु.
के. ८
१०



त्रिशांश कुंडली.
आठवी कुंडली.
लग्न कन्या.
४
३
२
५
शु. १
रा. ६ के.
र. १२
श. चं.
७
११ गु.
९ मं. वरु.
८
बु. १० प्रजा.


षष्ट्यंश कुंडली.
दहावी कुंडली.
लग्न कन्या.
४
३
२
५ र.
१
गु. ६ के.
१२ रा.
७ मं.
११ शु. श.
९ चं.
८
प्रजा.
व. १० बु.

# षोडशांश कुंडली.

नववी कुंडली.

लग्न मिथून.




पहिले कुंडलीची माहिती अंक १० पुस्तक १ मध्यें पान ३६ वर दिली आहे. पुढील कुंडल्यांची माहिती पुस्तक २ मध्यें ४२ पानापासून ४७ पानापर्यंत दिली आहे. ह्या कुंडल्या सन १८९६ सालचे सायन स्पष्ट ग्रहांचे पुस्तकासोबत दशवर्ग साधन कोष्टकें जोडलीं आहेत त्यांवरून कळतील.

NOT TO BE ISSUED

SMT. HANSA MEHTA LIBRARY, BARODA
RARE BOOK COLLECTION
UNIVERSITY LIBRARY

NOT TO BE ISSUED

SHML
M2131

ENTERED

M.2131.

NOT TO BE ISSUED

BF
1651
.J9-1

M 2131